**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**हरकतीच्या मुद्यासंबंधी**

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, तारांकित प्रश्नांवरील चर्चेला सुरुवात करण्यापूर्वी मला सभागृहात एक बाब निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, आपल्या राज्यात अत्यंत पारदर्शी मुख्यमंत्री आलेले आहेत व त्यामुळे राज्याचा कारभार सुध्दा पारदर्शीपणे सुरु झालेला आहे. या पारदर्शीपणाचे माननीय मुख्य मंत्र्यांचे अनुकरण सरकारमधील इतर मंत्री महोदय सुध्दा करायला लागले आहेत. त्याचे एक उदाहरण मी येथे सांगू इच्छितो. काल दि. 1 ऑगस्ट, 2011 रोजी खालच्या सभागृहात शासनातील एका मंत्र्याने आश्रमशाळा मंजूर करण्यासाठी 42 लाख रुपये घेऊन त्याची पोच पावती सुध्दा त्यांच्याच लेटर हेडवर दिली. त्यानंतर या प्रकरणाची रितसर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखलि झाली. ज्याला आश्रमशाळा देण्याचे कबूल केले होते त्याचा विश्वासघात झाला असावा किंवा त्याला आश्रमशाळा मंजूर करण्यात आली नाही म्हणून त्याने ही तक्रार केली. पण अशा प्रकारे तक्रार दाखल करुन कोणत्याही प्रकारची कारवाई मात्र करण्यात आली नाही. कारण सरकारमधील एका मंत्र्याच्याच विरोधात ही फिर्याद असल्यामुळे पोलिसांनी कारवाई केली नाही म्हणून ज्यांनी पैसे दिले ती व्यक्ती न्यायालयात दाद मागण्यासाठी गेली. न्यायालयाने फिर्याद घेऊन शासनाला आदेश दिले की, संबंधितांविरुध्द एफआयआर दाखल करावा. त्यानुसार संबंधित मंत्र्याविरुध्द आयपीसी कलम 420 (34) अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. अशा प्रकारे मंत्रिमंडळात कार्यरत असलेल्या एखाद्या मंत्र्याविरुध्द अशा प्रकारचा 420 खाली गुन्हा दाखल झाला असेल तर त्या मंत्र्याला पदावर राहणे हे पारदर्शी सरकारला कितपत शोभनीय आहे याचा विचार करण्याची गरज आहे. माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, काल विधानसभेत हे प्रकरण मांडण्यात आले पण कोणत्याही प्रकारचा खुलासा शासनाकडून करण्यात आलेला नाही. माझी मागणी अशी आहे की, निदान या सभागृहात तरी आजच्या आज मंत्री महोदयांनी निवेदन करावे. माझ्याकडे 42 लाख रुपये घेतल्याची पोच पावती व पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेल्या एफआयआरची प्रत आहे, ती मी आपल्या माहितीसाठी देण्यास तयार

आहे. एवढेच नव्हे तर ज्या मंत्र्यांच्या विरुध्द अशा प्रकारचा गुन्हा दाखल झालेला आहे त्यांना ताबडतोब राजीनामा देण्यास सांगावे अन्यथा त्यांना मंत्रिमंडळातून काढून टाकावे, यासंबंधी शासनाची भूमिका सभागृहाला जाणून घ्यावयाची आहे. तसेच आपण त्याबाबतीत निदेश द्यावेत अशी माझी मागणी आहे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, एका महत्वाच्या मुद्यावर माननीय विरोधी पक्षनेत्यांना बोलण्याची संधी दिली तशाच प्रकारचा महत्वाचा मुद्दा मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे. तो म्हणजे अनेक वर्तमानपत्रातून प्रसिध्द झालेले आहे की, "आदर्श" सहकारी गृह निर्माण संस्थेच्या बाबतीत जो घोटाळा झालेला आहे त्या प्रकरणाची चौकशी सुरु असताना शासनाचे अधिकारी श्री. ओक यांची देखील चौकशी करण्यात आली. त्यांनी चौकशीतून अशी माहिती दिली की, माननीय मंत्री श्री. नारायण राणे यांनी आदर्शची फाईल वेगाने मंजूर करावी म्हणून इंटरेस्ट घेतला होता. ज्याप्रमाणे इतर मंत्र्यांच्या बाबतीत, मुख्यमंत्र्यांच्या बाबतीत चौकशीचा प्रश्न येतो.......

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या निदर्शनास मला आणून द्यावयाचे आहे की, सभागृहात वर्तमान पत्रातील बातम्यांचा कॉग्नीजन्स घेऊन आरोप करणे उचित नाही, म्हणून आपल्या हरकतीच्या मुद्याची कोणत्याही प्रकारे दखल घेता येणार नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, माझ्याकडे असलेली एफआयआरची प्रत तसेच पैसे घेतल्याची पोच पावती आपल्याकडे देतो. ती प्रत माननीय गृह मंत्र्यांकडे मी दिलेली आहे. म्हणून माझी विनंती आहे की, आजच सभागृहात या विषयाबाबतचे निवेदन करण्यात यावे.

**उप सभापती** : तसे निदेश मी मंत्री महोदयांना देतो.

श्री. विनोद तावडे : महोदय, ज्यांनी पावती दिली त्याने चूक केली असेच म्हणता येईल. कारण इतर कोणतेही मंत्री महोदय अशा प्रकारे पावत्या देत नाहीत, त्यांच्या बाबतीत काय करणार आहात हे समजले पाहिजे. अन्यथा माननीय मंत्री श्री. मोघे यांचे अनुकरण तरी इतर मंत्र्यांनी करावे. अशा प्रकारे पुन्हा एकदा एका आदिवासी मंत्र्याचा बळी जाताना दिसत आहे.

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याची दखल घेण्याच्या सूचना मी मंत्री महोदयांना देत आहे.

श्री. आर.आर.पाटील : महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी, पोच पावती देऊन 30 लाख रुपये घेतल्याची एफआयआरची प्रत माझ्याकडे दिली आहे. अशा प्रकारच्या राज्यात अनेक तक्रारी होत असतात, त्यात किती तथ्य असते हे सांगता येत नाही. तसेच कोणाबद्दलही अशा प्रकारची तक्रार केल्यानंतर ती नोंदवून घेणे हे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार बंधनकारक आहे. त्यामुळे काही वेळा चुकीच्या तक्रारी सुध्दा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एफआयआरची

...3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.......

नोंद झाली याचा अर्थ हे प्रकरण खरे की खोटे या निष्कर्षाप्रत येण्याची आवश्यकता आहे. म्हणून प्रथमदर्शनी कोणी तरी पैसे घेऊन पावती दिली असेल याचा अर्थ प्रथमदर्शनी शंकेला खूप वाव आहे. म्हणून यासंदर्भात संबंधित मंत्री आजच या सभागृहात निवेदन करतील असे मी सभागृहाला सांगू इच्छितो.

--------

...4...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**राज्यात बिटी बियाण्यांची काळ्या बाजारात होत असलेली विक्री**

**(1) *17880 श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.जगदीश गुप्ता, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.केशवराव मानकर, डॉ.रणजित पाटील, श्री.सय्यद पाशा पटेल, श्री.धनंजय मुंडे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजन तेली, श्री.हुसेन दलवाई, श्री. एस. क्यू. ज़मा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयप्रकाश छाजेड, श्री.विक्रम काळे, श्री.रमेश शेंडगे, श्री.हेमंत टकले, श्रीमती उषाताई दराडे** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात 43 लाख हेक्टर क्षेत्रावर कपाशीच्या लागवडीसाठी अंदाजे 1 कोटी 80 लाख बीटी बियाण्यांच्या पाकिटांची गरज असताना बियाणे उत्पादक कंपन्यांनी 50 टक्केच पुरवठा केल्याचे दिनांक 2 जून, 2011 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) राज्यातील बीटी कापसाच्या बियाणाचे भाव वाढविण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांना 400 कोटीचा तोटा सहन करावा लागणार असल्याने त्यांच्यात संतापाचे वातावरण पसरले असल्याचे माहे मे, 2011 मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, राज्यातील सर्वच कापूस उत्पादक जिल्ह्यांमध्ये दुकानदार रुपये 1200 ते 2200 या दराने बियाणे काळ्या बाजारात विकत असल्याचे निदर्शनास आले असूनही तालुका, जिल्हा, विभागीय तसेच राज्य स्तरावर भरारी पथके कार्यरत असूनही त्यांनी कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बियाणे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(5) तसेच बीटी कापसाच्या बियाणांचे दर कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील** : (1) राज्यात 45 लाख हेक्टर क्षेत्रावर कपाशीच्या लागवडीसाठी 180 लाख बीटी कापूस बियाणे पाकिटांची मागणी जिल्ह्याकडून करण्यात आली होती. दिनांक 14/7/2011 अखेर 200 लाख पाकीटांचा पुरवठा बियाणे उत्पादक कंपन्यांनी केलेला असून पुरवठयाची टक्केवारी 111 % इतकी आहे.

...5...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(2) सन 2008-09 पासून सन 2010-11 पर्यंत (गेल्या तीन वर्षात) बी.टी. कापूस बियाण्यांचे दर वाढविण्यात आले नव्हते.

राज्यात इलेक्ट्रीसिटी, कर्मचारी पगार, प्रक्रीया, रसायने / औषधे इतर सुविधांचे वाढीव खर्च, पॅकींग इ. खर्चामध्ये वाढ झाल्यामुळे व शेजारील इतर राज्यात बी.टी. कापूस बियाण्यांचे दर वाढविण्यात आल्यामुळे राज्य शासनाने बी.टी. कापूस बियाण्यांचे दर वाढविण्याचा निर्णय दिनांक 13/5/2011 च्या अधिसूचनेद्वारे घेतलेला आहे.

(3) हे खरे नाही.

(4) बीटी कापूस बियाणे विक्री आराखडयानुसार पुरवठा न करणाऱ्या एकूण 6 बियाणे उत्पादक / विक्रेते कंपन्यांचे परवाने एक वर्षासाठी निलंबित करण्यात आले आहेत.

कापूस बियाणे कायद्यातील विविध तरतुदींचे उल्लंघन केल्याप्रकरणी राज्यातील 18 कापूस बियाणे विक्रेत्यांचे परवाने निलंबित करण्यात आले असून 15 परवाने रद्द करण्यात आले आहेत व एकूण 16 पोलीस केसेस दाखल केल्या आहेत. तसेच 11 प्रकरणात बियाणे साठा जप्तीची कारवाई करण्यात आली आहे.

(5) व (6) शासनाने बी.टी. कापसाच्या बियाणांचे दर वाढविण्याबाबत घेतलेला निर्णय जाणीवपूर्वक व अपरिहार्य कारणास्तव घेतलेला असल्याने दर कमी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, मागील तीन चार वर्षांपासून राज्यात विशेष करुन विदर्भ, मराठवाडा, खान्देश व उत्तर महाराष्ट्रातील जळगांव व नगर जिल्ह्यात कापसाच्या संकरित जातीत सुधारणा करुन बी.टी. हे नवीन कापसाचे बियाणे पुढे आले. त्याची उत्पादन क्षमता जास्त असल्याने सहाजिकच शेतकऱ्यांची मागणी सुध्दा वाढली व जास्तीत जास्त शेतकरी या बियाण्याकडे वळले. यावर्षी संपूर्ण राज्यात 43 लाख हेक्टर क्षेत्रावर बी.टी. ची लागवड होणार होती. त्यासाठी 180 लाख बी.टी. बियाण्याचे पॅकेट्स लागणार होते. अशा प्रकारे बी.टी. ची वाढती मागणी सुरु असताना काही शेतकरी 1 जून पासूनच धूळ पेरणी सुरु करतात, नंतर काही शेतकरी या बियाण्याची लागवड करतात. 1 जूनला पेरणी सुरु होते हे लक्षात घेऊन मे महिन्यातच बियाणे उपलब्ध होणे आवश्यक असते. अशा प्रकारे पुढच्या हंगामाची तयारी सुरु असताना या बी.टी. च्या बियाण्याची विक्री सुरु असताना अचानक त्याची दरवाढ करावी अशी मागणी करण्यात आली. बियाणे कंपनीने हंगाम तोंडावर आला असताना शासनाकडे या बियाण्याच्या किंमतीत वाढ झाली पाहिजे अशा प्रकारची अडवणूक करणारे धोरण स्वीकारले.....

(नंतर श्री. जुन्नरे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 1788**0...

श्री. पांडुरंग फुंडकर...

दिनांक 1 एप्रिल पर्यंत कापसाच्या बियाण्यांच्या किमती निर्धारित केल्या जातात असे माननीय कृषी मंत्री या प्रश्नाच्या संदर्भात सांगतील. बियाणे कंपन्यांनी सरकारची अडवणूक केल्यामुळे 12 मे, 2011 पर्यंत किंमत ठरु शकली नव्हती ही वस्तुस्थिती आहे. 12 मे रोजी पॅकेटमागे 180 रुपयांचा भाव शासनाने वाढवून दिल्यामुळे 290 कोटी रुपये बियाणे कंपन्यांना मिळाले होते. असे असतांनाही बियाणे कंपन्यांनी मागणी प्रमाणे पुरवठा केलाच नाही. माननीय कृषी मंत्र्यांनी उत्तरात सांगितले आहे की, 111 टक्के बियाण्यांचा पुरवठा जुलै महिन्यात झाला होता. पेरणीचा कालावधी उलटून दीड महिने झाल्यानंतर म्हणजे 14/7/2011 रोजी बियाण्यांचा 111 टक्के पुरवठा झाला होता. शेतक-याला ज्यावेळेस बियाण्यांची गरज होती त्यावेळेस मात्र शेतक-यांना बियाणे उपलब्ध झाले नव्हते. भाव वाढवून दिल्यानंतर किती टक्के बियाण्यांचा पुरवठा झाला तसेच कोणत्या महिन्यात किती पुरवठा झ ाला याची माहिती मंत्री महोदयांनी देण्याची आवश्यकता आहे.

माननीय कृषी मंत्र्याच्या नगर जिल्हयामध्ये सुध्दा बियाणांचा तुटवडा होता नव्हे बियाणे टंचाईच्या बाबतीत नगर जिल्हा आघाडीवर होता. बियाण्याच्या एका पॅकेटचा भाव 950/- रुपये ठरलेला असतांना 1500 ते 2200 रुपयांपर्यंत बियाण्यांचे एक एक पॅकेट्स विकले गेले होते. मागणी आणि पुरवठयाचे संतुलन न राहिल्यामुळे बियाण्याच्यां किमतीमध्ये वाढ झाली होती. बियाण्यांच्या बाबतीत विक्रेत्यांना विचारले तर ते सांगत होते की, बियाणे कंपनी बियाण्यांचा पुरवठा करीत नाही त्यामुळे बियाण्यांचा पुरवठा आम्हाला करता येत नाही. कृत्रिम टंचाई निर्माण करुन राज्यातील शेतक-यांना 450 कोटी रुपयांना गंडवले गेले होते. असे असतांनाही बियाणे कंपन्यांवर काही सुध्दा कारवाई झाली नाही. मंत्री महोदयांनी आपल्या छापील उत्तरात सांगितले आहे की, "कापूस बियाणे कायद्यातील विविध तरतुदींचे उल्लंघन केल्याप्रकरणी राज्यातील 18 कापूस बियाणे विक्रेत्यांचे परवाने निलंबित करण्यात आले असून 15 परवाने रद्द करण्यात आले आहेत व एकूण 16 पोलीस केसेस दाखल केल्या आहेत. तसेच 11 प्रकरणात बियाणे साठा जप्तीची कारवाई करण्यात आली आहे". सभापती महोदय, यासंदर्भात माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, प्रत्येक जिल्हयात अजित -155, मल्लिका-207, महिको, कनक-7351, राशी-2 चे बीटी

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 17880...**

श्री. पांडुरंग फुंडकर...

बियाण्यांचे पॅकेट्स 3-3 हजार रुपयांना विकले गेले होते. परंतु असे असतांना केवळ 18 कापूस बियाणे विक्रेत्यांचे परवानेच कसे काय निलंबित करण्यात आलेले आहेत ? कपंन्यानी शेतक-यांची फसवणूक केली तसेच सरकारला वेठीस धरल्यामुळे या कंपन्याची नावे काय आहेत याची माहिती सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे. या कंपन्यानी ज्या ज्या टप्प्यात बियाण्यांचा पुरवठा केला याचा ब्रेकअप मंत्री महोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. ज्या कंपन्यानी शासनाची व शेतक-यांची फसवणूक केलेली आहे अशा कंपन्यांना काळया यादीत टाकले गेले आहे काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी कापूस बियाण्यांच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केलेले आहेत. यावर्षी कापूस बियाणे कंपन्यांनी त्यांच्या बियाण्यांना भाव वाढवून मिळावेत यासंदर्भात मागणी केली होती. कापूस बियाण्यांचे उत्पादन गुजरात व आंध्रप्रदेश या राज्यातून होत असते. खरे म्हणजे बियाणे उत्पादक राज्याने बियाण्यांचे पहिल्यांदा भाव ठरविणे आवश्यक असते. बियाण्यांच्या संदर्भात मी स्वत: गुजरात सरकारच्या कृषी मंत्र्यांशी तसेच आंध्रप्रदेश राज्याच्या कृषी मंत्र्यांशी अहमदाबाद येथे चर्चा केली होती व त्यानुसार गुजरात सरकारशी चर्चा झाल्यानंतर बियाण्यांचा भाव 930 रुपये ठरला गेला. बियाणे महामंडळाच्या माध्यमातून व्यापारी सोडून जे शेतकरी बियाणे घेतील त्यांना सबसिडी देण्याचे सुध्दा जाहीर करण्यात आले होते. बियाण्यांचा तातडीने पुरवठा करावा यासाठी बियाणे कंपन्यांबरोबर दोनदा बैठक आयोजित करण्यात आली होती. परंतु बियाण्यांचा पुरवठा करण्याचा निर्णय उत्पादक राज्य लवकर निर्नय घेत नसल्यामुळे बियाणे मिळण्यास विलंब झाला ही वस्तुस्थिती आहे. नंतरच्या काळात शासनाबरोबर कंपन्याचे करार झाल्या प्रमाणे सर्व जिल्हयात बियाण्यांचा पुरवठा झाला होता.

मला सभागृहाला सांगावयाचे आहे की, शेतक-यांकडून विशिष्ट प्रकारच्या बियाण्यांची मागणी होत असते. राज्यामध्ये साधारणत 74 कंपन्या बीटीचे बियाणे पुरविण्याचे काम करीत असतात तसेच बियाणे कंपन्याची सर्व माहिती पटलावर ठेंवण्यास मी तयार आहे. राशी-2, कनक, अजित सीड्स तसेच मल्लिका या विशिष्ट कंपन्यांच्या बियाण्यांचीच शेतक-यांकडून मागणी होत असते. त्यामुळे काही जिल्हयात पुरवठा व मागणी यामध्ये मोठी विसंगती निर्माण झाली होती.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 1788**0...

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ...

महिको कंपनीने सरकार बरोबर जो एमओयु केला होता त्या प्रमाणे त्यांनी बियाण्यांचा पुरवठा केला होता. परंतु कंपन्या काही खाजगी व्यापा-यांकडून ॲडव्हान्स बुकिंग करतात, पैसे घेतात व नंतर व्यापा-यांनाही वा-यावर सोडून देतात व त्या माध्यमातून शेतक-यांनाही वा-यावर सोडून देत असतात. सन्माननीय सदस्यांनी बियाण्यांचा पुरवठा टप्प्या टप्प्याने कसा झाला आहे असा प्रश्न विचारल्यामुळे त्यासंदर्भातील सर्व माहिती मी देण्यास तयार आहे. परंतु कोणत्या महिन्यात किती पुरवठा झाला यासंदर्भातील माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नसल्यामुळे ही सर्व माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास मी तयार आहे. बियाणे किती उपलब्ध झाले याची माहिती आता सुध्दा माझ्याकडे उपलब्ध आहे. मार्च 2012 पर्यंत कोणत्याही सीड कंपन्यांनी राज्यातील व्यापा-यांकडून अगाऊ बुकिंग करुन पैसे घ्यावयाचे नाहीत अशा प्रकारच्या सक्त सूचना आम्ही कंपन्यांना दिलेल्या आहेत. बियाण्यांच्या संदर्भात राज्याबरोबर एमओयु करावयाचा, बियाण्यांची उपलब्धता किती आहे ते सांगावयाचे व सरकारच्या संमतीने मार्च 2012 नंतर बुकिंग करुन बियाणे उपलब्ध करुन द्यावे अशा प्रकारचे निर्देश कंपन्यांना दिलेले आहेत. पैसे घेऊन व्यापारी व शेतक-यांना लुटण्याचा जो प्रयत्न या पूर्वी केला जात होता तो आता थांबणार आहे.

या वर्षी काही जिल्हयांमध्ये कापसाचे बियाणे 2400,1500,1800,3000 पर्यंत विकले गेल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. बियाण्यांच्या संदर्भात कोणती कारवाई करण्यात आलेली आहे याची सर्व माहिती मी सभागृहाला दिलेली आहे. जिल्हा गुण नियंत्रण अधिका-यांकडून तसेच शेतक-यांकडून महिको कंपनीच्या विरोधात 18 केसेस दाखल झालेल्या आहेत. बियाणे खरेदीमध्ये व्यापा-यांची देखील फसवणूक झालेली आहे. असे प्रकार जे घडत होते त्यावर नियंत्रण आणण्याचा शासनाचा प्रयत्न सुरु असून कपन्यांच्या विरोधात कठोर कारवाई करण्यात आलेली आहे. यासंदर्भात हेल्पलाईन सुध्दा सुरु करण्यात आलेली आहे. आता कापसाच्या बियाण्यांचा पुरवठा शेतक-यांना झालेला आहे. मला सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना तसेच सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांना विनंती करावयाची आहे की, बियाणे उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात काही उणिवा राहिल्या असतील व त्यासंदर्भात आपण सूचना केल्या तर पुढील वर्षाच्या धोरणामध्ये त्या सूचनांचा अंतर्गत निश्चितपणे करता येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..4...

**ता.प्र.क्र.: 1788**0...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पहिल्यांदाच महाराष्ट्रातील शेतक-यांना आपल्या राज्यात कृषी खाते असल्याचे जाणवल्यामुळे मी माननीय कृषी मंत्र्यांचे अर्धवट अभिनंदन करणार आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ KGS/ KTG/ शरद.. 11:20

ता.प्र.क्र.17880..

श्री.दिवाकर रावते...

गेल्या दहा वर्षाचा इतिहास आपण पहावा. माननीय मंत्र्यांकडून करतो, पाहतो अशा प्रकारचीच आश्वासने दिलेली आहेत. आज कृषी अधिकाऱ्यांनी गडगंज पैसा कमावलेला आहे. त्यांच्या संपत्तीची आपण चौकशी केली तर आपल्यालाच धक्का बसेल की, आपण इतके वर्षे काय केले ? बियाणे, खत विक्रेते आहेत त्यांच्यावर धाडी घातल्या. प्रथमच आपल्या कादकिर्दीमध्ये कृषी खात्याच्या अधिकाऱ्यांना आपल्याला असे काम करावे लागते असे कळले म्हणून मी आपले अर्धवट अभिनंदन केले. कारण अजून ते काम पुढे पूर्ण व्हायचे आहे. जे काम हाती घेतले आहे ते पूर्ण झाले पाहिजे. ते प्रकरण जर मिटवले तर अपूर्णच राहणार. त्यामुळे आमचे अभिनंदन अर्धवट राहील. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, ते काम पूर्ण झाले पाहिजे.

सभापती महोदय, या लेखी उत्तरातच थोडी विसंगती आहे. 45 लाख हेक्टर क्षेत्रासाठी 180 लाख बीटी कापूस बियाणांची मागणी होती असे आपण नमूद केले आहे व पुढे असे म्हटले आहे की, 200 लाख पाकिटांचा पुरवठा झालेला आहे. म्हणजे मागणी पेक्षा पुरवठा जास्त झाला. 110 टक्के पुरवठ्याची टक्केवारी होती. असे आपणच लेखी उत्तरात नमूद केले आहे. याच उत्तरात आपण नमूद केले आहे की, बीटी कापूस बियाणे विक्री आराखड्यानुसार पुरवठा न करणाऱ्या एकूण 6 बियाणे उत्पादक/विक्रेत कंपन्यांचे परवाने एक वर्षासाठी निलंबित करण्यात आले आहेत. आपण वर सांगता की, 110 टक्के पुरवठा झाला. म्हणजे मग तक्रार असायला नको होती. तक्रारी वाढलेल्या आहेत हे मान्य केलेले आहे. त्यामुळे मी कृषी अधिकाऱ्यांना मनापासून धन्यवाद देतो की, त्यांनी शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे लक्ष देऊन कारवाई करण्याची दक्षता दाखविली. मी हे 33 जिल्ह्यांमध्ये बघत होतो. विदर्भ, मराठवाडा, खान्देश येथे अधिकाऱ्यांनी जागरूकता दाखविली आहे. शेजारच्या राज्यात दर वाढले म्हणून आपल्या राज्यात वाढविले असे आपण म्हटले आहे. ते पटणारे नाही. शेजारच्या राज्यात महाराष्ट्रापेक्षा डिझेल आणि पेट्रोलचे दर स्वस्त आहेत. आंध्रप्रदेशमध्ये जाऊन टॅन्कर फुल केला जातो. गुजरातमध्ये टॅन्कर फुल केला जातो आणि मग ते ट्रक, टॅन्कर आपल्या राज्यातून पास होतात. असे असताना शासन त्याचे समर्थन करीत आहे. माझे एवढे म्हणणे आहे की, त्यांनी दर वाढवले म्हणून आपण वाढविले असे म्हणण्यापेक्षा आपणच

..2

ता.प्र.क्र.17880..

श्री.दिवाकर रावते...

आपल्या राज्यातील शेतकऱ्यांची काळजी घेतली पाहिजे. आपण पुढच्या वर्षी नियंत्रण आणणार असल्याचे म्हणत आहात.

मी येथे महिको कंपनीचा उल्लेख करणार आहे. महिको ही जालन्याची कंपनी आहे. प्रत्येक अधिवेशनामध्ये प्रत्येक बियाणासंबंधी येथे महिकोची तक्रार होतेच. येथे महिकोवर कारवाई करण्याची घोषणा होते. वाटल्यास आपण मागचा इतिहास काढून पहावा. तरी पुन्हा एकदा महिकोने व्यापाऱ्यांना पुरवठा करतो असे सांगितले आणि तो केला नाही. महिकोने व्यापाऱ्यांना सांगितल्याप्रमाणे किती टक्के पुरवठा केला आहे ? त्यासंबंधातील आकडा माझ्याकडे आहे. तो जर आकडा शासनाकडे नसेल तर मग मी तो आकडा सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांना द्यावयास सांगतो. ही परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. महिको वर एक वर्षाची नव्हे तर पाच वर्षाची बंदी घातली पाहिजे. या कंपनीला काळ्या यादीमध्ये टाकू नये. काळ्या यादीमध्ये टाकले तर त्या कंपनीचा परवानाच रद्द होईल. तेव्हा महिको कंपनीवर शासन पाच वर्षाची बंदी घालणार आहे काय ? आपण अपरिहार्य कारणास्तव म्हणत आहात ते मला कळले नाही. शासनाने बीटी कापसाच्या बियाणांचे दर वाढविण्याबाबत घेतलेला निर्णय जाणीवपूर्वक व अपरिहार्य कारणास्तव घेतला असल्याचे नमूद केले आहे. त्याचा आपण खुलासा करणे आवश्यक आहे. शेतकऱ्याला कर्ज काढून बियाणे घ्यावे लागते. तेव्हा शेतकऱ्याला आणखी कर्जाच्या खाईत लोटण्यापेक्षा, कर्जमाफी, सबसिडी हे करण्यापेक्षा हा दरच आपण नियंत्रित करून दिला तर योग्य होईल. आपण खताला सबसिडी देतो. ती थेट शेतकऱ्यांकडे गेली पाहिजे. त्यामुळे शासनाला कोणती अपरिहार्यता होती याचा खुलासा करावा. एक छोटी गोष्ट आहे. आपण 16 पोलीस केसेस दाखल केल्या असा उल्लेख आहे, त्या ऐवजी 16 पोलीस गुन्हे दाखल केले असा उल्लेख का केला नाही ? तेव्हा आपल्या अधिकाऱ्यास मराठीचा वापर करण्यास सांगावे एवढी पुन्हा एकदा सूचना करतो.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, येथे माहिकोचा उल्लेख झालेला आहे. आपण माहिकोवर पहिल्यांदाच कारवाई केलेली आहे. त्यांना परवाने रद्द का करण्यात येऊ नये अशा प्रकारची शो-कॉज नोटीस दिलेली आहे. या कंपनीकडून राज्यात उद्या विक्रीसाठी येणाऱ्या बियाणांवरच निर्बंध घालावेत हे कायदेशीरदृष्टया तपासून पाहून कारवाई करण्याचा विचार करण्यात येत आहे.





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

पहिल्यांदाच अशा प्रकारची कारवाई आपण या कंपनीवर केलेली आहे. गुजरात, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश यांनी स्वत:चा बियाणे कायदा मंजूर केला. राज्याचा स्वत:चा वितरण,विपणन, किंमती ठरविणे इत्यादी संबंधीचा कायदा होता. गुजरात उच्च न्यायालयाने, गुजरात सरकारने तयार केलेला कायदा रद्दबातल ठरविला आहे. सरकार प्रयत्न करीत नाही असे नाही. शेतकऱ्यांना संरक्षण मिळावे म्हणून राज्य शासन प्रयत्न करीत आहे, कार्यरत आहे. ज्या कंपन्यांनी कमी पुरवठा केला आहे, त्यांच्यावर आम्ही कारवाई केली आहे. तसेच काही कंपन्यांनकडून आपण जास्तीचा पुरवठा वाढवून घेतला आहे. शेतकऱ्यांची अडवणूक होऊ नये म्हणून पुरवठा वाढवून घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्यांच्या भावना आहेत की, मोठ्या कंपन्यानी जादा दराने विक्री केलेली आहे, त्यांच्यावर कारवाई करावी. त्यासंबंधातील पुरावा दिल्यानंतर जी काही कारवाई करणे शक्य आहे, ती निश्चितपणे केली जाईल.

**उप सभापती** : सदर प्रश्नासाठी मी 18 मिनिटे दिलेली आहेत. बाकीच्या सन्माननीय सदस्यांचे देखील प्रश्न आहेत. त्यामुळे मी आता पुढचा प्रश्न पुकारीत आहे.

.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## रायगड जिल्ह्यातील ३ सहकारी बँका बुडीत निघाल्याबाबत

**(२) * १८१९४ श्री.संजय केळकर , श्री.विनोद तावडे , श्री.सय्यद पाशा पटेल :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील गत ३ वर्षात ३ सहकारी बँका बुडीत निघाल्याने जनतेच्या किमान रु.१००० कोटीच्या ठेवी या ३ बँकात अडकून पडल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास अशा बुडीत निघालेल्या सहकारी बँकांमधील अडकलेल्या ठेवी ठेवीदारांना परत मिळवून देणेबाबत शासनाने काही उपायायोजना केल्या आहेत काय, असल्यास त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) सहकारी बँका बुडीत जाण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तद्नुसार संबंधित संचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश सोळंके, श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याकरिता :** (१) होय. रोहा, गोरेगांव व पेण या तीन नागरी सहकारी बँकामध्ये एकूण ठेवींची रक्कम सुमारे रु.८६६.१३ कोटी अडकून पडली आहे.

(२) १) रोहा व गोरेगाव या दोन को.ऑप.बॅकांच्या ठेवीदारांना रु.१ लाखापर्यंतच्या ठैवी परत करण्यासाठी डीआयसीजीसी कडून क्लेम मंजूर करुन घेऊन रक्कम रु. ७८.९३ कोटी इतक्या ठेवी परत करण्यात आल्या आहेत.

२) पेण को.ऑप अर्बन बॅकेच्या हार्डशिपच्या ठेवीदारांचे क्लेम रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे मंजूरीसाठी पाठवून त्याच्या ठेवी बँकेतील निधी उपलब्धतेनुसर परत करण्यात आल्या आहेत.

३) सदर बॅकांच्या कर्ज वसुलीची व त्यातून ठेवी परत करण्याची कारवाई सुरु आहे.

(३) १. विनातारण कर्ज देणे

२. अपूर्ण कागदपत्रे असलेल्या प्रकरणी कर्ज देणे

३. कर्जाची मोठया प्रमाणात थकबाकी असणे

४. बोगस कर्जवाटप करणे

५. बँकातील गैरव्यवहार

(४) गोरगाव व पेण अर्बन बँकेचे संबंधित संचालक, अधिकारी व कर्मचारी यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच तीनही बँकांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

..5

ता.प्र.क्र.18194....

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, गेल्या तीन वर्षामध्ये रायगड जिल्ह्यात 4 सहकारी बँका बुडित निघाल्या आहेत. त्यामुळे तेथील जिल्ह्यात हाहा:कार उडालेला आहे. पेण अर्बन बँकेच्या संदर्भात माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. पेण अर्बन बँकेच्या संदर्भात मागच्या मार्च अधिवेशनात संघर्ष समितीच्या माध्यमातून एक आंदोलन सुरू झाले होते. उपोषण करण्यात आले होते. मी देखील त्यात कार्यरत होतो. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी आम्हाला भेट दिली होती. त्यांनी आम्हाला काही आश्वासने दिली. परंतु, गेल्या पाच वर्षामध्ये त्या आश्वासनांची पूर्तता झालेली नाही. रायगड जिल्ह्यातील जिव्हाळ्याचा कोणता प्रश्न असेल तर तो म्हणजे पेण अर्बन बँक आहे. त्यामध्ये एक लाखा पर्यंत 1लाख 82 ठेवीदार आहेत. 15151 हे एक लाखाच्या वरचे ठेवीदार आहेत. शैक्षणिक संस्था व निरनिराळ्या अशा 19 संस्था आहेत की, त्यांच्या सुद्धा ठेवी यामध्ये आहेत. या बँकेत 853 कोटी रूपयांचा घोटाळा झालेला आहे. या प्रकरणात पोलिसांनी मात्र त्यांचे काम चोख बजावले आहे. या बँकेच्या संचालकांना तातडीने पोलिसांनी अटक केली. कोणालाही जामीन मिळालेला नाही. दोन ते अडीच महिने धारकर आणि त्यांची टोळी जेलमध्ये होती. या लोकांनी रायगड जिल्ह्यातील लोकांचे जीवन उद्ध्वस्त केले.

ज्या मुद्यावर आम्ही उपोषण सोडले ते मुद्दे अजून तसेच आहेत. त्यामुळे माझे तीन प्रश्न आहेत. त्यावेळी पूर्णवेळ प्रशासक नेमण्याचे मान्य केले होते. त्याप्रमाणे शासन त्या बँकेवर प्रशासक नेमणार आहे काय, असल्यास, किती दिवसात ? ठेवीदारांचे दोन प्रतिनिधी प्रशासक मंडळावर नेमण्याचे मान्य केले होते. त्याप्रमाणे ठेवीदारांचे दोन प्रतिनिधी शासन प्रशासक मंडळावर नेमणार आहे काय ? यासंबंधी सचिवां समवेत देखील चर्चा झाली होती. त्यावेळी देखील आश्वासन देण्यात आले होते. तेव्हा आमच्या तोंडाला पाने पुसू नये एवढीच आमची विनंती आहे. या प्रकरणी 270 कोटी रूपयांची मालमत्ता पोलिसांनी सील केली आहे. त्यातून अनेक ठेवीदारांना दिलासा मिळू शकतो. सदर मॅटर फास्ट ट्रॅक कोर्टामध्ये चालवले तर ठेवीदांराना दिलासा मिळू शकतो. त्यामुळे हे प्रकरण फास्ट ट्रॅकमध्ये मुव्ह करणार काय ? रोहा बँकेच्या संचालकांविरूद्ध गुन्हे दाखल होऊन कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. तेव्हा यासंबंधी देखील काही कारवाई करणार आहात काय ? असे माझे चार प्रश्न आहेत.

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 18194....

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, पेण अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेमध्ये झालेल्या अपहारासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी चार प्रश्न विचारले आहेत. दिनांक 23.3.2011 रोजी सन्माननीय सहकार मंत्र्यांबरोबर झालेल्या बैठकीमध्ये प्रशासक मंडळामध्ये ठेवीदारांचे दोन प्रतिनिधी नेमण्यात आले तर ठेवीदारांमध्ये सुरक्षितता वाढेल अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आला. त्या नुसार त्या संघर्ष समितीला ठेवीदारांच्या दोन प्रतिनिधींची नावे कळविण्यास सांगण्यात आले. हा निर्णय पेण अर्बन बँकेच्या बाबतीत घेतला असून इतर बँकाच्या ठिकाणी आवश्यकता असेल तर त्याप्रमाणे सूचना दिल्या जातील. दुसरा प्रश्न पूर्ण वेळ प्रशासक नेमण्यात येणार काय? असा विचारण्यात आला. त्या बाबत सुध्दा सन्माननीय सहकार मंत्र्यांबरोबर चर्चा करुन एक महिन्याच्या आत निर्णय घेण्यात येईल....

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, प्रशासक नेमण्याचे त्यांनी कबूल केले आहे. नाही तर हे वर्षानुवर्षे असेच चालत राहील....

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, तशी परिस्थिती राहणार नाही. प्रशासक मंडळ कार्यरत आहे. आपण केलेल्या सूचनेची तपासणी करणे सन्माननीय सहकार मंत्र्यांच्या अधिकारात आहे. त्या मुळे या बाबतीत एक महिन्याच्या आत कारवाई केली जाईल. सभापती महोदय, तिसरा प्रश्न फास्ट ट्रॅक कोर्ट निर्माण करुन जप्त केलेल्या मालमत्तांची विक्री करण्यासाठी न्यायालयाची अनुमती मिळविण्या संदर्भातील आहे. त्या संदर्भात निश्चितपणे पी.आय.एल. दाखल करण्यात आले आहे. त्यामध्ये याचिकाकर्त्यांच्या याचिकेचा समावेश करुन न्यायालयाकडून आदेश मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी परवाच्या दिवशी सभागृहामध्ये पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेत असतांना पेण अर्बन बँकेच्या बाबतीत पोलीस खात्याने चांगल्या प्रकारे तपास करुन एक हजार पानांचे आरोप पत्र दाखल केले. इतकेच नव्हेतर गेल्या तीन-चार महिन्यात पोलिसांनी व पोलीस अधिक्षकांनी सुध्दा चांगल्या प्रकारे तपास केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. अशाप्रकारे जलद तपास करण्यास पोलिसांना प्रोत्साहन मिळावे यासाठी आपण या अधिकाऱ्यांना व पोलिसांना एक वेतनवाढ देण्यात यावी अशी मी सूचना करतो. त्या ठिकाणी प्रशासक नेमून बॅकेचा कारभार सुधारणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांच्या पेक्षा मला या क्षेत्रातील अनुभव थोडा जास्त आहे. प्रशासक मंडळानें सुध्दा चांगल्या प्रकारे काम



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केले आहे. पेण अर्बन बँकेचा तपास पोलिसांनी ज्या गतीने केला त्यामध्ये तेथील प्रशासक मंडळसुध्दा पोलिसांबरोबर अभिनंदनास पात्र आहे. ज्या लोकांनी ठेवीदारांचे पैसे खाल्ले आहेत त्यांचे आज वाभाडे निघत आहेत. तो अपहार थांबविण्याचे काम ज्या गतीने करण्यात आले आहे त्या बाबतीत पेण अर्बन बँक हे सहकार विभागासाठी एक मॉडेल ठरेल. कितीही फ्रॉड झाला तरी त्याचा तपास कशाप्रकारे केला पाहिजे याचे पेण अर्बन बँके हे एक उदाहरण आहे. या ठिकाणी मंत्रीमहोदयांनी उत्तर देतांना सांगितले की, शिष्टमंडळ भेटल्यानंतर दबाव येतो. परंतु कायद्यातील तरतुदीनुसार आरबीआय च्या नियमाप्रमाणे आपल्याला प्रशासक मंडळ नेमावे लागते. प्रशासक मंडळ नेमण्याचा आपल्याला अधिकार नसल्यामुळे आपण ते उत्तर दुरुस्त करावे. आपल्याला आरबीआय ला विचारावे लागेल की,हा कायदा संपूर्ण महाराष्ट्रासाठी लागू आहे काय? तसे आपल्याला करता येणार नाही.

काल सन्माननीय गृह मंत्र्यांनी सभागृहामध्ये एक निवेदन केले की, जे ठेवीदार आहेत त्यांच्या ठेवींचे पूर्ण संरक्षण करणारा कायदा या राज्यामध्ये आणीत आहोत. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन केले.तसे झाले तरच खऱ्या अर्थाने ठेवीदारांना संरक्षण मिळेल. जे ठेवीदार आहेत त्यांच्या 1 लाखावरील ठेवींना आपण कायद्याने संरक्षण देऊ शकत नाही. यामध्ये लोकांची विनाकारण फसवणूक होते ती होता कामा नये. त्याचप्रमाणे ज्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत त्या आपण केलेल्या नाहीत तर सीबीआय ने केल्या आहेत. त्यामध्ये सोन्याच्या तारणांच्या बाबतीत ज्यांनी बोगस एनसी केली आहे त्याचा पहिला क्लेम राहणार आहे. आपण सभागृहाला सांगितले पाहिजे की, 1 लाखाचा इन्शुरन्स दिल्यानंतर 300 कोटी रुपये ठेवीदारांना मिळतील आणि बाकीचे 400 कोटी रुपये मालमत्ता विकल्यानंतर मिळतील. ही प्रॉपर्टी विकल्यानंतर त्यातील पहिले पैसे आरबीआयच्या इन्शुरन्स कंपनीकडे जाणार आहेत. किंवा आरबीआयचे नियम बदलून त्यांनासांगावे लागेल की, ठेवीदारांचे पैसे दिल्याशिवाय तुमच्या इन्शुरन्सचे पैसे मिळणार नाहीत. तशाप्रकारे राज्य सरकार आरबीआयला सांगणार आहे काय? व नियमामध्ये बदल करण्याबाबत विनंती करणार आहे काय? दुसरा प्रश्न रोह्याच्या बाबतीत असून ज्या संचालकांची मालमत्ता जप्त केली आहे तिचा लिलाव करुन राहिलेले पैसे ठेवीदारांना देणार काय? त्याचप्रमाणे गोरेगावमध्ये सुध्दा तीच परिस्थिती आहे. त्या बँकेच्या चेअरमनच्या कारकिर्दीमध्ये गैरव्यवहार झाला म्हणून त्यांनी आत्महत्त्या केली. त्याठिकाणी ठेवीदाराचे प्रश्न अडचणीत आले आहेत. म्हणून माझा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्न असा आहे की, रोहा किंवा गोरेगाव येथील बँकेची मालमत्मता तातडीने विकण्याचे आदेश राज्य सरकार देणार आहे काय?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पेण बँकेच्या बाबतीत प्रश्न विचारला होता की, 1 लाख रुपयापर्यंतच्या ठेवींच्या संदर्भात शिष्टमंडळाने मागणी केली होती. पेण बँकेसाठी आरबीआयकडे नियमात बदल करण्या संदर्भात एक बैठक आयोजित करुन त्या संदर्भात निर्णय घेतला जाईल. दुसरा प्रश्न असा की, रोहा आणि गोरेगाव येथील संचालकांची मालमत्ता जप्त करुन तिची विक्री किंवा लिलाव करण्याबाबत कारवाई केली जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला विनंती करावयाची आहे की, या बँकेतील अपहारामुळे हजारो ठेवीदार उद्ध्वस्त झाले आहेत हजारो पेन्शनर उद्ध्वस्त झाले आहेत. फास्ट ट्रॅक कोर्टापुढे ही बाब मांडून तातडीने निर्णय घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे त्यासाठी आपण न्यायालयाला विनंती करणार काय? इतकेच नव्हेतर ज्यांनी अपहार केला आहे त्यांना आपण बेड्या घालणार काय?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी फास्ट ट्रॅक कोर्टाबाबत विचारलेल्या प्रश्नाला मी सकारात्मक उत्तर दिले आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, पेण अर्बन बँकेतील घोटाळयामुळे त्या बॅकेमधील जवळ जवळ 450 कामगार हवालदिल झाले आहेत. ज्या संचालकांनी हा अपहार केला, गैरव्यवहार केला त्यांची मालमत्ता आपण जप्त केली. अजूनही पेणमध्ये त्यांच्या अनेक मालमत्ता आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18194 . . . .

श्री.भाई जगताप . . .

अर्थात त्या आपण जप्त केलेल्या नाहीत तर त्या सी.बी.आय.ने केलेल्या आहेत आणि पोलिसांनी यामध्ये तत्परता दाखवून अतिशय चांगले काम केलेले आहे. त्यामध्ये प्रशासकांनी चांगल्या प्रकारची भूमिका बजावलेली आहे. परंतु या संचालकांनी इतर राज्यांमध्ये विशेषत: गुजराथ राज्यामध्ये प्रचंड मोठे जमिनीचे व्यवहार केलेले आहेत आणि माझ्या माहितीप्रमाणे या जमिनीच्या किंमती जवळजवळ 150 ते 200 कोटी रुपयापर्यंत असण्याची शक्यता आहे.पोलिसांच्या प्रथमदर्शनी अहवालानुसार 375 कोटी रुपयांची रिकव्हरी होऊ शकते. माझा माननीय मंत्री महोदयांना स्पेसिफीक प्रश्न आहे की, आज आपल्यासमोर सोर्सेस आहेत. संबंधितांनी केलेले गैरव्यवहार आणि चुकीच्या पध्दतीने खरेदी केलेल्या जमिनीचे व्यवहार आपल्यासमोर आहेत. अशा वेळी शासन या जमिनी त्वरित ताब्यात घेऊन त्यांच्याकडून पैसे रिकव्हर करणार आहेत काय ? हा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा की, 450 कामगारांच्या बाबतीत प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे. माझी तेथे युनियन असल्याने मी तेथील प्रशासकांबरोबर एक बैठक घेतली.त्यांनी कामगारांचे पगार सुरु ठेवलेले आहेत. परंतु याठिकाणी पगार हा विषय नाही. आमच्याकडे अशी माहिती आहे की, पंजाब नॅशनल बँक म्हणजे एक नॅशनल बँक किंवा तत्सम नॅशनल बँक, सदरहू 3 सहकारी बँका टेकओव्हर करीत आहे. यामध्ये कितपत सत्यता आहे ? असे माझे स्पेसिफीक प्रश्न आहे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी पेण को-ऑप.अर्बन बँकेच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केलेला आहे. या बँकेमध्ये जवळजवळ 300 कर्मचारी काम करीत आहेत. परंतु आतापर्यंत सन्माननीय सदस्यांनी जी चर्चा केली, ती ठेवीदारांच्या बाबतीत आहे. सर्व सामान्य लोकांनी किंवा पेन्शनरनी ज्या ठेवी बँकेमध्ये जमा केलेल्या आहेत, त्यांना एक लाखा पर्यंतच्या ठेवी मिळवून देणे त्यांचे संरक्षण करणे हे आपले पहिले काम आहे.

श्री.भाई जगताप (खाली बसून) : त्या सर्व ठेवी कामगारांनी आणलेल्या आहेत हे महत्वाचे आहे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी उत्तर देत आहे. सन्माननीय सदस्यांनी ऐकून घ्यावे. या दृष्टीकोनातून दुसरा पर्याय सांगितला आहे की, या बँकेचे विलीनीकरण व्हावे.त्याबाबतीतील प्रस्ताव तपासावा लागेल. त्यामध्ये नॅशनलाईज बँक किंवा इतर को-ऑपरेटीव्ह बँकेमध्ये विलिनीकरण करुन जर हा प्रश्न सुटत असेल तर त्या दृष्टीकोनातून कार्यवाही केली जाईल.


असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18194 . . . .

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, बँकेची जागा ताब्यात घेण्याच्या दृष्टीकोनातून काय केले जाणार आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मघाशी मी याबाबत उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी याबाबत जो प्रश्न विचारला होता, त्यावेळी मी सांगितले की, यासाठी आपल्याला न्यायालयाची अनुमती घ्यावी लागेल आणि त्यादृष्टीकोनातून आपण प्रयत्न सुरु केलेले आहेत.

श्री. एस.क्यू जमा : सभापति महोदय, महाराष्ट्र में अरबन कोपरेटिव बँकों में संवैधानिक संकट पैदा हो गया है. अरबन कोपरेटिव बँक पर बँकिंग रेगूलेशन एक्ट, महाराष्ट्र कोपरेटिव एक्ट, 1960 और डी.आई.सी.जी. एक्ट लागू होते हैं. डी.आई.सी.जी. एक्ट के अन्तर्गत ठेवीदार को 1 लाख रुपए वापस मिलने की गारन्टी है. नागपुर के 3 अरबन कोपरेटिव बँकों को पुनर्जीवित करने के संबंध में 4 जनवरी 2010 को चीफ सेक्रेटरी की अध्यक्षता में हाई पावर कमेटी बनाई गई थी. इस कमेटी ने सिफारिश की थी कि ठेवीदार को 5 लाख रुपए तक वापस मिलने की गारन्टी होनी चाहिए और इस प्रकार का प्रस्ताव महाराष्ट्र सरकार को केन्द्रीय सरकार के पास भेजना चाहिए. मेरा प्रश्न यह है कि चीफ सेक्रेटरी की हाई पावर कमेटी की सिफारिश के अनुसार ठेवीदारों को 1 लाख रुपए से ज्यादा का संरक्षण देने के लिए सरकार ने क्या किया है ? क्या महाराष्ट्र शासन कोपरेटिव एक्ट, 1960 में संशोधन करने के लिए तैयार है ? केन्द्रीय सरकार के कानून के अनुसार ठेवीदारों को 1 लाख रुपए का संरक्षण मिलता है तो फिर रिजर्व बँक 1 लाख रुपए से ज्यादा जमा करने की परमीशन क्यों देती है ? क्या महाराष्ट्र सरकार ने केन्द्रीय सरकार के पास बँकिंग रेगूलेशन एक्ट और डी.आई.सी.जी. एक्ट में अमेंडमेंट करने का प्रस्ताव भेजा है ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे, तो या प्रश्नाशी संबंधित नाही. तरीपण हा प्रश्न महत्वाचा आहे म्हणून मी उत्तर देतो. एक लाखाच्या वर आणि पाच लाखापर्यंत ठेवी संदर्भात आपण चीफ सेक्रेटरी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. त्यांनी ही शिफारस केलेली आहे आणि राज्य शासनाने सुध्दा रिझर्व बँकेकडे पाच लाखाच्या ठेवीपर्यंत संरक्षण मिळावे अशा प्रकारचा प्रस्ताव पाठविलेला आहे.

. . . . E-3



ता.प्र.क्र.18194 . . . .

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. प्राटील यांनी तीन बँकांपैकी पेण को-ऑप अर्बन बँकेच्या बाबतीत कौतुक केले आणि माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांची पाठ थोपटली. आज शेतकरी कामगार पक्षाचा वर्धापन दिवस असल्याने त्यांनी बहुतेक असे ठरविले असावे की, जरा त्यांचे कौतुक करावे. या विषयाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी प्रश्न विचारला की,रोहा बँकेच्या संचालकांवर चार्टशीट दाखल करुन 1 वर्ष झाले. त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन संबंधितांना अटक व्हावयास पाहिजे.

श्री.आर.आर.पाटील (खाली बसून) : संबंधितांना अटक केली आहे.

श्री.विनोद तावडे : नाही. पण तशी अटक झालेली नाही. तसेच याठिकाणी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्या प्रकरणातील लोकांनी तेथील जमिनी घेतल्या आहेत, त्याठिकाणी अफ्रीकन सफारी व्हावयाची आहे आणि कोणीतरी राष्ट्रीय नेते येऊन गेले अशा प्रकारची त्या भागात चर्चा देखील होत आहे. अशा वेळी या प्रकरणात संबंधितांना अटक करण्यासाठी कोणी तटबंदी केली आहे काय हे आम्हाला माहिती नाही. त्याठिकाणी संबंधितांच्या अटकेच्या बाबतीत तटबंदी घातली आहे काय ? हे माहिती नाही.

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : सन्माननीय मंत्री महोदय श्री.सुनिल तटकरे असे म्हणत आहात काय?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी तटकरे असे म्हटले नाही तर तटबंदी असे म्हटलेले आहे. माननीय मंत्री महोदय श्री.तटकरे असे म्हणत आहेत. सभापती महोदय, येथे कोणी तटबंदी केली काय असे मी म्हटलेले आहे.जर तेथील संचालकांनी गैरप्रकार केले असतील आणि त्यांना अटक होणार असेल तर तुम्ही काय करणार आहात ? ही बघ्याची भूमिका कधी संपणार आहे. माझा असा प्रश्न आहे की, संबंधितांना ताबडबोब अटक होणार आहे काय ? हे सरकारने सांगावे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, रोहा बँकच्या संदर्भात प्रशासक आणि जिल्हा निबंधक कार्यालयाने म्हणजे गर्व्हमेंट प्लीडरचे मत घेऊन पोलीस स्टेशनमध्ये दि.15-10-2007 रोजी तक्रार दाखल केलेली आहे.

. . . E-4



ता.प्र.क्र.18194 . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी संबंधितांच्या अटकेबाबत विचारीत आहे. त्यांना अटक केली आहे काय ?

**उप सभापती** : प्रश्न क्रमांक 17803 . . . .

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक 17803 . . . .

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, छापल्याप्रमाणे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला स्पेसिफीक उत्तर पाहिजे. रोहा, गोरेगांव व पेण या तीन नागरी सहकारी बँकांमधील संचालकांना अटक का केलेली नाही ? याबाबतीत आपल्या विभागाने काय केले आहे ? तुम्ही संचालकांना पाठीशी घालत आहात काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, आम्ही संबंधितांना पाठीशी घातलेले नाही.आम्ही तक्रार दाखल केलेली आहे आणि पोलीस विभागाकडे आम्ही वारंवार पाठपुरावा करीत आहोत आणि संबंधितांवर कारवाई करु.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, याबाबतीत माननीय गृह मंत्र्यांनी उत्तर द्यावे अशी माझी विनंती आहे. पोलीस खाते संबंधितांना अटक करण्यासाठी टाळाटाळ करीत आहे. तसे असेल तर सांगावे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी असे काही म्हटलेले नाही. आम्ही पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केलेली आहे आणि गुन्हा नोंदविण्याबाबत वारंवार पाठपुरावा करण्यात येत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय गृह मंत्र्यांनी याबाबत सांगावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या बँकेच्या भ्रष्टाचाराच्या, गैरप्रकारांच्या संदर्भात पोलिसांनी चांगल्या प्रकारे तपास केला असे प्रशस्तीपत्र दिलेले आहे. कालही या संदर्भात सदनामध्ये सविस्तरपणे चर्चा झाली आहे, त्यावेळी आपण उपस्थित नव्हता

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी उपस्थित होतो.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गुन्हे होत आहेत आणि त्यातून गोरगरीब माणसाला, प्रामाणिक ठेवीदाराने बुडविले जात आहे.त्याबाबत नक्की खूप काही कारवाई करण्याची आवश्यकता आहे. आमच्या सगळया विंग अधिक सक्षम करणे, त्यांना अकाऊंट मधील सर्व टेक्नीकल माहिती देणे, चार्टर्ड अकाऊंटसारख्या तज्ज्ञांचा सल्ला घेण्याची ....





ता.प्र.क्र.18194 . . . .

श्री.आर.आर.पाटील. . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सुविधा उपलब्ध करुन देणे या सगळया गोष्टी आम्ही करावयास घेतलेल्या आहेत. याठिकाणी रोहा येथील सहकारी बँकेबाबत तक्रार केलेली आहे. एकतर कायद्याप्रमाणे आवश्यक असलेल्या सगळया ॲक्शन्स् घेतल्या जातील आणि जर कोणी कायद्याप्रमाणे ॲक्शन घेणे आवश्यक असताना सुध्दा टाळाटाळ केली असेल तर त्यांच्यावरही कारवाई केली जाईल.

----------

. . . .ई-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**सिंधुदुर्ग जिल्ह्यात अंमली पदार्थांची विक्री करणारे रॅकेट असल्याबाबत**

**(3) * 17803 श्री.परशुराम उपरकर , श्री.राजन तेली , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.सुभाष चव्हाण , श्रीमती अलका देसाई , श्री.हुसेन दलवाई** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यात माहे मे, 2011 रोजी वा त्या दरम्यान पाच लाखांची हशीश जप्त केली हे खरे आहे काय,
(2) तसेच यापूर्वीही सावंतवाडी व दोडामार्ग तालुक्यात गांजा विक्री करणारी टोळी पकडून त्यांच्या मुख्य सूत्रधारापर्यंत पोहचण्यास पोलीस अपयशी ठरले हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, या रॅकेटचे जाळे कर्नाटक, गोवा, महाराष्ट्र, दिल्ली ते उत्तर भारतात पसरले आहे हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांवर कारवाई करणेबाबत तसेच अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या रॅकेटचे समूळ उच्चाटन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील ,श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) केंद्र शासनाच्या अखत्यारीतील नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो गोवा इंटेलिजन्स युनीट यांनी दिनांक 3.5.2011 रोजी केलेल्या कारवाईत हॉटेल रेणूका पॅलेस, सावंतवाडी येथून 3.5 किलो हशीश जप्त केले आहे.
(2) दोडामार्ग पोलीस ठाणे येथे गांजा बाळगल्याबाबत गुंगीकारक औषधी द्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम 1985 च्या कलम 22 अन्वये दिनांक 13.10.2010 रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. एका आरोपीस अटक करण्यात आली असून दुसरा आरोपी फरार आहे. सदर प्रकरणी खटला दाखल करण्यात आला आहे.
(3) व (4) सदर बाब निदर्शनास आलेली नाही परिणामी कार्यवाही नाही.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17803....

श्री. राजन तेली : सभापती महोदय, रेणुका हॉटेल, सावंतवाडी येथे दिनांक 3-5-2011 रोजी जी कारवाई करण्यात आली आहे, त्या कारवाईमध्ये किती लोकांना अटक करण्यात आली आणि त्यांची नावे काय आहेत? या अनुषंगाने माझा प्रश्न असा आहे की, सर्वसाधारपणे हे ड्रग्जचे व्यवसाय गोवा किनारपट्टीवर फार मोठया प्रमाणात आहेत. गोवा पोलिसांनी लक्ष विचलित करण्यासाठी त्या रेणुका हॉटेलमध्ये अशा प्रकारचा खोटा छापा टाकला अशा प्रकारची चर्चा आहे, तेव्हा याची चौकशी करण्यात येणार आहे काय, या गुन्हयामध्ये जे आरोपी अटक करण्यात आलेले आहेत त्यांची नावे काय आहेत, दोडामार्गमधील एका आरोपीला अजूनही अटक झालेली नाही त्या आरोपीचे नाव काय आहे आणि अटक झालेल्या आरोपीचे नाव काय आहेत?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, पहिल्या प्रकरणामध्ये नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने कारवाई केलेली आहे. यामध्ये कृष्णासिंग नावाच्या व्यक्तीला अटक करण्यात आलेली आहे आणि ते ज्यांना देणार होते तो मि. गुस राल्फ डियर्समन असा जर्मन नागरिक आहे. सापळा रचून या दोघांच्या अटकेची कारवाई एनसीबीने केलेली आहे. आता सध्या हे दोन्ही ज्युडिशिअल कस्टडीमध्ये आहेत. दुसऱ्या प्रकरणामध्ये श्री. राजेसाहेब मुहम्मद मुल्ला यांना अटक केलेली आहे. दुसऱ्या व्यक्तीचे नाव व्यवस्थित सांगितलेले नाही पण फकीर या नावाची व्यक्ती कर्नाटकातील आहे त्याचा तपास सुरु आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हा प्रश्न सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आहे आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातून या अंमली पदार्थाची ने-आण गोवा राज्यात जो चेक नाका आहे तेथून आणि कोल्हापूर मार्गे होते, अशा प्रकारची माहिती आहे. तेव्हा या दोन्ही गोष्टी तपासण्यात येतील काय आणि या सीमेवरील गस्त वाढविण्यात येईल काय?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, या संदर्भात ऑलरेडी तशा सूचना एस.पीं.ना देण्यात आलेल्या आहेत.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, 3.5 किलो हशीश जप्त झाले याचा गुन्हा दिनांक 13-10-2010 रोजी दाखल करण्यात आला होता मग या आरोपींना पकडण्यासाठी एक वर्षाचा अवधी का लागला? गोवा आणि इकडून-तिकडून हा सर्व माल येत असला तरी ज्या रेणुका हॉटेलमधून हे हशीश जप्त करण्यात आले आहे. या हॉटेलमध्ये पुन्हा असा गुन्हा घडू नये या दृष्टिकोनातून या हॉटेल मालकावर काय कारवाई करण्यात आली?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17803.....

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, दोन वेगवेगळे विषय आहेत.पहिल्या गुन्हयामध्ये हॉटेलमध्ये कृष्णासिंग या माणसाला अटक करण्यात आली होती. एखाद्या हॉटेलमध्ये रहावयास जात असताना तो माणूस कोण आहे, याची माहिती त्या हॉटेल मालकाने घेणे क्रमप्राप्त आहे. एनसीबीने ही कारवाई केलेली आहे. त्या हॉटेलने या बाबतीत काही उपाययोजना केली नसेल किंवा ती माहिती घेतली नसेल आणि अशा गोष्टी वारंवार या हॉटेलमध्ये घडत असतील तर निश्चितपणे त्या हॉटेलवर कारवाई केली जाईल. दुसऱ्या गुन्हयामध्ये जो आरोपी फरारी आहे ती फकीर नावाची व्यक्ती असून हुक्केरी, बेळगाव असा त्याचा पत्ता आहे. त्याचा पूर्ण पत्ता नसला तरी त्याला पकडण्यासाठी कर्नाटक पोलिसांबरोबर समन्वय साधून त्याला लवकरात लवकर पकडण्याचा प्रयत्न सुरु आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई येथील वरळी, नायगाव, ना.म.जोशी मार्ग, शिवडी आणि मुंबई सेंट्रल या ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या पोलिसांची घरे त्यांच्या नावावर करण्याबाबत**

**(४) * १८९९५ श्री.सुभाष चव्हाण , श्री.मोहन जोशी , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.हुसेन दलवाई , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.उल्हास पवार , श्री.जयप्रकाश छाजेड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील वरळी, नायगाव, ना.म.जोशी मार्ग, शिवडी आणि मुंबई सेट्रल या ठिकाणी गेल्या चाळीस वर्षापासून वास्तव्य करणाऱ्या पोलिसांना ही घरे त्यांच्या नावावर करण्याबाबत मंत्रीमंडळाच्या बैठकीत माहे मार्च-एप्रिल, २०११ मध्ये वा त्या दरम्यान निर्णय घेऊनही अद्यापी याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे मे, २०११ रोजी वा त्या दरम्यान आढळून आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरळी, नायगाव, ना.म.जोशी मार्ग, शिवडी आणि मुंबई सेंट्रल येथील घरे लवकरात लवकर पोलीसांच्या नावावर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्या करिता:** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मुंबईतील गिरणी कामगारांप्रमाणेच पोलिसांच्या घरांचा प्रश्न देखील अत्यंत महत्वाचा आहे. मुंबई येथील वरळी, नायगाव, नामजोशी मार्ग, शिवडी, मुंबई सेंट्रल व बीडीडी चाळ या इंग्रजांनी 100 वर्षापूर्वी बांधलेल्या बिल्डिंग्स आहेत. वरळी, नायगाव, मुंबई सेंट्रल ही जागा किती हेक्टरमध्ये आहे, त्यामध्ये पोलिसांचे एकूण किती गाळे आहेत, त्या प्रत्येक गाळयांमध्ये घरे किती आहेत, त्यांचे किती स्क्वेअर फूट क्षेत्र आहे तसेच किती अनधिकृत लोकांना ही घरे देण्यात आलेली आहेत? सभापती महोदय, या अनुषंगाने माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, हे पोलीस ज्या ठिकाणी रहातात त्याच ठिकाणी त्यांना कायम स्वरुपी जागा देण्यात येणार आहे काय? पोलीस गृहनिर्माण संस्था स्थापन झालेली आहे. सेवानिवृत्त होता-होता डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस त्या ठिकाणी जातात. तेव्हा आजतागायत या पोलीस गृहनिर्माण विभागाने या पोलिसांना एकूण किती जागा दिलेल्या आहेत?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाचा विचार केला असता एकूण 92.68 एकर जमिनीवर एकूण 207 चाळी बांधण्यात आलेल्या आहेत. या सर्व चाळी तळमजला अधिक तीन मजल्याच्या आहेत. प्रत्येक मजल्यावर 20 गाळे आहेत. एका चाळीत एकूण 80 गाळे आहेत. प्रत्येक गाळयांचे क्षेत्रफळ साधारणपणे 160 चौ. फूट इतके आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18995.....

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी या ठिकाणी हा महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे, हे फार बरे झाले. हाच प्रश्न या सभागृहात अद्यापपर्यंत जवळ जवळ 5 ते 10 वेळा चर्चिला गेला आहे. परंतु गृहनिर्माण विभागाकडून या बाबतीत काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, ही अत्यंत खेदाची बाब आहे. सन्माननीय सदस्यांनी मुंबई बद्दल प्रश्न विचारलेला आहे. मी या ठिकाणी ठाण्याचे उदाहरण देतो. त्याचा मी पूर्णपणे व्यवस्थित अभ्यास केलेला आहे. मुंबई गृहनिर्माण विभागाकडून काही इमारती पोलिसांना राहण्यासाठी क्वार्टस म्हणून भाडयाने घेतल्या होत्या. या इमारती बांधून जवळपास 50 वर्षे होऊन गेलेली आहेत. या इमारतींची अवस्था अत्यंत वाईट आहे. कुठल्याही क्षणी त्या पडतील अशा अवस्थेत आहेत. श्री. शांगारे पोलीस आयुक्त असताना मी त्यांना एक पत्र दिले होते तसेच सन्माननीय गृहमंत्र्यांनाही एक पत्र दिले होते. त्यानंतर ती फाईल प्रोसेस होऊन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे गेली. त्यांनी असा अहवाल दिला की, ही घरे राहण्यास योग्य नाहीत. या वर जो खर्च करावयाचा आहे, तेवढा निधी आपल्याकडे नाही.

दुसरी गोष्ट अशी की,त्या वेळी या इमारतींचे 72 लाख रुपयांपेक्षा अधिक भाडे थकलेले होते. याच परिसरामध्ये इतर गृहनिर्माण मंडळाच्या ज्या बिल्डिंग आहेत त्या ठिकाणी राहणाऱ्या सगळया भाडेकरुनी या इमारती गृहनिर्माण मंडळाकडून कायम स्वरुपी विकत घेऊन, सोसायटया स्थापन करुन आपापले हक्काचे घर मिळवले. या प्रश्नाच्या बाबतीत राज्य शासनाने असे उत्तर दिलेले आहे की, हा निर्णय घेतला तर तो धोरणात्मक निर्णय होईल आणि तो निर्णय संपूर्ण महाराष्ट्रात राबवावा लागेल. प्रश्न असा आहे की, प्रत्येक प्रश्नाला वेगळा कंगोरा असतो. या ठिकाणी गृहनिर्माण विभागाच्या इमारती आहेत त्यांचे भाडे शासनाकडे थकलेले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने उत्तर दिलेले आहे की, या इमारतींची दुरुस्ती करणे योग्य नाही आणि या इमारतींची दुरुस्ती करावयाची असली तरी त्यांच्याकडे तेवढा पैसा नाही. अशा परिस्थितीत त्या पोलीस कर्मचाऱ्यांनी तुमचे जे काही देणे असेल ते आम्ही गृहनिर्माण मंडळाला देतो पण या इमारती आमच्या नावावर देण्यात याव्यात. आम्ही आमच्या सोसायटया स्थापन करुन या इमारतींची दुरुस्ती करुन घेतो म्हणजे आम्हाला कायमची घरे मिळतील अशी विनंती केलेली आहे. असे असताना, या पोलिसांनी इतकी जोखीम पत्करलेली असताना देखील राज्य शासनाने त्या पोलिसांना त्या इमारतीमध्ये राहणे क्रमप्राप्त केलेले आहे.

..5..



SMT/ KTG/ KGS/ ST/ AKN/ प्रथम सौ. रणदिवे... 11:50

ता.प्र.क्र.18995...

**उप सभापती**.....

लोकहितार्थ जर एखादा  शासकीय निर्णय थोडासा बाजूला ठेवून राज्यकर्त्यांनी आपली भूमिका योग्य तऱ्हेने घेतली तर मला असे वाटते की, ते खऱ्या अर्थाने लोकाभिमुख प्रशासन होईल. म्हणून मी गृह विभागाला अशी विनंती करतो की,आपण प्रत्येक प्रश्नाचा नीट तपासून, अभ्यास करावा. शेवटी असे आहे की, आपल्या खालच्या अधिकाऱ्यांची उत्तरे ही नेहमीच निगेटिव्ह असतात. आयपीएस अधिकाऱ्यांना कायमच्या इमारती मिळाल्या, फ्लॅट्स कायमचे मिळाले, आयएएस लोकांना फ्लॅटस मिळाले तर मग या लोकांना अधिकार नाही काय? त्यांनी रस्त्यावर उभे राहून आपले प्राण संकटात घालून कित्येक वेळा आपल्या सर्वांचे संरक्षण केले आहे. आबा आपण भावनाशील आणि भावनाप्रधान असे गृहमंत्री आहात. या प्रश्नाकडे आपण आता तरी सहानुभूतीने पहाल असे मला वाटते. कृपया तेच उत्तर असेल तर मी जास्त बोलत नाही. पण तेच उत्तर देऊ नये, असे माझे मत आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आपण एका अत्यंत महत्वाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले आहे. ही गोष्ट खरी आहे की, या सगळया प्रश्नाची उत्तरे समाधानकारकपणे देता येता नाहीत. आज मुंबईमध्ये कोणी अनधिकृत झोपडी बांधली तर मानवतेच्या दृष्टिकोनातून आपण त्यांना जागा देतो. वास्तविक ती झोपडी अवैध पध्दतीने कायद्याचे उल्लंघन करुन बांधलेली असते पण कायद्याचे पालन करणारा पोलीस ज्यावेळी निवृत्त होतो त्यावेळी तीन महिन्याच्या आत त्यांना घर खाली करण्याबाबतची नोटीस देण्यात येते.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 18995..... श्री. आर. आर. पाटील .....

काही वेळा कर्तव्यावर असताना पोलीस कर्मचारी मयत होतो आणि त्यांच्या नातेवाईकांना सुध्दा नोटीस देऊन घर खाली करावे लागते. त्यांची मुले शाळेत असतात, विधवा असते त्यांना सुध्दा नोटीस देऊन घर खाली करावे लागते. हे करीत असताना समाधान आहे आणि समाधानाने या गोष्टी कराव्या लागतात अशातील भाग नाही. आज एकट्या मुंबई शहराची अवस्था पाहिली तर 43 हजार 242 अधिकारी आणि कर्मचारी पोलीस दलामध्ये काम करतात. उपलब्ध असलेली निवासस्थाने 21 हजार 169 आहेत. म्हणजे केवळ 49 टक्के कर्मचाऱ्यांच्या घरांचीच गरज आपण या क्वॉर्टर्समधून भागवितो. हे जे क्वार्टर्स आहेत त्यामध्ये गृह खात्याने पोलीस दलासाठी बांधलेले काही क्वार्टर्स आहेत तर काही क्वार्टर्स भाडे तत्वावर घेतलेले आहेत. अलीकडच्या काळात पोलिसांसाठी पोलिसांनी भाडे तत्वावर घेतलेले क्वार्टर्स न सोडल्यामुळे नव्याने पोलिसांना भाडे तत्वावर एकही क्वार्टर उपलब्ध होत नाही. अशा स्थितीमध्ये आज जे कर्मचारी सेवेमध्ये आहेत त्यांनाच राहण्यासाठी पुरेशी घरे नाहीत मग भाड्याने घेतलेल्या क्वार्टर्समध्ये जे राहतात ते क्वार्टर्स पोलिसांना मालकी हक्काने द्यावयाचे म्हटले तर पोलीस दलामध्ये नव्याने येणारे जे पोलीस आहेत आणि सेवा करीत आहेत त्यांना देण्यासाठी आपल्याकडे क्वार्टर्स शिल्लक राहणार नाहीत. यामध्ये दोन गोष्टी आहेत. ज्या इमारती किंवा जे क्वार्टर्स आपण भाडे तत्वावर घेतलेले आहेत त्यांचे भाडे आपण देतो आणि संबंधित विभागाने, ज्यांचे कोणाचे क्वार्टर्स असतील त्यांनी त्याची दुरुस्ती करावी अशी आपली नियमाप्रमाणे अपेक्षा आहे. परंतु जुन्या काळामध्ये ठरलेले भाडे एवढे कमी आहे की, तो मालक सुध्दा ते क्वार्टर्स दुरुस्त करीत नाहीत आणि अत्यंत नादुरुस्त क्वार्टर्समध्ये त्यांना राहावे लागते.

सभापती महोदय, आपण ज्या शंका उपस्थित केल्या, जे प्रश्न उपस्थित केले ते 100 टक्के योग्य आहेत. जरुर त्या बाबतीत सर्वंकष धोरण, जर क्वार्टर्स भाडे तत्वावर असतील तर त्यांच्या दुरुस्तीसाठी काय करावे लागेल याबाबतीतील धोरण, जे खात्याचे क्वार्टर्स आहेत पण तेही नादुरुस्त आहेत त्यावर कशा पध्दतीने खर्च करुन ते राहण्यासाठी अद्ययावत करावयाचे या बाबतीतील धोरण ठरवावे लागेल. त्याचबरोबर जे कर्मचारी निवृत्त होत आहेत त्यांच्या सुध्दा अपेक्षा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 18995..... श्री. आर. आर. पाटील .....

असणे स्वाभाविक आहे की, आयुष्यभर आम्ही कायद्याचे पालन करीत नोकऱ्या केल्या आणि शेवटी आम्हाला सगळयांना मिळणारा हक्क सुध्दा मिळत नाही, म्हणून म्हाडा असेल किंवा शासनाकडून अन्य जी घरे बांधली जातात त्यामध्ये निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी काही राखीव हिस्सा ठेवणे ही बाब सरकारच्या विचाराधीन आहे. त्याही बाबतीत विचार करु. या घरांच्या बाबतीत लवकरच एक सर्वंकष धोरण आम्ही निश्चितपणे ठरवू. जे क्वार्टर्स दुरुस्त करणे शक्य नाही किंवा संबंधित विभाग ते क्वार्टर्स तेथे राहात असलेल्या पोलिसांना देण्यास तयार असतील तर त्या बाबतीतील वेगळे धोरण, जे शासनाचे क्वार्टर्स आहेत त्यांच्या दुरुस्तीचे धोरण आणि निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यासाठी वेगळ्या पध्दतीने घरे किंवा जागा देण्याचे धोरण या बाबतीत आम्ही निश्चितपणे तीन महिन्याच्या आत विचार करु.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. आपण म्हणाला त्या प्रमाणे या आधी पाच सहा वेळा हा प्रश्न उपस्थित झालेला आहे...

श्री. आर. आर. पाटील : (बसून) याबाबत निश्चित विचार करु.

**उप सभापती** : आपण उभे राहून सांगितले तर I will be thankful to you.

श्री. भाई जगताप : Everybody will be thankful. I think the Hon. Members of both the Houses will be thankful to you. माझी या ठिकाणी एक विनंती अशी राहील. आपल्याला एक गोष्ट नाकारता येणार नाही की, ज्या ज्या वेळेला या कॉलनी तयार झाल्या, अगदी उपनगरातील सुध्दा, तेव्हा त्या ठिकाणी कोणीही जाण्यास तयार नव्हते पण तेव्हा पोलीस त्या ठिकाणी गेलेले आहेत. म्हणजे सर्वात प्रथम कोणाला पाठवावयाचे तर सरकारी कर्मचारी आणि पोलिसांना पाठवावयाचे असा आतापर्यंतचा प्रघात आहे. त्या नंतर जनता त्या ठिकाणी आलेली आहे. मानखुर्द असेल, मालवणीचे टोक असेल, ठाणे असेल किंवा कल्याण असेल त्या ठिकाणी आपण त्यांना पाठवतो. माझी या ठिकाणी शासनाला आणि विशेषत: माननीय गृह मंत्र्यांना अशी विनंती आहे की, ज्या धर्तीवर आपण आय.ए.एस. अधिकारी, आय.पी.एस. अधिकारी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 18995..... श्री. भाई जगताप .....

यांना घरे देतो, त्यांना घरे मिळाली पाहिजेत, त्यांना मिळू नये हा माझा विषय नाही परंतु त्याच धर्तीवर आपल्याला यांना प्रोत्साहीत करता येईल का, यांच्या ज्या हाऊसिंग सोसायटीज आहेत, आपण म्हणतो की पोलीस हाऊसिंग सोसायटी काम करते परंतु त्या बाबतचे उत्तर आले नाही. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी असा प्रश्न विचारला की, आतापर्यंत या हाऊसिंग सोसायटीच्या अंतर्गत किती घरे तयार झाली आणि किती घरे हस्तांतरित केली किंवा दिली याचे उत्तर आलेच नाही. म्हणून माझी विनंती राहील की, या हाऊसिंग सोसायटीच्या माध्यमातून आपण ज्यावेळी सर्वंकष धोरण करणार आहात त्यावेळेला कायद्यामध्ये जर काही बदल करता आला, गिरण्यांच्या मालकांना त्या ठिकाणी जास्त जागा मिळावी म्हणून जर आम्ही नियम 58(7) मध्ये बदल केला, तशाच प्रकारचा बदल कायद्यामध्ये करुन या कर्मचाऱ्यांना सुध्दा कायम स्वरुपी घरे, मोफत नव्हे तर त्यांचा जो हाऊस रेंट जातो तेवढा त्यांचा हप्ता असावा, तशा प्रकारे होणार आहे का ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा प्रश्नोत्तराचा तास चालू आहे का ?

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास सुरु झाल्यानंतर माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांना पहिली आठ मिनिटे त्यांना जे म्हणणे मांडावयाचे होते ते मी मांडू दिले. मी असे ठरविले की, आपण प्रश्नोत्तराच्या तासासाठी पूर्ण एक तास वेळ द्यावा. म्हणून मी सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी दिली. 12 वाजून 8 मिनिटांनी प्रश्नोत्तराचा तास संपेल.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य प्रश्न न विचारता भाषण करीत आहेत.

( दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मी प्रश्न विचारला. या ठिकाणी गिरणी कामगारांच्या बाबतीत पुतना मावशीचे प्रेम दाखवून राजकारण करणाऱ्या लोकांनी पोलिसांना घरे मिळत आहेत म्हणून अशा प्रकारे वक्तव्य करण्याची काही गरज नाही. ज्या पोलिसांनी मुंबईचे संरक्षण केले, जे पोलीस तुमचे आणि आमचे संरक्षण करतात त्या पोलिसांच्या बाबतीमध्ये (अडथळा) ...

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ AKN/ KTG/ KGS

ता. प्र. क्र. 18995.....

श्री. भाई जगताप : तशा प्रकारची घरे आपण देणार आहात काय अशा प्रकारचा माझा प्रश्न होता. मी दोन स्पेसिफिक प्रश्न विचारले. पोलीस हाऊसिंगच्या माध्यमातून किती घरे झाली असा प्रश्न मी पहिला विचारला. त्या व्यतिरिक्त दुसरा प्रश्न असा विचारला की, आपल्या गृहनिर्माणाच्या कायद्यामध्ये आपण जे बदल केले, आपण गिरणी कामगारांच्या बाबतीत बदल केले तशा पध्दतीने बदल करुन या पोलीस कर्मचाऱ्यांना सुध्दा घरे मिळण्याचे धोरण सरकार अवलंबिणार आहे का ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, पोलीस हाऊसिंग अंतर्गत किती घरे बांधली आणि किती अपुरी आहेत याची माहिती मी पटलावर ठेवीन. सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, शासन या बाबतीत नवीन धोरण ठरवील आणि सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्याही त्यामध्ये अंतर्भूत करुन त्यावर विचार केला जाईल.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

---

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय. माझा औचित्याचा मुद्दा आहे. महाराष्ट्रातील सर्व राजकीय पक्षांचे कार्यकर्ते जे आंदोलन करतात त्या आंदोलनाच्या वेळी मोर्चा असेल, जमावबंदी असेल अशा वेळी त्यांच्यावर राजकीय केसेस पोलिसांकडून भरल्या जातात. एक वर्षापूर्वी महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाने 2005 पर्यंतच्या सर्व राजकीय पक्षांच्या सर्व केसेस काढून टाकण्याचा निर्णय घेतलेला होता. कॅबिनेटचा निर्णय झाला पण आजपर्यंत महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांकडे जे आदेश जावयास पाहिजे होते ते आदेश न गेल्यामुळे एखादा कार्यकर्ता ज्यावेळी पासपोर्ट काढण्यासाठी जातो तेव्हा त्याच्यावर तो गुन्हा दाखल असेल तर त्याला पासपोर्ट मिळत नाही. एखाद्या कार्यकर्त्याची जर शासनाने एखाद्या कमिटीवर नेमणूक केली तर त्याला व्हेरिफिकेशन सर्टिफिकेट मिळत नाही. मी माननीय गृह मंत्र्यांना विनंती करतो की, मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी एक वर्ष होऊन सुध्दा खालच्या पातळीवर झालेली नाही. त्याबाबत आपण किती दिवसात आदेश काढून स्थानिक पोलीस आयुक्त किंवा जिल्हा प्रमुख यांच्यापर्यंत पोहचून त्या बाबतीत कार्यवाही होईल ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, हा निर्णय मंत्रिमंडळाने घेतलेला नव्हता. हा निर्णय गृह मंत्रालयाने घेतलेला होता. अनेक वेळा राजकीय कार्यकर्ते आंदोलने करतात आणि त्यांच्यावर छोट्या छोट्या गुन्ह्यांसाठी केसेस राहतात. त्यामध्ये त्यांचा वेळही जातो. असे जे गुन्हे जुने आहेत, जे गुन्हे 2005 पूर्वीचे आहेत ते काढून घेण्याचा निर्णय गृह मंत्रालयाने घेतलेला होता. ज्यामध्ये आर्थिक हानी झालेली असेल त्या प्रकरणामध्ये जेवढे नुकसान झालेले आहे तेवढे भरुन देऊन हे गुन्हे परत घेण्याची प्रक्रिया अनेक जिल्ह्यांनी केलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

पुणे जिल्ह्यामध्ये किती गुन्हे काढले किंवा काढले नाहीत याची माहिती घेतली जाईल. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित करण्यात आलेली आहे. त्यात पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, ग्रामीण सदस्य आहेत. जेथे पोलीस आयुक्तालय आहे तेथे आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली कमिटी गठित करण्यात आलेली आहे. ही एक न्यायिक प्रक्रिया आहे. यामध्ये गुन्हा का काढण्यात आला आहे ते कोर्टाला कळवावे लागते. ज्यांनी अर्ज केलेले आहेत, त्यांचा या समितीमध्ये विचार केला जातो. तेवढे गुन्हे मागे घेण्यात येतात. पुन्हा मी एकदा या गुन्ह्यांसंबंधीचा आढावा घेईन. यासंबंधी गृह मंत्रालयाने निर्णय घेतला आहे त्याची अंमलबजावणी ज्या जिल्ह्यात केली नसेल तर त्या जिल्ह्यांना सूचना देण्यात येतील.

श्री.एस.क्यू.जमा : सभापति महोदय, कामगार संघटनाओं के बार में भी विचार किया जाएगा क्या ?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, जिल्हाधिकारी कार्यालयात, पोलीस आयुक्तालयामध्ये व पोलीस अधीक्षक कार्यालयात अशा प्रकारच्या समित्या गठित करुन त्यांच्या माध्यमातून गुन्हे मागे घेण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. परंतु ती पध्दत खूप क्लिष्ट आहे. अनेक लोकांपर्यंत ती पध्दतच पोहोचलेली नाही. त्यामुळे हे गुन्हे तसेच प्रलंबित राहतात. ही पध्दत सुटसुटीत करण्याबाबत जिल्हा जिल्ह्यातील माहिती एस.पी.कार्यालयातून मागविली तर संबंधित लोकांपर्यंत संदेश जाईल व त्यांना तसे अर्ज करता येतील. परंतु अर्ज करण्याची पध्दत किंवा माहिती देण्याची पध्दत क्लिष्ट आहे ती शासन सोपी करणार काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, खूप मोठ्या संख्येने अनेक जिल्ह्यातील गुन्हे मागे घेण्यात आले आहेत. ज्या जिल्ह्यामध्ये काही अडचणी असतील तर त्याही तपासून बघितल्या जातील व संबंधित अधिका-यांना सूचना दिल्या जातील. या पध्दतीत क्लिष्टता असेल तर ती दुरुस्त करुन 2005 पूर्वीचे राजकीय आंदोलनाचे गुन्हे असतील ज्यामध्ये जीवित व वित्तीय हानी झालेली नाही असे गुन्हे परत घेण्याच्या सूचना देण्यात येतील. तसेच शेतकरी आंदोलनामध्ये केलेले गुन्हे व राजकीय आंदोलनांचे गुन्हे त्यांचाही यामध्ये समावेश आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, विधिमंडळाचे हे अमृत महोत्सवी वर्ष आहे. ब्रिटिश काळापासून अन्याय, अत्याचाराच्या विरोधात आंदोलन करणे, त्याचा निषेध करण्याची आपल्याकडे पध्दत आहे. जे सत्शील मार्गाने आंदोलने करतात किंवा धरणे धरतात, ज्यामध्ये कोणत्याही प्रकारची तोडफोड न करता, मारझोड न करता ख-या अर्थाने लोकशाही मार्गाने आंदोलने केली तर त्यांच्याविरुध्द पोलीस खटले दाखल करतात. न्यायालयात दाव्यांची प्रचंड संख्या आहे. आमच्या सारख्या कार्यकर्त्यांना कोर्टात हजर रहावे लागते, त्याचा निकाल वर्षानुवर्षे लागत नाही. अनेक वर्षे अशा केसेस चालू राहतात. मला असे वाटते की, हे अमृत महोत्सवी वर्ष असल्यामुळे माननीय गृहमंत्र्यांनी 2005 हे वर्ष गृहित न धरता 2011 पर्यंतच्या जेवढ्या काही आंदोलनाच्या केसेस असतील त्या मागे घेण्याची कार्यवाही करावी अशी मी त्यांना विनंती करते.

---------

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ AKN/ ST/

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "बुलढाणा जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने दीड कोटीचा कोटा उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील यांनी "तळेगाव-दाभाडे, जि.पुणे येथे राहणारे श्री.प्रसन्न कदम यांची गाडी अडवून चार इसमांनी त्यांची रोख रक्कम,दागिने व एटीएम कार्ड पळवून नेणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, नागो गाणार, संजय केळकर यांनी "राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतनश्रेणीतील तफावत दूर करण्याच्या आश्वासनाची पूर्तता न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो गाणार, नितीन गडकरी, रामनाथ मोते, भगवानराव साळुंखे, डॉ.रणजित पाटील, चंद्रकांत पाटील यांनी "कामठी तालुक्यातील जाखेगाव येथील राजीव गांधी विद्यालयात एका शिक्षकाने अंगावर रॉकेल ओतून जाळून घेण्याचा केलेला प्रयत्न" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "जे.जे.रुग्णालयात एमआरआय/सीटी स्कॅनसाठी रुग्णांना कॉन्ट्रास्ट मिडिया बाहेरुन विकत घ्यावा लागणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**......

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी "सांगली-मिरज शहरांमध्ये गेल्या दोन महिन्यापासून डासांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी "रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील जामगे छत्रपती संभाजी राजे सैनिक स्कूलच्या शाळेच्या इमारतीच्या भाड्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "बुलढाणा जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अशोक राऊत यांना छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांची जीवंत जाळण्याचा केलेला प्रयत्न" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनावणे, विक्रम काळे यांनी "विद्याशक्ती शिक्षण प्रसारक मंडळ कोळसा, ता.सेलगाव, जि.हिंगोली संचालित विद्या निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांना संस्थेचे अध्यक्ष व इतरांनी मानसिक, शारीरिक व आर्थिक छळ करुन जीवे मारण्याची दिलेली धमकी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात लेप्टो स्पायरोसिसच्या रोगाची झालेली लागण त्यात अनेकजण मृत्युमुखी पडणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

5....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 अन्वयेची निवेदने

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आज चर्चेसाठी क्रमांक 5 वर असलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदन व आजच्या कामकाज पत्रिकेवर नमूद केलेल्या नियम 260 अन्वयेच्या क्रमांक 3 वरील प्रस्तावातील विषय सारखाच असल्यामुळे दोन्ही बाबत एकत्रितपणे चर्चा करण्यात यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

**उप सभापती** : ठीक आहे. ज्या वेळी क्रमांक 5 वरील निवेदन पुकारण्यात येईल त्या वेळी योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

6...

अप्रसिद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ AKN/ ST/

**पृ.शी.** :शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील करार पध्दतीवरील कर्मचाऱ्यांना नियमित करुन पगारवाढ देण्याची गरज

**मु.शी.**: :शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील करार पध्दतीवरील कर्मचाऱ्यांना नियमित करुन पगारवाढ देण्याची गरज याबाबत सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवानराव साळुंखे, धनंजय मुंडे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.डी.पी.पाटील ( वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक एक सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ AKN/ ST/

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्रातील रुग्णालयात कंत्राटी पध्दतीने कामगारांना नियुक्त केले जाते. त्यांना 3-4 वर्षानंतर कायम करण्यात यावे असा या नियम 93 अन्वयेच्या सूचनेतील विषय आहे. या संदर्भात शासनाने निवेदन केलेले आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील ...

सामान्य प्रशासन विभागाने कामगारांना नियमित करणे शक्य नाही असे स्पष्ट केलेले आहे. म्हणजे काय केलेले आहे ? वेतनवाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. ही वेतनवाढ नक्की कधी करणार ?

श्री. डी.पी.सावंत : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर, लातूर आणि अकोला यांची निर्मिती 2000 आणि 2002मध्ये झालेली आहे. या जी.आर. नुसार ही महाविद्यालये कशा प्रकारे कमीत कमी खर्चामध्ये सुरु करावीत यासंबंधी वित्त विभागाने आदेश दिले होते. ही महाविद्यालये सुरु होत असताना नियमित 149 पदे, 103 कंत्राटी पदे आणि 228 पदे आरोग्य सेवा संचालक यांच्याकडून डेप्युटेशनने भरुन ही महाविद्यालये सुरु झाली. 2004 पासून सदरील 103 कंत्राटी पदे मान्य आहेत. कोल्हापूर महाविद्यालयामध्ये 83 कंत्राटी पदावर माणसे कार्यरत आहेत. अकोला महाविद्यालयामध्ये 30 माणसे कंत्राटी पदावर कार्यरत आहेत आणि लातूर महाविद्यालयामध्ये कोर्ट केसमुळे एकही कंत्राटी पदावर माणूस कार्यरत नाही. सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न उपस्थित केलेला आहे की, यांना कशा प्रकारे पगारवाढ देण्यात येईल ? या पदांची निर्मिती अजून नियमित इ ाालेली नाही. ती होण्यासाठी आम्ही कॅबिनेट समोर जाणार आहोत. कारण हीच पदे शासनाच्या इतर महाविद्यालयामध्ये नियमित पदे आहेत. फक्त या तीन महाविद्यालयामध्ये आणि वांद्रयाच्या नागरी स्वास्थ्य केन्द्रामध्ये ही पदे कंत्राटी पध्दतीने भरली जात आहे. त्यामुळे इतर महाविद्यालयाप्रमाणे ही पदे नियमित कशी करता येतील यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. या लोकांना पगारवाढ देण्यासाठीचा प्रस्ताव 2009 पासून कॅबिनेटसमोर आहे. हा प्रस्ताव पुनश्च एकदा वित्त विभागाकडे पाठविण्यात येणार आहे.

---

...2..

**पृ.शी.** : कोकण किनारपट्टी जवळ गुहागर तालुक्यातील पालशेतजवळच्या गावात एक लाख वर्षापूर्वीची आढळेली गुहा

**मु.शी.**: कोकण किनारपट्टी जवळ गुहागर तालुक्यातील पालशेतजवळच्या गावात एक लाख वर्षापूर्वीची आढळेली गुहा याबाबत श्री. परशुराम उपरकर,वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर हे सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. त्यांनी दिलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदन माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाच्या पटलावर ठेवावे.

श्री. संजय देवतळे ( सांस्कृतिक कार्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने कर्मचा-यांना सेवाज्येष्ठतेनुसार सेवेत सामावून न घेणे

**मु.शी.**: खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने कर्मचा-यांना सेवाज्येष्ठतेनुसार सेवेत सामावून न घेणे याबाबत श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री. प्रकाश सोळंके (पणन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, खामगाव कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत काम करणा-या कर्मचा-यांचा हा प्रश्न आहे. काही कर्मचारी 1988 पासून, काही कर्मचारी 1999 पासून तर काही कर्मचारी 1995 पासून या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कार्यरत होते. शासनाने कर्मचारी भरतीमध्ये मनाई आणल्यामुळे, सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे रोजंदारी कर्मचारी म्हणून ते काम करीत होते. त्यांचे मस्टर भरले जात होते. वर्षानुवर्षे काम करीत असलेल्या या कर्मचा-यांना गेल्या दोन महिन्यापासून अचानकपणे त्यांची मस्टरवर सही न घेता त्यांना प्रत्येक दिवशी रोजंदारीप्रमाणे काम करायला भाग पाडून त्यांच्यावर अन्याय केलेला आहे. ते कर्मचारी कामगार न्यायालयामध्ये गेल्यानंतर कामगार न्यायालयाने कर्मचा-यांच्या बाजूने निकाल दिला. हा निकाल दिल्यानंतरही कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवाने तो निकाल केराच्या टोपलीत टाकला. हे कर्मचारी 2 महिन्या पासून उपोषणाला बसलेले आहेत. जिल्ह्याच्या डीडीरआरने या कर्मचा-यांच्या मस्टरवर सह्या घेऊन त्यांना सेवेत सामावून घेण्यासंबंधी पत्र दिलेले आहे. तरी देखील कृषी उत्पन्न बाजार समितीचा सचिव ऐकत नाही. ही 93ची सूचना दिल्यानंतर 2 दिवस त्या कर्मचा-यांना कामावर घेण्यात आले आणि कालपासून पुन्हा त्यांना कामावर घेणे बंद केले. सभापती महोदय, 12-12 वर्षे काम करणा-या कर्मचा-यांना काढून टाकून नवीन लोकांची भरती करण्याचा डाव कृषी उत्पन्न बाजार समितीचा असून त्यासाठी 3-3, 4-4 लाख रुपये ॲडव्हान्स घेतलेले आहेत. 12-12 वर्षे काम केलेल्या या कर्मचा-यांना मस्टरवर घेतले जात नाही, त्यांना गेटच्या आत प्रवेश देखील करु दिला जात नाही. डीडीआरने पत्र दिलेले असताना देखील सचिव ऐकत नाही. तेव्हा याबाबतीत सचिवावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे. तेव्हा या कर्मचा-यांना कामावर घेऊन त्यांच्या मस्टरवर सह्या घेण्याचे आदेश कृषी उत्पन्न समितीच्या सचिवाला देण्यात येतील काय ? कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवाने शासनाचे आदेश पाळले नाहीत तर त्याच्यावर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. प्रकाश सोळंके : खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एकूण 16 कर्मचारी रोजंदारीवर आहेत. याबाबतीत तपासणी केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे औद्योगिक न्यायालयाने कर्मचा-यांची नावे मस्टरवर घेऊन त्यांना पेमेंट करण्याचे आदेश दिलेले आहेत. परंतु त्या आदेशांचे पालन कृषी उत्पन्न बाजार समितीने केलेले नाही. डीडीआरने सूचना

..5..



श्री. प्रकाश सोळंके...

देऊनही केलेले नाही. म्हणून या संपूर्ण प्रकरणाची डीडीआर मार्फत कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आणि सचिव यांनी न्यायालयाच्या आदेशाचे पालन केले नाही म्हणून त्या बाबतीत चौकशी करुन कारवाई केली जाईल. या कामगारांना न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे काम करण्याच्या बाबतीत देखील शासनाच्या वतीने आदेश दिले जातील.

श्री. पांडुरंग फुंडकर : कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवाने जर ते आदेश पाळले नाही तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल काय ?

श्री. प्रकाश सोळंके : होय.

---

...6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कळणे माइन्स येथील खनिज चोरीला

जाण्याची तक्रार करणा-याला ठेकेदाराकडून झालेली मारहाण

**मु.शी.**: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कळणे माइन्स येथील खनिज चोरीला जाण्याची तक्रार करणा-याला ठेकेदाराकडून झालेली मारहाण याबाबत श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर हे सदनामध्ये उपस्थित नाहीत. त्यांनी दिलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेसंबंधीचे निवेदन माननीय मंत्री महोदयांनी पटलावर ठेवावे.

श्री. संजय देवतळे ( सांस्कृतिक कार्य मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 4 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...7 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**<u>नियम 93 अन्वयेच्या निवेदन क्रमांक 5 बाबत</u>**

**उप सभापती** : निवेदन क्रमांक 5 चा विषय हा आजच्या कामकाजपत्रिकेवरील नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाशी निगडित आहे. त्या मुळे या निवेदनाच्या संदर्भात त्या प्रस्तावाच्या वेळी चर्चा होईल.

**<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 1 बाबत</u>**

**उप सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 1 पुढे ढकलण्यात आलेली आहे. या लक्षवेधी सूचनेसंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांचे असे पत्र आलेले आहे की, ही लक्षवेधी सूचना महसूल विभागाशी संबंधित आहे. ती लक्षवेधी सूचना महसूल विभागाकडे पाठविलेली असून महसूल विभागाला ती प्राप्त झालेली आहे. सदर लक्षवेधी सूचनेला दोन-चार दिवसात उत्तर देण्यात येईल असे महसूल विभागाने सांगितलेले आहे.

...8...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.** : मुंबईतील अतिधोकादायक इमारतींची दुरुस्ती करुन तेथील रहिवाशांचे पुनर्वसन करण्याबाबत

**मु.शी.** : मुंबईतील अतिधोकादायक इमारतींची दुरुस्ती करुन

तेथील रहिवाशांचे पुनर्वसन करण्याबाबत श्रीमती अलका देसाई, सर्वश्री चरणसिंग सप्रा, सुभाष चव्हाण, भाई भाई जगताप, व राजन तेली, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पावसाळ्यात जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारती कोसळून होणाऱ्या दुर्घटना लक्षात घेवून मुंबई महापालिकेने शहर आणि उपनगरातील धोकादायक इमारतींची यादी तयार करणे, मुंबईत एकूण २४४ अतिधोकादायक इमारती असून त्यात महापालिकेच्या ५२ (शाळा, निवासी संकुले) तर १९२ खासगी इमारती समाविष्ट असणे, दरवर्षी पावसाळ्यात मोडकळीस आलेल्या इमारतींना धोकादायक इमारती म्हणून नोटिसा देण्यात येणे, मात्र या नोटिशीची रहिवासी पर्वा न करता इमारतींना टेकू लावून मृत्यूच्या सापळ्यात राहत असणे, राज्य शासनाने पावसाळ्यात होणारी जीवित हानी टाळण्यासाठी मुंबईतील अति-धोकादायक इमारतींची दुरुस्ती करुन तेथील रहिवाशांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..9..



श्रीमती अलका देसाई : मुंबई शहरामध्ये ज्या वेगवेगळया एजन्सीची इमारतींची बांधकामे आहेत त्यामध्ये म्हाडा आहे, खाजगी बिल्डर्स आहेत, रिपेअर बोर्ड आहे, रिकन्स्ट्रक्शन बोर्ड आहे. असे असले तरी जी मंडळी कधीच घर दुरुस्त करीत नाहीत अशा खाजगी मालकांच्या इमारतींच्या बाबतीत मी बोलत आहे. याचे कारण असे की, उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, इतर खाजगी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मालकीच्या उपकरप्राप्त व इतर शासकीय इमारतींना महानगरपालिकेने नोटीस दिल्यानंतर खाजगी मालकीच्या इमारती, सहकारी गृहनिर्माण संस्था व शासकीय इमारतींची देखभाल करण्याची तसेच पुनर्बांधणी व रहिवाश्यांना पर्यायी जागा देण्याची जबाबदारी ही संबंधित यंत्रणांची असते." संबंधित यंत्रणा म्हणजे खाजगी यंत्रणा की सरकारी यंत्रणा हे ध्वनित होत नाही. याबाबतीत मंत्री महोदयांनी खुलासा करावा. हाऊसिंग यंत्रणेमध्ये काही 4 चांगले अधिकारी सोडले तर बाकीच्या अधिका-यांकडे सतत पाठपुरावा करावा लागतो. तरी देखील ते काम होईलच याची खात्री नसते. त्यामुळे ते काम कोणी करावे ? मग ती रिपेअर बोर्डाची इमारत असो, हौसिंग बोडाने रहिवाशांसाठी बांधलेली भाड्याची इमारत असो अगर खाजगी इमारत असो. या इमारती कधी कोसळतात आणि तेथील रहिवाशी तेथून कधी जातात किंवा कधी मरतात आणि खाजगी इमारतीचा ताबा घेऊन तेथे मोठेमोठे टॉवर्स बांधायला कधी मिळतात याच्या प्रतीक्षेत काही मंडळी असतात आणि अशा प्रकारचे चित्र मुंबई शहरामध्ये बघायला मिळते. जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीमध्ये राहाणा-या नागरिकांच्या जीवितास जी हानी पोहोचणार असते त्या बाबतीत आपली जबाबदारी म्हणून आपण काय ठरविणार आहात ?

...नंतर श्री. खर्चे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर : महोदय, मुंबई शहरात अशा धोकादायक इमारतींच्या बाबतीत उपकर प्राप्त इमारतींसाठी घरदुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या माध्यमातून देखरेख करणे, नवीन बांधणे अथवा पर्यायी घरे देणे अशा प्रकारचे काम केले जाते. तसेच यासाठी मुंबई महानगर पालिकेची एक यंत्रणा आहे त्या माध्यमातून ज्या खाजगी इमारती आहेत त्या महापालिकेची प्रॉपर्टी आहेत, त्यांची दुरुस्ती करुन वेळप्रसंगी पुनर्बांधणी करणे ही प्रक्रिया करण्याचे काम केले जाते. म्हाडाच्या माध्यमातून ज्या सोसायट्यांना घरे दिली जातात त्या इमारतीचे, त्या प्रॉपर्टीचे कन्व्हेयन्स केल्यानंतर ती संपूर्ण जबाबदारी त्या त्या सोसायटीची असते. भविष्यात त्या ठिकाणी पुनर्बांधणी करण्याची गरज पडली तरी ती त्या त्या संस्थेने स्वत:हून केली पाहिजे. काही इमारती म्हाडाच्या किंवा महापालिकेच्या जमिनीवर सुध्दा नाहीत, खाजगी जागेवर आहेत, अशा धोकादायक इमारतींची संख्या सुध्दा मुंबईत मोठ्या प्रमाणावर आहे. पावसाळ्यात महापालिकेच्या वतीने अशा 244 इमारतींपैकी 192 इमारतींच्या मालकाना नोटिसेस दिल्या आहेत. अशा नोटिसेस देताना त्यात स्पष्ट सूचना केल्या जातात की, ही इमारत राहण्यायोग्य नसल्याने ती दुरुस्त करावी अथवा नव्याने बांधकाम करावे.

**उप सभापती** : आपण पोलिसांच्या निवासस्थानांच्या बाबतीत मात्र सभागृहात वेगळेच उत्तर देत असता, त्यांच्या संदर्भात असा पॉझिटिव्ह मुद्दा का येत नाही ?

श्री. सचिन अहिर : महोदय, ज्यांच्यासाठी कोणत्याही प्रकारचा पर्याय देण्याचा प्रयत्न होत नाही असे जे ओनर्स असतील त्यांनी स्वत:हून त्यांची व्यवस्था करावी, असे शासनाचे धोरण आहे.

श्री. भाई जगताप : महोदय, मंत्री महोदयांनी नेहमीच्याच पध्दतीने व व्यवस्थित उत्तर दिले असले तरी एक गोष्ट मात्र नाकारता येणार नाही. ती म्हणजे 16 हजार पेक्षा जास्त इमारती आज धोकादायक स्थितीत आहेत. येथे दिलेल्या निवेदनात म्हटल्यानुसार सन 1940 पासूनच्या जवळपास 12 हजार इमारती आहेत. अशा इमारतींच्या ठिकाणी नव्याने बांधकाम करण्यासाठी या मालकांना प्रोत्साहित करण्यासाठी शासनाचा एक प्रचलित नियम आहे. त्यानुसार या सोसायट्या प्रोत्साहित झ ाल्या नाहीत तर दुसरा पर्याय सुध्दा आपल्याकडे आहे. दुसरा पर्याय म्हणजे डी.सी.रुल मध्ये 33 (7) या कलमाच्या माध्यमातून दुरुस्ती करुन क्लस्टर डेव्हलपमेंटबाबतचा धोरणात्मक निर्णय देखील शासनाने घेण्याचा प्रयत्न केला होता. पण त्याचा पुढे म्हणावा तसा

....2.....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ........

फायदा झाला नाही. कारण या सर्व इमारती 100 वर्षापूर्वीच्या आहेत. त्यात प्रामुख्याने 244 (सी) (1), 244 (सी) (2) 244 (सी) (3) असे तीन भाग आहेत. दुर्दैवाने या 244 (सी)(1) मधील इमारती अत्यंत खिळखिळ्या झालेल्या आहेत. अशा इमारतींच्या बाबतीत सरकार, म्हाडा किंवा तत्सम यंत्रणा कोणते धोरण अवलंबिणार आहे, जेणेकरुन 16 हजारपेक्षा जास्त इमारतींचा विकास एकत्रित करणे सोपे होईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी असेही विचारले की, किती सोसायट्यांना आपण पुनर्बांधणी करण्यासाठी प्रोत्साहित केले, त्यातून किती सोसायट्यांचे पुनरुज्जीवन झाले अथवा किती सोसायट्यांच्या जागेवर पुनर्बांधणी करण्यात आली?

श्री. सचिन अहिर : महोदय, मुळात अशा प्रकारे धोरणात्मक निर्णय घेत असताना आपण मुंबई शहराचे दोन भाग केले. त्यात बेटावर असलेले जुने शहर आणि दुसरे उपनगर. सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, अशा उपकर प्राप्त आणि बेटावर असलेल्या इमारती यांचा एकत्रित पुनर्विकास करता यावा म्हणून आपण डी.सी.रुल 33 (9) मध्ये बदल केला व चार हजार पेक्षा जास्त इमारती एकत्र होती तर त्यांना एफएसआय वाढवून देण्याचा विचार केला जाईल अशी भूमिका शासनाने घेतली होते. आतापर्यंत अशा प्रकारे 10 प्रकल्पांना मान्यता देण्याचे काम शासनाने केले हे सांगण्यास मला आनंद वाटतो. गेल्याच महिन्यात भेंडी बाजार येथील 222 इमारतींना क्लस्टर डेव्हलपमेंटसाठी मान्यता देण्याचे काम शासनाने केले. अशाच प्रकारचे प्रयत्न उपनगरात सुध्दा व्हायला पाहिजेत म्हणून उपनगरातील अशा धोकादायक इमारतींच्या बाबतीत सुध्दा अफझलपूरकर समितीच्या शिफारशी मान्य करण्याबाबत शासनाचे धोरण आहे. हे सध्या अंतिम टप्प्यात आहे. या शिफारशींना ऑलरेडी मान्यता दिलेली आहे. यासंबंधीचा निर्णय झाल्या नंतर उपनगरातील धोकादायक इमारतींना सुध्दा प्रोत्साहित करण्याचे काम करण्यात येईल. या सोसायट्यांना सुध्दा संधी देऊन प्रचलित धोरणानुसार अशा इमारतींनी पुढे यावे अशी शासनाची भूमिका आहे. कारण उपनगरात या शिफारशी लागू झाल्या तर तेथे सुध्दा अधिक चटई क्षेत्र निर्देशांक देऊन प्रोत्साहन मिळू शकेल.

श्री. भाई जगताप : महोदय, शासनाने सुध्दा या संदर्भात पुढाकार घेऊन हा प्रयत्न करावा अशी माझी विनंती आहे.

...3...



PFK/ AKN/ ST/ पूर्वी श्री. शिगम एम.... 12:30

डॉ. दीपक सावंत : महोदय, मंत्री महोदयांनी निवेदनात सांगितले आहे, पण रहिवाशी तयार असून देखील अशा धोकादायक इमारती तोडायला आल्यानंतर अनेक मालक परवानगी देत नाहीत. अशा प्रकारे ॲडॉमेंट मालकांवर कोणत्या कायद्यानुसार शासनाला कारवाई करता येईल ?

श्री. सचिन अहिर : महोदय, एमएमसी कलम 354 अंतर्गत नोटीस देऊन ती इमारत ताबडतोब रिक्त करण्याचे आदेश दिले जातात. त्यानंतर कलम 2 (सी) (1) अंतर्गत टोटल डिमॉलिशन करण्यात येते, कलम 2 (सी) (2) अंतर्गत इमारत दुरुस्त करण्यासाठी असेल आणि मालक तयार नसेल तर कलम 105 (बी) अंतर्गत त्या मालकावर एफआयआर दाखल करता येतो.

श्रीमती अलका देसाई : महोदय, आम्ही अशा मालकांवर कारवाई करु असे मंत्री महोदयांनी सांगितले. पण माझा प्रश्न असा आहे की, अशा प्रकारे किती मालकांवर शासनाने आतापर्यंत कारवाई केली, तशी कारवाई केली नसेल तर केव्हा करणार आहात ?

श्री. सचिन अहिर : महोदय, आतापर्यंत महापालिकेच्या माध्यमातून 138 मालकांना कलम 354 नुसार नोटिसेस दिल्या आहेत. तसेच आजच्या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन अशा प्रकारे कलम 354 च्या कारवाईची पूर्तता न करणाऱ्या मालकांवर त्वरित कारवाई करावी असे आदेश मुंबई महापालिकेला दिले जातील.

श्री. दिवाकर रावते : महोदय, क्लस्टर डेव्हलपमेंटच्या संदर्भात मंत्री महोदय स्वत:चीच पाठ थोपटून घेत आहेत. त्यांनी भेंडी बाजारात अशा प्रकारचा प्रकल्प सुरु करुन कौतूक करुन घेतले पण तो प्रकल्प अंमलात आणणाऱ्यांचे कौतूक ते का करीत नाहीत, हे मला समजत नाही. भेंडी बाजारातील क्लस्टर डेव्हलमेंटच्या निर्णयानंतर पाचव्याच दिवशी मुंबईत फटाके वाजवून स्वागत करण्यात आले आणि हे फटाके म्हणजे साखळी बॉम्बस्फोट झाले त्याच्या माध्यमातून कदाचित स्वागत केले असावे. निवेदनात शेवटच्या परिच्छेदात म्हटले आहे की, "धोकादायक इमारतीतील रहिवाशांच्या तात्पुरत्या स्थलांतरणासोबत अशा इमारतींचा पुनर्विकास करण्याच्या दृष्टीने सुध्दा विकास नियंत्रण नियमावलीतील कलम 33 (6), 33 (7) व 33 (9) अन्वये पुनर्विकासाकरिता ना हरकत प्रमाणपत्र देणे, ज्या ठिकाणी इमारत मालक अथवा विकासक पुनर्विकासाकरिता पुढे येत नसतील तेथे म्हाडाद्वारे इमारत भूसंपादित करुन पुनर्विकास करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे." वास्तविक पाहता सरफेसच्या संघर्षाने शासनाने अशा ठिकाणी 3

...4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर केला. हे करण्यासाठी सुध्दा एक वर्ष लागले. पण महापालिकेला हे अधिकार फक्त 2.5 पुरतेच आहेत आणि त्यानंतर 3 एवढे चटई क्षेत्र मंजूर करावयाचे असेल तर तो प्रस्ताव शासनाकडे पाठवावा लागेल, असा त्याचा अर्थ होतो. शासनाकडे प्रस्ताव पाठविल्यानंतर मात्र त्यात भ्रष्टाचाराला वाव असतो, असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. कारण ती फाईल माननीय मुख्य मंत्र्यांकडे येणार आणि मुख्यमंत्री निर्णय घेईपर्यंत किती दिसत जातील हे माहीत नाही. म्हणून शासनाने मोकळ्या मनाने हे अधिकार सुध्दा महापालिकेकडेच द्यावेत. तसेच चाळीच्या विकासासाठी शासनाने हे जे नियम केले आहेत त्यासंबंधीच्या सूचना मी याबाबतीत जे विधेयक सभागृहात चर्चेसाठी येईल तेव्हा करणारच आहे. पण अशा प्रकारे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर विना चौकशी बडतर्फीची कारवाई केली जाईल अशी तरतूद देखील या दुरुस्तीच्या वेळी करावी अशी मी सूचना करतो. त्यामुळे भ्रष्टाचाराला वाव राहणार नाही पण हे न करता शासनालाच हे अधिकार आपल्याकडे घ्यावयाचे आहेत असे दिसते. म्हणून तातडीने ही तरतूद रद्द करणार काय ? कारण मुंबई महानगर पालिकेवर शासनाचा विश्वास नाही असे वाटते. म्हणून 2.5 ऐवजी 3 एवढा चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्यासंबंधीचा निर्णय घेण्याचे अधिकार सुध्दा महापालिकेकडे देण्यात येतील काय ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, शासन जेव्हा धोरण आखते तेव्हा ते धोरण एकटया विभागासाठी नसते. भेंडी बाजाराचा विकास क्लस्टरमध्ये करण्याचा शासनाचा मानस आहे त्याच प्रमाणे मुंबा देवीचा, गोटावाल चाळीचा, माजगाव परिसराचा तसेच इतर परिसरात विकास करण्याचे धोरण आहे. सन्माननीय सदस्यांनी एफएसआयच्या संदर्भात उल्लेख केला असून त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, 3 टक्के एफएसआय दिला होता त्याची घोषणा दोन वर्षापूर्वीच झाली होती. परंतु यासंदर्भात म्हाडाने अट टाकली होती की, या पुढच्या काळात तुम्हाला 300 चौरस फूटाची रुम उपलब्ध करुन दिली परंतु त्यांना एफएसआयचा बेनिफीट दिला नव्हता. नंतरच्या लोकांना वाढीव एफएसआयचा फायदा मिळतो परंतु अगोदरच्या लोकांना वाढीव एफएसआयचा फायदा मिळत नाही त्यामुळे याबाबतीत सुध्दा मार्ग काढण्याचा आपण प्रयत्न केलेला आहे. तसेच सन 2008-09 मध्ये म्हाडाने ज्या काही एनओसी दिल्या त्यामध्ये जर 300 चौ.फुट बंधनकारक केले असेल तर या सर्वांनाच 3 टक्के एफएसआय देणे योग्य होईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी दुसरी जी सूचना केलेली आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, याबाबतीत माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उप मुख्यमंत्र्यांशी मी स्वत: चर्चा केली आहे. पारदर्शकता ठेवण्यासाठी सर्व अधिकार शासनाकडे घेण्यापेक्षा ते डिसेंट्रलाईज करता येतील काय याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास ही बाब आणून त्यासंदर्भात उचित निर्णय घेण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मुंबई शहर व उपनगराची मोठी व्याप्ती आहे. दक्षिण मुंबईमध्ये 50-100 वर्षाच्या किती तरी इमारती असून या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. बीएमसीचे जे 227 वॉर्डस् आहेत त्या वॉर्डात किती इमारती मोडकळीस आलेल्या आहेत याचा सर्व्हे करुन व्यवस्थित प्लॅनिंग करण्याची आवश्यकता आहे. ट्रान्झीट कॅंपची व्यवस्था नसल्यामुळे अनेक मोडकळीस आलेल्या इमारतीमधील रहिवासी इमारत खालीच करीत नाहीत. त्यामुळे ज्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत अशा मोडकळीस आलेल्या इमारती मधील रहिवाशांचा ट्रान्झिट कॅंपचा प्रश्न सोडविला गेला पाहिजे. किती इमारती मोडकळीस आलेल्या आहेत व किती इमारती नव्याने बांधावयाच्या आहेत तसेच नवीन इमारती एक दोन वर्षात बांधून पूर्ण झाल्यातरच लोक ट्रान्झीट कॅप



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण...

मध्ये जाण्यास विरोध करणार नाहीत. त्यामुळे 227 वॉर्डांमध्ये बीएमसीची मदत घेऊन ज्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत त्या सर्व इमारतींचा सर्व्हे करुन त्यांचा व्यवस्थित प्लॅन करण्याची माननीय मंत्री महोदयांची तयारी आहे काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अटकेत असलेला आरोपी मोहम्मद अली याने कोटयावधी रुपयांची जमवलेली मालमत्ता

**मु. शी.** : अटकेत असलेला आरोपी मोहम्मद अली याने कोटयावधी रुपयांची जमवलेली मालमत्ता यासंबंधी सर्वश्री रामदास कदम, परशुराम उपरकर ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"तेलमाफिया सयद अली मदार उर्फ चांदभाई यांच्या हत्येप्रकरणी अटकेत असलेला मोहम्मद अली यांनी कोट्यावधीची बेनामी मालमत्ता जमविल्याचे तपासात आढळून येणे, मुंबई व दुबईसह देशभरात ११ ट्रान्स्पोर्ट कंपन्या असून त्यांची वर्षाची उलाढाल १०० कोटीची असल्याचे तपासात आढळून येणे, या तपासानुसार क्राईमब्रँचच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयावर टाकलेल्या धाडीत शेकडो बनावट व्हाऊचर सापडणे, त्यावरुन ६५ लाख रोख देऊन एकाच वेळी शेकडो लिटर डिझेल खरेदी केल्याचे उघडकीस येणे, त्यांनी २५० ट्रक खरेदी केले असून याबाबत शासनाला योग्य तो कर ही न भरणे, शासनाने या प्रकरणांची सखोल चौकशी करुन त्यांचेवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. आर.आर.पाटील ( गृह मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात शासनाने अधिकची माहिती दिलेली आहे. मंत्रीमहोदयांना मला एवढेच विचारावयाचे आहे की, मोहम्मद अलीची एकंदर प्रॉपर्टी किती आहे ? संबंधित आरोपीकडे 230 वाहतूक मोटारगाडया, 72 फ्रोर्कलिफ्ट, 24 क्रेन वाहने आहेत. संबंधिताच्या देशभरात अनेक ट्रान्स्पोर्ट कंपन्या आहेत. त्यामुळे मोहम्मद अलीची मुंबई आणि दुबईसह एकंदर किती प्रॉपर्टी आहे ? मोहम्मद अलीकडे 10 वर्षापूर्वी काय होते व नंतर एकदम एवढी प्रॉपर्टी कशी काय आली ? सन 2008 मध्ये माजी तत्कालीन मुख्यमंत्र्यांना तसेच पोलीस महानिरीक्षकांना पत्र दिले होते व त्या पत्रामध्ये मोहम्मद अली हा खोपट येथे मोठया प्रमाणात ऑईल भेसळीचे काम करीत असल्याबाबत उल्लेख केला होता. परंतु यासंदर्भात कोणतीही कारवाई केली गेली नाही. पोलिसांचे आणि गुन्हेगारांचे संबंध कसे असतात हे माझ्या पत्रावरुन आपल्याला समजून येईल. मी जेव्हा पत्र दिले होते त्याच वेळेस कारवाई झाली असती तर बरे झाले असते. मोहम्मद अली हा कोटयावधी रुपयांचा मालक झालेला आहे. या आरोपीने बोटीमधील डिझेल चोरी करण्याचे सुध्दा काम केलेले आहे. तत्कालीन पोलीस अधिका-यांनी त्याच वेळेस संबंधितावर कारवाई केली असती तर आज ही वेळ आली नसती. त्यामुळे संबंधित पोलीस अधिका-यांवर कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आतापर्यंतच्या तपासामध्ये मोहम्मद अलीच्या प्रॉपर्टीचा तपास सुरु असून त्यासाठी ऑडीटर्स सुध्दा नेमलेले आहेत. इन्फोर्समेंट डायरेक्टरचे लोक सुध्दा यासंदर्भात तपास करीत आहेत. हा तपास पूर्ण झाल्यानंतर जी अतिरिक्त प्रॉपर्टी आढळून येईल त्याबाबत इन्कम टॅक्स विभागाला सुध्दा चौकशी करण्यास सांगण्यात येईल. तसेच त्याने किती कर बुडवेगिरी केलेली आहे त्या प्रमाणे कर वसूल करण्याच्या सूचना देखील देण्यात येतील.

सभापती महोदय, मोहम्मद अलीच्या प्रॉपर्टीच्या संदर्भात त्याच्या संगणकावरुन व रेकॉर्डवरून हॉटेल ब्ल्यू बर्ड, ससून डॉक, कुलाबा. अभ्युदय बँकेचे शेअर्स, मेरीटाईम इस्टर्न चेम्बर्स फ्लॅट नंबर 26,29,32,33,34, नंदलाल जानी मार्ग, मशीद बंदर, मुंबई पूर्व, प्लॉट नंबर 49, इम्रान अर्पामेंट प्लॉट नंबर 1,2 आग्रीपाडा, मयूर कोल्ड स्टोरेज इंडस्ट्रीअल एरिया, तुर्भे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

ठाणे, मारवान पाया प्रॉडक्ट कंपनी, सर्व्हे नंबर 11/1 सी, 8/7 सी, 2/6, 2/20, 8/1 डी, अशी एकूण 1.27 हेक्टर व सर्व्हे नंबर 2/17 बी मध्ये 0.35 हेक्टर इतकी रायगड जिल्हयात जमीन आढळून आलेली आहे. टॉरस ट्रान्सपोर्ट कंपनी, एम.ए. सायकल शॉप, मशीद बंदर, मुंबई, अलाहाबाद उत्तर प्रदेश येथे कमर्शियल कॉम्पलेक्स व बंगला, मारुती स्वीफ्ट, टोयाटा क्वालीस, तवेरा, होंडा सीआरव्ही अशा गाडया आहेत. त्याच्या प्रापर्टीची अजूनही चौकशी सुरु आहे. विरोधी पक्ष नेते असतांना सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी जे पत्र दिले होते त्यामध्ये मोहम्मद अलीचा उल्लेख तेल माफिया असा करण्यात आला होता. संबंधित पोलीस अधिका-यांना या प्रकरणाची माहिती होती काय, त्यांनी या प्रकरणात दुर्लक्ष केले होते काय याची सुध्दा माहिती घेण्यात येईल. जर संबंधिताला कोणी पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला असेल तर आयजी लेव्हल व जॉईंट सीपी कडून सुध्दा याप्रकरणाचा तपास केला जाईल व दोषी आढळलेल्या अधिका-यावर कारवाई करण्यास मी मागे पुढे पाहणार नाही. एका मर्डर केसमध्ये संबंधित आरोपीला ताब्यात घेतले असून त्याच्या सर्व साथीदारांना मोक्का लावण्यात आला असून मोहम्मद अली आता न्यायालयीन कस्टडीत आहे. मोहम्मद अलीचे साम्राज्य उध्वस्त करण्यामध्ये आज तरी पोलीस दल यशस्वी झालेले आहे.

श्री एस.क्यू.ज़मा : सभापति महोदय, सम्माननीय सदस्य के प्रश्न को माननीय मंत्री महोदय ने विस्तृत रुप से उत्तर दिया है. मोहम्मद अली के प्रॉपर्टी के बारे में यहां पर बताया गया है. उन्होंने कहा है कि यह केस न्यायालय में दाखिल कर दिया गया है इसलिए यह मॅटर सबज्युडिस है. मेरा माननीय मंत्री जी से एक ही प्रश्न है. केंद्र सरकार इस बारे में विचार कर रही है कि ऐसे माफिया लोगों की जो बेनामी प्रॉपर्टी है, उसकी पूरी प्रॉपर्टी जल्द से जल्द अपने कब्जे में करने के लिए कोई विशेष कानून बनाने का प्रावधान महाराष्ट्र शासन करेगी क्या ? क्योंकि अभी के वर्तमान परिस्थिति में आप उसकी प्रॉपर्टी टेकओव्हर नहीं कर सकते. जिनके पास इल्लीगल प्रॉपर्टी है, उसके संबंध में विशेष कानून बनाया जा सकता है क्या ? क्योंकि केंद्र

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस.क्यू.ज़मा...

सरकार और महाराष्ट्र सरकार की जांच प्रक्रिया में बहुत समय लगता है. कोर्ट की प्रक्रिया चालू होती है. दस साल केस चलने के बाद भी कुछ नहीं होता है. इसलिए एक विशेष कानून बनाकर ऐसी सारी बेनामी प्रॉपर्टी को टेकओव्हर करने की योजना सरकार बना सकती है क्या ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे तिचा अभ्यास करावा लागेल. अशा बेनामी प्रॉपर्टी घेण्याच्या दृष्टीने काय उपाययोजना कराव्या लागतील हे तपासून त्या संदर्भात कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला जाईल.

-------

नंतर श्री.भारवी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ठाणे शहरातील मुंब्रा बायपास रस्त्याचे निकृष्ट झालेले काम

**मु. शी.** : ठाणे शहरातील मुंब्रा बायपास रस्त्याचे निकृष्ट झालेले काम यासंबंधी सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे,रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे शहरातील मुंब्रा बायपास रस्त्याचे निकृष्ट झालेले काम, सदर रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले असल्याची उघडकीस आलेली धक्कादायक माहिती, त्यामुळे सदरचा रस्ता वाहतुकीच्या दृष्टीने धोकादायक झालेला असणे, परिसरातील स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांनी रस्त्यात केलेले निषेधात्मक आंदोलन, निकृष्ट दर्जाच्या झालेल्या या कामाची उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन तातडीने संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप याबाबत पुन्हा आंदोलनाचा दिलेला इशारा, सदर रस्त्याची त्वरित दुरुस्ती करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.रणजित कांबळे (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मुंब्रा बायपास रस्त्याच्या कामासंबंधातील माझी लक्षवेधी सूचना आहे. आपण स्वत:ही ठाणे जिल्ह्यातील आहात. शासनाने ठाणे जिल्ह्याची जणू काही नाकाबंदीच केली आहे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मग तो भिवंडी बायपास रस्ता असो, मुंब्रा बायपास रस्ता असो, शीळ-कल्याण बायपास रस्ता असो, घोडबंदरला जोडणारा अहमदाबाद रस्ता असो. सदर रस्त्याचे काम 2007 मध्ये पूर्ण झाले असे लेखी उत्तरात नमूद केले आहे. सदर रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर त्या कामाच्या उद्‌घाटन समारंभाला देखील मी उपस्थित होतो. त्या उद्‌घाटनाच्या कार्यक्रमातच मी सांगितले होते की, हे काम किती वर्ष टिकणार आहे, हे काम योग्य पद्धतीने झाले आहे की नाही याची चौकशी करावी. सहा महिन्यातच मुंब्रा बायपास रस्त्याला तडे पडायला लागले. यापूर्वी मी या बायपास मार्गा विषयीचे दोन प्रश्न विचारले होते व आता लक्षवेधी सूचना उपस्थित करीत आहे. सुरूवातीलाच काम नीट करावयाचे नाही आणि उत्तरात असे म्हटले आहे की, स्वखर्चाने तो त्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करत आहे. आधी जो रस्ता केला होता तो योग्य पद्धतीने केला नव्हता. त्यावेळी त्याच्यावर कारवाई का केली नाही. आपण उत्तरात नमूद केले आहे की, निविदा शर्तीनुसार सवलत कालावधीमध्ये संपूर्ण रस्त्याची देखभाल दुरूस्ती उद्योजकाने करणे आवश्यक आहे. तथापि उद्योजकाने रस्त्यावरील खड्डे विहित वेळेत न भरल्याने माहे सप्टेंबर 2010 पासून जानेवारी 2011 पर्यंत 130 दिवसाच्या कालावधीत पथकर वसुली बंद करण्यात आली होती. शेवटी तिथल्या लोकांना आंदोलन करावे लागले. त्यामुळे 130 दिवस पथकर वसुली बंद करण्यात आली. टोल वसुली जबरदस्तीनेच बंद केली होती. यामध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाला होता म्हणून मी चौकशीची मागणी केली होती. परंतु, शासनाने चौकशी केली नाही. त्याचे मला काहीही उत्तर आले नाही. आजही तेथील 500 मीटरचा रस्ता पूर्ण झालेला नाही. असे असताना सद्य:स्थितीत रस्त्याची वाहतूक सुरळीत सुरू आहे असे नमूद करण्यात आलेले आहे.

सभागृहात सन्माननीय सदस्य श्री.सुभाष भोईर देखील उपस्थित आहेत. त्यांना देखील आपण या रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरू आहे काय, हे विचारावे. आम्ही दर चार दिवसांनी त्या भागात जात असतो.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर..

त्यामुळे माझा प्रश्न आहे की, हा पथकर रस्त्याचे काम पूर्ण होई पर्यंत बंद करणार काय ? ठाणे जिल्हा एमएमआरडीएच्या अंतर्गत येतो. एमएमआरडीएला सर्व अधिकार देण्यात आलेले आहेत. 11 टोल नाके या जिल्ह्यात आहेत. त्यामुळे एमएमआरडीएच्या भागात जे टोलनाके आहेत ते शासन बंद करणार आहे काय ? यानंतरचा प्रश्न चौकशीच्या संदर्भातील आहे. सदर रस्त्याच्या कामा संबंधातील चौकशी आपण केली आहे काय, त्या चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले, त्या कंत्राटदाराला आपण काळ्या यादीमध्ये टाकले काय, त्याला पेनल्टी लावली आहे काय ? ठाणे जिल्ह्यातील सर्व बायपास रस्त्यांना खड्डे पडले आहेत. खड्डे बुजवण्यासाठी 400 कोटी रूपये लागतात. खड्डे बुजवल्यानंतर पुन्हा पाऊस आल्यानंतर तेथील वाहतूक मंदावते. तेव्हा यासंबंधी आपण कोणती उपाययोजना करणार आहात ?

श्री.रणजीत कांबळे : सभापती महोदय, हे खरे आहे की, जो रस्ता तयार करण्यात आला होता त्याला खड्डे पडले होते. याला मुख्य कारण हा रस्ता डोंगराच्या बाजूला आहे. या रस्त्याच्या बाजूला असलेल्या गटारामध्ये डेबरीज पडून राहते. त्यामुळे पावसाचे पाणी पडल्यानंतर गटार ओव्हरफ्लो होते व ते पाणी रस्त्यावर येते त्यामुळे रस्ता खराब होतो. रस्ता खराब झाल्यामुळे आंदोलन करण्यात आले होते. त्यामुळे 140 दिवस टोल वसूल करण्याचे बंद करण्यात आले होते. या संबंधी कंत्राटदाराला बोलाविले होते. त्यांच्यावर 5.41.कि.मी.रस्त्याचे सिमेंटीकरण स्वखर्चाने करण्यात यावे असे बंधन घालण्यात आले. तो चार लेनचा रस्ता आहे. एका दिशेच्या दोन लेनच्या रस्त्याचे सिमेंटीकरण झाले आहे. मान्सून संपल्यानंतर उरलेल्या कामाचे देखील सिमेंटीकरण करण्यात येणार आहे. रस्त्यावर खड्डे पडू नयेत म्हणून सिमेंटीकरणाचा उद्देश होता. त्यांच्या क्वालिटीमध्ये कुठे ना कुठे तरी फरक होता. डेबरीजमुळे ड्रेन चोकअप झाले होते. त्यामुळे आपण सिमेंटीकरण करावे असे सांगितले होते. तसेच त्यांच्या कन्सेशन पिरिएडमध्ये कुठेही वाढ करण्यात आलेली नाही. 14 वर्षे कन्सेशन पिरिएड आहे तो आजही लागू आहे. ते आता पूर्ण रस्त्याचे सिमेंटीकरण करणार आहेत. एमएमआरडीच्या हद्दीत टोल लावू नये असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. आता आपण बोओटीवर काम देतो. त्यामुळे त्या कामाची पूर्ण जबाबदारी त्यांचीच असते. टोलच्या माध्यमातून ते पैसे वसूल करण्यात येतात. लोकांच्या मागणीमुळे आम्ही

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजीत कांबळे....

बीओटीवर काम घेतो. डिमांड, वाहतुकीची वर्दळ, या गोष्टी विचारात घेऊनच आपण प्रस्ताव तयार करतो. जेव्हा एखादा कंत्राटदार बीओटीमध्ये पैसे गुंतवितो तेव्हा त्याला त्याचा पैसा हा मिळालाच पाहिजे कारण तो कॉन्ट्रक्टचा भ्ाग असतो.

श्री.सुभाष भोईर : सभापती महोदय, अत्यंत महत्त्वाच्या विषयावर लक्षवेधी सूचना मांडली आहे. सदर रस्ता हा बीओटी तत्त्वावर देत असताना कंत्राटदाराने स्वत:च्या पैशातून रस्ता बांधलेला आहे. कॉक्रीटीकरण केलेल्या कामाची गुणवत्ता व दर्जा मानका प्रमाणे योग्य आहे,असे शासनाचे म्हणणे आहे म्हणून मी अशी मागणी करणार आहे की, या रस्त्याच्या कामासंबंधात आपण चौकशी करावी. यासाठी आपण समिती नेमावी. जेणे करून कामाचा दर्जा काय आहे हे आपल्याला कळेल. कारण कामाचा दर्जा पाहता येत्या दोन वर्षातच या रस्त्याला तडे जाणार आहेत. मी रोज त्या रस्त्यावरून जातो. आता पर्यंत 50 ते 60 टक्के रस्ता खराब झालेला आहे. अशा प्रकारचे कॉंक्रीटकरण तेथे केलेले आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, या रस्त्याच्या कामाची अवस्था पाहण्यासाठी समिती नेमून चौकशी करावी. त्यामुळे कामाचा दर्जा कळून येईल. त्यामुळे शासन समिती नेमून चौकशी करणार आहे काय ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, या पूर्वी माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. सदर रस्त्याचे काम सन 2000 सालामध्ये सुरू झाले होते. हा चार लेनचा रस्ता होता. त्याचे डांबरीकरण करायचे होते. या रस्त्याच्या एका बाजूला खोल दरी सारखा भाग आहे. त्याच्या खाली झोपड्या होत्या. तेथील माती काढणे, झोपड्या मागे घेणे अशा प्रकारची कामे होती. काम करीत असताना मध्येच रस्ता खचला. त्यामुळे तो खराब झाला. त्यामुळे खूप आरडाओरड झाली. त्यामुळे आपण ताबडतोब टोल बंद केला. तो रस्ता कंत्राटदाराने दुरूस्त केला. त्यानंतर देखील अडचणी सुरू राहिल्या. त्यानंतर त्याने सांगितले की, मी माझ्या खर्चाने कुठल्याही प्रकारचे तोशीस टोलवर पडू न देता या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करून देतो. त्याने दोन्ही दिशांकडील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण केले. फक्त एका दिशेच्या लेनमधील 400 मीटरचे कॉंक्रीटीकरण करणे बाकी आहे. ते पावसाळा संपल्यानतर हाती घेण्यात येईल. आता तो रस्ता ठीक आहे. मी यासंबंधी आमच्या अभियंत्यांना विचारले की, रस्ता बघितला काय ? त्यांनी सांगितले की, होय, हा रस्ता ठीक आहे. 5.41

..5



BGO/ ST/ AKN/ 12:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ....

कि.मी.चा रस्ता आहे. हा चार लेनचा रस्ता आहे त्यापैकी एका दिशेकडील सिमेंटीकरण पूर्ण झाले असून दुसऱ्या दिशेकडील दोन लेनमधील फक्त 400 मीटरचे कॉंक्रीटीकरणाचे काम शिल्लक राहिलेले आहे. तेथे डांबरीकरण केलेले आहे. राहिलेले काम पावसाळ्यानंतर हाती घेण्यात येणार आहे. मी येथे असेही सांगू इच्छितो की,जो कंत्राटदार टोल वसूल करतो त्यानेच रस्त्याची देखभाल करायची आहे.

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री छगन भुजबळ...

त्याच्याकडून जर पुन्हा त्रास झाला तर त्याचा टोल बंद होईल. या पूर्वी देखील त्याचा टोल बंद झाल्यामुळे त्याने पुन्हा रस्ता व्यवस्थित केला असावा असे वाटते. मघाशी मी सांगितल्याप्रमाणे हा रस्ता व्यवस्थित आहे असे इंजिनिअरनी सांगितले आहे. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, हा रस्ता खराब झाला असेल तर त्याठिकाणी मुख्य अभियंत्यांना आजच त्या रस्त्याची पाहणी करण्याकरिता पाठवून तो रस्ता पुन्हा एकदा तपासण्यास लावतो. त्यामध्ये जर काही अडचण असेल तर ताबडतोब त्या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत पुढील कारवाई केली जाईल.

**उप सभापती** : या लक्षवेधी सूचनेवर सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर व अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारले आहेत. आदरणीय सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदय मी आपल्याला विश्वासाने आणि खात्रीने सांगतो की, हा रस्ता ज्यांने बांधला आहे, त्याने अत्यंत बेजबाबदारीने, नागरिकांच्या जीवाची कोणतीही पर्वा न करता बेदरकारपणे अत्यंत वाईट काम केले आहे. जेव्हा आम्ही सभागृहामध्ये खात्रीशीररित्या वस्तुस्थिती मांडतो ती नेहमी सत्य मानली जाते. त्यामुळे निदान आमचा जो अनुभव आहे त्या नुसार शासनातील अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने अशा गोष्टी नेहमी घडत असतात. म्हणून या ठिकाणी माझे स्पष्ट मत झाले आहे की, या रस्त्याचा गेल्या पाच-सहा वर्षामध्ये जो काही खेळखंडोबा झाला आहे त्याला कंत्राटदाराचा बेजबदारपणा कारणीभूत असल्यामुळे आपण ताबडतोब त्याला काळया यादीमध्ये टाकावे हे मी अत्यंत जबाबदारीने बोलत आहे. या कंत्राटदाराने हे काम अत्यंत वाईट दर्जाचे केले आहे, हे गेल्या पाच-सहा वर्षात आपल्याला दिसून आले आहे. या करिता आपण त्याचा टोल बंद करण्याची कारवाई केली आहे. अशा बेजबाबदार कंत्राटदाराला राज्य शासनाने आणखी काही ठिकाणी कामे दिली आहेत, हे आम्ही रस्त्याने जाता-येतांना पहात असतो. एका कंत्राटदाराने जर एखादी चूक केली असेल तर त्या चुकांची पुनरावृत्ती राज्यात अनेक ठिकाणी करावयाची काय हा देखील एक महत्वाचा प्रश्न आपणासमोर आहे.

या निमित्ताने मी एवढेच सांगू इच्छितो की, केवळ चिफ इंजिनिअर किंवा संबंधित अधिकारी यांना त्या ठिकाणी पाहणी करण्याकरिता पाठवून त्यांनी दिलेल्या माहितीवर विश्वास ठेवून आपण जर या सभागृहामध्ये आम्हाला उत्तर देणार असाल तर लोकप्रतिनिधी म्हणून जनतेच्या प्रती आमची देखील काही कर्तव्ये आहेत. आपण आमचे नेते आहात, परंतु आम्ही ज्या वेळी एखादी गोष्ट तळमळीने मांडतो त्या वेळी ती गोष्ट तितकीच खरी आहे असे आपण निश्चितपणे मानले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती....**

पाहिजे. या ठिकाणी एका कंत्राटदाराने केलेली चूक ही शासनाच्या रेकॉर्डवर आहे, त्या करिता त्याचा टोल बंद करण्यात आला. आपण असेही सांगितले की, त्या कंत्राटदाराचा टोल बंद केल्यानंतर सुध्दा तो स्वखर्चाने काम करीत आहे. तो जर स्वखर्चाने काम करीत असेल तर तो शासनावर काहीही उपकार करीत नाही. राज्य शासनाच्या अटीनुसार ज्या रस्त्यांची तो देखभाल करतो त्याचे तो पैसे घेत असतो. त्यामुळे दुरुस्तीचे काम करणे हे त्याचे कर्तव्य आहे. हे कर्तव्य पार पाडण्यामध्ये जर तो पुन्हा कुचराई करीत असेल तर त्याला शासन झालेच पाहिजे. या सभागृहामध्ये मी उपसभापती म्हणून जरी काम करीत असलो तरी ठाण्यातील एक लोकप्रतिनिधी देखील आहे. या सभागृहामध्ये ठाण्यातील लोकप्रतिनिधींनी ही लक्षवेधी सूचना मांडली आहे, ती गंभीर बाब समजून अशा चुकांची पुनरावृत्ती होता नये . या बाबतीत आपण एका कंत्राटदाराला जरी शिक्षा केली तरी बाकीचे सर्व कंत्राटदार वठणीवर येतील. या पुढे अशा प्रकारची कामे होणार नाहीत याची निश्चितपणे दक्षता घेण्याच्या दृष्टीने या कंत्राटदाराला आपण तत्काळ काळया यादीमध्ये टाकावे असे मी आपल्याला या ठिकाणी सुचवितो.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, आपण मार्गदर्शन केल्याबद्दल मी आपला आदर व्यक्त करतो व आपले आभार सुध्दा मानतो. या कामाच्या करारनाम्यानुसार सन 2000 मध्ये कामाचा आदेश देण्यात आला होता. त्यानंतर तयार करण्यात आलेला हा रस्ता डोंगरी भागातील असून त्यावर दरड कोसळत असते. मी स्वत: त्या ठिकाणी जाऊन तो रस्ता पाहिला आहे. हा रस्ता एका दरडीच्या बाजूने उंचावरुन जात आहे. रस्त्याच्या खालच्या बाजूला झोपडया असून तो रस्ता खालून पोखरत आतमध्ये गुहेसारखा करण्यात आलेला आहे.

**उप सभापती** : तेथे काही लोक मृत्युमुखी मेले आहेत.

श्री. छगन भुजबळ : रस्त्याच्या खालच्या बाजूला रस्ता पोखरत नेणे यावर कुणाचा कंट्रोल राहणार नाही. वरच्या बाजूला किती मजबूत रस्ता असला तरी खालच्या बाजूला तो पोखरला तर तो डॅमेज होणार. तो डॅमेज झाल्यानंतर त्या कंत्राटदाराला शिक्षा म्हणून त्याचा टोल बंद करण्यात आला. त्याने सरकारवर मेहरबानी केली नाही हे बरोबर आहे, परंतु त्या रस्त्याचे कॉक्रिटीकरण करणे त्याच्यावर बंधनकारक नव्हते. त्याला आपण फक्त डांबरीकरण करण्याचे कॉट्रॅक्ट दिले आहे. हे सर्व झाल्यानंतर सुध्दा त्याच्या 14 वर्षाच्या टोलमध्ये एक दिवसाची सुध्दा वाढ करण्यात आलेली नाही. मी मघाशी सांगितले आहे की, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती सत्य



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. सभापती महोदय, त्या रस्त्याचे नुकतेच काढण्यात आलेले फोटो माझ्याकडे आहेत ते आपण पाहू शकता. मी मघाशी हेच सांगितले की,माझ्या इंजिनिअरनी मला जरी सांगितले असले तरी सन्माननीय सदस्यांनी माहिती सांगितल्यानंतर त्या रस्त्याची पाहणी करण्याकरिता मी चिफ इंजिनिअर, क्वॉलिटी कंट्रोलचे अधिकारी इतकेच नव्हेतर माझ्या विभागाच्या सचिवांना सुध्दा पाठवितो. मला जे या ठिकाणी सांगण्यात आले, हे फोटो दाखविण्यात आले त्याप्रमाणे मी उत्तर दिले आहे. त्यामुळे मला त्या मध्ये जर काही आढळून आले तर निश्चितपणे आपण केलेल्या सूचनांबाबत विचार केला जाईल.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, त्या कंत्राटदाराने शासनावर मेहरबानी केली नाही असे मंत्रीमहोदयांनी सांगितले हे खरे आहे. सन 2017 मध्ये त्या रस्त्यावरुन जेवढी वाहने जावयास पाहिजेत तेवढी वाहने आज त्या रस्त्यावरुन जात आहेत असा वाहतूक विभागाचा अहवाल आहे. त्यामुळे त्याने पथकर अगोदरच वसूल केलेला आहे. त्याने कॉंक्रिटीकरण केले म्हणून आपल्यावर उपकार केले नाहीत. पथकरामधून त्याला भरपूर पैसे मिळाले आहेत. सन 2007 मध्ये या रस्त्याचे उद्‌घाटन झाल्यानंतर सहा महिन्यामध्ये तो रस्ता खराब झाला. त्यामुळे त्या रस्त्यावरुन गेल्या पाच वर्षामध्ये मी कधीही जाऊ शकलो नाही. अशा परिस्थितीत त्या कंत्राटदाराला काळया यादीमध्ये टाकण्यास आपण टाळाटाळ कां करीत आहात?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, मी आपल्याला सांगितले आहे की, आता तो रस्ता मोटरेबल केलेला आहे. त्याचे फोटो माझ्याजवळ आहेत. मी तुम्हाला हे देखील सांगितले आहे की, याऊपर सन्माननीय सदस्य माहिती देत आहेत ती खरी आहे असे समजून चिफ इंजिनिअर आणि क्वॉलिटी कंट्रोलच्या अधिकाऱ्यांना जाऊन पाहणी करण्यास सांगितले आहे. तुम्हाला जर वाटत असेल तर मी स्वत: जावून पाहणी करण्यास तयार आहे. परंतु या ठिकाणी कुणाला तरी वाटत आहे म्हणून त्या कंत्राटदाराला काळया यादीमध्ये, गोऱ्या यादीमध्ये टाकण्यापूर्वी आपल्याला त्याला काहीतरी पुरावे द्यावे लागतील. असा आपण निर्णय घेतला तर उद्या तो कोर्टात गेल्यानंतर आणखी अडचण निर्माण होईल. त्यामुळे आपण सत्य परिस्थिती पाहिली पाहिजे. सभापती महोदय, मी आपणास स्पष्टपणे सांगितले की,सन 2000 मध्ये कॉंट्रॅक्ट झाले तेव्हापासून जर तो रस्ता खराब झ ाला तर तो दुरुस्त करण्याची जबाबदारी त्या कंत्राटदाराची आहे. जर रस्ता खराब झाला तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ....

त्याला टोल देता कामा नये, तो रस्ता त्या कंत्राटदाराने दुरुस्त करावयाचा आहे. त्याला आपण टोलचा एक दिवस सुध्दा वाढवून दिलेला नाही. त्याला एकदा सजा झालेली आहे, त्यानंतर तो रस्ता दुरुस्त करण्यात आला आहे. सद्य परिस्थितीत फोटोवरुन आणि विभागाने दिलेल्या माहितीवरुन तो रस्ता चांगल्या स्थितीत आहे. सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, तो रस्ता चांगला नाही. या करिता मी क्वॉलिटी कंट्रोलचे अधिकारी, सचिव यांना पाठवून त्याची तपासणी करतो. तपासणीमध्ये काही अयोग्य आढळले तर त्याच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

**उप सभापती** : सन्माननीय मंत्रीमहोदय, या बाबतीत जर पुरावे सादर केले तर त्या कंत्राटदाराला आपण काळया यादीमध्ये टाकण्यास तयार आहात काय?

श्री. छगन भुजबळ : मी आपल्याला सांगितले आहे की, चिफ इंजिनिअर, क्वॉलिटी कंट्रोलचे अधिकारी आणि विभागाचे सचिव यांना पाठवून रस्त्याची तपासणी केली जाईल व त्यानंतर त्यावर कारवाई केली जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेख

**पृ. शी.** : सदाशिव पेठ, पुणे येथील सोनोग्राफी सेंटरमध्ये जनवादी महिला संघटनेच्या कार्यकर्त्यांनी केलेले स्टिंग ऑपरेशन

**मु. शी.** : सदाशिव पेठ, पुणे येथील सोनोग्राफी सेंटरमध्ये जनवादी महिला संघटनेच्या कार्यकर्त्यांनी केलेले स्टिंग ऑपरेशन याबाबत श्री.अनिल भोसले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. अनिल भोसले यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"पुणे शहरातील नामांकित पेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सदाशिव पेठमध्ये स्त्री रोग प्रसूती तज्ज्ञ डॉ. मकरंद रानडे यांच्या हॉस्पिटलमध्ये तसेच डॉ. नीना मठरानी यांच्या सोनोग्राफी सेंटर्सवर जनवादी महिला संघटनेच्या कार्यकर्त्यांनी स्टिंग ऑपरेशन करुन गर्भलिंग निदान होत असल्याचे उघड करुनही पालिकेच्या आरोग्य खात्याने पुढाकार घेऊन एकही स्टिंग ऑपरेशन केलेले नाही. सदर स्टिंग ऑपरेशनसाठी प्रत्येक जिल्हा आणि महापालिकांना 25 हजार रुपयांच्या निधीची आरोग्य खात्याने तरतूद केली असतांनाही गेल्या काही वर्षापासून या निधीतील एक रुपयाही खर्च झालेला नाही. मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण झपाटयाने घटत असतांनाही स्त्री भ्रूण हत्येचे गूढ राज्यात उघड झाले असतानाही याकडे गांभीर्याने न पाहता पुणे शहरात मोठया प्रमाणात रुग्णालय सुरु आहेत या बाबत शासनाने लक्ष घालून सदर रुग्णालये तातडीने बंद करण्याकरिता सदर बाब मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून उपस्थित करीत आहे, कृपया शासनाने याबाबत निवेदन करावे."

---- (यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : माचिसवर छत्रपती शिवाजी महाराजांचे छायाचित्र छापणे

**मु.शी.** : माचिसवर छत्रपती शिवाजी महाराजांचे छायाचित्र छापणे याबाबत श्री.दिवाकर रावते, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□य सदस्य श्री.दिवाकर रावते यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

याठिकाणी विशेष उल्लेखाच्या सूचनेच्या माध्यमातून मी अत्यंत महत्वाचा विषय मांडत आहे. "राष्ट्रपुरुषांच्या छायाचित्रांचा वापर हा कुठेही जाहिरातीसाठी किंवा कोणत्याही वस्तुच्या वेष्टनावर वापरु नये अशा प्रकारची तरतूद आपण नियमामध्ये आणि कायद्यामध्ये केलेली आहे.परंतु माझ्या हातामध्ये काड्याची पेटी आहे. माझ्या शिवसेना पक्षाचा एक कार्यकर्ता काल परळी (जि.बीड) येथून रेल्वेने मुंबईला येत होता. त्यावेळी शेजारी बसलेल्या एका प्रवाशाने बिडी पेटवली. त्या प्रवाशाच्या हातातील माचिसकडे माझ्या कार्यकर्त्याचे सहज लक्ष गेले आणि त्यावरील चित्र पाहून तो अवाक झाला. महोदय, त्या माचिसवर छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र होते. माझ्या कार्यकर्त्याने त्या प्रवाशास विचारले की, ही माचिस कुठून आणली ? तेव्हा त्या प्रवाशाने ही माचिस परळी वैजनाथ (जि.बीड) येथील एस.टी.स्टॅण्डवरील पानपट्टीच्या दुकानावर घेतल्याचे सांगितले.

सभापती महोदय, सदर माचिसचे कव्हर मी आपणाकडे व माननीय मुख्यमंत्री, माननीय गृहमंत्री यांच्याकडे देतो. माचिसवर छत्रपती शिवाजी महाराजांचे छायाचित्र छापणे हा गुन्हा आहे. या संदर्भात कृपया चौकशी करावी. "

सभापती महोदय, माझ्याकडे शिवसेना पक्षाच्या एका कार्यकर्त्याने जी माचिस आणून दिली त्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळयाचा वापर झालेला आहे. म्हणून मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेल्या काडेपेटीचे वेष्टन आहे त्यावर असे लिहीलेले आहे की, "Maharaja Safety Matches, Brand owned by Lal Agency, Bihar. Lalagency@gmail.com, Rukmini Match Works, Gudiyattam." या कंपनीवर महाराष्ट्र शासनाने त्वरित कारवाई करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत अशी मी या विशेष



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . .

उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करीत आहे. तसेच याबाबतीत "कारवाई केलेली आहे किंवा झालेली आहे" असे उत्तर न पाठविता योग्य त्या कारवाईच्या संबंधातीलच उत्तर पाठविण्यात यावे अशी आपल्या माध्यमातून मी शासनाकडे आग्रहाची मागणी करीत आहे. धन्यवाद.

**उप सभापती** : या संदर्भात राज्य शासनाने गंभीर दखल घ्यावी. छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र जर माचिसवर छापण्यात आले तर त्याच्यासारखे दुसरे दुर्दैव नाही.

श्रीमती वर्षा गायकवाड : सभापती महोदय,याबाबतीत गृह विभागाला माहिती देऊन ॲक्शन घेण्यात येईल.

-----

. . . .एन-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मराठवाडा विभागातील गारखेडा सूत गिरणी परिसरातील क्रीडा संकुलात विविध खेळांच्या मासिक व वार्षिक दरात वाढ केल्यामुळे खेळाडूंमध्ये निर्माण झालेला असंतोष

**मु.शी.** : मराठवाडा विभागातील गारखेडा सूत गिरणी परिसरातील क्रीडा संकुलात विविध खेळांच्या मासिक व वार्षिक दरात वाढ केल्यामुळे खेळाडूंमध्ये निर्माण झालेला असंतोष याबाबत श्री.सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"मराठवाडा विभागातील गारखेडा सूत गिरणी परिसरात विभागीय क्रीडा संकुल उभारण्यात येणे, शासनाने उत्तम खेळाडू निर्माण करण्याच्या उद्देशाने संकुल उभारण्यात येणे, तथापि नुकत्याच दिनांक 27 जुलै 2011 रोजी जाहीर केलेल्या विविध खेळांच्या मासिक आणि वार्षिक दरात करण्यात आलेली मोठी वाढ, त्यांना मॉर्निंग वॉकसाठी सुध्दा महिना 150 रुपये दर लावण्यात आलेला आहे. त्यामुळे खेळाडूंमध्ये निर्माण झालेला असंतोष व निराशेचे वातावरण, तसेच विविध खेळांचे दर कमी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

-----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

. . . .एन-4

02-08-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) N-4

APR/ 13:10

**पृ. शी.** : रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील योगिता दंत महाविद्यालयाच्या आवारात संरक्षक भिंत

बांधण्याकरता निधीची तरतूद करणे.

**मु.शी**. : रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील योगिता दंत महाविद्यालयाच्या आवारात संरक्षक भिंत बांधण्याकरता निधीची तरतूद करणेबाबत श्री.रामदास कदम, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील योगिता दंत महाविद्यालयाच्या आवारात मोठ्या प्रमाणात पुराचे पाणी येत असून त्यामुळे या महाविद्यालयाचे मोठया प्रमाणात नुकसान होणे, याकरिता नारिंगी नदीच्या बाजूने संरक्षण भिंत बांधल्यास पुराच्या पाण्यामुळे होणारी वित्त व जीवित हानी टळण्याची शक्यता, याकरिता येथे संरक्षण भिंत बांधण्यासाठी मुख्य अभियंता, मुंबई सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांच्या कार्यालयामध्ये माहे मार्च, 2010 च्या सुमारास सादर केलेले सुमारे 2 कोटी रुपयांचे अंदाजपत्रक व नकाशे, सदरहू नकाशे व अंदाजपत्रक सादर करुन अकरा महिने लोटले तरी याबाबत कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी यंदाच्या पावसाळ्यात या महाविद्यालयास पुराच्या पाण्याचा फटका बसण्याची निर्माण झालेली शक्यता लक्षात घेता संरक्षण भिंत बांधण्याकरिता सदरहू अंदाजपत्रकास मान्यता देऊन अर्थसंकल्पात या निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे."

सभापती महोदय, रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यामध्ये नारिंगी नदीच्या बाजूलाच योगिता दंत महाविद्यालय आहे आणि तेथे भोरवाडी ही मोठी वस्ती आहे. त्याठिकाणी या नदीचे पाणी मोठया प्रमाणात योगिता दंत महाविद्यालय परिसरात आणि भोरवाडी या वस्तीमध्ये येते. मी याबाबत तेथे संरक्षक भिंत बांधण्याबाबत विनंती केली होती. शासनाकडे तशा प्रकारचा प्रस्ताव आणि कामाचे एस्टीमेट देखील प्राप्त झालेले आहे. पण अजून त्यासाठी निधीची तरतूद होत नाही.





श्री.रामदास कदम . . . .

त्या अनुषंगाने शासनाने याबाबत तातडीने दखल घ्यावी अशी मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून आपल्याला विनंती करतो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

-----

. . . .एन-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.** : राज्यातील अनेक अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयातील अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क तसेच

शिष्यवृत्तीची रक्कम शिक्षण संस्थेत जमा करणे

**मु.शी.** : राज्यातील अनेक अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयातील अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क तसेच शिष्यवृत्तीची रक्कम शिक्षण संस्थेत जमा करण्या-बाबत श्री.पांडुरंग फुंडकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□य सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"राज्यातील अनेक अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयात हजारो गोरगरीब अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे या करिता शासनाकडून या विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्क व शिष्यवृत्तीची रक्कम परस्पर संस्थेकडे जमा करण्यात येते. ही रक्कम गेल्या 4 वर्षापासून शासनाकडून वेळेवर संस्थेकडे जमा होत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना अनेक आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागते. सध्या शैक्षणिक क्षेत्रात फार मोठे बदल झाले असून एकविसावे शतक हे विज्ञान व तंत्रज्ञानाचे शतक म्हणून घोषित करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना अनेक विषयांचे ज्ञान होण्यासाठी वेगवगळे अभ्यासक्रमही सुरु करण्यात आले आहेत. उच्च शिक्षण प्राप्त होण्यासाठी सर्वसामान्य विद्यार्थ्यांप्रमाणेच अनेक अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थी या अभ्यासक्रमासाठी निरनिराळया संस्थांमध्ये प्रवेश घेत असतात. हे गरीब



श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

परंतु हुशार विद्यार्थी शिक्षणात मागे राहू नयेत व सध्याच्या तांत्रिक युगात त्यांनी पुढे यावे यासाठी ते शिक्षण घेत असलेल्या संस्थेमध्ये त्यांचे शैक्षणिक शुल्क व शिष्यवृत्तीची रक्कम वेळेवर जमा होणे गरजेचे आहे. ही मुले आपला अभ्यासक्रम पूर्ण करुन आपल्या पायावर उभे राहण्यासाठी जेव्हा संस्थेबाहेर पडतात तेव्हा त्यांचे शैक्षणिक शुल्क व शिष्यवृत्तीची रक्कम शासनाकडून संस्थेकडे जमा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

झालेली नसल्यामुळे काही संस्थाचालक या विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र तसेच त्याचे गुणपत्रक देण्यात असमर्थता दर्शवित असल्यामुळे या विद्यार्थ्यांना पुढील भावी आयुष्यात अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर येणाऱ्या अडचणी दूर होण्याच्या दृष्टीने त्यांची शैक्षणिक शुल्क तसेच शिष्यवृत्तीची रक्कम प्रत्येक वर्षी वेळेवर ते शिक्षण घेत असलेल्या संस्थेत जमा करण्याबाबत माननीय सामजिक न्याय मंत्री महोदयांना व खास बाब म्हणून माननीय मुख्यमंत्री महोदयांना सूचित करावे म्हणून या विशेष उल्लेखाव्दारे ही बाब मी सदनाच्या निदर्शनास आणत आहे."

-----

. . . .एन-8

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेशाचे वाटप न होणे

**मु. शी.** : सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेशाचे वाटप न होणे याबाबत श्री.रामनाथ

मोते, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची
सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सर्व शिक्षा अभियान योजने अंतर्गत प्राथमिक शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश देण्याची योजना शासनाने सुरु केलेली असून आज शाळा सुरु होऊन 45 दिवसांचा कालावधी होऊन गेला आहे. तथापि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये जे विद्यार्थी आहेत, त्यांना पाठ्यपुस्तके मिळालेली नाहीत. काही ठिकाणी पाठ्यपुस्तके मिळाली तर काही ठिकाणी पाठ्यपुस्तके मिळालेलीच नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्याचबरोबर शाळा सुरु होताना गणवेश वाटप होणे अपेक्षित आहे. परंतु आता शाळा सुरु होऊनही 45 दिवस झाले आहेत. पण अद्यापही गणवेशाचे वाटप झालेले नाही. सिंधुदूर्ग जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमधील विद्यार्थी पाठ्यपुस्तकांशिवाय आणि गणवेशा शिवाय शाळेत येत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. याबाबतीत शासनाने तातडीने लक्ष घालावे आणि या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश आणि पाठ्यपुस्तके तातडीने उपलब्ध होतील यासाठी उपाययोजना करावी अशी मी विनंती करतो.

----

. . . .एन-9



**पृ.शी.** : महिंदा (ता.आष्टी,जि.बीड) येथे 2007-2008
या वर्षात मजुरांनी केलेल्या कामाची अद्यापपर्यंत
मजूरी न मिळणे

**मु.शी.** : महिंदा (ता.आष्टी,जि.बीड) येथे 2007-2008
या वर्षात मजुरांनी केलेल्या कामाची अद्यापपर्यंत
मजूरी न मिळणे याबाबत श्री.धनंजय मुंडे,वि.प.स.
यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"मौजे महिंदा, ता.आष्टी, जि.बीड हे गाव डोंगरदऱ्यामध्ये वसलेले असणे, त्यामुळे या गावाचा समावेश डोंगरी विकास विभागामध्ये केलेला असणे, गावातील बहुतांशी नागरिकांचे मजुरी हेच उपजीवीकेचे मुख्य साधन आहे. 2007-2008 सालामध्ये रोजगार हमी योजनअंतर्गत महिंदा येथे गाव तलाव क्र.5 चे काम पूर्ण झाले. या कामावर गावातीलच मजूर होते. काम पूर्ण होऊन तीन वर्षे उलटली तरी या मजुरांना अद्यापपर्यंत एक रुपयाची मजुरी मिळालेली नाही. या संबंधी मजुरांनी अनेक आंदोलने केली, उपोषणासाठी बसले, तरी सुध्दा प्रशासनाकडून या संबंधित मजुरांना कामाची मजुरी मिळालेली नाही. म्हणून त्यांना मजुरी मिळण्याच्या बाबतीत आपल्याकडून कार्यवाही व्हावी म्हणून हा विषय मी विशेष उल्लेखाव्दारे सदनामध्ये मांडत आहे. धन्यवाद.

-----

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सर्वशिक्षा अभियान योजने अंतर्गत प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेशाच अद्याप वाटप न होणे

**मु. शी.** : सर्वशिक्षा अभियान योजने अंतर्गत प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेशाच अद्याप वाटप न होणे याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा मांडतो.

( येथे सन्माननीय सदस्यांनी दिलेली सूचना व भाषण द्यावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील प्रवेशांसाठी संभाव्य पालकांची लेखी परीक्षा घेणे

**मु. शी.** :प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील प्रवेशांसाठी संभाव्य पालकांची लेखी परीक्षा घेणे याबाबत श्री. हेमंत टकले वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"डोंबिवली येथील एका नामांकित शिक्षण संस्थेने पुढील शैक्षणिक वर्षाच्या ज्युनिअर के.जी. प्रवेशासाठी संभाव्य पालकांची लेखी चाचणी परीक्षा आयोजित केली आहे. अशाच प्रकारे अनेक शाळांमध्ये प्राथमिक व माध्यमिक प्रवेशांसाठी मुलाखती किंवा लेखी परीक्षाच घेणे सध्या चालू आहेत. शिक्षण हक्क कायदा अंमलात येऊनही खाजगी विनाअनुदानित शाळा मनमानी कारभार चालवित आहेत. कायदेशीर मनाई असून देखील हे प्रकार घडत आहेत. पालकांची नागरिक म्हणून असलेली जबाबदारी हा विद्यार्थी प्रवेशाचा निकष असू शकतो का? आर्थिक दुर्बल घटकांसाठी 25 टक्के आरक्षणाचीही तरतूद आहे. या परिस्थितीत या सर्व गोष्टींना पायबंद घालण्यासाठी राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने तातडीने कारवाई करावी अशी मी विनंती करीत आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचा मुद्दा

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. पाडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणाऱ्या पांडुरंगाचे दर्शन घेऊन श्री गजानन महाराज संस्थानची वारी बीड जिल्ह्यातून जालना जिल्ह्यामध्ये दिनांक 25 जुलै रोजी आलेली असताना दुपारी 3 च्या सुमारास श्री संत गजानन महाराजांच्या दिंडीत घुसून एका कंटेनरने 13 वारकऱ्यांना अक्षरश: चिरडले. या दुर्दैवी अपघातामध्ये 13 वारकरी मृत्युमुखी पडले, तर इतर 70 वारकरी जखमी झाले. हा अपघात इतका भीषण होता की, काही काळापूर्वी वारीच्या आनंदात आणि हरीनामाच्या गजरात रममाण असणाऱ्या वारकऱ्यांच्या दिंडीत मृत्यूने अक्षरश: तांडव घातले. मृत्यू पावलेल्या वारकऱ्यांमध्ये बुलढाणा जिल्ह्यातील 6 तर अकोला जिल्ह्यातील 5 भाविकांचा समावेश आहे. या मृत व्यक्तींना एक लाख रुपयांची मदत माननीय मुख्यमंत्री यांनी जाहीर केली आहे. या घटनेवर या सभागृहामध्ये चर्चा झाली. चर्चेच्या शेवटी आम्ही असा प्रश्न उपस्थित केला की, बॉम्बस्फोटामध्ये मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना 5 लाख रुपये, दंगलीत मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना 5 लाख रुपये अशा पध्दतीने या राज्यात मदत दिली गेली असेल तर त्या वारकऱ्यांचा दोष नसताना त्यांना एका कंटेनरने चिरडून टाकले आहे. त्या वारकऱ्यांच्या कुटुंबीयांना फक्त 1 लाख रुपयाची मदत का? त्या वेळी मंत्री महोदय श्री. आर.आर. पाटील यांनी या ठिकाणी असे उत्तर दिले होते की, याबाबतीत मी माननीय मुख्यमंत्री यांच्या बरोबर चर्चा करुन ही मदत वाढवून देण्यात येईल.

सभापती महोदय, मी कालच माझ्या जिल्हयातील काही वारकऱ्यांच्या घरी जाऊन आलो. आमच्या जिल्हयाचे पालक मंत्री श्री. नाईक यांनी फक्त एक-एक लाख रुपयाचा चेक त्या वारकऱ्यांच्या घरी पोहचविलेला आहे. एक लाख रुपयाच्या वर एक नवा पैसासुध्दा त्या वारकऱ्यांच्या घरी पोहचविण्यात आलेला नाही. म्हणून माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांची गृह मंत्री महोदयांबरोबर चर्चा झाली असेल आणि या मदतीमध्ये वाढ करण्यात आली असेल तर ती वाढ जाहीर करुन ती ताबडतोब मृत्युमुखी पडलेल्या वारकऱ्यांच्या कुटुंबीयांना पोहचविण्यात आली तर त्यांना थोडासा दिलासा मिळेल.

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, या मदतीमध्ये थोडी वाढ केली पाहिजे गृह मंत्री महोदयांबरोबर माझी चर्चा झालेली आहे.त्याबद्दल सकारात्मक भूमिका घेण्याचे आम्ही ठरविलेले आहे. फक्त काही प्रिसीडन्टस् होऊ नयेत आणि या बद्दलच्या नियमामध्ये काही बदल होऊ नयेत या बद्दल थोडासा विचार चालू आहे. लवकरच याबाबतचा निर्णय घेऊन तो घोषित करण्यात येईल. निर्णय झाल्याबरोबर मृत्युमुखी पडलेल्या वारकऱ्यांच्या कुटुंबीयांना पैसे दिले जातील यामध्ये काही अडचण येणार नाही.

श्री. दिवाकर रावते ( बसून) : वाढ करण्यात येणार आहे काय?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : वाढ करण्यात येणार आहे.

**उप सभापती** : आता विधेयक क्रमांक 26 चर्चेला घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मध्यंतराच्या सुट्टीसाठी आता फक्त 5 मिनिटे उरलेली आहेत. 5 मिनिटात या विधेयकावरील चर्चा पूर्ण होणार नाही.

**उप सभापती** : आपण ते विधेयक ऑन लेग ठेवू. पण आता त्या वरील चर्चा सुरु करु या.

श्री. दिवाकर रावते : हे विधेयक 100 टक्के मंजूर करुन देण्यात येईल. माननीय सभापतींनी जाहीर केल्याप्रमाणे आजचे कामकाज होणार आहे. मी आपल्याला विनंती करतो की, विरोधी पक्षाकडून नियम 260 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावावरील चर्चा संपल्यानंतर सत्ताधारी पक्षामार्फत देण्यात आलेला प्रस्ताव मांडण्यात येणार नसेल तर त्यावेळी हे विधेयक घेण्यात यावे.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा दुपारी 2.00 वाजता सुरु होणार आहे. आता 1 वाजून 25 मिनिटे झालेली आहेत.

श्री. दिवाकर रावते : विधान परिषदेचे कामकाज अधिकृतरित्या मध्यंतरासाठी 1.30 ते 2.00 वाजे पर्यंत स्थगित करण्यात येते याची माननीय मंत्री महोदयांना कदाचित कल्पना नसेल.

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई न्यायालय - फी (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. XXVI OF 2011

( A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY COURT FEES ACT, 1959.)
AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE THEREON.

श्री. पृथ्वीराज चव्हाण ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 26. मुंबई न्यायालय-फी अधिनियम, 1959 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 26. मुंबई न्यायालय-फी अधिनियम, 1959 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, एका बाजूला या राज्यामध्ये न्यायालयीन प्रकरणांची संख्या फार मोठया प्रमाणात वाढत आहे. न्यायालयीन प्रक्रियामध्ये जी न्यायालयीन फी भरतो त्या मुंबई न्यायालय -फी महाराष्ट्र सुधारणा विधेयक, 2011 यामध्ये बदल करण्यात येणार आहे. हा जो मूळ अधिनियम आहे त्या अनुषंगाने ही फी भरतो त्यामध्ये मुद्रांकाचा कागद असेल किंवा चिटकवणारे स्टॅम्प असतील अशा पध्दतीने आपण ती न्यायालयीन फी भरतो. कित्येक वेळा हे कागद उपलब्ध होत नाहीत. त्यांचे शॉर्टेज असते त्यामुळे बऱ्याच प्रकारचे घोटाळे झालेले आपल्याला माहीत आहेत. प्रशासनामध्ये गतीमानता यावी, या करिता ई-गव्हर्नन्सच्या पध्दतीने, ई-पेमेंटच्या पध्दतीने, ई-चलन पध्दतीचा अवलंब करण्याचा विचार बऱ्याच दिवसापासून शासनाच्या विचाराधीन होता. आता त्या सर्व पध्दतीमध्ये निश्चिती आलेली आहे. या विधेयकाच्या माध्यमातून पुढच्या कालखंडामध्ये एका बाजूला कागदाच्या स्टॅम्प पेपरने फी भरणे आणि स्टॅम्प चिटकवून फी भरणे ही प्रक्रिया चालू राहील पण त्याच पध्दतीने ई-चलन पध्दतीने फी देण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. पूर्वीच्या

...5...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण.....

काळामध्ये बनावट स्टॅम्प पेपर असतील, बनावट चिठ्ठया असतील त्यामुळे बरचसे गैरव्यवहार होत होते. कलर झेरॉक्स आल्यामुळे अगदी अस्सल पेपर तयार करण्यात येत होते, असे अनेक प्रकार पुढे आलेले आहेत. ई-चलन भरण्याच्या पध्दतीमुळे अशा प्रकारचे सर्व गैरप्रकार नाहीसे होतील आणि आपल्या घरी बसून इंटरनेटच्या माध्यमातून न्यायालयाची फी देता येईल अशा पध्दतीचे हे सुधारणा विधेयक आहे. सन्माननीय सदस्यांना माहीत आहे की, सध्या सर्वोच्च न्यायालयामध्ये आणि उच्च न्यायालयात ई-चलन पध्दतीने फी भरण्यात येते. ई-चलन पध्दतीचा अवलंब केल्यास स्वाभाविकपणे वेळ आणि प्रवास खर्च वाचू शकतो. दळणवळणचा खर्च वाचल्यामुळे आणि वेळ वाचल्यामुळे शासनात गतीमानता येणे आणि महसुलात भर पडणे हेही होणार आहे. लोकांचे हित लक्षात घेता हा अध्यादेश काढण्यात आला होता. त्याचे रुपांतर आता कायद्यात करण्याचा प्रयत्न आहे. म्हणून मी सभागृहाला विनंती करतो की, हे अतिशय महत्वाचे आणि जनहिताचे विधेयक असल्यामुळे त्याला आपण स्वीकृती द्यावी. धन्यवाद.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 26-मुंबई न्यायालय-फी अधिनियम, 1959 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 40 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडते.

सभापती महोदय, या ठिकाणी शासनाने जी सुधारणा आणलेली आहे ती तशी बरोबर असली तरी या ठिकाणी बिलाच्या उद्देश आणि कारणामध्ये असे म्हटले आहे की, "न्यायालय-फी मुद्रांकाचा पुरवठा करणे कठीण होऊन बसते. तत्कालीन अस्तित्वात असलेल्या पध्दतीनुसार, न्यायालय-फी फक्त प्रत्यक्ष मुद्रांक कागदांव्दारे प्रदान केली जात होती, तथापि, या मुद्रांक कागदांच्या सत्यतेची तपासणी करणारी कोणतीही यंत्रणा न्यायालयांत कार्यान्वित नाही." इतके दिवस आपण या पध्दतीने मुद्रांक शुल्क गोळा करीत होतो. त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची तपासणीची यंत्रणा नव्हती. ते खरे आहे की खोटे आहे हे तपासण्याची जर आपल्याकडे यंत्रणा नव्हती तर आतापर्यंत ही गोष्ट शासनाच्या लक्षात का येऊ शकली नाही ? तेलगीचा एवढा मोठा मुद्रांक घोटाळा जेव्हा लक्षात आला, आपले कोट्यवधी रुपये त्यात गेले आणि लोकांची फसवणूक झाली आणि त्यानंतर 7 वर्षांने आपल्याला ही दुरुस्ती करण्याचे सुचले. तो 2003-2004 मधील घोटाळा होता आणि आता 2011 मध्ये आपण ई-प्रदानाव्दारे किंवा सिक्युअर्ड बँक व कोषागार पावती याव्दारे न्यायालय-फी प्रदान करण्यासाठी तरतूद करणारी पध्दत सुरु करण्याची बाब आपल्याला 7 वर्षानंतर लक्षात आली. 7 वर्षे आपल्याला वाट पाहण्याची गरज का वाटली ? एवढ्या मोठ्या प्रमाणात महसूल बुडाला, लोकांची फसवणूक झाली, 7 वर्षे तेलगी जेलमध्ये आहे, त्यांची केस सुरु आहे, असे असताना ही छोटीशी दुरुस्ती करण्यासाठी आपल्याला 7 वर्षे लागली, हे खऱ्या अर्थाने शासनाचे अपयश आहे असे मी म्हटले तर ते वावगे होणार नाही.

सभापती महोदय, या बिलामध्ये असे म्हटले आहे की, "न्यायालय-फी ई-प्रदानाव्दारे देण्यात आली असेल त्याबाबतीत, मुद्रांक रद्द करण्यास सक्षम असणारा अधिकारी हा, त्या प्रदानाच्या खरेपणाबद्दल पडताळणी करील आणि न्यायालय-फी देण्यात आल्याबाबत त्याची स्वत:ची खात्री

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्रीमती शोभा फडणवीस ....

पटल्यानंतर, तो संगणकावरील त्याविषयीची नोंद सुरक्षित बंद करील आणि त्या दस्तऐवजावर न्यायालय-फी देण्यात आली आहे व त्याबाबतची नोंद सुरक्षित बंद केली आहे, असे आपल्या सहीनिशी पृष्ठांकन करील." हे तो किती दिवसात करणार, त्याचा कार्यकाळ किती ? समजा उद्या ई-मेलव्दारे पैसे भरले आणि समजा तो अधिकारी सुट्टीवर असेल आणि जर त्या प्रदानाबद्दल नोंद झ ााली नाही आणि ज्या तारखेला ते भरावयाचे होते त्या तारखेला जर नोंद झाली नाही तर त्यामध्ये पैसे भरणाऱ्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होणार आहे. याकरिता आपण यामध्ये कोठे तरी वेळेचे बंधन, तारखेचे बंधन किंवा दिवसांचे बंधन घालणे अत्यंत आवश्यक होते.

सभापती महोदय, या बिलामध्ये असे म्हटले आहे की, "जिल्हाधिऱ्याकडून" या मजकुराऐवजी "जिल्हाधिकाऱ्याकडून किंवा नियमांव्दारे विहित केलेल्या रीतीने ई-प्रदानाच्या मार्गाने" हा मजकूर दाखल करण्यात येईल. हे जरी खरे असले तरी मुद्रांक शुल्क हा आपला गंभीर विषय आहे. परंतु त्याहीपेक्षा गंभीर विषय दिवाणी दावे आणि हायकोर्टामध्ये असलेल्या प्रकरणांच्या बाबतीत आहे. त्याचा आपण कधीच विचार करीत नाही. जी महिलांसाठी असलेली कौटुंबिक न्यायालये आहेत, महिलांच्या क्रिमिनल केसेस सोडविण्यासाठी असलेली न्यायालये आहेत, महिलांसाठी महिला न्यायाधीश असलेली न्यायालये आहेत, त्या न्यायालयांमध्ये 2010 मध्ये 25 हजार 795 केसेस प्रलंबित होती. 2010 या वर्षाअखेर प्रलंबित असणारी प्रकरणे 20 हजार 867 आहेत. त्या ठिकाणी दरवर्षी नव्याने दाखल होणारी प्रकरणे आहेत. शासनाने मान्य केले होते की, आम्ही प्रत्येक जिल्ह्यात कौटुंबिक न्यायालये स्थापन करु. त्याचे काय झाले ? महिलांना न्याय केव्हा मिळणार आहे ? जर 20-20 हजार, 25-25 हजार प्रकरणे वर्षाच्या शेवटी शिल्लक राहात असतील तर केवळ मुद्रांक शुल्क भरणे किंवा पैसे हा विषय नाही तर आम्हाला न्याय मिळवून देणे हा महत्वाचा विषय आहे. ही न्यायालये खऱ्या अर्थाने आम्हाला न्याय देण्याकरिता आहेत. ही न्यायालये जर आम्हाला न्याय देण्यासाठी असतील आणि इतक्या मोठ्या प्रमाणात केसेस प्रलंबित असतील तर हे खऱ्या अर्थाने शासनाचे मोठे अपयश आहे. यामध्ये शासनाचे अपयश आहे असे मी एवढ्यासाठीच म्हणते की, दिवसेंदिवस औद्योगिक क्षेत्र वाढत आहे. दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे. इतकी लोकसंख्या वाढून सुध्दा आपण न्यायालयांची संख्या तेवढीच

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्रीमती शोभा फडणवीस .....

ठेवलेली आहे. आपण पाहिजे त्या प्रमाणात न्यायालये वाढविलेली नाहीत. कित्येक ठिकाणी अजूनपर्यंत न्यायाधीशांच्या नियुक्त्या झालेल्या नाहीत. न्यायाधीशांची रिक्त पदे हाही एक मोठा विषय आहे. अशा वेळेला कौटुंबिक न्यायालयामध्ये जर एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रकरणे शिल्लक राहात असतील तर ही महिलांना न्याय देण्यारी बाब आहे असे मुळीच म्हणता येणार नाही.

सभापती महोदय, एकीकडे भ्रूणहत्येचा प्रश्न आहे. त्यांच्यावर अजूनपर्यंत केसेस होत नाहीत. कायद्यामध्ये पाहिजे त्या प्रमाणात ज्या तरतुदी करावयास पाहिजेत त्या शासन करीत नाही. महिलांसाठी कठोर कायदे करु अशी आश्वासने शासनाने दिली परंतु महिलांचे जीव वाचविण्याकरिता, बलात्काराच्या प्रकरणामध्ये फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी असताना अजूनपर्यंत त्याबाबत कोणत्याही प्रकारचा निर्णय झालेला नाही. शासन कायद्यामध्ये दुरुस्ती करीत नाही. लोकांमध्ये कायद्याचा धाक नाही. पोलीस आम्हाला मदत करीत नाहीत. पोलीस जेव्हा न्यायालयात केसेस टाकतात तेव्हा त्या केसेस परिपूर्ण नसतात. त्या ठिकाणी आम्हाला न्याय मिळवून देण्याकरिता मोठ्या प्रमाणात चौकशी करुन पोलिसांनी जर खरे रिपोर्ट सादर केले तरच आम्हाला कोर्ट न्याय देईल. पण त्या ठिकाणी सुध्दा पोलीसवाले आम्हाला न्याय देत नाहीत. न्यायालयामध्ये आम्हाला न्याय मिळत नाही. 2010 मध्ये उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असलेली प्रकरणे 63 हजार 172 आहेत. त्यानंतर नवीन दाखल झालेली प्रकरणे 22 हजार 442 आहेत 85 हजार 604 प्रकरणांपैकी वर्षभरामध्ये केवळ 20 हजार 451 प्रकरणे निकाली निघालेली आहेत. ही 20 हजार प्रकरणे तीन वर्षात निकाली निघालेली आहेत. ही फी भरलेली प्रकरणे आहेत. फी भरलेली प्रकरणे जर वर्षानुवर्षे चालत असतील, आज आम्ही फी भरल्यानंतर 10 वर्षानंतर जर निकाल लागत असेल तर ही फी भरण्यापेक्षा न्यायालयांच्या बाबतीत दुरुस्ती करुन त्या ठिकाणी प्रलंबित प्रकरणे राहणार नाहीत या दृष्टीने न्यायालयांची वाढ करण्यात यावी. त्या ठिकाणी न्यायाधीश देण्यात यावेत आणि मग या पध्दतीने विचार व्हावा.

सभापती महोदय, आता आपण बजेटचे पुस्तक उघडून पाहिल्यानंतर सगळ्या विभागांमध्ये मला ई-मेलच्या बाबतीत मागणी दिसली. सगळ्या विभागांमध्ये ई-मेलसाठी तरतुदी केलेल्या आहेत. कोर्टातही या बाबतीत तरतूद झालेली आहे. पण मुद्रांक शुल्क गोळा करण्याकरिता म्हणून केलेली

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्रीमती शोभा फडणवीस ....

ही दुरुस्ती जनतेला, महिलांना, लोकांना न्याय देणारी राहणार नाही. फक्त व्यवस्था म्हणून ही दुरुस्ती केलेली आहे. खऱ्या अर्थाने आमच्या न्यायालयाकडून ज्या अपेक्षा आहेत त्या शासन केव्हा पूर्ण करणार हा महत्वाचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, जिल्हा सत्र न्यायालयांमध्ये तर लाखो प्रकरणे आहेत. म्हणून केंद्र शासनाने मागच्या पाच वर्षापूर्वी 119 कोटी रुपये न्यायालये बांधण्याकरिता दिले होते. परंतु ते पैसे सुध्दा आपण खर्च करु शकलो नाही. ते पैसे परत करावे लागले. केंद्र सरकार पैसे देण्यासाठी तयार आहे परंतु आपण घेण्यास तयार नाही अशी परिस्थिती या ठिकाणी आहे. मग आपण या ठिकाणी सतर्क राहिले पाहिजे. न्यायालये निकाल देत नाहीत हे मला माहीत आहे पण न्यायालये वाढली पाहिजेत. त्याकरिता केंद्र शासनाकडून परवानगी घेऊन न्यायालये वाढविण्याचे काम आपण करु शकतो. न्यायालये बांधण्याचे काम करु शकतो. हायकोर्टाच्या माध्यमातून या ठिकाणी आपण व्यवस्था करु शकतो. म्हणून या सगळ्या गोष्टी करीत असताना आणि हे बिल आणत असताना आपण बाकीच्याही गोष्टींचा विचार करावा. किती कोटी रुपयांचे नुकसान झाले हे सांगण्याची काही गरज नाही. हे करीत असताना संबंधित अधिकाऱ्यांनी किती दिवसात हे काम करावे, कोठे पैसे भरल्यानंतर त्याची नोंद किती दिवसात व्हावी आणि अगोदर इतक्या त्रुटी असताना त्याबाबत आपण दुरुस्ती का करु शकलो नाही या बद्दलचा निर्णय या ठिकाणी व्हावा. याकरिता मी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा जो प्रस्ताव मांडलेला आहे तो सभागृहाने संमत करावा अशी मी विनंती करते.

प्रस्ताव प्रस्तुत झाला

**उप सभापती** : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतच्या प्रस्तावावर एकत्रित चर्चा होईल. त्यानंतर मंत्री महोदयांचे उत्तर झाल्यानंतर प्रथम विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव मतास टाकला जाईल. तो असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल. आता सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपले भाषण सुरु करावे.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात आपण विनंती केली तसेच कालपासून माननीय मुख्यमंत्री या बिलाकरिता आग्रही असल्यामुळे आपण हे विधेयक चर्चेला घेतलेले आहे. थोडक्यात पण चर्चा करण्याकरिता काही गोष्टी आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांकडे हे खाते असल्यामुळे आमची अशी अपेक्षा आहे की, या खात्याच्या संदर्भात आम्ही जर काही सुधारणा सुचविल्या किंवा सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी ज्या सुधारणा सुचविल्या त्याचा काही परिणाम होईल. त्यादृष्टीने काही गोष्टी या ठिकाणी मांडणे आवश्यक आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय, एक तर आपला परिचयच असा आहे की, इ-मेल किंवा अलीकडच्या काळातील जे तंत्रज्ञान आहे त्याबाबतीत आपण दिल्लीपासून पारंगत आहात. त्यामुळे यामध्ये आपल्याला खास रस असणार हे आम्हाला मान्यच करावे लागेल. परंतु यामध्ये जी वाक्यरचना केलेली आहे ती चुकीची आहे. उद्देश व कारणांमध्ये असे म्हटले आहे की, "मुद्रांक कागदांच्या सत्यतेची तपासणी करणारी कोणतीही यंत्रणा न्यायालयांत कार्यान्वित नाही."

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

मुळामध्ये ती नव्हती म्हणून तेलगी प्रकरण जन्माला आले. त्यावेळी आपला महाराष्ट्राशी संबंध नव्हता. तेलगी प्रकरणामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात रणकंदन झाले. त्या प्रकरणामुळे विधानसभेचे दोन आमदार जेलमध्ये कित्येक वर्षे होते. ते सुटून आल्यानंतर निवडणुका झाल्यावर लोकांनी पुन्हा आमदार केले. लोकांना काय वाटते हा विषय वेगळा. एक आमदार बनावट मुद्रांकाच्या प्रकरणात 2-3 वर्षे जेलमध्ये होते. लोक त्यांना पुन्हा निवडून देतात. 15 दिवसात काम करणारे महाराष्ट्रातील एकमेव आमदार, अशा प्रकारचे आम्हाला एक सुंदर बुकलेट पाठविण्यात आले होते. महाराष्ट्रातील कोणत्याही प्रकल्पाचे काम 15 दिवसात निकाली काढतात. हे प्रकरण ज्यावेळी उजेडात आले त्यावेळच्या शासनकर्त्यांनी या प्रकरणी योग्य लक्ष घातले नाही. त्यानंतर आपण मुख्यमंत्रीपदी आल्यानंतर ई-मेलद्वारे भरणा करण्याची तरतूद केली जात आहे. ही पध्दत सुलभपणे वापरणे शक्य होईल. त्यामध्ये छापील मसुदा वगैरे काहीही नाही. परंतु हे विधेयक मांडत असताना जुनी पध्दत सुध्दा तशीच सुरु ठेवणार आहात. त्यामुळे ही सुधारणा अपूर्ण आहे असे मला वाटते. पूर्वीच्या पध्दतीने सुध्दा भरणा होणार आहे.

यामध्ये "जिल्हाधिकाऱ्यांकडून" या मजकुराऐवजी, "जिल्हाधिकाऱ्याकडून किंवा नियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने ई-प्रदानाच्या मार्गाने" असे म्हटलेले आहे. मुख्यमंत्री महोदय, लोकांकरिता आपण एक नवीन व्यवस्था याद्वारे निर्माण करुन देत आहात. मला अशी खात्री आहे की, ई-मेल पध्दतीने या पध्दतीचा वापर सर्व वकील मंडळी करतील. त्या पध्दतीने महसूल जमा होईल. महसूल म्हटल्यावर हे काम महसूल खात्याचे आहे. मुद्रांक शुल्काचा घोटाळा महसूल खात्यात झाला. त्यावेळी बनावट मुद्रांक आले नव्हते. त्यातील कोणताही मुद्रांकाचा पेपर बनावट असल्याचे सिध्द झालेले नाही. व्यवस्थित कट रचून नाशिकमध्ये जेथे मुद्रांक पेपर छापले जात होते तेथे नवीन मशिन बसविण्यासाठी असलेली मशिन भंगारात काढण्यात आली. त्यानंतर जी मूळ मशिन तेलीगीच्या हातामध्ये आली. तेलगीने मुद्रांक पेपर्स छापले होते ते बनावट नव्हते, ते अस्सलच होते. परंतु अशा मार्गाने करोडो मुद्रांक पेपर्स वापरात आणल्यामुळे शासनाच्या असे लक्षात आले की, एवढी वर्षे मुद्रांक पेपर्सद्वारे महसूल मोठ्या प्रमाणात गोळा होत असताना आता ते कमी का

2...

श्री.दिवाकर रावते....

झाले, शासनाच्या तिजोरीत मुद्रांक पेपर्सद्वारे मिळणारा महसूल कमी होण्याचे कारण काय ? दुसऱ्या बाजूला मुद्रांक शुल्क भरले जात होते. अशा प्रकारे हा घोटाळा उघडकीस आला होता.

माननीय मुख्यमंत्री महोदयांना तंत्रज्ञान या विषयाची आवड आहे, त्या विभागाच्या माध्यमातून ही सुधारणा केली जात असली तरी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या कक्षेतील हा विषय आहे. मागच्या वेळी यासंबंधी चर्चा करीत असताना मी अनेक विषय मांडले होते. त्यावेळी आपण नव्हता. गृह खात्यासाठी भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी नेमले जातात. या खात्यासाठी मात्र न्यायाधीशांना नेमले जाते. त्यांना तेथे नेमल्यानंतर या खात्यात येणारे प्रशासकीय प्रश्न या खात्याचे अधिकारी न्यायाधीश असले तरी ते सोडवतील. दुर्दैवाने हे प्रशासकीय काम असल्यामुळे न्याय व्यवस्थेतील तज्ज्ञ व्यक्ती त्यासाठी पुरेशी ठरत नाही. म्हणून मी मागील वेळी असे म्हटले होते की, या खात्याचे प्रशासन सुधारावयाचे असेल तर भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांना विधी खात्यात नेमले पाहिजे, तेथे न्याय व्यवस्थेतील न्यायाधीशांना नेमू नये. या खात्यात जे घोळ झाले आहेत ते मी थोडक्यात मांडू इच्छितो. माननीय मुख्यमंत्र्यांना ते माहीत पाहिजे म्हणून ते मी मांडतो. या खात्यात प्रशासनातील अधिकाऱ्यांना नेमावे याचे कारण असे आहे की, विधी व न्याय खात्यात विधी व परामर्शी हे पद आहे. हे पद गेली 5 वर्षे रिक्त आहे. ते रिक्त का आहे ? हे पद अत्यंत महत्वाचे आहे. महाराष्ट्रातील सर्व शासकीय खात्यांमधून त्यांच्याकडे अनेक विषयांबाबत कायदेशीर मत मागितले जाते. परंतु हे पद रिक्त असल्यामुळे या पदाचा पदभार दुसऱ्या अधिकाऱ्यांकडे दिलेला आहे. त्याचा परिणाम असा झालेला आहे की, या क्षणी त्यांच्याकडे 150 ते 175 नस्त्या निर्णयाविना तशाच पडून आहेत. कायदेशीर सल्ला त्या खात्याने दिला पाहिजे. योग्य काय, अयोग्य काय याचा निर्णय द्यावयाचा आहे. ते जर चुकले तर त्याचा विपरित परिणाम होऊ शकतो. म्हणून ते काम आपल्याला झेपत नसल्यामुळे खात्याच्या दुय्यम अधिकाऱ्यांकडे नस्ती दिली जाते. त्यांनी दिलेले मत खालच्या स्तरावर पाठविले जाते. भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी अशा अधिकाऱ्यांनी दिलेले मत योग्य नसल्याचे कारण देऊन ती नस्ती परत पाठविण्यात येते. म्हणजे जनतेच्या कामामध्ये या खात्याच्या अव्यवस्थापनामुळे प्रचंड विलंब होत आहे. ई-मेलने मुद्रांक भरण्याची व्यवस्था होत असताना ही त्रुटी मुख्यमंत्री महोदय भरुन काढतील काय हा प्रश्न आहे.

3....

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, अनुशेष अंतर्गत एससी, एसटी, ओबीसी या क्रमाने भरती होणे आवश्यक असताना तशी न करता कोणाला तरी डावलून दुसऱ्या कोणाचा समावेश करुन भरती केली. अशा प्रकारचे एक प्रकरण होते. या खात्याचे प्रमुख न्यायाधीश आहेत तेच जर अन्याय करीत असतील तर ते अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे त्यांच्याविरुध्द कोणी अॅट्रॉसिटीचा खटला दाखल करील का ? श्री.शिंदे यांना सचिव या पदावर बढती देण्यात आलेली आहे. ती आरक्षण डावलून देण्यात आलेली आहे. आरक्षणातील उमेदवार तेथे उपलब्ध नाही का हे आम्हाला कळले पाहिजे. उमेदवार प्राप्त होईपर्यंत त्यांना बढती दिली आहे काय, नसेल तर शाहू, फुले व आंबेडकरांचे नाव घ्यावयाचे आणि आपणच त्यांच्या तत्वाची पायमल्ली करावयाची असा कारभार या खात्याचा सुरु आहे.

सभापती महोदय, नोटरीच्या नियुक्तीच्या संदर्भात उच्च न्यायालयाने एक मार्गदर्शक तत्व घालून दिलेले आहे. यासाठी वर्तमानपत्रातून जाहिरात प्रसिध्द केली पाहिजे. अर्ज मागवावेत व संबंधित उमेदवाराची मुलाखत घेतली पाहिजे. मुख्यमंत्री महोदय, मी आपल्यासमोर हा गंभीर मुद्दा मांडत आहे. मी अमरावतीमध्ये असताना चर्चा झाली आहे. म्हणून मी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागविली होती. परंतु संबंधित माहिती अधिकारी माहिती देत नाहीत. श्री.मुंदडा नावाच्या सद्‌गृहस्थाला नोटरी करण्यात आले. त्यांनी त्यासाठी मागणी केली नव्हती, अर्ज केला नव्हता. तरी त्यांना नोटरी म्हणून जाहीर करण्यात आले. त्यानंतर त्यांच्याकडून अर्ज घेण्यात आला. प्रत्येक अर्जावर विधी व न्याय खात्याच्या मंत्र्यांची सही असते. आजही त्यांचा अर्ज काढून पाहिला तर मंत्री महोदयांनी मान्यता दिल्याची सही नसल्याचे दिसून येईल. हे काय प्रकरण आहे, कोणामुळे झाले आहे ? मुंदडा नावाचे हे एक प्रकरण झाले, परंतु अशी किती तरी प्रकरणे असतील. पैसे घेऊन नोटरी करण्याची प्रकरणे पुढे रेटली तर नाही ना, याबाबत कोणावर आरोप करावयाचा ? अशा प्रकारे माननीय मुख्यमंत्र्यांच्या अधिपत्याखालील खात्याचा कारभार चालू आहे. अजून खूप गोष्टी आहेत. या खात्याच्या कारभाराविषयी आणखी वेळ पाहिजे होता. आपण विनंती

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.दिवाकर रावते....

केल्यामुळे मी थोडक्यात विचार मांडलेले आहे. आपण शितावरुन भाताची परीक्षा करावी. गेल्या वेळी 4 खात्यांचा कारभार कसा चालू आहे ते मांडले होते. मुंदडा प्रकरणाबाबत तातडीने चौकशी करावी, स्वत: लक्ष घालावे, त्यांना बेकायदेशीरपणे नोटरी केले असल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मी आपल्याला विनंती करतो आणि माझे भाष्य संपवितो. धन्यवाद.

-----

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 26 यावर विचार करण्यासाठी ही विधेयक माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मांडलेले आहे. या विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे आकारण्याजोगी सर्व फी, उमटविलेल्या व चिकटविलेल्या मुद्रांकांच्या मार्गाने गोळा केली जाते. त्यासाठी राज्य शासनाने स्टॅम्प व्हेण्डर्सना नेमलेले आहे. त्या स्टॅम्प व्हेंण्डर्सजवळ अनेकजण काम करीत असतात. परंतु हे विधेयक मंजूर झाल्यानंतर खूप मोठी बेकारी निर्माण होणार आहे, याचाही शासनाने विचार केला पाहिजे. स्टॅम्प व्हेण्डरचा धंदा स्टॅम्प पेपरवर अवलंबून आहे. आपला देश स्वतंत्र झाला तेव्हापासून ते हा व्यवसाय करीत आहेत. शासनाने ई-मेलद्वारे मुद्रांक प्रदान करण्याची चांगली योजना आणली असली तरी त्यांच्या व्यवसायावर हा आघात आहे. पण या लोकांचा शासनाने विचार केला आहे काय ? सामान्य माणसांकडे कॉम्प्युटर नाही. त्यामुळे त्यांना कोठे तरी जाऊन ई-मेल द्वारे पैसे भरावे लागतील. एखाद्याला रजिस्ट्री करावयाची असेल ते या व्यवस्थेमुळे शक्य होणार नाही. आज बँकांमध्ये मोठी गर्दी असते. त्यामुळे लोकांना आपले पैसे भरण्यासाठी व काढण्यासाठी रांगा लावाव्या लागतात. यासाठी विशेष उपाययोजना केली जाणार आहे काय ? कोषागार पावतीसंबंधी सुध्दा अडचणी आहेत. महाराष्ट्रात आधीच बेरोजगारी वाढलेली आहे. या व्यवस्थेमुळे त्यात आणखी भर पडणारी आहे. हे टाळण्यासाठी उपाययोजना केली जाईल काय, त्यांना शासकीय नोकरीत सामावून घेतले जाईल काय, हा विषय मोठा आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी या विधेयकाच्या माध्यमातून माझ्या मुद्यांबाबत विचार करावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, या विधेयकावरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्रीमती शोभताई फडणवीस, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यानी भाग घेऊन अतिशय महत्वाच्या सूचना केलेल्या आहेत.

सभापती महोदय, आपणा सर्वांना हे माहीत आहे की हे एक सुधारणा करणारे पाऊल आहे. आपल्या राज्यामध्ये स्टॅम्प पेपरचा घोटाळा झाला होता. त्यानुषंगाने हे विधेयक लवकर का आणले गेले नाही असा प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. या तंत्रज्ञानामुळे इंटरनेटच्या माध्यमातून सेक्युअर्ड असे पेमेंट होईल. त्यामध्ये कोणी घुसखोरी करुन कोणी हायकिंग करु शकणार नाही या दृष्टीनेही प्रयत्न चाललेले आहेत. याबाबतीत पहिला प्रयत्न हा सर्वोच्च आणि उच्च न्यायालयामध्ये करण्यात आला. सुरुवातीला ज्या काही अडचणी आल्या त्या दूर करण्यात आल्या. ती व्यवस्था उत्कृष्टपणे चालू लागल्यानंतर तो प्रयोग आपल्या येथे आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रलंबित खटल्याबाबत येथे बोलले गेले. मी थोडक्यात सांगू इच्छितो की, महाराष्ट्रा मधील न्यायालये आणि न्यायाधीशांची संख्या ही देशामध्ये दुस-या क्रमांकावर आहे. उत्तरप्रदेशमध्ये 1893 न्यायाधीश आणि न्यायालये आहेत तर आपल्याकडे 1853 न्यायाधीश आणि न्यायालये आहेत. ही संख्या अजूनही वाढविली पाहिजे. प्रलंबित खटल्यांची संख्या फार आहे. मोठ्या राज्यांच्या तुलनेमध्ये प्रलंबित खटल्यांची संख्या आपल्या राज्यामध्ये कमी आहे. याबाबतीत समाधान मानण्याचे कारण नाही. ही संख्या एकदम कमी झाली पाहिजे.

केन्द्र सरकारने आपल्याला 10 वर्षासाठी 100 फास्ट ट्रक कोर्ट दिली होती. पहिल्यांदा 5 वर्षासाठी आणि पुन्हा 5 वर्षासाठी ही कोर्ट आपल्याला दिली होती आणि त्याचे पैसे देखील केन्द्र शासनाने दिले होते. ही अतिशय चांगली कल्पना असल्यामुळे 100 फास्ट ट्रॅक कोर्ट ही स्वत:च्या पैशाने चालू ठेवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे. ही कोर्ट चालू झालेली आहेत. या 100 फास्ट ट्रॅक कोर्ट पैकी काही न्यायालये महिलांच्या खटल्यासाठी काही ॲट्रासिटीच्या गुन्ह्यासाठी आणि काही बालगुन्हेगारारीसाठी करता येतील का अशा प्रकारचा विचार सुर असून त्यादृष्टीने प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे कामाला गती येईल. सकाळी 200 आणि सायंकाळी 200 न्यायालये सुरु झालेली असून त्याचा अनुभव चांगला आहे. संबंध न्याय व्यवस्थेवर चर्चा करण्याची ही वेळ नाही.

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

परंतु सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्याचा मी आदर करतो. हे अतिशय चांगले विधेयक असून न्यायालयाचा वापर करणारे जे दावेदार आहेत त्यांना निश्चितपणे समाधान मिळेल. त्यांचे काम सुकर होईल. जुनी व्यवस्था चालू ठेवण्याचे कारण स्वाभाविक आहे. प्रत्येकाला इंटरनेट कळण्यास थोडा वेळ लागेल. ही पध्दत प्रचलित झाली, अंगवळणी पडली की जुनी पध्दत हळूहळू कमी कमी करता येईल. आता त्यामुळे फार मोठी बेरोजगारी निर्माण होईल अशातला भाग नाही. परंतु त्या लोकांना प्रशिक्षित करुन त्याच कामामध्ये त्यांना गुंतविता येईल काय याचा विचारही करता येईल. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांचा आदर करुन सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मागे घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मी असा मुद्दा मांडला होता की, ईमेलने पैसे भरल्यानंतर खेरेपणाची पडताळणी करण्यासाठी वेगळी यंत्रणा आपण ठेवलेली आहे. त्यांनी पडताळणी करुन खात्री पटल्यानंतरच संगणकावर नोंद होणार आहे. यासाठी काही ठरावीक कालावधी निर्धारित करणे आवश्यक आहे. या बाबतीत वेळ लागणार नाही या दृष्टीने काही उपाययोजना करणार काय याचे उत्तर मिळाले तर बरे होईल. या व्यवस्थेमध्ये कुठे त्रुटी राहाणार नाहीत याचा विचार केला तर मी माझा प्रस्ताव मागे घेईन.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : ही पध्दत सर्वोच्च न्यायालयामध्ये आणि उच्च न्यायालयामध्ये अतिशय चांगल्या प्रकारे चालू आहे. तेथील अनुभव चांगला आहे. पैसे भरल्यानंतर पुढची जी प्रक्रिया आहे ती व्यवस्थित निर्धारित केलेली आहे. त्याबाबतची सर्व माहिती इंटरनेटवरुन घेण्याची व्यवस्था आहे. आपले अकौण्ट कसे उघडायचे, काय करायचे याची माहिती इंटरनेटवरुन उपलब्ध होते. ही पध्दत अंगवळणी पडण्यास थोडा वेळ लागेल. परंतु सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयामध्ये ही यंत्रणा व्यवस्थित चालू आहे. याबाबतीत काही अडचण येईल असे वाटत नाही. तसेच प्रशिक्षणाच्या बाबतीतही सोय करता येईल. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या दोन मुद्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे. सेक्रेटरी आणि आरएलअे हे पद खूप दिवसापासून रिक्त आहे. हे पद भरण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यावर असून या संबंधातील धारिका सामान्य प्रशासन विभागाकडून नुकतीच

..3..



श्री. पृथ्वीराज चव्हाण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आलेली आहे. त्यावर लवकरच निर्णय घेण्यात येईल. ॲडव्होकेट श्री. आर.एम मुंदडा या नोटरीच्या बाबतीत मुद्दा उपस्थित करण्यात आला. हे गृहस्थ मृत झालेले आहेत. हे निदर्शनास आल्यानंतर ते पद रिक्त करुन त्यांचे नाव वगळण्यास मान्यता दिलेली आहे. ते पद भरण्याची प्रक्रिया चालू आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे या प्रकरणी चौकशी करुन कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांबाबत मी खुलासा केलेला आहे. तेव्हा सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी त्यांचा विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मागे घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी मी जो प्रस्ताव दिलेला आहे, तो मागे घेण्यास मी सभागृहाची अनुमती मागते.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.

**उप सभापती** : आता मी विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 7 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011चे वि.स.वि. क्रमांक 26 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक 26 संमत झाले आहे.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.30 वाजता पुन्हा भरेल.

(दुपारी 1.59 ते 2.30 मध्यंतर)

---

....नंतर श्री. खर्चे...

**( मध्यंतरा नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**पृ.शी.**: पोचपावती देऊन पैसे घेतल्याचे सभागृहात करण्यात आलेले आरोप

**मु.शी.**: पोचपावती देऊन पैसे घेतल्याचे सभागृहात करण्यात आलेले आरोप यासंबंधी माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे निवेदन

श्री. शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान परिषद नियम 46 अन्वये पुढीलप्रमाणे निवेदन करीत आहे :--

महोदय, काल दि. 1 ऑगस्ट, 2011 रोजी खालच्या सभागृहात माझ्या संदर्भात जो मुद्दा उपस्थित झाला होता त्यानुसार मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, ऐनुद्दीन नावाच्या व्यक्तीने माझ्याविरुध्द धडगांव जि. यवतमाळ येथील पोलीस स्टेशनमध्ये 10 वर्षापूर्वी पैसे घेतल्याची तक्रार दाखल केली होती. त्यानंतर हे प्रकरण कनिष्ठ न्यायाधीश, वरिष्ठ श्रेणी यांच्याकडे गेले असता न्यायालयाने हे प्रकरण 10 वर्षापूर्वीचे असल्यामुळे त्यातील सत्यता पाहून सात दिवसात न्यायालयाला अहवाल सादर करावा असे आदेश दिलेले आहेत. सध्या या प्रकरणाची चौकशी चालू असल्याने मला त्यावर बोलावयाचे नाही. पण या निमित्ताने इतकेच सांगावयाचे आहे की, तक्रार करणाऱ्या व्यक्तीने 10 वर्षापूर्वी मला आश्रमशाळा आणि कॉलेज मिळवून देण्यासाठी पैसे दिले असे म्हटले आहे. तसेच 10 वर्षापूर्वी म्हणजेच सन 2000 मध्ये मला 10-12 लाख रुपये दिले आणि उरलेले 30 लाख रुपये सन 2001 मध्ये दिले. तसेच दहा वर्षापूर्वी माझ्या स्वीय सहाय्यकाने त्याला पावती लिहून दिली असेही त्यांनी म्हटलेले आहे परंतु माझ्या माहितीप्रमाणे या इसमाने पोलीस स्टेशनमध्ये या गोष्टीला नकार सुध्दा दिला आहे. विशेष म्हणजे माझ्याकडे सन 2010 मध्ये हा विभागच नव्हता. तसेच ज्या व्यक्तीने सन 2000 मध्ये शाळा आणि कॉलेजच्या मान्यतेसाठी पैसे दिल्याची तक्रार केली त्याच्याकडे सन 2000 मध्ये कोणतीही रजिस्टर्ड शाळा नव्हती, त्याची संस्था सन 2004 मध्ये रजिस्टर्ड झाली.

तिसरी गोष्ट म्हणजे चोराने कशी चूक केली हे यावरुन लक्षात येईल. सन 2000 मध्ये पावती लिहून दिल्याचे त्याने म्हटले आहे. पण त्या पावतीवर जो शिक्का आहे तो पर्यावरण,

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे .....

जलसंधारण व परिवहन विभागाचा. पण माझ्याकडे दीड वर्षानंतर माझ्याकडे जलसंधारण विभागाचा कार्यभार दिला गेला. अशा प्रकारे उलटसुलट माहिती देऊन माझी बदनामी करण्याचा प्रयत्न या व्यक्तीने केलेला आहे. तसेच त्यानंतर माझ्यावर आरोप केले व 4 मार्च रोजी माझ्याविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली. त्याच दिवशी वेगवेगळ्या ठिकाणच्या पोलीस स्टेशन्समध्ये इतरही पाच लोकांच्या विरोधात त्याने तक्रारी केलेल्या आहेत, यावरुन ती व्यक्ती विक्षिप्त असल्याचे लक्षात येते. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी होऊन काय निष्पन्न होईल तेव्हा होईल पण मला सभागृहाच्या निदर्शनास एक बाब आणून द्यावयाची आहे की, या आरोपांमध्ये कोणत्याही प्रकारचे तथ्य नाही. अत्यंत खोडसाळपणे, असत्य व माझी बदनामी करणारे हे आरोप असूनन मी सार्वजनिक जीवनातून निवृत्ती घ्यावी या दुष्ट हेतूने ही माहिती प्रसारित करण्यात आली आहे. सभागृहात समोर आलेल्या कागदपत्रांच्या आधारे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मुद्दा उपस्थित केला असावा, त्याबद्दल मला काहीच म्हणावयाचे नाही. यासंदर्भात मी काल देखील खालच्या सभागृहात स्पष्टीकरण दिले व येथे सुध्दा सांगत आहे की, या आरोपांमध्ये अर्धा टक्का जरी सत्यता आढळून आली तर केवळ आमदारकीच नव्हे तर सार्वजनिक जीवनातून देखील मी निवृत्त होईन.

---------

.....3....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई समुद्र किनाऱ्यावर एम.व्ही.पॅव्हिट हे भरकटलेले जहाज सापडणे
**मु.शी.**: मुंबई समुद्र किनाऱ्यावर एम.व्ही.पॅव्हिट हे भरकटलेले जहाज सापडल्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी उपस्थित केलेल्या मुद्याला अनुलक्षून माननीय गृह राज्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : महोदय, काल दिनांक 1 ऑगस्ट, 2011 रोजी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी मुंबई समुद्र किनाऱ्यावर एम.व्ही.पॅव्हिट हे भरकटलेले जहाज सापडल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्या मुद्याला अनुलक्षून आपण निदेश दिल्यानुसार मी आपल्या अनुमतीने पुढील निवेदन करीत आहे.

**नि वे द न**

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

------

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात वाढते दरोडे, लूटमार तसेच नक्षलवाद्यांचा वाढत असलेला प्रभाव
**मु.शी.**: राज्यात वाढते दरोडे, लूटमार तसेच नक्षलवाद्यांचा वाढत असलेला प्रभाव या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री केशवराव मानकर, धनंजय मुंडे, चंद्रकांत पाटील, परशुराम उपरकर, रामनाथ मोते, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, किशनचंद तनवाणी, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री. पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :--

"महाराष्ट्रामध्ये चांद्यापासून बांद्यापर्यंत चोऱ्या, दरोडे, लुटमार, खंडणी, दंगलीचे प्रमाण वाढलेले असणे, एकूण गुन्हेगारीत वाढ झालेली असताना पोलिसांच्या तसेच विधी व न्याय खात्याच्या संशयास्पद भूमिकेमुळे गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण केवळ 6 ते 7 टक्क्यापर्यंतच असणे, शिक्षा झालेले आरोपी देखील हजारोंच्या संख्येने फरारी झाल्याचे निदर्शनास येणे, तसेच महिला व बालकांवरील अत्याचारात पुरोगामी महाराष्ट्राने बिहारलाही मागे टाकणे, वीरगाव, ता.अकोले, जि.अहमदनगर येथे दरोडे खोरांनी दरोडा टाकून महिलांवर बलात्कार केल्याचे उघडकीस येणे, लैंगिक अत्याचाराच्या जाचाला महिला पोलीससुध्दा बळी पडल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, अल्पवयीन मुली व महिलांवर बलात्कार करुन त्यांचा खून करण्याच्या घटनांमध्ये वाढ होणे, सायबर गुन्ह्यांच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक करण्याच्या घटनेत वाढ झालेली असणे, गडचिरोलीमध्ये नक्षलवाद्यांचा प्रभाव कमी करण्यास शासनास अपयश येणे, नक्षलवाद्यांचे लोण गडचिरोलीपर्यंत मर्यादित न राहता पुण्यापर्यंत पोहोचणे, गुन्हेगारांवर कारवाई न करणाऱ्या पोलिसांनी वारकऱ्यांना जालना जिल्ह्यामध्ये संरक्षण न दिल्याने कंटेनर-टेलरच्या धडकेने 14 वारकरी जागीच ठार होणे, त्यात उसळलेल्या असंतोषामध्ये गोळीबारात दोन गावकरी ठार होणे, कायदा व सुव्यवस्थेच्या या बिघडलेल्या परिस्थितीमुळे संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारांत घेण्यात यावी."

**तालिका सभापती** : या प्रस्तावावर सभागृहात ठरल्यानुसार सर्व पक्षांचे गटनेते व अन्य दोन सदस्य भाषण करतील. त्यानुसार एकूण 2 तास 30 मिनिटांचा वेळ ठरलेला आहे. त्यातील 2 तास सन्माननीय सदस्यांच्या भाषणांसाठी व 30 मिनिटे मंत्री महोदयांच्या उत्तरासाठी असतील.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,कदाचित राज्याच्या गृहमंत्र्यांना असे वाटेल की, प्रत्येक अधिवेशनामध्ये कायदा व सुव्यवस्थेच्या विषयावर विरोधक कशासाठी चर्चा घडवून आणतात ? खरे म्हणजे कायदा व सुव्यवस्था हा विषय राज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असा विषय आहे. एक वेळेला भारतातील सर्वात सुरक्षित राज्य कोणते असे विचारले तर अभिमानाने लोक सांगत असत की, महाराष्ट्र राज्यच हे देशातील सर्वात सुरक्षित राज्य आहे. पुरोगामी वृत्तीच्या महाराष्ट्राने गुन्हेगार व गुन्हेगार वृत्तींना कधीही थारा दिला नव्हता. केंद्रीय सेवेतील अधिकारी महाराष्ट्राला नेहमी फर्स्ट प्रायोरिटी देत असत. परंतु आता महाराष्ट्रातील स्थिती पूर्णपणे बिघडलेली आहे. महाराष्ट्रातील गुन्हेगारीचा आलेख वाढत चालला आहे. दर वर्षी महाराष्ट्रातील गुन्हेगारी कशी कशी कमी होत गेलेली आहे यासंदर्भात गृहमंत्री आपल्या उत्तराच्या भाषणात नेहमी प्रमाणे माहिती देतील. परंतु जानेवारी 2011 ते 31 जून, 2011 पर्यंत महाराष्ट्रातील पोलीस स्टेशनमध्ये नोंद झालेल्या गुन्हेगारीची आकडेवारी मी देणार आहे. सहा महिन्यात 1430 खून झाले, खुनाचा प्रयत्न 1091, घरफोडया 6970, चो-या 26,249, जबरी चो-या व दरोड्यासारखे प्रकार 1813, बलात्काराच्या घटना 831 झालेल्या आहेत.

सभापती महोदय, आता महाराष्ट्र सुरक्षित आहे असे म्हणण्याचे धाडस कोणीही करणार नाही. या महाराष्ट्र राज्याची तुलना आम्ही बिहार राज्याशी केली तर ते वावगे होईल असे कोणी म्हणणार नाही. काही वर्षापूर्वी उत्तरप्रदेश, बिहार ही राज्य गुन्हेगारीतील पुढे असलेली राज्ये मानली जायची परंतु गेल्या पाच वर्षापासून महाराष्ट्राने त्यांच्याकडून हा नंबर हिसकावून घेतला आहे. दुस-या बाबतीत नंबर हिसकावून घेतला असता तर आम्ही समजू शकलो असतो. परंतु गुन्हेगारीच्या बाबतीत आपण बिहारच्याही पुढे चाललो आहोत. सन 2006 मध्ये 636 लूटमारीचे गुन्हे नांदवले गेले होते. सन 2010 पर्यंत ही संख्या 752 पर्यंत पोहचली होती. सन 2006 मध्ये 2540 दरोड्यांचे गुन्हे नोंदवले गेले होते. सन 2010 पर्यंत 3651 पर्यंत ही आकडेवारी पोहचली होती. सन 2006 मध्ये 14138 घरफोड्यांचे गुन्हे नोंदवले गेले होते. सन 2010 पर्यंत ही संख्या 14,420 पर्यंत पोहचली होती. घरफोडया व चो-या करणा-या महिला व पुरुषांचा वयोगट 18 ते 45 असा आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्डमध्ये ही आकडेवारी प्रसिध्द झालेली आहे. 13 जून रोजी विले

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

विले पार्ले येथे पिस्तूल व चाकूचा धाक दाखवून न्यू अशोक कुरियर कंपनीच्या कामगाराकडून पार्सल लुटले होते. दिल्लीवरून एअर जेटने आलेल्या पार्सल मध्ये 1.46 कोटी रुपयांचे दागिने, सोन्याची बिस्कीटे आणि हिरे होते. अटक केलेल्या आरोपीपैकी एकाही आरोपीची गुन्हेगारी पार्श्वभूमी नसल्यामुळे हा गुन्हा उघडकीस आणला गेला नाही. या प्रकरणामध्ये चुकीच्या लोकांना अटक करण्यात आलेली असून हे आरोपी आम्ही पकडले आहेत असे दाखवले गेले आहे. एपीएमसी जवळ भर दुपारी एटीएम मध्ये पैसे भरण्यासाठी गेलेल्या इंडियन बँकेच्या टाटा सुमोवर दरोडा टाकण्यात आला होता. त्यातील कर्मचा-यांना बेदम मारुन त्यांच्याकडील 53 लाख रुपयांची रक्कम लंपास करण्यात आली. पणवेल-रायगड या ठिकाणी दरोडयांचे प्रमाण वाढले आहे. नाशिक जिल्हयातील घटना मी उधृत करणार नाही. मराठवाडयातील घटना मात्र सांगणार आहे. वैजापूर तालुक्यातील माजी आमदार श्री. कैलास पाटील यांच्या घरावर दरोडा पडला होता, अशोक कचरु बागुल यांच्या घरावर दरोडा टाकून घरातील महिलांना मारहाण केली व त्यांच्या अंगावरील दागिने तसेच 22 हजार रुपये घेऊन दरोडेखोर पळून गेले. विदर्भातील चंद्रपूर जिल्हयातील मदिंरालाही चोरटयांनी सोडले नाही. देशभरातील जैन धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेल्या भद्रावती येथील पार्श्वनाथ मंदिरात दिनाक 24 जुलै, 2011 रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरटयांनी मूर्तीवरील सोन्या,चांदीचे दागिने तसेच दान पेटीतील 26 लाख रुपये लंपास केले होते. चो-यांमध्ये पोलिसांचे घरेही सुटलेले नाहीत. माझ्या जिल्हयातील शिरोळे नावाच्या डीवायएसपीच्या घरी चोरी झालेली असून अजूनपर्यंत या चोरीचा तपास लागलेला नाही. सांताक्रूजच्या पश्चिमेस असलेल्या पोलीस वसाहतीमधील इमारतीमधील 5 घरे फोडण्याची घटना दिनांक 16 रोजी घडलेली असून ही घरफोडी पहाटेच्या सुमारास झाली होती.

सभापती महोदय, आषाढी एकादशीला आम्ही पंढरपूरला गेलो होतो. त्या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री सपत्नीक महापूजेला आले होते. महापुजेनंतर मंदिरातून बाहेर पडल्यानंतर आम्हाला अशी बातमी मिळाली की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या पत्नीच्या पर्स मधून 40 हजार रुपये चोरीला गेले. कराडवरुन जळगावला जात असतांना मुख्यमंत्र्यांच्या पत्नीची पर्स चोरली गेली होती. सुरक्षा रक्षक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .......

असून सुध्दा मुख्यमंत्र्यांच्या पत्नीची पर्स चोरीला गेली होती. विदर्भापासून मुंबईपर्यंत तसेच सर्वसामान्य जनतेपासून, आमदार,खासदार, मुख्यमंत्री ते पोलिसांपर्यंत कोणीही सुरक्षित नसल्याचे दिसून येत आहे. हा महाराष्ट्र छत्रपती शिवरायांचा राहिला नाही, हा महाराष्ट्र शाहू, फुले, आंबेडकरांचा राहिलेला नाही, हा महाराष्ट्र पुरोगामी विचारांचा राहिलेला नाही असे आम्ही म्हणावयाचे काय ? आता हा महाराष्ट्र बॉम्बस्फोटवाला महाराष्ट्र झालेला आहे. हा महाराष्ट्र दंगल खोरांचा आहे, हा महाराष्ट्र दरोडे खोरांचा महाराष्ट्र आहे, हा महाराष्ट्र चोरांचा महाराष्ट्र आहे, या महाराष्ट्रात महिलांवरील बलात्काराच्या घटना वाढ होत आहे. खंडणी व अपहरण करणा-यांचा हा महाराष्ट्र आहे. भ्रष्टाचाराचा अड्डा बनलेला हा महाराष्ट्र आहे, गुंडाचा हा महाराष्ट्र आहे, पत्रकारांवर हल्ले करुन त्यांचे मुडदे पाडणारा हा महाराष्ट्र आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

हा महाराष्ट्र असुरक्षित आहे असे म्हणावयाचे काय ? कालचीच घटना आपण पहावी. संघटनेची मजल कुठ पर्यंत गेली हे आपण पहावे. या राज्यामध्ये कायद्याचे राज्य आहे की नाही अशी शंका आम्हाला यायला लागली आहे. काल दुपारी 3.00 वाजता, बुलढाणा जिल्हा परिषदेमध्ये श्री.राऊत नावाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी बसलेले असताना त्यांना रॉकेल व पेट्रोलने जीवंत जाळण्याचा प्रयत्न झाला. आज कुणाचे जीवन सुरक्षित आहे ? आज सरकारी अधिकारी सुरक्षित नाही. त्यांच्या तोंडाला काळे फासले जाते. त्यांना खड्डे बुजवायला लावतात. आज कोण सुरक्षित आहे, त्यांना कोण संरक्षण देणार आहे ? त्यामुळे हा महाराष्ट्र कुणाचा आहे अशी शंका आमच्या मनामध्ये निर्माण झ ाली आहे.

गेल्या सहा महिन्यामध्ये 800 पेक्षा जास्त बलात्काराच्या घटना घडल्या. एक प्रकरण आपणा सर्वांना लाजेने मान खाली घालावे लागेल असे घडले. परवा वीरगावला भयंकर घटना घडली. तेथे सन्माननीय गृह मंत्री व मी स्वत: जाऊन आलो. एका गरीब शेतकऱ्याचे घर. त्याच्या घरात दुसरा कुठलाही पुरूष नाही. घरातील कर्त्या पुरूषाचा मृत्यू झाला होता. दहाव्या दिवसाच्या कार्यासाठी त्यांच्या मुली घरी आल्या होत्या. दरोडेखोरांना जात, पात, धर्म,पंथ काहीही नसतो. दहाव्या दिवशी कार्य होणार आहे, त्यामुळे त्यांच्या घरात निश्चितपणे काही तरी असेल या आशेने दरोडेखोर आले असतील. ती एक छोटीशी वाडी आहे. लाईट नव्हते. रात्री बारा वाजता दरोडेखोर घरात घुसले आणि घरातील किडूकमिडूक त्यांनी घेतले, गळ्यातील मंगळसूत्र ओढले. त्यानंतर दरोडखोरांनी उद्योग सुरू केला. ती विकृती आहे की, नाही हे समजू शकलेले नाही. त्या दिवशी मी माननीय गृहमत्री श्री.आर.आर.पाटील यांच्याशी बोललो होतो. ते गरिबाचे घर होते. जो काही ऐवज लुटायचा होता इथ पर्यंत ठीक आहे. पण ज्या दोन मुली आपल्या सासरवरून वडिलांच्या दहाव्याच्या कार्यासाठी आल्या होत्या त्या दोन मुलींवर आळीपाळीने बलात्कार करण्यात आला. चार महिला ह्या 60 वर्षाच्या वर होत्या. त्यांना पहाटे 4 वाजे पर्यंत कशा प्रकारे रात्रभर सतावले हे तेथीलच राष्ट्रवादीच्या महिला आघाडी प्रमुखान मला सांगितले. असला प्रसंग कुठल्याही दुश्मनावर येऊ नये, असे मला सांगून त्या रडत होत्या. एवढी हिंमत दरोडेखोरांची का व्हावी ? या राज्यात महिलांचे शील सुरक्षित राहणार आहे की, नाही



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

हा एक प्रश्न आहे. दरोडेखोरांनी महिलांवर केलेल्या अत्याचाराची माहिती माझ्याकडे आहे. माननीय सभापती साहेबांनी आम्हाला वेळ वाटून दिलेला आहे. त्यामुळे त्या तपशीलात मी जाणार नाही. ही सर्व माहिती सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे देतीलच. त्यामुळे मी बलात्काराच्या घटनेला छळणार नाही. वीरगावची घटना आपणा सर्वांना विचार करायला लावणारी आहे.

आम्ही छत्रपतींच्या राज्यात राहतो. आज खरेच छत्रपतींचे राज्य राहिले आहे काय ? इतिहास असे सांगतो की, छत्रपतींच्या राज्यात राजाच्या पाटलाने एका महिलेचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. ही बाब जेव्हा छत्रपतींना समजली तेव्हा त्यांनी रायगडावर त्या पाटलाला मुसक्या बांधून आणले. त्यांनी विनवण्या केल्या. परंतु, त्यांनी विनयभंग केला म्हणून राजाने हुकूम सोडला की, यांचे हातपाय तोडून गडावरून कडेलोट करा. असे म्हणणारा छत्रपती शिवाजी राजा कुठे ? आपण त्यांच्या नावाने राज्य करणारे आहेत. आज आमच्या आया-बहिणींवर सामूहिक बलात्कार होत आहेत. गरिबीमुळे त्यांच्या घरात काहीच सापडले नाही. त्यामुळे दरोडेखोर चिडतात. चिडून जर त्या मुलींवर आळीपाळीने बलात्कार होणार असतील तर महिलांचे शील या राज्यात सुरक्षित राहणार आहे की नाही ? याचा विचार आपणा सर्वांना करावा लागणार आहे. अशी प्रवृत्ती राज्यामध्ये का वाढत आहे. राज्यात गुन्ह्याचे प्रमाण घटले आहे असे माननीय गृह मंत्री सांगतील. जे गुंड आहेत, बदमाष आहेत, दरोडेखोर आहेत, चोर आहेत त्यांची हिंमत वाढलेली आहे. आज पोलिसांचा धाक राहिलेला नाही, हे आपल्याला मान्य करावे लागेल. त्यामुळेच दरोड्याचे प्रमण वाढत चालले आहे. एवढे दरोडे झाले, एवढ्या दरोड्यांचा तपास झाला, एवढे आरोपी पकडले गेले, एवढ्या आरोपींना शिक्षा झाली या संबंधीची आकडेवारी माननीय गृह मंत्र्यांनी द्यावी. चोऱ्यांचे, दरोड्याचे तपास लागत नाहीत. बलात्कार करणारे फरार होतात.

आज वीरगावच्या घटनेचे काय झाले ? साध्या कर्मचाऱ्यांना निलंबित केल. दरोडेखोर रात्री 12.00 वाजता आले आणि पहाटे 4.00 वाजेपर्यंत हैदोस घालत होते असे मला तेथील महिलांनी सांगितले. शेजारच्या तरूणाने पोलीस ठाण्याला फोन केला. तेव्हा पोलीस फोन उचलायला तयार नव्हते. तीन तासाने फोन उचलल्यानंतर पोलिसांनी संगितले की, हमारे पास गाडी नही है, हम सुबह आएंगे.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

अशा पद्धतीने पोलीस वागायला लागले तर धाक कोणाचा राहणार आहे. त्यामुळे ही चर्चा उपस्थित करण्याचा आमचा उद्देशच हा आहे की, महाराष्ट्रातील सरकारचा धाक राहिलेला आहे की, नाही. महाराष्ट्र आपण गुंडांच्या हवाली केला काय, महाराष्ट्र आपण दरोडेखोरांच्या हवाली केला काय, महाराष्ट्र महिलांवर बलत्कार करणाऱ्या बलात्कारी लोकांच्या हवाली केला आहे काय ? असा प्रश्न आमच्या समोर आहे. याची उत्तरे जनतेला मिळाली पहिजेत. वारंवार गृह खात्यावर चर्चा करायला आम्हाला हौस नाही. पण वेदना होतात, दुःख होते. त्या दिवशी आपण गंमतीने म्हटले की, सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गेल्यामुळे, श्री.फुंडकर साहेब गेल्यामुळे मला तेथे जावे लागले. माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील आपण त्या दिवशी जाणार नव्हता काय, आपण गंमतीने जरी स्टेटमेंट केले असले तरी ते बरोबर नव्हते. या राज्यात गृह मंत्र्यांचे काही कर्तव्य आहे की नाही.

सभापती महोदय, पोलिसांकडे संरक्षण मागितल्यानंतर देखील ते देण्यात येत नाही. शेगावच्या दिंडीने सर्वात आधी आपल्याकडे संरक्षणाची मागणी केली होती. दिंडी निघण्याच्या 15 दिवस आधी महाराष्ट्रातील ज्या ज्या जिल्ह्यातून ती दिंडी जाते त्या त्या जिल्ह्यातील जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र पाठविले जाते. पूर्ण प्रोगाम त्यांना दिला जातो. जालना जिल्ह्यामध्ये दिंडी गेल्यानंतर पोलीस त्या संबंधी कुठलही काळजी घेत नाही. अंबड पोलीस ठाण्याने त्या दिंडीचे स्वागत करावे असे आमचे म्हणणणे नाही. जेथे चांगले काम झाले तेही त्यांनी सांगितले. मी व्यवस्थापकला विचारले तेव्हा त्याने सांगितले की, भाऊसाहेब, सोलापूर जिल्ह्यात दिंडी गेल्यानंतर आम्हाला पोलिसांचे चांगले सहकार्य मिळाले. ते नाकारणारे आम्ही नाहीत. पण पोलीस असे का वागतात. 13 लोकांचा जीव गेला. त्याचे पोलिसांना काही वाटले नाही. मग त्यातून असंतोष निर्माण झाला. असंतोष का होणार नाही ? श्री गजानन महाराजांच्या प्रती भाविकांच्या मनामध्ये एक श्रद्धा आहे. निरपराध वारकरी चिरडले गेल्यानंतर जमाव एकत्र आला. त्यामुळे मग आपणच दोष ठेवतो की, जमाव संतप्त झाला. पोलिसांच्या गाड्या जाळायला लागला होता. पोलिसांवर हल्ला करीत होता, असे म्हणून चालणार नाही.

मी फार वेळ घेणार नाही. 2-3 मुद्दे मी येथे मांडणार आहे. याचा आपण बंदोबस्त करणार आहात की नाही ? मुंबई आपण कोणाच्या हातामध्ये सोपविली आहे ? मुंबईवर बोलण्याचा मला अधिकार नाही. मुंबईचे सन्माननीय सदस्य येथे बसले आहेत. ते यावर बोलतील.

यानंतर सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

सभापती महोदय, एका गोष्टीचा उल्लेख कुठेही होत नाही, तो का होत नाही हे माझ्या लक्षात येत नाही. या शहरामध्ये बॉम्बस्फोट झाल्यानंतर त्यावर या सभागृहात चर्चा होते व उपाय योजना सुचविल्या जातात. सभागृहामध्ये चर्चा करीत असतांना या मुंबईचे जे मूळ दुखण् आहे त्या बाबत आपण कधीतरी विचार करणार आहोत की नाही? या मुंबईमध्ये बेकायदेशीरपणे परदेशी नागरीक वास्तव्य करुन राहात आहेत. त्यांना त्यांच्या देशामध्ये परत पाठविण्याचा विचार करणार आहोत की नाही? त्यांना परत पाठविण्याच्या बाबतीत आपले शासन अपयशी ठरले आहे काय?

यापूर्वी फक्त बांगलादेशी नागरिकांचे वास्तव्य मुंबई शहरामध्ये होते. परंतु गेल्या दहा वर्षामध्ये या राज्यामध्ये या समस्येने गंभीर रुप धारण केले आहे. मुंबईमध्ये आज बांगलादेशीच नाहीतर पाकिस्तानी आणि नायजेरीयन लोक सुध्दा राहात आहेत. आम्ही आतापर्यंत बांगला देशी नागरिकांच्या नावाने घसा कोरडा करीत होतो, परंतु नायजेरीयन नागरिकांची संख्या सुध्दा फार जास्त झाली असून ते मुंबईमध्ये बेकायदेशीररित्या वास्तव्य करीत आहेत. इतर देशांमध्ये त्यांचा व्हिसा संपल्यानंतर एक दिवस सुध्दा राहू दिले जात नाही त्याच क्षणी त्यांना त्यांच्या देशामध्ये पाठविले जाते. परंतु या राज्यामध्ये वर्षानुवर्षे हे लोक राहात आहेत याची आपण दखल घेण्यास तयार नाही. ज्या शाखेकडे हे काम दिले आहे ती शाखा काय काम करीत आहे? वर्तमानपत्रामधून यावर अनेक वेळा प्रकाश टाकण्याचे काम केले जात आहे. मुंबईच्या पोलीस विभागामध्ये या करिता एक विशेष पोलीस दल नेमण्यात आले आहे. यामध्ये विशेष शाखा क्रमांक 1 कडे बांगलादेशी नागरीक, पाकिस्तानी नागरीक यांच्या बाबतची माहिती आहे. त्याचप्रमाणे विशेष शाखा क्र. 2 कडे नायजेरीयन नागरिकांबाबत माहिती आहे. या शहरामध्ये बांगलादेशी नागरीक किती आहेत, पाकिस्तानी नागरीक किती आहेत, ते केव्हा आले त्यांचा राहण्याचा कालावधी किती आहे आणि ते परत केव्हा जाणार आहेत? याची नोंद विशेष शाखेमध्ये ठेवली जात नाही व त्याची कुणीही दखल घेत नाही, त्याबाबत कुणीही कारवाई करीत नाही. या लोकांचे पोलिसांशी लागेबांधे आहेत. या नायजेरीयन लोकांची माहिती घेतली असता ते अंमली पदार्थांचा व्यवसाय करीत असल्याचे व अवैध शस्त्रास्त्रांची तस्करी करीत असल्याचे आढळले आहे. त्यांच्यावर आपले नियंत्रण नाही. हे नायजेरीयन लोक कुलाबा, मशिद बंदर, मीरा रोड, डोंगरी या भागामध्ये रस्त्यांवर उघडपणे ड्रग्जचा व्यापार करीत आहेत. त्याला लहान मुले, कॉलेजची मुले बळी पडत आहेत. कॉलेजच्या

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

बाहेर नायजेरीयन तरुण उभे असल्याचे आढळतात, परंतु त्यांना पोलीस कां पकडू शकत नाहीत याचे कारण काय? पोलीस महासंचालकाच्या कार्यालयाच्या बाजूला रिगल सिनेमाजवळ लहान लहान गेस्ट हाऊसेस आहेत, हॉटेल्स आहेत त्या ठिकाणी नायजेरीयन लोक वास्तव्य करुन राहतात. त्यांची कधीही झडती घेतली जात नाही, त्यांना कधीही विचारले जात नाही. जवळपास 5 हजारापेक्षा जास्त त्यांची संख्या असून त्याविरुध्द तुमची विशेष शाखा क्र. 2 काहीच कारवाई करीत नाही. सन्माननीय गृहमंत्री आपण यामध्ये बदनाम होत आहात. आमचा वैयक्तिक रोष तुमच्यावर नाही. कुणीही आम्हाला विचारले तर सन्माननीय गृहमंत्री खूप चांगले आहेत असे मी नेहमी बोलतो. परंतु या परदेशी लोकांना प्रतिबंध करण्यासाठी आपण कायदा केला आहे काय? त्यांची आपण चौकशी करणार आहात की नाही? जर कायदा केला नसेल तर तशा प्रकारचा कायदा आपण तयार करावा.

मुंबई शहर ही कुणाचीही धर्मशाळा नाही, कुणीही यावे आणि रहावे असे चालणार नाही. त्याचे दुष्परिणाम मुंबईतील जनतेला भोगावे लागत आहेत. मुंबईमध्ये होणाऱ्या बॉम्बस्फोटांच्या मालिकेमधून या शहराच्या कायदा व सुव्यवस्थेला निश्चितपणे गंभीर धोका उत्पन्न होऊ शकतो.सभापती महोदय, कोकेन, चरस, गांजा, अफू या सर्व अंमली पदार्थांचा दीन दहाडे व्यापार सुरु आहे, हे लोक अवैधरित्या शस्त्रे घेऊन येत आहेत. त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. या बाबतीत बांगलादेशी नागरीक असो, पाकिस्तानी नागरीक असो किंवा नायजेरीयन नागरीक असो त्यांची आपण त्वरित चौकशी सुरु करावी. ही मंडळी मुंबई शहरामध्ये केव्हा आली आणि केव्हा परत जाणार आहेत, त्यांच्याकडे पासपोर्ट आहे की नाही, त्यांनी बोगस पासपोर्ट तयार केला आहे काय, त्यांना कुणी परवानगी दिली याचा आपण पहिल्यांदा शोध घ्यावा अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, गुन्हेगारांना पकडण्याचे प्रमाण आपल्या राज्यामध्ये फार कमी आहे. त्याचबरोबर जे गुन्हेगार पकडले जातात त्यांना शिक्षा होत नाही. गुन्हेगारांचा हौसला वाढण्यामागील हा देखील एक मुद्या आहे. सन 2009 मध्ये कोर्टात गुन्हे शाबित होण्याचे महाराष्ट्रातील प्रमाण इतर राज्यातील गुन्हेगारीच्या तुलनेत फार कमी आहे. या देशातील उत्तराखंड राज्यामध्ये 69 टक्के आहे, राजस्थानमध्ये 60.60 टक्के आहे, तामिळनाडूमध्ये 62.1 टक्के आहे, केरळमध्ये 57 टक्के आहे, उत्तर प्रदेशमध्ये 54 टक्के आहे आणि महाराष्ट्रामध्ये इतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

राज्यांच्या मानाने फक्त 10.12 टक्के आहे. गुन्हेगारांना पकडले जाते, परंतु त्यांच्याविरुध्द चार्जशीट दाखल केले जात नाहीत, पुरावे सादर केले जात नाहीत, त्यामुळे त्यांना शिक्षा होत नाही. आपल्या राज्यामधील गुन्हेगारांच्या शिक्षेचे प्रमाण फक्त 10.12 टक्के कां आहे, याचा अभ्यास करण्यासाठी गृह विभागाचे सह सचिव श्री. आर.डी.संखे यांच्या अध्यक्षतेखाली तीन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश असलेली समिती नेमली असून त्या समितीने 50 टक्के गुन्हे शाबित असलेल्या राज्यांना जुलै महिन्यात भेटी देऊन त्या राज्यातील गुन्हे शाबित असल्याचे प्रमाण जास्त असण्यामागील कारणे शोधून राज्य सरकारलर सूचना कराव्यात अशी अपेक्षा होती. या समितीने राज्य शासनाला काय सुचविले आहे? दर महिन्याला पोलीस आयुक्त आणि घटक प्रमुख, गुन्हे विषयक परिषद घेऊन गुन्हे विषयक तसेच इतर कार्याचा आढावा घेण्यासाठी बैठका घेतात. त्यामध्ये मागील आढावा घेऊन पुढे काय कारवाई केली जाते हे आम्हाला अजूनपर्यंत समजले नाही.

सभापती महोदय, मला नक्षलवादाबाबत या ठिकाणी काही महत्वाचे मुद्दे मांडावयाचे आहेत.. नक्षलवाद्यांनी मागील दोन महिन्यात 19 आदिवासींना ठार मारले आहे. मंत्रीमहोदय, आपण गडचिरोली जिल्ह्याचे पालक मंत्री आहात, हा जिल्हा आपण जाणीवपूर्वक मागून घेतला आहे व त्या ठिकाणी कामाला सुरुवात केली आहे. परंतु नक्षलवाद्यांच्या कारवाया अजून थांबलेल्या नसून त्या दिवसें दिवस वाढत आहेत. नक्षलवादी आणि माओवादी या संस्थांचे जाळे गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यापुरते मर्यादित राहिले नसून गोंदिया, भंडारा, नागपूरमध्ये सुध्दा नक्षलवादी वास्तव्य करीत आहेत. त्यांची घरे यवतमाळ, नांदेड, पुणे येथे असून त्यांनी आपले नेटवर्क पसरविले आहे. सभापती महोदय, कदाचित एका बाजूला मुंबई अतिरेक्यांच्या ताब्यात आणि उर्वरीत महाराष्ट्र नक्षलवाद्यांच्या ताब्यात असे एके दिवशी होईल ते होता कामा नये याची आपण काळजी घेतली पाहिजे. ज्या 19 आदिवासींना मारण्यात आले त्यांची नावे माझ्याजवळ असून ती मी वाचून सभागृहाचा वेळ घेणार नाही. परंतु आपण थोडीशी दक्षता घेऊन या नक्षलवाद्यांचा बंदोबस्त करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. आपण सांगणार की, पोलीस यंत्रणेवर ताण पडत आहे हे खरे आहे. आपल्या राज्याची लोकसंख्या 10 कोटींवर गेली असून या लोकसंख्येच्या मानाने पोलीस दलामध्ये 1 लाख 87 हजार 547 पदे मंजूर आहेत. याचाच अर्थ एक हजार लोकसंख्येमागे 1.8 एवढी पोलिसांची संख्या आहे. हे निकष आपण कुठेतरी बदलले पाहिजेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

सभापती महोदय, आम्ही वारंवार सांगत आहोत की, एका बाजूला पोलीस स्टेशनच्या अंतर्गत 100 गावे आणि दुसरीकडे पोलिसांची संख्या 80 अशी स्थिती आहे. मग गुन्हेगारी कशी रोखली जाणार आहे असा प्रश्न आहे. पोलिसांची संख्या वाढविली पाहिजे. सध्या पोलिसांची जी संख्या आहे, ती पुरेशी नाही. याठिकाणी माननीय वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार देखील उपस्थित आहेत.आपल्या राज्यात पोलिसांची संख्या फार कमी आहे आणि त्यांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने कोणताही निर्णय होत नाही.राज्यामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये पोलीस असावयास पाहिजेत असे कदाचित आपल्या मॅन्युअलमध्ये देखील असेल. आता तुमच्या विभागाला माननीय वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी सढळ हस्ते निधी दिलेला आहे. त्यांनी असे जाहीर केले की, गृह विभागाला पैसा कमी पडू देणार नाही. त्यामुळे माननीय गृह मंत्र्यांनी पदे भरण्याच्या बाबतीत प्रस्ताव सादर करावयास पाहिजे आणि मॅन्युअलनुसार लोकसंख्येच्या प्रमाणात या राज्यातील पोलीस दल असले पाहिजे अशा प्रकारची मी येथे मागणी करीत आहे.

सभापती महोदय, पोलीस दलाचे सक्षमीकरण करीत असताना अतिरिक्त पदाची निर्मिती व त्याठिकाणी त्वरित भरती करण्याच्या बाबतच्या घोषणा राज्य सरकारकडून करण्यात येत असल्या तरी त्या पूर्ण होत नाहीत. एकंदर जी पदे मंजूर आहेत, त्यामध्ये एकंदर 13,627 जागा रिक्त आहेत. जागाच भरल्या जात नाहीत. पोलीस शिपायापासून अप्पर महासंचालकांपर्यंत जागा रिक्त आहेत आणि त्यामुळे सध्या असलेल्या पोलीस यंत्रणेवर ताण येतो हे आम्हाला मान्य आहे. मग कामकाज कसे चालणार आहे? याचा हिशोब केला तर एका गावासाठी एक पोलीस देखील येत नाही. अशा वेळी गणेशोत्सवाच्या वेळी पोलीस, जर कुठे एखादी घटना घडली तर तेथे पोलिसांची आवश्यकता असते. समजा कुठे दंगल झाली तर सर्व पोलीस स्टेशनचा स्टाफ एकत्र केला जातो. समजा माननीय मुख्यमंत्र्यांचा दौरा असला की बुलढाणा जिल्ह्यातील संपूर्ण पोलीस दल एका ठिकाणी एकत्र येते याचाही विचार करावा. जर आपण अशा प्रकारे विचार केला नाही तर मी सुरुवातीला म्हटले ते खोटे नाही की, तुमची इच्छा असूनही या राज्यावर गुंडांनी कब्जा केला. या राज्यावर दरोडेखोरांनी, अतिरेक्यांनी कब्जा केला. या राज्यावर चोरांनी, खंडणी मागणाऱ्यांनी कब्जा केला असे हे महाराष्ट्र राज्य आहे आणि जर तसे कोणी म्हटले तर वाईट वाटण्याचे कारण नाही. खरे म्हणजे मला खूप बोलावयाचे होते पण वेळेचे बंधन आहे.सर्व बाबींचा विचार करुन पुढच्या अधिवेशनामध्ये किमान गृह विभागावर सन्माननीय सदस्यांना चर्चा करावी लागणार नाही ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

अशा प्रकारचे वातावरण महाराष्ट्रमध्ये निर्माण व्हावे अशी आमची अपेक्षा आहे. 13 जूनला मुंबई शहरामध्ये जो बॉम्बस्फोट झाला पण अजूनपर्यंत शासनाला त्याचे धागेदोरे मिळालेले नाहीत. दुसरीकडे या बॉम्बस्फोटातील मृतांचा आकडा 26 पर्यंत गेला आहे. पण महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात बॉम्बस्फोट होऊन 15 दिवसाचा कालावधी झालेला आहे. परंतु बॉम्बस्फोटाच्या संबंधातील धागेदोरे मिळालेले नाहीत एवढे आमच्या राज्यातील सक्षम पोलीस खाते आहे असे आम्हाला म्हणावे लागेल. पण आमच्यावर तसे म्हणण्याची वेळ येऊ देऊ नका. या सर्व गोष्टींचे खुलासे माननीय गृह मंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये करावेत अशी मी मागणी करतो आणि माझे संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

-----

. . . .डब्ल्यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : मी माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना विचारु इच्छितो की, आपण दोन मिनिटांमध्ये पुरवणी विनियोजन विधेयक संमत करुन घेऊ या काय ?

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, कामकाजाच्या बाबतीत सुसूत्रता असली पाहिजे, लिंक असली पाहिजे असे मला वाटते.

-----

. . . .3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी. : महाराष्ट्र (व्दितीय पुरवणी) विनियोजन विधेयक

मु.शी. : L.A. BILL NO. XXXIV OF 2011

( A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH 2012.)

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 34 - दिनांक 31 मार्च 2012 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोग करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे,असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो.

( खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शिर्षक व हेतू वाक्य विधेयकचे भाग झाले.)

परिषदेने कोणतीही शिफारस केलेली नाही म्हणून विधान परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा संदेशासह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येत आहे.

----

. . . .डब्ल्यू-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: राज्यात वाढते दरोडे,लूटमार तसेच नक्षलवाद्यांचा वाढत असलेला प्रभाव

**मु.शी.**: राज्यात वाढते दरोडे,लूटमार तसेच नक्षलवाद्यांचा वाढत असलेला प्रभाव या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर,दिवाकर रावते,विनोद तावडे,रामदास कदम, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री केशवराव मानकर, धनंजय मुंडे, चंद्रकांत पाटील, परशुराम उपरकर, रामनाथ मोते,डॉ.रणजित पाटील,सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, किशनचंद तनवाणी,वि.प.स.यांचा प्रस्ताव (चर्चा पुढे सुरु)

**तालिका सभापती** : मला सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे की, आता आपल्याकडे वेळ अतिशय कमी राहिलेला आहे. एक तास सत्ताधारी पक्षासाठी आणि एक तास विरोधी पक्षासाठी असे वेळेचे वाटप करण्यात आले आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी एकंदर 35 मिनिटे भाषण केले आहे आणि उरलेल्या 25 मिनिटांमध्ये आपल्याला सर्वांची भाषणे संपवावयाची आहेत. आता सन्मानननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी आपले विचार व्यक्त करावेत.

डब्ल्यु-6 . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, याठिकाणी सन्मननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे. त्यानुसार कायदा आणि सुव्यवस्थेबाबत सांगावयाचे तर आज महिलांची जी परिस्थिती आहे, त्याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी उभी आहे.

सभपती महोदय, माननीय गृह राज्यमंत्र्यांनी नव्याने कारभार हाती घेतलेला आहे. त्यांना याबाबत कल्पना असेल तर उत्तम आहे अन्यथा 2003 मध्ये केंद्र सरकारने मल्लिमठ समिती नेमली होती आणि गुन्हेगार सहीसलामत  का सुटतात त्याच्या अनेक कारणांचा उहापोह केंद्र आणि राज्य शासन यांच्यामध्ये झाला होता. आपण आकडेवारी बाबत नेहमीच चर्चा करीत असतो. सन्माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील हे प्रत्येक वेळी राज्यातील गुन्ह्यांची संख्या कमी झाली याची उदाहरणे देत असतात. परंतु "पुणे सकाळ" मध्ये श्री.रमाकांत दाणी यांनी दिलेला रिपोर्ट आहे. तो कोणाचा वैयक्तिक अहवाल नसून नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोचा जो अहवाल आहे, त्यानुसार वेगवेगळया राज्यांमध्ये आरोपीनां किती शिक्षा होते याची त्यांनी आकडेवारी दिलेली आहे. मी वेळेच्या अभावी सगळया राज्यांची आकडेवारी वाचणार नाही. परंतु महाराष्ट्रामध्ये 9.06 टक्के आरोपींना शिक्षा होते. याचा अर्थ 91 टक्के आरोपी सुटतात. या तुलनेमध्ये उत्तर प्रदेशमध्ये 54 टक्के आरोपींना शिक्षा होते. तामिळनाडू मध्ये 62 टक्के आरोपींना शिक्षा होते आणि पश्चिम बंगाल मघ्ये 12 टक्के आरोपींना शिक्षा होते. म्हणून शिक्षा होण्याचे जे प्रमाण आहे ते अतिशय कमी आहे आणि ज्यावेळेला सामाजिक गुन्ह्यांचा प्रश्न येतो तेव्हा 6 ते 7 टक्के गुन्ह्यांमध्ये शिक्षा झाल्याचे दिसते ही यातील वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, त्याचबरोबर विविध प्रकारचे जे अत्याचार आहेत, त्यांची देखील सरासरी काढली तर त्याबाबत नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो यांनी संपूर्ण देशातील ॲव्हरेज काढलेले आहे. त्यामध्ये सगळया देशात किती खून सिध्द होतात तर 35 टक्के खून सिध्द होतात. महाराष्ट्रामध्ये फक्त 30 टक्के खून सिध्द झाल्याचे दिसते. त्याप्रमाणे बलात्काराच्या प्रकरणामध्ये इतर ठिकाणी शिक्षेचे प्रमाण 26 टक्के आहे.पण महाराष्ट्रामध्ये फक्त 19 टक्केच शिक्षा झाल्याचे दिसते. फसवणुकीच्या बाबतीत सुध्दा असेच आहे की, संपूर्ण देशामध्ये 28 टक्के इतके प्रमाण आहे आणि राज्याचे प्रमाणे 9.9 इतके आहे.त्यामुळे एक गोष्ट स्पष्टपणे दिसते की, महाराष्टाच्या गृह विभागामध्ये खास करुन अंतर्गतरित्या प्रचंड मोठया प्रमाणात सुधारणा करण्याची गरज आहे पण सगळ्यात मोठी जी कमतरता आहे ती म्हणजे गृह विभागाला स्वत:चे आत्मपरिक्षण करण्यास वेळ



डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

नाही. ही यातील वस्तुस्थिती आहे. सभापती महोदय,नक्षलवाद्यांच्या प्रादूर्भावाच्या बाबतीत आपल्या कडे वारंवार चर्चा होत आहे परंतु एक बाब स्पष्ट आहे की,नक्षलवाद्यामुळे 9 हजार पेक्षा जास्त व्यक्ती मृत पावल्या आहेत. त्याबरोबर पुण्यासारख्या शहरामध्ये, जिल्ह्यामध्ये, शिरुर तालुक्यामध्ये नक्षलवाद्याचे मोठे पथक आपल्याला सापडले आणि मुंबई, पुणे, ठाणे तसेच नाशिक या शहरामध्ये,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नागपूर शहरामध्ये नक्षलवादी ज्यांना कव्हर म्हणतात अशा सुशिक्षित, अतिशय श्रीमंत, मध्यमवर्गीय तरुण-तरुणींमध्ये जाऊन त्यांना प्रभावित करुन त्यांना नक्षलवादासाठी कामाला लावणे असा मोठा प्रकार घडल्याचे दिसून येत आहे. एका बाजूला 91 टक्के आरोपी सुटतात आणि दुसरीकडे नक्षलवादी हातपाय पसरत आहेत. या दोन्ही मधून काय परिस्थिती होत असेल त्याचा आपण विचार करु शकतो.

यानंतर कु.थोरात . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

सभापती महोदय, नक्षलवाद्यांच्या प्रादुर्भावा बरोबरच मी या ठिकाणी काही उदाहरणे आणलेली आहेत. त्या सगळया उदाहरणांमध्ये मी जाणार नाही. पण अकोला येथे जी घटना घडलेली आहे त्या घटनेच्या बाबतीत लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्यावेळी चर्चा झालेली आहे व सन्माननीय गृह राज्य मंत्र्यांनी त्याला उत्तरही दिलेले आहे. त्याच्यामध्ये ते संशयित नसून ते आरोपी आहेत, अशा प्रकारचे या ठिकाणी निवेदन करण्यात आलेले आहे.

सभापती महोदय, सरकार मार्फत दर वर्षी क्राईमसह पोलीस रिपोर्ट प्रकाशित करण्यात येतो. हा अतिशय चांगला रिपोर्ट आहे, त्यामध्ये संपूर्ण प्रकारची आकडेवारी दिलेली असते. तसेच कुठे काय त्रुटी आहेत आणि त्या कशा दुरुस्त केल्या पाहिजेत या बद्दलची माहिती दिलेली असते. सभापती महोदय, दरोडा, बलात्कार, अपहरण, लहान मुलांना पळवून नेणे हे जे गुन्हे आहेत या गुन्हयांच्या बाबतीत या रिपोर्टमध्ये एक वेगळा सेक्शन असला पाहिजे. दरोडा आणि बलात्कार अशा घटना किती घडल्या, काही जिल्ह्यांमध्ये या घडतही नसतील त्यामुळे त्या ठिकाणची माहिती निरंक येईल, ती चांगली गोष्ट आहे. पण जेथे हे गुन्हे घडलेले आहेत ते समोर येतील. दरोडयांच्या बरोबरच बलात्कार किंवा स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे गुन्हे याचे प्रमाण किती मोठे आहे हे स्पष्ट होईल तेव्हा या रिपोर्टमध्ये यासाठी एक सेक्शन वाढविण्यात यावे अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, तक्रार नोंदविताना दिरंगाई होते. ठाणे-पणवेल रेल्वेमध्ये एका महिलेची जेव्हा छोडछाड झाली त्यावेळी तिची तक्रार रेल्वे पोलिसांनी नोंदवून घेतली नाही, तक्रार नोंदवताना हयगय होता कामा नये असे उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. सभापती महोदय, मी गिरगाव येथे गेले होते. तेथे नितीन बेनके यांनी दिलेला अर्ज आहे. त्या अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, दिनांक 18-4-2010 ला गिरगावच्या जवळ दहा किलो मीटर अंतरावर दरोडा पडला होता. त्या दरोडयामध्ये श्रीमती सानाबाई मंडलिक यांचा मृत्यू झाला आहे. या दरोडयाचा अद्याप तपास लागलेला नाही. ज्या श्री. तायडे या पोलीस इन्स्पेक्टरचा उल्लेख या ठिकाणी वारंवार केला जात होता त्या श्री. तायडे यांच्या अखत्यारीमध्ये हा विभाग असतांनाच हा दरोडा आणि बलात्काराची घटना पडलेली आहे. सभापती महोदय, या सगळया तपशीलामध्ये जात असताना मला या ठिकाणी काही मागण्या करावयाच्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

डॉ. नीलम गोऱ्हे....

सभापती महोदय. ज्या बलात्कारित महिला आहेत त्यांच्याशी बोलायचे असेल किंवा त्यांची विचारपूस करावयाची असेल तर सामाजिक कार्यकर्त्या किंवा आमच्या सामाजिक संस्था आहेत त्यांना कुठे तरी सहकार्य मिळाले पाहिजे. जेजुरी येथे एक बलात्काराची घटना घडली होती. त्यावेळी त्या ठिकाणी पालीस इन्स्पेक्टर श्री. शेवाळे हे होते. आम्ही त्या महिलेशी बोलत असताना त्यांनी तिच्या हातातून मोबाईल काढून घेतला आणि बोलण्यास बंदी घातली. तूम्ही कोणाशीही बोलावयाचे नाही असे तिला सांगितले. कल्याण रेल्वेस्थानकात जेव्हा एका तरुणीवर बलात्कार झ ाला तेव्हा ती तरुणी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवायला गेली होती पण तेव्हा लोहमार्ग पोलिसांनी तिची तक्रार घेतली नाही. नंतर ती तक्रार कल्याणला वर्ग करण्यात आली. सभापती महोदय, त्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही.असता तर आरोपी तिला खेचून नेत आहेत हे दिसले असते व तो आरोपी लवकर पकडला गेला असता पण सी.सी. टी.व्ही. लावलेच जात नाहीत. म्हणून माझी पहिली मागणी अशी आहे की, या बलात्कार पीडित महिलांशी बोलत असताना संवेदनशील पध्दतीने बोलणे आवश्यक आहे. महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी अशा स्त्रियांशी कशा पध्दतीने बोलले पाहिजे याचे प्रशिक्षण त्यांना देण्याची गरज आहे. थोडक्यात सांगावयचे झाले तर विचारपूस करण्याची देखील पध्दती असते. पोलिसी खाक्या ऐवजी ती पीडित महिला आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. समुपदेशकांची पदे सर्व रुग्णालयात रिक्त आहेत त्यामुळे मेडिकल सोशल वर्कर्स किंवा समुपदेशक यांची मदत मिळू शकत नाही.

सभापती महोदय, माझी मागणी अशी आहे की, आज 16000 लोक बेपत्ता झालेले आहेत. त्यामध्ये मुलींचे प्रमाण मोठे आहे. उच्च न्यायालयाने दिनांक 16 सप्टेंबर, 2002 ला पोलीस महासंचालकांना या बेपत्ता लोकांच्या बाबतीत समिती नेमण्याबाबत आदेश दिलेले अहेत. परंतु ती समिती अद्याप नेमली गेली नाही. पुण्याच्या संदर्भात बोलावयाचे झाले तर पिंपरी चिंचवड या ठिकाणी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय असावे अशी अनेक वर्षापासून आमची मागणी आहे. ठाणे जिल्ह्याप्रमाणेच पुणे जिल्ह्याची सुध्दा वाढ होत आहे. म्हणून पिंपरी चिंचवड येथे एक आयुक्तालय असावे अशी मी या ठिकाणी मागणी करते. तसेच हवेली पोलीस स्टेशनच्या विभाजनाची मागणी मी या ठिकाणी करते. त्याचबरोबर कमिशनर ऑफ विमेन्स राईट्स आणि सोशल जस्टीस नेमले पाहिजे. महिलांच्या विषयीच्या ज्या केसेस आहेत त्याचा फॉलोअप कोर्टात होईपर्यंत बऱ्याच वेळेला

...3...



SMT/ KGS/ KTG/ 15:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

झालेला तपास आणि सरकारी वकील यांच्यामध्ये प्रचंड मोठी विसंगती झालेली दिसते. म्हणून प्रत्येक महसूल विभागामध्ये महिलांच्या प्रश्नांसाठी आणि सामाजिक विषयांसाठी आयुक्त दर्जाचे अधिकारी विभागीय स्तरावर नेमले पाहिजेत, अशी माझी मागणी आहे. जेणेकरुन चार्जशीट दाखल झाल्यापासून कोर्टात केस उभी राहीपर्यंत मधल्या काळात त्या केसेसचा फॉलोअप आणि पीडित महिलांची वस्तुस्थिती यांच्यामध्ये कुठे तरी ताळमेळ घालण्याचे काम होऊ शकेल, या मागणीकडे मी मत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छिते.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा असा आहे की, दरोडे आणि मुलींना पळवून नेण्याचे जे प्रकार होत आहेत त्यामध्ये परप्रांतीयांचा काही हात आहे का असा प्रश्न उपस्थित होतो. काही जिल्ह्यामध्ये ठरावीक व्यवसायामध्ये परप्रांतीय आहेत.आमच्याकडच्या काही मिसिंग मुलींना 24 परगणा भागातून शोधून आणण्यात आले आहे. चाकण, आळंदी या पोलीस स्टेशनमधील चित्र पहिले तर तेथे बऱ्याच वेळेला या गुन्हयांशी त्यांचा संबंध दिसून येतो. गुन्हेगार अणि दरोडे या सोबतच सोनसाखळया चोरण्याचे प्रमाण मोठया प्रमाणात आहे. मी या ठिकाणी ज्या सहा-सात मागण्या केलेल्या आहेत त्याचा फॉलोअप शासनाने जरुर करावा. सभापती महोदय, दोन गुन्हे उघडकीस आलेले आहेत आणि असे अनेक गुन्हे आहेत. ते म्हणजे पोलीसच या गुन्हयांमध्ये गुन्हेगार सापडलेले आहेत. बंडगार्डन पोलीस स्टेशनमध्ये मोठे रॅकेट उघडकीस आले आहे. बंडगार्डन पुणे पोलीस स्टेशनमधील कर्मचारी श्री. दिगंबर घोरपडे आणि पासपोर्ट एजंट श्री. इनायत अली अब्दुल अजीज हरियाणवी यांनी संगनमत केले. अभिनेत्री जिया अशोक चोपडा आणि पासपोर्ट एजंट श्री. अरविंद राजेंद्र भट यांना नुकतीच अटक झालेली आहे. 700 बोगस पासपोर्ट या लोकांनी पुण्यातील चुकीचे पत्ते देऊन वापरलेले आहेत.

सभापती महोदय, दुसरे प्रकरण असे आहे की, राज्य पोलीस दलातील क्युआरटी शाखेत भरती करण्यासाठी श्री. सागर कांबळे यांने स्वत: पोलीस असल्याचे सांगून उमेदवारांकडून दहा हजार रुपये घेतले. महाराष्ट्र पोलीस दलाचे चिन्ह, राजमुद्रा, ॲन्टी टेररिस्ट स्क्वॉड असा मजकूर असलेली बनावट नियुक्ती पत्रके दिली आणि त्यावर अतिरिक्त पोलीस महासंचालक श्री. के.टी. रघुवंशी यांची बनावट सही सुध्दा केली. श्री. रीतेश भास्कर मोरे या माणसाने तक्रार केल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले. श्री. सागर कांबळे असे सांगतो की, तो श्री. किरण यादव या

..4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अधिकाऱ्यासाठी काम करतो.हे श्री. किरण यादव कोण आहेत याचा पोलीस अद्याप शोध घेत आहेत. ते कुणालाच सापडले नाहीत. ही दोन गुन्हे पोलीस कमिशनरेटच्या अंतर्गत घडलेले आहेत आणि या गुन्ह्यामध्ये पोलीस कर्मचारीच असल्याची उदाहरणे आपण बघितली आहेत. मला असे वाटते की, श्री. दादा उप मुख्यमंत्री आहेत पण "दिव्या खालीच अंधार आहे" असे म्हणण्याची वेळ येते. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद. जय महाराष्ट्र.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ KTG/

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलले ) : सभापती महोदय, गृह विभागावरील चर्चेत भाग घेणारा कोणताही सदस्य महाराष्ट्र हा दरोडयांनी आणि घरफोडयांनी व्यापलेला आहे. या व्यतिरिक्त काही बोलू शकणार नाहीत. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे बऱ्याचशा गोष्टी महिलांच्या आत्याचाराच्या बाबतीत बोलतील असे मला वाटले होते. पण त्यांनी ते खास मांडले नाही. आम्ही ते विषय या ठिकाणी मांडू शकणार नाही. सभापती महोदय,दरोडे आणि घरफोडयांच्या बाबतीत वर्तमानपत्रात छापून लेलेली केवळ शीर्षके मी या ठिकाणी वाचली तरी मला वेळ पुरणार नाही. वर्तमान पत्रा अशा प्रकारच्या शीर्षकाखाली बातम्या छापून आलेल्या आहेत. "घरफोडी सोनसाखळी चोरीचा धुमाकुळ सुरुच," मुंबई दिनांक 30/5. "घरफोडया सोनसाखळया चोरण्याचे सत्र सुरुच" दिनांक 11/5. जूनमध्ये "घरफोडया अनेक; पोलीस मात्र ढिम ! पोलिसांची कारवाई नाही." घरफोडयांच्या वाढत्या घटनांमुळे मुंबईकरांवर भीतीचे सावट."

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सभापती महोदय, 'कर्जतमध्ये भरदिवसा घरफोडी- दरोडा-आरोपी मोकाट' या शीर्षकाखाली बातमी आलेली आहे. सभापती महोदय, 'तीन घरफोडीच्या घटनांमध्ये पंधरा लाखाची लूट' या शीर्षकाखाली पनवेलची बातमी आलेली आहे. सभापती महोदय, 'सोनसाखळी चोरावर आता दरोड्याचा गुन्हा' या शीर्षकाखाली रायगडची बातमी आलेली आहे. सभापती महोदय, 'गृहमंत्र्यांच्या सांगली जिल्ह्यात सहा महिन्यांत 72 घरफोड्या' या शीर्षकाखाली वृत्तपत्रात बातमी आलेली आहे. सभापती महोदय, 'कळंबोलीत एका रात्रीत 2 घरफोडी' या शीर्षकाखाली बातमी आलेली आहे. सभापती महोदय, 'पडघ्यात भरदिवसा घरफोडीत 16 लाखांचा ऐवज लंपास' या शीर्षकाखाली बातमी आलेली आहे. सभापती महोदय, 'घरफोडीच्या सत्राने रायगड जिल्ह्यातील लोक हैराण' या शीर्षकाखाली बातमी आलेली आहे. सभापती महोदय, 'पायघुणी येथील सोडतीन कोटीच्या घरफोडी प्रकरणी पाच जणांना अटक' या शीर्षकाखाली बातमी आलेली आहे. सभापती महोदय, 'सफाळे येथे दरोड्याने घबराट' या शीर्षकाखाली बातमी आलेली आहे. सभापती महोदय, 'चोरी, जबरी चोरी आणि घरफोडीच्या घटनेत साडेनऊ लाख रुपयांची लूट या शीर्षकाखाली ठाण्याची बातमी आलेली आहे. सभापती महोदय, 'सफाळे येथे दरोड्याने घबराट' या शीर्षकाखाली पालघर येथील बातमी आलेली आहे. सभापती महोदय 'नवी मुंबईत 53 लाखांचा दरोडा' या शीर्षकाखाली बातमी आलेली आहे. सभापती महोदय, 'वासिंदमध्ये एम.आर.ज्वेलर्सवर दरोडा' या शीर्षकाखाली बातमी आलेली आहे. सभापती महोदय, 'सफाळ्यातील दरोड्यात तीन लाखांचा ऐवज लंपास' या शीर्षकाखाली पालघरची बातमी आलेली आहे. सभापती महोदय, 'दरोडा घालणारी टोळी जेरबंद' या शीर्षकाखाली खडकवासल्याची बातमी आलेली आहे. सभापती महोदय, अशा घटनांनी संपूर्ण महाराष्ट्र कसा व्यापला आहे ते मी सांगत आहे.

श्री. राम पंडागळे : या सर्व बातम्या सामना दैनिकातील आहेत.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी कृपया खाली बसावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, वाईट एवढेच वाटते की, सन्माननीय सदस्य ज्या सत्तेमध्ये बसले आहेत त्यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रभर चोऱ्या आणि दरोडे पडत आहेत आणि त्याबद्दल

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. दिवाकर रावते ....

आपल्याला चिंता वाटली म्हणून आपण त्यांचे प्रमुख आहात काय ? सन्माननीय सदस्यांचे काय म्हणणे आहे ? तुम्हाला काय म्हणावयाचे आहे ? आम्ही या ठिकाणी गृह खात्याचे धिंडवडे काढत असताना तुम्हाला काय सांगावयाचे आहे ? सन्माननीय सदस्यांची बोलण्याची ही पध्दत नाही. तुम्ही दरोड्यांचे समर्थन करीत आहात काय ?

( सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, मला एका गोष्टीचा खुलासा करावयाचा आहे.

श्री. दिवाकर रावते : दैनिक सामनामध्ये हे सर्व येते हे तुम्ही समजून घ्या. जर दैनिक सामना असत्य छापत असेल तर आपण कोर्टात जा आणि कारवाई करा.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या आवडत्या प्रहार वर्तमानपत्रात 'खोपोलीमध्ये दरोडेखोरांची दहशत' या शीर्षकाखाली बातमी आलेली आहे. मुंबई सकाळमध्ये पनवेलमधील दरोड्याची बातमी आलेली आहे. सभापती महोदय, पुढारी दैनिकात 'धुळ्यात 20 लाखाचा दरोडा' या शीर्षकाखाली बातमी आलेली आहे.

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी कृपया खाली बसावे. आपल्याला ज्या वेळी बोलण्याची संधी मिळेल त्या वेळी आपण बोलावे. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर, कृपया आपण खाली बसावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षातील जे सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत आहेत ते सगळे दरोडेखोर आहेत का ? सामना दैनिकामध्ये ज्या बातम्या येतात त्या सत्य बातम्या असतात. सामना दैनिकात असत्य बातम्या नसतात. उलट जोरदारपणे या सरकारची तसेच दरोड्यातील अंडीपिल्ली बाहेर काढतो ते सन्माननीय सदस्यांना सहन होत नाही.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मला एवढेच म्हणावयाचे आहे की, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब वर्तमानपत्रातून जे काही वाचून दाखवत होते...

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : मी अजून ते वाचले नाही. मी फक्त मथळे वाचलेत.

श्री. विनायक मेटे : मी माननीय सभापती महोदयांशी बोलत आहे. आपण एवढे गरम कशासाठी होता ? सन्माननीय सदस्य जे बोलले त्यावर सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांना काही हरकत घ्यावयाची होती. ती हरकत घेत असताना आपण सभापती म्हणून जो काही निर्णय द्यावयाचा असेल तो आपला अधिकार आहे. पण त्याबाबत सन्माननीय सदस्यांना एवढ्या मिरच्या झोंबण्याचे काय कारण आहे ? एवढे अंगावर कशासाठी यावयाचे ? सन्माननीय सदस्यांना हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्याचा अधिकार आहे. त्यांची मुस्कटदाबी करण्याची काय गरज आहे ? त्यांना त्यांची हरकत मांडू दिली नाही, हे बरोबर नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना त्याबाबत समज दिली पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ज्याने त्याने आपापल्या बुध्दीप्रमाणे वागावे. अचेत बालकाने या सभागृहामध्ये काय बोलावे ?

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी कृपया खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मला उद्देशून भाषण करावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला अचेत बालकापासून संरक्षण द्यावे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी काहीही कॉमेन्ट्स केलेले चालतात.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला बोलण्यासाठी वेळ कमी आहे पण सन्माननीय सदस्यांनी माझी दहा मिनिटे घालविलेली आहेत. आपण वेळ कमी दिल्यामुळे महाराष्ट्रव्यापी अनेक वर्तमानपत्रातून या शासनाच्या सुरक्षिततेबाबत आणि जनतेमध्ये निर्माण झालेल्या वातावरणासंदर्भात ज्या बातम्या आलेल्या आहेत त्यांची मी फक्त शीर्षके वाचतो. कारण वेळ कमी आहे. मी वर्तमानपत्र वाचत नाही. ते वाचले तर आणखी कपडे उतरतील. सभापती महोदय, मी आतापर्यंत घरफोड्यांच्या बाबतीत आलेल्या बातम्यांची शीर्षके वाचली. आता मी दरोड्यांच्या बाबतीत आलेल्या बातम्यांची शीर्षके वाचतो. सभापती महोदय, सकाळमध्ये आलेले आहे की,'दरोड्यात घर मालकाची

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

हत्या.' सभापती महोदय, पुढारीमध्ये आलेले आहे की,'चिखले ग्रामस्थांवर गुन्हे दाखल करु नका.' सभापती महोदय, 'घरफोड्या रोखण्यासाठी पोलिसांचा पुराना फंडा चालू' अशी एक बातमी आलेली आहे. पुराना फंडा म्हणजे हप्ते घेणे. सभापती महोदय, 'पनवेलमध्ये दरोडा' याबाबतची एक बातमी आलेली आहे. 'पळस्पे येथे दरोडा' या बाबतची बातमी प्रहारमध्ये आलेली आहे. सभापती महोदय, 'एकाच बिल्डिंगमध्ये चार फ्लॅट फोडले' अशी एक बातमी आलेली आहे. सभापती महोदय, 'कुऱ्हाडीचे घाव घालून दोघांची हत्या, पनवेलजवळ दरोडा, पळस्पे गावात दरोडाखोरांचा धुमाकूळ' या बाबतची बातमी सकाळ दैनिकात आलेली आहे. नवाकाळमध्ये 'दीड महिन्यात 22 घरफोड्या, लोक पिकनिकला गेले असताना 22 घरफोड्या' अशी बातमी आलेली आहे. 'दरोडेखोरांना रोखण्यासाठी पनवेलकरांचा खडा पहारा तरीही घरफोड्या चालूच आहेत' अशी बातमी सामना दैनिकात आलेली आहे.

सभापती महोदय, या संपूर्ण महाराष्ट्रामध्ये घरफोड्या आणि दरोडयांनी वातावरण व्यापले आहे हे सांगण्याचा मी प्रयत्न केला. त्यामध्ये जर आमच्या सन्माननीय सदस्यांना वाईट वाटले असेल तर मी त्यांच्या माहितीकरिता एवढेच सांगतो की, आज माननीय गृह राज्यमंत्र्यांनी या सभागृहात एक निवेदन वाचून दाखविले.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य बोलत आहेत त्याबद्दल मला काही बोलावयाचे नाही. आपण या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करताना सुरुवातीला सांगितले होते की, विरोधी पक्षाला 1 तास वेळ द्यावयाचा आणि सत्ताधारी पक्षाला 1 तासाचा वेळ द्यावयाचा आणि बाकीचा वेळ उत्तरासाठी द्यावयाचा. आपल्याला 1 तास नव्हे तर 2 तास वेळ देऊ द्या त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. आमचा प्रश्न एवढाच आहे की, 1 तास होऊन गेलेला आहे. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना जेवढा वेळ दिलेला आहे तेवढा वेळ आपण आम्हाला वाढवून दिला पाहिजे एवढीच आमची विनंती आहे. त्यानुसार आपण निर्णय घ्यावा.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी दहा मिनिटे सन्माननीय सदस्यांनी घेतलेली आहेत. ती दहा मिनिटे त्यांच्या वेळेतून वजा करावी. त्यांच्या वेळेतून ही दहा मिनिटे वजा होतात की नाही हे आम्ही बघणार आहोत. सभापती महोदय, माननीय गृह राज्यमंत्र्यांनी या ठिकाणी निवेदन केले आणि जहाज कसे आले ते सांगितले. लोकसत्ता वर्तमानपत्राने तुमच्या सुरक्षिततेचा सर्व चेहरामोहराच बिघडवून टाकलेला आहे. मी त्यावर जास्त काही बोलणार नाही. सभापती महोदय, सांगलीमध्ये दुधाची भेसळ झाली. जवळजवळ 5 ते 6 लाख लिटर भेसळीचे दूध होते. नुसते दुधात पाणी ओतले अशी भेसळ नाही तर कृत्रिमरित्या बनविलेले रासायनिक दूध रोज सांगलीतून 5 लाख लिटर जात हाते. माननीय गृह मंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी नागपूरला रासायनिक दूध कसे बनते याचे प्रात्यक्षिक दाखविले. सर्व टी.व्ही. वाहिन्यांचे कॅमेरे आणि पत्रकारांना बोलविले आणि रासायनिक दूध कसे बनते ते दाखविले. परंतु रासायनिक दूध बनविणाऱ्या सांगलीतील कोणालाही अजूनपर्यंत अटक झालेली नाही. त्यांच्यावर गुन्हे दाखल झालेले नाहीत. रासायनिक दूध कसे बनवितात हे माननीय गृह मंत्री कौतुकाने सांगतात. तेल माफिया, वाळू माफिया, भूखंड माफिया, फायनान्स माफिया अशा माफियांचे राज्य या महाराष्ट्रामध्ये चालू आहे. या ठिकाण्ी आम्ही बड्या बड्या बाता ऐकतो परंतु एकाच्याही मुसक्या अजून आवळल्याची आम्हाला माहिती नाही. असेल तर सांगावी. आजही दूरदर्शच्या विविध वाहिन्यांवर वाळू माफियावर किमान एक तरी बातमी दाखविलीच जाते. अशा प्रकारे या महाराष्ट्रामध्ये वाळू माफियांबाबत परिस्थिती आहे. त्याबाबत काय केले ?

सभापती महोदय, बारबालाच्या संदर्भात सांगू इच्छितो. त्याबाबत माननीय गृह मंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी किती कौतुक करुन घेतले. चार दिवसांपूर्वी या मुंबईतील बारमध्ये तुमच्या पोलिसांना त्या बारबालांनी आणि त्या हॉटेलवाल्यांनी हॉकी स्टीकने मारमार मारले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

मुंबईतील बारबालांसंबंधी पोलिसांची ही परिस्थिती आहे. हे पोलीस संरक्षण आहे ? माननीय विरोधी पक्ष नेते यांनी बांगलादेशीय, पाकिस्तानी घुसखोराबद्दल मत मांडले असल्यामुळे मी त्यावर बोलणार नाही. परंतु तो विषय सुध्दा गंभीर आहे.

या ठिकाणी रेव्ह पार्टी संबंधीचा विषय मांडला आहे. हे सर्व ड्रग्ज कोठून, कसे व का आणले जातात ? यामध्ये पोलीस खात्याचे पोलीसच सामील असतात. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी परवा तर सभागृहात दारुची पार्टी करणाऱ्या पोलिसांचा फोटोच मंत्री महोदयांकडे दिला होता. त्यांच्यावर शासनाने कारवाई केली आहे काय, हे आम्हाला कळले पाहिजे. गुन्ह्यांचा तपास लागण्याची टक्केवारी केवळ 8 टक्के आहे, संपूर्ण देशामध्ये ही टक्केवारी कमी आहे. याचा अर्थ काय, तर तुमचे पोलीस हप्ते खाण्यामध्ये मश्गुल असतात. ते गुन्हेगारांना पकडतात परंतु त्यांच्याविरुध्द आरोपपत्र मुदतीमध्ये दाखल न केल्यामुळे हे सर्व आरोपी न्यायालयात सुटतात. 20 हजार आरोपी सुटलेले आहेत, त्यापैकी केवळ 1500 आरोपी सापडले आहेत. बाकीचे कोठे गेले ते माहीत नाही. ही आकडेवारी वाचल्यानंतर मंत्री महोदयांना काही वाटते की नाही ? हे आरोपी राज्यात सर्वत्र हैदोस घालत आहेत. परंतु हे शासन हतबल आहे. हे आरोपी कोठे गेले ? न्यायालयात निर्णय लागत नसेल, त्या प्रकरणांचा शोध घेतल्यानंतर जर मोठ्या प्रमाणात आरोपी सुटत असतील तर त्याची जबाबदारी कोणावर का टाकली जात नाही, या अधिकाऱ्यांना विभागाकडून गडगंज पगार दिला जातो त्या अधिका-यांना शासन जाब का विचारत नाही ? इतक्या मोठ्या प्रमाणात आरोपी सुटतात कसे, तुमच्या तपासामध्ये, पुरावे जमा करण्यामध्ये त्रुटी असल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात चिंताग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, पोलीस विभागातील महिला पोलिसांसंबंधी वर्तमानपत्रातून वारंवार बातम्या येत असतात. काही दिवसापूर्वी कोल्हापूर येथील पोलीस प्रशिक्षण केंद्राची बातमी आली होती. त्याच्यावर विस्ताराने बोलता येईल. परंतु मुंबईच्या पोलीस आयुक्तांसंबंधी वर्तमानपत्रात एक बातमी आली आहे. महिला पोलिसांना श्री.पटनायक यांनी आदेश दिले आहेत. ते कधी कधी विनोद

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करीत फिरत असतात, शेर शायरी करीत फिरत असतात, कधी हॉकी स्टीक घेऊन फिरत असतात, त्यांचे काय काय प्रकार चालू असतात. पहारा करुन थकलेले पोलीस असतात. महिला पोलिसांच्या बाबतीत अतिशय वाईट व पोलीस खात्याला काळिमा फासणारे त्यांनी आदेश काढले आहेत. त्या आदेशात असे म्हटले आहे की, पोलीस अधिकाऱ्याने एकट्या महिला पोलिसाला बोलविले तर जाऊ नये. तशीच गरज पडली तर महिला पोलिसांना बरोबर घेऊन जावे. यावरुन कामावर असलेले आमचे पोलीस कधी त्या महिलेची वाट लावतील हे सांगता येत नाही असा त्या आदेशाचा अर्थ होतो की नाही ? पोलीस विभागातील पोलीस असे आहेत का, एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने महिला पोलिसाला रात्री बोलविले तर या खात्यातील महिला पोलीस सुध्दा सुरक्षित नाही. असे जर असेल तर या राज्यात दरवाजात पोलीस आल्यानंतर त्यांना कोण उभे करणार, अशा परिस्थितीत पोलीस स्टेशनमध्ये कोण जाईल ? पोलीस दलातील मानसिकता पूर्ण खराब झाल्याचे व सक्षमता संपल्याचे निदर्शनास येत आहे. दरोडे, घरफोडीचे प्रकार वाढलेले आहेत. खुनाचे प्रकार वाढले आहेत, ते ज्या पध्दतीने होत आहेत ते भयंकर आहेत. खुनात अडकलेले आरोपी जामिनावर सुटत आहेत. पुरावे सिध्द होत नाहीत.

सभापती महोदय, पोलिसांच्या कार्यक्षमतेचे मी उदाहरण देतो. अमरावतीहून मला काल समन्स आलेला आहे. 2002 साली अमरावती येथे माझा मोबाईल चोरीला गेला होता. त्यासंबंधी मी तक्रार केली होती. मला वाटले की, त्यांनी शोधला असेल. आज आपण 2011 मध्ये आहोत. मला त्यांनी अमरावती येथे अमूक तारखेला कोर्टात साक्षीदार म्हणून बोलविले आहे. साध्या मोबाईल चोरीच्या प्रकरणाचा शोध 8-8 वर्षे लागत लागत नाही. मग हे पोलीस गुन्ह्यांचा शोध लावतात, काय करतात हे पोलीस ? मध्यंतरी मला धमक्या आल्या होत्या. ते प्रकरण सांगत असताना मला वाईट वाटते. अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला आहे. 501 हा फोन नंबर कोणाचा आहे हे मला माहीत नाही. मला लागोपाठ 4 वेळा फोनवरुन धमकी आली होती. मी या सभागृहात सांगितले होते की, मला धमकी का दिली जात आहे असा प्रश्न पडलेला आहे. धमकीला मी घाबरत नाही. परंतु माझ्या हातून काय घडले आहे ते मला कळणे आवश्यक आहे. त्याचा शोध घेण्याची मी विनंती केली होती. त्याबाबत मला माहिती मिळाली आहे की, त्यासंबंधी

3....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. अशा प्रकरणांची पोलिसांनी दखल घ्यायची नाही. येथे येऊन काहीही बोला, आम्ही दखल घेणार नाही. मग आम्ही कोणत्या पध्दतीने सांगावयाचे ?

सभापती महोदय, त्या स्पोर्टसमध्ये मुलगा आणि त्याचे वडील हे दोघेही कायम तेथेच असतात. मधल्या थोड्या काळासाठी जातात आणि वशिला लावून पुन्हा तेथेच येतात. असे तेथे सध्या काय ठेवले आहे, गृह खात्यामध्ये असलेल्या एका अधिकाऱ्यांचे भाऊ स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये आहेत. तो पोलीस साधा हवालदार, पीआय, पीएसआय ते एसीपीपर्यंतच्या बढत्या घेऊन कायम तेथेच नोकरीला आहे. ते किती वर्षे आहेत ते माहीत नाही. अशा वेळी या खात्याची कार्यक्षमता कशी वाढविणार, हे पोलीस दादागिरीची भाषा करतात, आमदारांना सुध्दा असे बोलतात की, माझा तेथे बाप बसला आहे त्यामुळे माझे कोणीही वाकडे करु शकत नाही. त्यांच्यात ही घमेंड आली आहे, पोलीस म्हणजे शिस्त पाहिजे, विभागात शिस्त पाहिजे. कायद्याच्या बाबतीत बापाला बाप म्हणत नाही तो पोलीस असतो. परंतु येथे तर सर्वांनाच खाऊन टाकून आपणच जिंकाण्याचा प्रकार सुरु आहे. म्हणून अत्यंत खेदाने असे म्हणेन की, संपूर्ण पोलीस यंत्रणा उद्ध्वस्त झालेली आहे. त्याला या खात्याचे मंत्री जबाबदार आहेत काय तर नैतिकदृष्टया ते जबाबदार आहेत. खालचे अधिकारी ही शिस्त बिघडवित असतील तर विभागाचे निश्चित नियोजन काय आहे ते आम्हाला कळले पाहिजे. लोकांमध्ये त्यांच्याविषयी केवळ धाक निर्माण होता कामा नये. पोलिसांमुळे लोकांना सुरक्षितता वाटली पाहिजे, लोकांना पोलिसांमुळे असुरक्षितता वाटत आहे, असे पोलीस खात्याचे चित्र उभे राहिलेले आहे. पोलीस ज्या पध्दतीने वागतात, बोलतात त्यामुळे मला तर अजिबात पोलीस स्टेशनमध्ये जाण्यास आवडत नाही. त्यांच्यामध्ये गँगवॉर आहे, जातीयवाद आहे, एकमेकाबद्दल दुस्वास आहे. या सगळया परिस्थितीत सुधारणा होण्यासाठी पोलीस खाते प्रथम सुधारले पाहिजे तरच गुन्ह्यांवर नियंत्रण येईल. अन्यथा कधीही गुन्ह्यांवर नियंत्रण येणे शक्य नाही. ज्या मुंबईत बारबाला पोलिसांना पिटतात त्या पोलिसांचे मी आणखी काय धिंडवडे काढावेत ? सभापती महोदय, माझा राहिलेला वेळ सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना द्यावा, अशी विनंती करतो आणि येथेच थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-----

4.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्री.मोहन जोशी )** : सन्माननीय सदस्यांच्या मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आता 3 वाजून 47 मिनिटे झालेली आहेत. या नंतर एका तासाने म्हणजे सायंकाळी 4 वाजून 47 मिनिटांनी मंत्री महोदयांच्या उत्तरासहित ही चर्चा आपल्याला संपवावयाची आहे. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी एक तासाच्या आत आपली भाषणे पूर्ण करावीत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या चर्चेला सुरुवात करीत असताना आपण असे जाहीर केले होते की, शिवसेना पक्षाचे 3 आणि भारतीय जनता पक्षाचे 3 तसेच सत्तारुढ पक्षातील प्रत्येकी 3-3 सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी दिली जाईल.

**तालिका सभापती** : नियम समितीमध्ये जे काही ठरले होते त्या नुसार मी बोलत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : काल रात्री 10.30 पर्यंत सभागृहाची बैठक चालू होती.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नियम समितीमध्ये हा विषय आला होता त्यावेळी माननीय सभापतींनी असे सांगितले होते मी एखाद्या विषयावरील चर्चेला अनुमती दिल्यानंतर त्या विषयाची चर्चा अनेक तास चालते. प्रत्येक चर्चेच्या वेळी मर्यादित सदस्यांनी बोलावे. बोलण्यासाठी बंधन ठेवू नये. मर्यादित सदस्यांमध्ये जेवढी चर्चा चालू ठेवावयाची आहे तेवढी चालू द्यावी. त्यामुळे प्रत्येक पक्षाचे त्या त्या विषयावर वेगवेगळे सदस्य आपले भाषण करतील. म्हणून अडीच तासाचे बंधन घालू नये, असे मी म्हटले होते. याबाबतची टिप्पणी पाहिली तर ते आपल्याला दिसून येईल. तरी सुध्दा शक्यतो आपण अडीच तासात चर्चा संपण्याचा प्रयत्न करीत असतो.

**तालिका सभापती** : विधिमंडळ कार्यालयाकडून जे परिपत्रक आले होते ते मी वाचून दाखविले. तसेच त्या दिवशी माननीय सभापतींनी या संबंधी आदेशही दिलेला होता. सन्माननीय सदस्यांच्या भाषणांसाठी 2 तास व मंत्री महोदयांच्या उत्तरासाठी अर्धा तास वेळ निश्चित केलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : विरोधी पक्षातर्फे हा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. त्यामुळे आम्हाला आपण बोलू देणार नाही काय ?

श्री.विनोद तावडे : सभागृहाची वेळ संध्याकाळी 6 वाजेपर्यंत ठरविलेली असताना काल रात्री 10.30 पर्यंत सभागृह का चालविले ?

यानंतर श्री.शिगम....

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदयांनी काल सांगितले की, या प्रस्तावावर शिवसेना पक्षाचे तीन सदस्य, भारतीय जनता पक्षाचे 3 सदस्य आणि सत्ताधारी पक्षातील चार-चार सदस्य बोलतील. विरोधी पक्षनेत्याला आपण 5 मिनिटामध्ये खाली बसविणार आहात काय ? विरोधी पक्षाचा हा प्रस्ताव आहे. विरोधी पक्षाच्या सदस्यांना बोलता आले नाही तर त्यांच्यावर अन्याय होईल. तेव्हा शिवसेना पक्षाच्या 3, भारतीय जनता पक्षाच्या 3 आणि विरोधी पक्षातील आणखी 2 सदस्यांना या प्रस्तावावर बोलण्याची संधी मिळाली पाहिजे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी वेळेचे बंधन देखील पाळले पाहिजे. मी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना आणि दोन सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी देतो. बोलणा-या दोन सन्माननीय सदस्यांची नावे आपण माझ्याकडे द्यावीत. मी दोन सन्माननीय सदस्यांना 5-5 मिनिटे वेळ वाढवून देतो आणि तेवढा वेळ मी सत्ताधारी पक्षाला दिलेल्या वेळेतून कमी करतो.

(विरोधी तसेच सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, आपण दिलेला निर्णय मान्य आहे. त्या बद्दल मी काही बोलत नाही. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते सभागृहामध्ये उपस्थित नव्हते. ते बाहेर गेले होते त्यावेळी आमचे गटनेते बोलणार नाहीत असे सांगण्यात आले. आता त्यांनी भाषण केले. अशा प्रकारे चर्चा वाढत जाणे बरोबर नाही. तसेच सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे हे ज्या पध्दतीने बोलतात ती त्यांची पध्दत बरोबर नाही. सभापती महोदय, आपला अवमान होईल अशा पध्दतीने ते बोलतात. त्यांना समज द्यावी.

**तालिका सभापती** : विरोधी पक्षाकडून बोलणा-या दोन सन्माननीय सदस्यांची नावे माझ्याकडे द्यावीत.

श्री. पांडुरंग फुंडकर : आपण आमच्यावर असा अन्याय करु नये. या सभागृहामध्ये आम्हाला लक्षवेधी सूचनेवर प्रश्न विचारता येत नसतील, नियम 93च्या सूचनेवर प्रश्न विचारता येत नसतील तर आम्ही कशासाठी येथे यावयाचे ? सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळत नसेल तर ते योग्य नाही. चर्चेसाठी वेळ वाढवून द्यावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावासाठी अडीच तासाची वेळ असते. विरोधी पक्षाकडून 6 आणि सत्ताधारी पक्षाकडून 8 सन्माननीय सदस्य बोलणार आहेत. मंत्र्यांच्या उत्तरासाठी 30 मिनिटे ठेवलेली आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्र्यांच्या उत्तरासाठी 30 मिनिटे वेळ दिलेला आहे. तर मग विरोधी पक्ष नेत्याला देखील बोलण्यासाठी खास वेळ दिला पाहिजे. 5 मिनिटामध्ये काय बोलणार ?

**तालिका सभापती** : या प्रस्तावावर बोलण्यासाठी दोन सदस्यांची नावे आपण मला द्यावीत. त्यांना 5-5 मिनिटांमध्ये भाषण संपवावे लागेल.

--

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, महाराष्ट्रात वाढत असलेले गुन्हेगारीचे प्रमाण या संदर्भात विरोधी पक्षाकडून आणलेल्या नियम 260च्या प्रस्तावावर माझ ो विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, आमचे विचार या विधानपरिषदेमध्ये मांडायला वेळ मिळणार नसेल तर या ठिकाणी येण्याचा काय मतलब ? अहमदनगर आणि अकोले जिल्ह्यामध्ये घडलेल्या घटनेबद्दल मी बोलत नाही. परंतु माननीय गृहमंत्र्यांच्या ही गोष्ट लक्षात आणून देते की, ज्या दिवशी त्या महिलांना अकोल्याच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले त्या दिवशी रात्री 10.00 वाजेपर्यन्त त्या महिलांकडे लक्ष दिले गेले नाही. तेथील डॉक्टरला एका आमदाराने विचारले की, रात्रीचे 10.00 वाजले तरी या महिलांना ट्रीटमेंट का दिली नाही, त्यांना नाशिकला का हलविले नाही. त्यावेळी त्या डॉक्टरने सांगितले की, त्यांना लोक बघायला येतात म्हणून त्यांना नाशिकला हलविले नाही. म्हणजे स्त्री ही भोगवस्तू म्हणून की शोभेची वस्तू म्हणून त्या महिलांना तेथे बसवून ठेवण्यात आले ? लोक बघायला येतात म्हणून तेथील डॉक्टरने त्या महिलांना बसवून ठेवले होते. रात्री 10.00 वाजेपर्यन्त त्यांना ॲम्ब्युलन्स दिलेली नव्हती. डिझेल नसल्यामुळे त्यांना रात्री 10.00 वाजता ॲम्ब्युलन्स मधून नाशिकला नेण्यात आले नाही. ही गरिबांची थट्टा नाही काय? त्या गरीब महिलांजवळ पैसे नव्हते. त्या महिलाच होत्या, एकही पुरुष त्यांच्या सोबत नव्हता. डिझेल भरण्यासाठी त्या प्राथमिक स्वास्थ्य केन्द्रामध्ये पैसे नव्हते काय ? अशा पध्दतीने तुम्ही महिलांची थट्टा करणार असाल तर ती अतिशय शरमेची बाब आहे. बलात्कार झालेल्या, मारहाण झालेल्या महिलांना लोक बघायला येतात म्हणून त्यांना तेथे बसवून ठेवण्याची ही कोणती पध्दत आहे ? अशा प्रकारे तुम्ही महिलांची थट्टा करणार असाल तर महिलांना तुम्ही काय न्याय देणार आहात ? कोणत्या क्षेत्रामध्ये आपण पुढे गेलो आहोत. पोलीस डिपार्टमेण्टचे प्रत्येक ठिकाणचे वाभाडे काढावे तितके थोडेच आहेत.

सभापती महोदय, 6 वर्षापूर्वी कळंबोली येथे भंगारामध्ये स्फोटके सापडली. त्यावेळी गृहमंत्र्यांनी या विधानपरिषदेमध्ये सांगितले की, ताबडतोब ती स्फोटके स्फोटक नाशक विभागाकडून नष्ट करण्यात येतील परंतु अजूनपर्यन्त एकही स्फोटक नष्ट झालेले नाही. अजूनही ती स्फोटके तेथे तशीच पडून आहेत. या सभागृहामध्ये आश्वासन देऊन स्फोटके नष्ट होत नसतील तर त्याचा कुठे तरी गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

..4..


श्रीमती शोभा फडणवीस...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, मघाशी रेव्हपार्टीबद्दल या ठिकाणी बोलले गेले. रेव्हपार्टीतील तरुणांवर गुन्हे दाखल होणे हे मी समजू शकते. परंतु त्या रेव्हपार्टीला स्वत: पोलीस ऑफिसर ड्रग्ज पोहोचवत असेल तर पोलीस खाते कुठेपर्यन्त गेलेले आहे याचा गांभीर्याने विचार करावा लागेल. रेव्ह पार्टीमध्ये पोलीसवाले येतात. त्या पार्टीमध्ये अंमली पदार्थ विरोधी शाखेतील वरिष्ठ अधिका-याचा हात असतो. ज्याने अंमलीपदार्थ पकडायला पाहिजेत असा अधिकारी जर अंमलीपदार्थ पुरवीत असेल तर या पोलीस खात्याचे आणखी किती वाभाडे काढायला पाहिजेत ? चेंबूरमध्ये एका पोलीस ऑफिसरने पार्टीमध्ये डान्स केला म्हणून त्याला निलंबित करण्यात आले. मग दबंग सिनेमामध्ये मुन्नी बदनाम हुअी या गाण्यावर पोलीस ऑफिसर नाचतानाचे जे दृश्य दाखविलेले आहे ते दृश्य आपण सेन्सॉर करु शकत नाही काय ? पिक्चर्सच्या माध्यमातून पोलिसांची किती तरी बदनामी केल्याचे दाखविले जात असते. जेथे चो-या होतात तेथे पोलिसवाले जाऊन नुसते उभे असतात असे दृश्य पिक्चरमध्ये दाखविले जाते, ज्या ठिकाणी मारपीट होत असते तेथे पालीस नुसता उभा असलेले दृश्य दाखविले जाते. अशा प्रकारे महाराष्ट्रातील पोलिसांची थट्टा पिक्चरच्या माध्यमातून सा-या हिंदुस्थानात दाखविली जात असेल तर महाराष्ट्रातील पोलिसांची काय इज्जत राहील ? पोलिसांच्या धाकामध्ये कोण राहील ? 16-19 वर्षाची मुले मुलींवर बलात्कार करतात ? ही कोणती मानसिकता आहे ? कोणत्या मानसिकतेने तरुण पिढी ग्रासली आहे ? पोलिसांची नैतिका घसरलेली आहे. राज्यकर्ते सुध्दा याकडे लक्ष देत नसतील तर न्याय कुणाकडे मागावा अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. या बाबतीत उत्तर काय मिळणार आहे ते माहीत आहे. परवा जे उत्तर दिले गेले तेच उत्तर आजही दिले जाईल.राज्यामध्ये इतके गुन्हे कमी झाले अशा प्रकारचे वर्षानुवर्षे दिले जाणारे उत्तर आजही दिले जाईल.

गुन्हे कमी होतात हे सांगण्यात येत असले तरी हे गुन्हे का होतात ? हे गुन्हे होऊच नये यासाठी आपण काय उपाययोजना करीत आहात ? पोलिसांना आपण नैतिकतेचे धडे देणार आहात की नाही ? 10 पोलिसांनी पाप केले असेल आणि 10 पोलीस चांगले निघत असतील तर तो प्रश्न नाही. जे 10 चांगले पोलीस असतील त्यांच्याकडे कोणी लक्ष देत नाही. पोलिसांनी महिलांवर बलात्कार करायचा, ट्रेनिंगसाठी आलेल्या मुलींवर बलात्कार करायचा, त्यांचे लैंगिक शोषण

..5..



श्रीमती शोभा फडणवीस...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करावयाचे ? आज या राज्यामध्ये महिला कुठेही सुरक्षित नाहीत याचा विचार होण्याची गरज आहे. महिलांची अशा पध्दतीने बदनामी होत असेल, त्यांना लुटण्याचे काम होत असेल तर ही बाब अतिशय गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे एवढे मी या ठिकाणी सांगते.

...नंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .....

त्याचबरोबर विरोधी पक्षाच्या सदस्यांना विधेयकावर बोलण्यावर बंदी आणली जाते, लक्षवेधी सूचनेवर प्रश्न विचारण्यासाठी वेळेचे बंधन घालण्यात येते मग आम्ही सभागृहात यावयाचे की नाही याचाही विचार करावा लागेल. अशा प्रकारे शासनाकडून प्रत्येक गोष्टीवर अडवणूक करण्यास सुरुवात झाली आहे. शासकीय विधेयके पास करुन घेण्यासाठी मात्र आम्हाला काल रात्री 10.30 वाजेपर्यंत बसविले. अशा प्रकारे विरोधी पक्षाला मुसक्या बांधून सभागृहात बसविले जात असेल, बोलण्यासाठी वेळ देत नसाल तर येथे बसायचे की नाही याचाही आम्हाला विचार करावा लागेल. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

--------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी कायदा व सुव्यवस्थेसंबंधी जो प्रस्ताव सभागृहात चर्चेसाठी आणला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, गेल्या दहा-अकरा वर्षात या सभागृहात याच विषयावर अनेक वेळा चर्चा झाल्या. त्या चर्चेला दिलेले उत्तर आजही तेच तेच मिळते ही दुर्दैवाची गोष्ट आहे. राज्यातील गुन्हेगारीचे प्रमाण आजही कमी झालेले नाही. साखळी चोरांपासून अतिरेकी बॉम्ब हल्ले असे अनेक गुन्हे राज्यात घडत आहेत. पोलिसांची संख्या मात्र 44 हजार झाली पण गुन्ह्यांचे प्रमाण कमी होऊ शकले नाही. उलट सायबर क्राईम नावाचा नवीनच गुन्हा या राज्यात आणखी ॲड झालेला आहे. राज्यात आजही स्त्रिया सुरक्षित नाहीत हे सुरुवातीलाच सांगितले आहे. तसेच तारीखवार दरोडे पडल्याच्या घटना देखील सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी निदर्शनास आणून दिल्या. दुर्दैवाने सांगावेसे वाटते की, या राज्यात अपंग स्त्रिया, गतिमंद व मतिमंद तसेच असहाय्यित स्त्रियांच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन जे लोक त्यांच्यावर अत्याचार करतात, बलात्कार करतात त्यांना कडक शासन होणे आवश्यक आहे. पण आपल्या कायद्यामध्ये अशी कडक शिक्षा होईल अशी कोणतीच तरतूद नाही. मध्यंतरी सुप्रीम कोर्टाने गतिमंद व मतिमंद मुलींवर बलात्कार होणे ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे व त्या गुन्ह्यासाठी शिक्षा काय असावी याचा उच्चार मला सभागृहात करवत नाही. न्यायालयाने या गुन्ह्यासाठी "कस्टरायझेशन" सारखी शिक्षा असावी असेही मत व्यक्त केले होते. या राज्यातील असहाय्य स्त्रिया, अपंग, गतिमंद व मतिमंद मुलींवर अत्याचाराच्या गुन्ह्यांचे प्रमाण पाहिले तर ती अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे.

महोदय, एका बाजूला राज्यातील मुलींचे प्रमाण हजारामागे कमी कमी होत चालले आहे व त्यामुळे सामाजिक असमतोल वाढीस लागत आहे, यासंदर्भात सुप्रीम कोर्टाने निदेश दिल्याप्रमाणे गांभीर्याने निर्णय घेण्याची गरज आहे, असे माझे वैयक्तिक मत आहे. सभागृहासमोर मला असेही निदर्शनास आणावयाचे आहे की, किती बलात्काराच्या केसेसमध्ये "इन कॅमेरा" चौकशी झाल्या आहेत याचाही अंतर्मुख होऊन विचार करण्याची वेळ आली आहे. यासंदर्भात उदाहरण देताना मी सांगणार आहे की, याबाबतीत आपल्याकडे सिरियलमध्ये काम करणाऱ्या शायनी आहुजा नावाच्या कलाकाराची केस होती. दुसरी एका मिल मालकाच्या मुलाची केस होती. या दोन्ही केसेसमध्ये

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .........

या मुलांनी बलात्कार केल्याचा आरोप होता. त्यापैकी मिल मालकाचा मुलगा मोकाट सुटला आणि शायनी आहुजाला मात्र शिक्षा झाली. मरीन ड्राईव्हला ड्रग्जच्या नशेत लोकांना चिरडणारी वकिलाची मुलगी सुटून गेली. अशा प्रकारे पोलीस विभागात अनेक लॅप्सेस असल्याने हे लोक सुटतात हा महत्वाचा भाग आहे.

महोदय, देशात साधारणपणे दर 34 मिनिटाला एक अतिप्रसंग होतो. महाराष्ट्र आणि मुंबईत दर सहा तासाला एक अतिप्रसंगाची केस होते. गेल्या दोन वर्षात साधारणपणे 20 हजार लोक बेपत्ता आहेत, त्यांचे काय झाले, त्यात मुलांचे प्रमाण जास्त आहे, स्त्रियांचे प्रमाण सुध्दा जास्त आहे, या स्त्रिया व मुलांना भीक मागण्यासाठी प्रवृत्त केले की काय, कारण अशा प्रकारच्या टोळ्या आजही मुंबईत कार्यरत आहेत, याबाबत खुलासा झाला पाहिजे. तसेच या टोळ्यांच्या बाबतीत शासन काय कारवाई करणार आहे याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. आज पोलीस दलात बॉम्ब स्क्वॉडमध्ये बॉम्बशोधक डॉग आपल्याकडे उपलब्ध नाही अशी माझी माहिती आहे. त्याचबरोबर हे बॉम्बशोध पथक सक्षम करणार की नाही, याचाही खुलासा करावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी गृह विभागासंबंधीची जी चर्चा उपस्थित केली आहे, त्यावर माझे विचार मी व्यक्त करणार आहे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, मी भाषण करीत असताना माझ्या भाषणातून "सामना" या दैनिकातील बातम्यांचा संदर्भ देत असताना सत्तारुढ पक्षातील काही सन्माननीय सदस्य त्यावर टीका-टिप्पणी करीत होते. त्या संदर्भात मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, "सामना" या दैनिकाच्या माध्यमातून सरकारच्या कामकाजावर, व्यवस्थेवर तसेच राज्यातील गुन्हेगारी व शासनाच्या प्रवृत्तीवर प्रकाश टाकला जातो, त्याचा मला सार्थ अभिमान वाटतो. तसेच हे सन्माननीय सदस्य इतर वर्तमान पत्रांच्या बाबतीत सुध्दा टीका करीत होते, हे योग्य नाही. आपण ही बाब संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

श्री. विनोद तावडे : महोदय, मुंबईत नुकतेच जे बॉम्बस्फोट झाले त्याबाबत मी पोलीस दलाला दोषी म्हणणार नाही पण शासनाचे यासंबंधीचे जे धोरण आहे त्याबाबत मला माझे विचार व्यक्त करावयाचे आहेत. कारण प्रत्यक्ष शासन चालविणारे राजकीय नेतृत्व व प्रशासनातील प्रमुख पोलीस अधिकारी यांच्या संबंधीची चर्चा करण्याची वेळ आली आहे. आज आपल्या राज्याचा गृह विभाग म्हणजे "पुढचे पाठ, मागचे सपाट" असा झालेला आहे म्हटले तरी चालेल. माननीय गृह मंत्र्यांचे डान्स बार बंद करण्याच्या संदर्भात बरेच नाव झाले, काम तात्कालिक स्वरुपाचे झाले असेल. पण आजही मुंबईतील डान्स बार चालू आहेत. काल परवाच असे डान्स बार चालू असल्याच्या सी.डी. बनवून खालच्या सभागृहात कदाचित दाखविल्या असतील. त्यात इंडियन ऑयडॉलशी संबंधित व्यक्तींचा उल्लेख झाला. तसेच बारच्या संदर्भात सांगावयाचे तर "बुलबुल", "घुंगरु", "नटराज" आणि "चाँदनी" सारखे बार काल रात्रभर चालू होते. त्यांचीच सी.डी. दाखविण्यात आली. म्हणूनच मी गृह विभागाचा कारभार "पुढचे पाठ आणि मागचे सपाट" असा असल्याचा उल्लेख केला.

मागील वेळेस अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री. यशवंत सोनावणे यांची तेल माफियांकडून हत्या झाली, त्याची चर्चा सभागृहात झाली. त्यावेळेस आम्ही मागणी केल्यानुसार गृह विभागाने कारवाई करण्यात येईल असे सांगितले होते. पण 100 कंटेनर, 20 लाख लिटर ऑईल संयुक्त अरबमधून आणले होते, त्यांचा विक्रांत नावाचा एजंट राज्यात होता. त्याला मंत्रिमंडळातील एका सदस्याचा पाठिंबा होता.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

सभागृहात प्रत्यक्ष सर्व मांडून सुध्दा त्यावर काहीही कारवाई होणार नसेल तर ते योग्य होणार नाही. ज्यावेळेस अशा प्रकारच्या घटना उघड केल्या जातात त्यावेळी ते व्यवस्थित केले जाईल असे सांगितले जाते परंतु पुन्हा "ये रे माझ्या मागल्या" या प्रमाणे पुढे काम केले जाते. टेस्ट ऑईल लुब्रीकंट प्रा. लि., रबाळे या कंपनीवर आपणच धाड घातली, आपणच गुन्हयांची नोंद केली, अटकही केली परंतु तीच माणसे तोच व्यवसाय आजपर्यंत सुध्दा चालवित आहेत हे कसे काय ? म्हणून माझे म्हणणे आहे की, पुढचे पाठ आणि मागचे सपाट असे काम शासनाकडून चालले आहे. सागरी व्यवस्थेच्या समितीमध्ये 250 लँडींग पॉईंट असून त्या ठिकाणी अद्ययावत व्यवस्था नाही अशी माहिती समोर आलेली आहे. सागरी व्यवस्थेसाठी इंधनाचा प्रश्न आहे, सागरी पोलीस आयुक्तालयाच्या घोषणा झाल्या परंतु प्रत्यक्षात कार्यान्वित काहीही झाले नाही. असे एक नाही तर अनेक विषय मांडता येतील.

सर्वात महत्वाचे म्हणजे ज्या पध्दतीने डान्स बारचा विषय निघाला आहे त्याच पध्दतीने सायबर क्राईम गुन्हयांचा उल्लेख आता होतो आहे. सहा वेबसाईटवरुन खुले आम वेश्या व्यवसाय सुरु असून याची माहिती सायबर क्राईमकडे दिलेली असून सुध्दा या वेबसाईट अजूनपर्यंत सुरु आहेत. www. mumbaifemaleescorts. com, www. mumbaiescortsforfun. com, www.rahulescorts.com, www. tenagegirlsescorts. com, www. chamdi. com , www. pinkparadise.modelsitegirls. com या सहा वेबसाईटवरुन फाईव्हस्टार हॉटेलचा व्यवसाय सुरु आहे. 10 दिवसांपूवी जीडब्ल्यू मेरिएटच्या सहाव्या माळयावर धाड टाकली तेव्हा त्यामध्ये असा एक अधिकारी सापडला की, त्याला सोडवायला आपलेच लोक उत्सुक होते त्यामुळे संबंधित व्यक्तीला सोडविण्यात आले. तो अधिकारी रिटायर्ड झाला, त्याने दुस-या राज्यात जाऊन निवडणूक लढवली या सर्व डिटेलमध्ये मी जात नाही. मुंबईमध्ये सर्व काही खुले आम होत आहे. परंतु आमचे गृहमंत्री घोषित करतात की, महाराष्ट्राच्या पोलिसांचा पगार देशात नंबर वन केला जाणार आहे. खरे म्हणजे आपल्या राज्यातील पोलिसांना जास्त पगार दिलाच पाहिजे या मताशी मी सुध्दा सहमत आहे. परंतु भ्रष्ट पोलिसांच्या यादीमध्ये महाराष्ट्राचा देशात पाचवा क्रमांक आहे याची आपल्याला कल्पना आहे काय ?

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

आयपीएस अधिकारी चर्चा करतात की, सोशल सर्व्हीस ब्रँचचे रिपोर्टींग अगोदर स्टेप बाय स्टेप व्हायचे ते आता डायरेक्ट कमिशनरांकडे जाते. यातील अधिकारी तिकडे गेल्यानंतर त्यांना डान्सबारमध्ये मार खावा लागला. डायरेक्ट रिपोर्टींगचे काय कारण आहे याचीही माहिती मिळाली पाहिजे. जेव्हा एखाद्या प्रकरणात खालच्या अधिका-यांची सीआयडी चौकशी सुरु असते व ज्यावेळेस ही चौकशी प्रमुख अधिका-यापर्यंत पोहचते तेव्हा त्याच वेळी फाईल बंद होते. अशा वेळी आपल्या राज्याचा भ्रष्टाचारामध्ये जो पाचवा क्रमांक आहे तो पहिल्या क्रमांकावर येण्यास वेळ लागणार नाही. जे वाईट आहे ते वाईट आहे व जो चांगला आहे चांगला आहे अशी भूमिका जोपर्यंत सरकार घेणार नाही तोपर्यंत काहीही होणार नाही. गृहमंत्री नेहमी बोलत असतात की, आता गुन्हेगार पोलिसांपेक्षा स्मार्ट झालेले आहेत. मला असे विचारावयाचे आहे की, गृहमंत्री स्मार्ट होणार आहेत की, नाही ? हा महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेचा प्रश्न आहे. गृहमंत्री स्मार्ट होणार असतील, गृहमंत्र्यांची अधिका-यांवर पकड बसणार असेल तर ख-या गुन्हेगारांना काही तरी अटकाव केला असे आपल्याला म्हणता येईल. त्यामुळे आपले गृहखाते स्मार्ट होणार आहे की, नाही हेच मला या चर्चेच्या निमित्ताने विचारावयाचे आहे. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी उपस्थित केला असून त्यावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते आपले भाषण संपवितांना असे म्हणाले होते की, पुढील अधिवेशनामध्ये कायदा व सुव्यवस्थेची चर्चा कशी होणार नाही हे गृहमंत्र्यांनी बघावे. मी सांगू इच्छितो की, मराठी, हिंदी किंवा इंग्रजी अशा कोणत्याही चित्रपटामध्ये राजकीय नेता व पोलीस अधिकारी असल्याशिवाय जसा चित्रपट पूर्ण होऊ शकत नाही तसे मला वाटते की, कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा केल्याशिवाय कोणतेही अधिवेशन पूर्ण होणार नाही. कायदा व सुव्यवस्थेवर आपण नेहमीच चर्चा करीत राहणार आहोत. कायदा व सुव्यवस्थेमध्ये फरक घडवीत असतांना पोलिसांचे चूक आहे की, बरोबर आहे आणि ते 100 टक्के बरोबर आहे असे मी म्हणणार नाही. परंतु काही अधिकारी चूक करतात म्हणून त्याची जबाबदारी संपूर्ण पोलीस दलावर सोपविणे हे काही बरोबर होणार नाही. बहुसंख्य पोलीस अधिकारी आणि पोलिसांनी निवृत्तीपर्यंत आपल्यावर कोणत्याही प्रकारचे लांछन येऊ दिलेले नाही, कोणताही आरोप येऊ दिलेला नाही अशा चांगल्या अधिका-यांना व पोलिसांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत असतो. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी गुन्हेगारी प्रवृत्ती वाढली आहे असे सांगितले आहे. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. आता गुन्हेगारी प्रवृत्ती वाढलेली आहे. मी तर असे म्हणेन की, सर्वच प्रकारचे गुन्हे वाढलेले आहेत. महिलांवरील, वृद्धांवरील,मुलांवरील गुन्हे वाढलेले आहेत, दरोडे, खून वाढलेले आहेत. अशा प्रकारे सर्वच गुन्हयांमध्ये वाढ झालेली आहे. परंतु गुन्हे का वाढले आहेत याची आपण कारणमीमांसा करणार आहोत की, नाही ?

सभागृहात चर्चा होत असतांना उपाय सुचविणे तसेच कायद्यामध्ये बदल करता येतील असे सुचविणे गरजेचे आहे. गुन्हयांचे प्रमाण वाढत आहे. गंभीर प्रकारचे गुन्हे घडत आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळेच गुन्हे घडत आहेत असे आपल्याला दिसून येईल. 25 वर्षापूर्वी जे पोलीसदल होते तेच आता सुध्दा आहे, शासन सुध्दा तेच आहे, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री सुध्दा तसेच आहेत. परंतु 25 वर्षापूवी आतासारखे क्राईम होते काय? हा महत्वाचा मुद्दा आहे. 25 वर्षापूर्वी रेव्ह पाटर्या होत होत्या काय ? यासाठी आपण विशेष

श्री. किरण पावसकर .....

अशा कायद्याची तरतूद केली काय ? 25 वर्षापूर्वी तरुणामध्ये रेव्ह पाटर्या प्रसिध्द झाल्या होत्या काय ? 25 वर्षापूर्वी सायबर क्राईम होता काय ? पूर्वी गाव-खेडयामध्ये महिलावर अत्याचार फार कमी प्रमाणात होत होते परंतु आता गाव-खेडयामध्ये सुध्दा महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढलेले आहे. कदाचित त्यावेळेचे संस्कार, कीर्तनाचे कार्यक्रम मंदिरात होत होते त्यामुळे अत्याचार होत नसतील. परंतु आता मेडीयामधून जे एक्सपोजर मिळते त्याचाही गुन्हे वाढीवर परिणाम होत असेल. 25 वर्षापूर्वी खंडणीसाठी मुलांचे अपहरण होत होते काय ? आंतकवाद आणि बॉम्बस्फोट 1993 च्या अगोदर ऐकिवात सुध्दा नव्हते. अशा पध्दतीने जे गुन्हे वाढलेले आहेत त्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी त्या पध्दतीचे तांत्रिक शिक्षण, आधुनिकीकरण पोलीस दलाला तेवढयाच पध्दतीने मिळणे गरजेचे आहे. सभागृहात भाषण करतांना आणि पोलिसांकडे एक बोट दाखवतांना उरलेली तीन बोटे आपल्याकडे येतात हे मात्र विरोधक विसरतात व हाताचे वरचे बोट देवाकडे आहे, मी खरे बोलतो की, खोटे बोलतो याचा विचार विरोधकांनी करण्याची आवश्यकता आहे. कर्जत येथे काल-परवा झालेल्या रेव्ह पार्टीमध्ये लोकप्रतिनिधींची मुले असल्यामुळे प्रसार माध्यमांनी राजकीय दबावापोटी एक-दोन मुलांची नावे वगळली होती. ज्यावेळेस रेव्ह पार्टीवर छापे घातले जातात तेव्हा त्यातून काही धक्कादायक माहिती बाहेर येऊ शकते. रेव्ह पाटीमध्ये सहभाग असल्यामुळे सामाजिक भावनेतून दादर येथे एका पथकाने पथनाट्य करण्याचा प्रयत्न केला असतांना एका पक्षाच्या तरुणांनी ...

श्री. राम पडांगळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी लोक प्रतिनिधींची मुले रेव्ह पाटर्यांमध्ये होती असा उल्लेख केलेला आहे. धक्कादायक माहिती सभागृहापुढे आलेली आहे. आमचीही मुले तरुण आहेत. रेव्ह पार्टीमध्ये कोणत्या लोकप्रतिनिधींची मुले होती याची माहिती सभागृहाच्या पटलावर येण्याची आवश्यकता आहे अशी मी आपल्या वतीने विनंती करतो.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, रेव्ह पार्टीमध्ये ज्या लोकप्रतिनिधींची मुले होते त्यांची नावे लिखित स्वरुपात सन्माननीय सदस्यांकडे पाठवून देतो. रेव्ह पार्टीच्या संदर्भात सामाजिक भावनेने एका पक्षाच्या तरुण कार्यकर्त्यांनी दादर येथे पथनाटय सादर करण्याचा प्रयत्न केला होता.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

भविष्यामध्ये अशी रेव्ह पार्टी होऊ नये, मुले व्यसनाधीन होऊ नयेत, शाळा-कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुलांनी शनिवारी कार्यकर्त्यांच्या हॉटेलमध्ये रेव्ह पार्टी करू नये ह्या भावनेतून एका पक्षाच्या तरूण युवकांनी दादरला पथनाट्य करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांना हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला. ही आपली सामाजिक बांधिलकी आहे काय ? नंतर मग आपण कोणाला जबाबदार धरतो तर पोलिसांना. ही कुठली पद्धत आहे. मी पण दोन चार चांगली पुस्तके वाचली आणि टिपण काढले तर नक्कीच कीर्तनकारासारखा बोलेन.

आज पर्यंत मुंबईत 1993 च्या आधी बॉम्बस्फोट झाले नाहीत असे म्हटले गेले. पण 1993 च्या आधी या मुंबईमध्ये जेवढ्या हत्या झालेल्या आहेत, त्यांचा रेकॉर्ड काढला की आपल्याला कळेल की, कुठला पक्ष किंवा कुठले राजकीय लोक त्या मागे आहेत. सामाजिक बांधिलकी ठेवून समाजात कसे वागावे, कसे बोलावे याचे भान ठेवणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे म्हणाले की, आता माफिया शब्द प्रचलित झाला आहे. सध्या वाळू माफिया, तेल माफिया, खाण माफिया असे शब्द प्रचलित झाले आहेत. पूर्वी स्मगलर्स होते. मोठ्या प्रमाणावर स्मगलिंग केले जात होते. त्यांना आपण माफिया म्हणत होतो. पण आता राजकीय पुढारी आपल्या भाषणामध्ये राजकीय पक्षाला, दुसरा पक्ष कसा चुकीचा आहे हे दाखविण्यासाठी माफिया या शब्दाचा आधार घेत आहेत. झटपट श्रीमंत होण्यासाठी जी स्पर्धा लागली आहे, त्या स्पर्धेतून जे निर्माण होतात त्यांना माफिया म्हणतो. मी तेल माफिया, खाण माफिया, वाळू माफिया यांना पाठीशी घालत नाही. ते चांगले आहेत असे म्हणत नाही. या माफियांना शिक्षा ही व्हायलाच हवी. नव्हे त्यांना कडक शिक्षा व्हायला पाहिजे.

मुंबई शहरात जेथे जागा आहेत, तेथे आपण छोटीशी झोपडी बांधायला गेलो तर तिकडचा नगरसेवक किंवा अधिकाऱ्याला बरोबर घेतल्याशिवाय झोपडी बांधता येत नाही. मुंबई आज झोपडपट्टयांच्या विळख्यात अडकलेली आहे. या झोपडपट्टयांच्या जागांवर डल्ला मारणारे कोण माफिया आहेत, कोणत्या पक्षाचे माफिया आहेत, त्यांना आपण भूमाफिया म्हणायचे काय ? याच सभागृहामध्ये मिठी नदीचा गाळ काढण्या विषयी बोललो आहोत. मिठी नदीचा गाळ काढण्यासाठी 500 कोटी, 600 कोटी, 1000 कोटी इतका खर्च आला आहे. त्यामुळे ज्यांनी गाळ काढला आहे

2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

त्यांना आपण गाळ माफिया म्हणणार आहात काय ? खड्डा माफिया तर मोठे आहेत. डोंबिवली-कल्याण येथील खड्डे बुजविण्यासाठी आपण दरवर्षी साडेसहा कोटी रूपये देत आहोत. मुंबईतील खड्डे बुजविण्यासाठी 800 रूपये दिले जातात. त्याच पद्धतीने काही आमदारांच्या निधीतून रस्त्यांच्या कामांसाठी जास्त निधी दिला जात आहे. मग त्यांना खड्डे माफिया म्हणणार काय ? नदीतील काढलेला गाळ, रस्त्यावरील गाळ हा कोणाच्या घरात नेऊन ठेवला जात आहे ? त्यांना कोणता माफिया म्हणणार आहात.

सायबर क्राईम ही नवीन पद्धत आहे. तशा प्रकारचे नवीन माफिया उघडकीस येत आहेत. एका गुन्हेगाराने चोरी केली तर त्याला आपण चोर म्हणतो. पैसे घेताना अधिकारी पकडला तर त्याला आपण लाचखोर म्हणतो. अशा पद्धतीने वेगवेगळ्या मार्गाने मग गाळातून असो, खड्डयातून असो जो पैसा घेतला जातो त्यांना आपण काहीच नाव देणार नाही काय, त्यांनी एवढे मोठे दरोडे टाकल्यावर देखील त्यांच्या विरूद्ध काहीच कारवाई करणार नाही काय ? त्यांच्यावर देखील ॲक्शन व्हायला पाहिजे. तरच त्याला कुठेतरी आळा बसू शकेल.

केवळ पोलिसांनाच टार्गेट करता कामा नये. कालच मला आमच्या एका मित्राने चांगली गोष्ट सांगितली. ती येथे सांगणे फार गरजेचे आहे असे मी समजतो. लंडन, अमेरिका, चायना हे विकसनशील देश आहेत. तेथील सर्व लोक सांगतात की, आम्ही क्राईम करायला घाबरतो. मग तो कुठलाही असो. कारण तेथील शिक्षा मोठी आहे. दुबईला ड्रग्जमध्ये एखादा आरोपी सापडला तर तो पुन्हा कधीच बाहेर येत नाही. आजही युएसए, युकेचे लोक म्हणतात आम्ही शिक्षेला घाबरतो. आपल्या देशात विचारले तर प्रत्येक गुन्हेगार हेच सांगेल की, मला पोलिसांची भीती वाटते. त्यांना शिक्षेची भीती वाटत नाही. याचाच अर्थ असा आहे की, आपल्या येथील असलेल्या कायद्यात बदल करून कठोर शिक्षेची तरतूद असणारा कायदा तयार केला पाहिजे. पोलिसांच्या आचरणामध्ये बदल करून गुन्हेगारी कमी होणार नाही. त्यासाठी कायद्यांमध्ये बदल करावा लागेल. त्या दिवशीच समाजामध्ये लोकम्हणायला लागतील की, होय आम्ही शिक्षेला घाबरतो. आज आपल्या येथे एखाद्या आरोपीला पकडल्यानंतर त्याची चार दिवसामध्ये सुटका होते. आता पर्यंत साडेनऊ ते दहा टक्के लोकांनाच शिक्षा झाली आहे. बाकीच्यांना शिक्षा झालेली नाही. एक अधिकारी लाच

.3



BGO/ ST/ AKN/ शरद 16:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घेतो म्हणून त्याचा दोष पूर्ण विभागाला देतो. ते चुकीचे आहे. म्हणूनच कठोर शासन होण्यासाठी कायद्यामध्ये बदल होण्याची गरज आहे.

आपल्याकडे धडाकेबाज अधिकारी आहेत. त्यांनी काम करताना धोका पत्करला आहे. पण त्यातील 75 टक्के अधिकारी हे कोणत्या-ना-कोणत्या प्रकरणांमध्ये अडकले असून आज तेच स्वत: तुरुंगात आहेत. त्यांच्या मागे आपण किती उभे राहणार आहोत ? मानवी हक्क आयोगाकडे एखादी केस गेली तर काय होऊ शकते हे मी सांगणार आहे. मी त्या केसचे नाव घेऊ इच्छित नाही. एका अल्पसंख्याक गुन्हेगारावर 7 खुनाचे आरोप होते. त्याची हत्या झाली म्हणून मानवी हक्क आयोगाने अधिकाऱ्यांना आतमध्ये टाकले. हत्येमध्ये जो मारला गेला त्याच्यावर 7 खुनाचे आरोप होते. अशा लोकांना खरोखरच जगण्याचा अधिकार आहे काय,असे मी सभागृहाला विचारू इच्छितो. आज आपण गुन्हेगारांविषयी भरपूर बोलतो. गुन्हे भरपूर होत आहेत. बलात्कार भरपूर होत आहेत. ते करणाऱ्यांना आपण कधी शिक्षा देणार आहात, त्यांना शिक्षा करणाऱ्या अधिकाऱ्यांना शिक्षा होणार असेल तर त्यांच्या पाठीशी हे सभागृह उभे राहणार आहे काय ?

मी मानवी हक्क आयोगाला विचारू इच्छितो की, बॉम्बस्फोटामध्ये जे निष्पाप मारले गेले आहेत त्यांच्यासाठी मानवी हक्क आयोग काही करणार आहे काय, आपण फक्त अधिकाऱ्यांवरच अंकुश उचलणार आहात काय ? त्यासाठी आपण काय करणार आहात ते सांगणे गरजेचे आहे. जे अधिकारी आतमध्ये गेले आहेत, त्यांच्यावर जी कारवाई झाली आहे, त्यांच्यासाठी शासनाने उत्तमरित्या प्रयत्न केले पाहिजेत असे मला वाटते.

मी येथे 2-3 सूचना करणार आहे. गुन्हेगारी कमी करण्यासाठी आपण मानसिकता बदलली पाहिजे. त्यासाठी विरोधकांनी बॉम्बस्फोट झाला म्हणून गृह मंत्री बदला, अमुक झाले गृहमंत्री बदला असे बोलून चालणार नाही. गृह मंत्री बदलल्यानंतर बॉम्बस्फोट होणार नाहीत याची हमी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे देणार आहेत काय ? हे आहेत म्हणून बॉम्बस्फोट होणार आहेत असे काही आहे काय ? मी सन्माननीय उप मुख्यमंत्री आणि सरकारचे आभार मानेन. माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांचे देखील आभार मानेन. उप मुख्यमंत्र्यांनी पोलीस दलासाठी लागणारा पैसा कुठेही कमी पडणार नाही असे जाहीर केले होते. त्यामुळे त्यांचे आभार

..4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मानू इच्छितो. खरे म्हणजे पोलीस दलाची परीक्षा तीन वर्षाने जेव्हा बदलीचा काळ येतो तेव्हा असते. यावेळी मोठ्या प्रमाणावर बदल्या झाल्या. पण कुठेही देवाणघेवाणीचा शब्द बाहेर चर्चेत आलेला नाही याचे खऱ्या अर्थाने श्रेय गृह विभागाल जाते. हे श्रेय पोलीस महासंचालक, माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील, माननीय गृह राज्य मंत्री श्री.सतेज पाटील यांना जाते. बदल्यांच्या वेळी देवाणघेवाणीचे प्रकार होतात असे ऐकिवात होते. पण मागच्या वर्षी असे ऐकिवात आले नाही. आमदार-खासदार पाच वर्षाने निवडणूक लढविताना आपली मालमत्ता जाहीर करतात, त्याप्रमाणे पोलीस दलातील अधिकाऱ्याला देखील प्रत्येक पाच वर्षानंतर आपल्या मालमत्ता जाहीर करणे अनिवार्य केले पहिजे.

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर...

त्यामुळे आम्हाला सुध्दा समजेल की, कुणाकडे किती मालमत्ता आहे. त्यामधून भ्रष्टाचाराचे आरोप होणार नाहीत.

मानवी हक्क आयोगाकडे जेवढया केसेस आहेत त्यांची एकदा उच्च स्तरीय चौकशी करण्यात येऊन त्या केसेसची शहानिशा करण्यात यावी. त्याच प्रमाणे पोलीस दलातील कर्मचाऱ्यांचे फिजिकल फिटनेस नसेल आणि त्यामुळे पोलिसांची प्रतिमा लोकांमध्ये डागाळत असेल तर त्यांना ऑफिस वर्क देण्यात यावे. एखादा पोलीस शिपाई रस्त्यावर डयुटी करीत असतांना मिडीयावाले त्या एका पोलिसाला चॅनेलवर दाखवून लोकांना ही पोलीस यंत्रणा कशी आहे हे दाखवीत असतात. राज्यातील पोलीस यंत्रणेमधील सर्वच पोलीस कर्मचारी तसे नसतात. त्यामुळे ज्यांच्याकडे फिजिकल फिटनेस नसेल तर त्यांना परत ऑफिसमध्ये पाठविले पाहिजे किंवा त्यांची साईड ऑफिसमध्ये नियुक्ती केली पाहिजे. त्याच प्रमाणे पोलिसांची भरती करीत असतांना लोकसंख्येच्या प्रमाणात तुलना करुन ती भरती करण्याचा दृष्टीकोन आपण स्वीकारला पाहिजे. मागील वेळी 200, 400 होते म्हणून आम्ही यावेळी 700, 800 नवीन पोलीस भरणार आहोत अशाप्रकारे वेगवेगळया आयुधांचा वापर करुन सन्माननीय विरोधी पक्षाच्या व ईकडील बाजूच्या सदस्यांनी अनेक वेळा प्रश्न उपस्थित केले आहेत. परंतु लोकसंख्येच्या तुलनेत ही भरती झाली पाहिजे असे मला सुचवावयाचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. आज गृह विभागाने उच्च न्यायालयामध्ये सादर केलेल्या प्रतिज्ञा पत्रामध्ये 26 हजार 882 जागा रिक्त असल्याचे म्हटले आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, त्याचप्रमाणे डयुटीवरील पोलिसांना बिलकूल सुट्टया मिळत नाहीत. शासनाने त्यांच्या घराच्या बाबतीत किंवा त्यांना आधुनिक यंत्रणा उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत विचार करीत असतांना त्यांना वेळच्या वेळी सुट्टया दिल्या पाहिजेत. त्याच प्रमाणे त्यांना आर्थिक मदत न करता त्यांना व त्यांच्या कुटुंबीयाना उत्तम प्रकारची वैद्यकीय मदत कशी मिळेल यासाठी प्रयत्न करावेत. त्याचप्रमाणे पोलिसांबद्दल जनतेमध्ये आदरयुक्त भीती असणे आवश्यक आहे याबद्दल दुमत नाही. विरोधकांनी केवळ विरोधाचे भाषण केले म्हणून नव्हे तर या राज्यामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे, लोकसंख्येचे प्रमाण वाढले आहे. या बाबत तुलनात्मकदृष्टया शासनाने ज्या उपाय योजना केल्या आहेत त्या आणखी मोठया प्रमाणात करुन जनतेला दिलासा देऊ शकतो असा आत्मविश्वास निर्माण करावा या करिता मी पुन्हा एकदा सन्माननीय गृहमंत्री व त्यांच्या गृह विभागाचे आभार मानून माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये गुन्हेगारीचे वाढत चाललेले प्रमाण चिंताजनक असल्यामुळे त्या बाबतीत तातडीने उपाय योजना करणे गरजेचे आहे. पूर्वी इंग्रजांच्या काळात काठीला सोने बांधून काशीला जावे असे म्हटले जात होते व त्या प्रमाणे माणसे निर्धास्तपणे जात होती. दुर्दैवाने आज तशी अवस्था राहिलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. या बाबतीत कुणालाही दोष देण्याचा प्रश्न नाही. परंतु त्या बाबतीत तातडीने काही उपाय योजना करणे गरजेचे आहे. सभापती महोदय, गुन्हेगारीच्या प्रकारामध्ये दरोडा घालण्याच्या कृत्याकडे मला सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील शेतकरी शेतीवर वस्ती करुन रहातात. अतिशय दुर्गम असलेल्या भागामध्ये हा शेतकरी वस्ती करुन रहात असतांना कष्ट करुन धान्य पिकवितो, जनतेच्या अन्नधान्याची सोय करतो परंतु त्याचे जीवन मात्र असुरक्षित राहिले आहे. सभापती महोदय, अहमदनगर व बीड या दोन जिल्ह्यांमध्ये पडलेल्या दरोडयांचे प्रमाण पाहिले तर त्या ठिकाणी अनेक वर्षापासून सातत्याने दरोडे पडत असल्याचे दिसून येते. त्या ठिकाणी अतिशय अमानुष पध्दतीने दरोडे घातले जातात. दरोडा घालतांना केवळ पैसे किंवा सोने, धन लुटून नेणे हाच उद्देश नसतो. या बाबतीत अलिकडेच वीरगावला झालेल्या घटनेकडे मी आपले लक्ष वेधतो. त्या गावामध्ये अतिशय गरीब असलेल्या शेतकऱ्याचे घर होते. त्या घरामध्ये फक्त एक पुरुष शेतकरी होता व बाकीच्या सर्व महिला त्या दहा x दहाच्या घरामध्ये रहात होते. त्या घरावर दरोडा घालतांना त्या लोकांकडून पैसे किंवा दागिन्यांची अपेक्षा दरोडेखोरांनी ठेवली नसावी. अतिशय अमानुष व क्रूर पध्दतीने तो दरोडा घालण्यात आला. समाजाला काळीमा फासायला लावणारे अत्याचार त्या ठिकाणी करण्यात आले होते.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. अतिशय गंभीर स्वरुपाच्या व महत्वाच्या विषयावर नियम 260 अन्वये ज्यांनी चर्चा उपस्थित केली आहे ते सन्माननीय विरोधी पक्षनेते आता सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की, त्यांना या चर्चेचे गांभीर्य आहे की नाही? त्यांची कायदा व सुव्यवस्थेवरील भाषणे ही केवळ आरोप-प्रत्यारोपांची आहेत. ती भाषणे योग्य आहेत की, त्यांना वाटणारी चिंता व काळजी योग्य आहे हे मला समजत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही. आमच्या बाजूला या प्रस्तावावर बोलण्यासाठी अनेक सन्माननीय सदस्य उपस्थित असल्यामुळे आपण याची नोंद घेऊन संबंधितांना समज देण्यात यावी अशी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे : सभापती महोदय, नगर आणि बीड जिल्ह्यांमध्ये गेल्या काही वर्षामध्ये दरोडयांचे प्रमाण वाढत चालले आहे त्यामुळे त्या ग्रामीण भागामध्ये राहणारा शेतकरी, गरीब जनता भयभीत झालेली आहे, त्यांना असुरक्षित वाटत आहे. या गोष्टीची आपण गंभीरपणे दखल घेतली पाहिजे. अडचणीच्या परिस्थितीत कष्टमय जीवन जगत असतांना त्यांना अशाप्रकारे असुरक्षितरित्या रहावे लागले तर ते निश्चितपणे शोभनीय नाही. या करिता सुरु असलेले दरोडयाचे सत्र थांबविण्यासाठी व तातडीने उपाय योजना करण्यासाठी एक विशेष मोहिम राबविली पाहिजे.

सभापती महोदय, इंग्रजांच्या काळामध्ये पेंढाऱ्यांनी धुमाकुळ घातला होता. इंग्रजांनी त्या पेंढाऱ्यांचा बंदोबस्त केला होता. आज आपण या दरोडेखोरांचा बंदोबस्त करु शकत नाही काय? मला या ठिकाणी विनंती करावयाची आहे की, त्या ठिकाणी क्षेत्रफळ मोठे असते त्या तुलनेत पोलीस संख्येने फार कमी असतात. हे जरी सत्य असले तरी त्या भागात ग्राम सुरक्षा दल स्थापन करण्याबाबत अनेक वेळा चर्चा ऐकत असलो तरी हे ग्राम सुरक्षा दल कुठेही प्रभावीपणे काम करीत असल्याचे आढळत नाही. त्या ग्राम सुरक्षा दलाला थोडेफार अधिकार देता येतील काय याबाबत गंभीरपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे आपल्याकडे होमगार्ड नावाची संघटना असून त्या संघटनेचा यामध्ये आपल्याला उपयोग करुन घेता येईल काय? त्यांच्यावर अनेक प्रकारचे ताण तणाव असतात, त्यांच्या काही अडचणी असतात याची आपल्याला कल्पना आहे. शहरामध्ये गणेशोत्सव सारखे मोठमोठे धार्मिक सण व उत्सव मोठया प्रमाणात साजरे केले जातात

श्री. राम पडांगळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी एक महत्वाचा मुद्दा उपस्थित केला की, त्यामध्ये आमदारांची मुले आहेत. या ठिकाणी शिवसेना पक्षाचे एकही आमदार उपस्थित नाहीत हे सर्व आमदार त्या बाबत शोध घेण्यासाठी गेले आहेत काय?

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे एका गंभीर विषयावरील महत्वाच्या चर्चेमध्ये सारखे सारखे उभे राहून बोलू नये असे मला आपणास सांगावयाचे आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामभाऊ पडांगळे हे अतिशय वरिष्ठ सदस्य आहेत. ते ज्या आमदारांच्या मुलाचा उल्लेख करीत आहेत त्या मागील वस्तुस्थिती आपण समजून घेतली पाहिजे. खरे असेल तर आमचे काहीही म्हणणे नव्हते. आपण फॅक्चुअल समजून घेऊन आरोप केले तर आमचे काहीही म्हणणे नाही....

श्री. हेमंत टकले : सन्माननीय सदस्यांनी आरोप केलेले नाहीत. समोरच्या बाजूकडील सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये येऊन बसावे अशी त्यांची इच्छा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, विधानसभेतील किंवा या सभागृहातील जे सन्माननीय सदस्य दोषी असतील तर त्यांच्यावर आपण जरुर टीका करावी. परंतु जर नसेल तर त्यांच्या कुटुंबीयाना राजकीय वैमनस्यासाठी या मध्ये ओढून त्यांच्यावर टीका करणे योग्य नाही. जर सत्य असेल तर आपण तो विषय सभागृहामध्ये उघड करतो. आम्ही देखील साहेबांचा विषय या ठिकाणी उपस्थित केला होता एवढेच मला सांगावयाचे आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, डान्स बारची मालकी त्यांच्या नातेवाईकांकडे आहे की नाही याचे उत्तर आपल्याला मिळेल.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, मला आपल्या माध्यमातून आदरणीय गृहमंत्री महोदयांना सांगावयाचे आहे की, खरोखरच हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे.ग्रामीण भागात जे दरोडे पडत आहेत,त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे.म्हणून यावरील उपाय योजनेच्या दृष्टीकोनातून सांगावयाचे तर मी ग्राम सुरक्षा दलाबाबत मुद्दा उपस्थित केला.त्या भागामध्ये रहाणारे जे तरुण आहेत,त्यांना संघटित करुन त्यांच्या माध्यमातून ग्राम सुरक्षा दल अधिक प्रभावी कसे करता येईल यादृष्टीने ठोस अशी उपाययोजना करावयास पाहिजे.त्याचप्रमाणे आपल्याला संरक्षणाची व्यवस्था करण्याच्या दृष्टीकोनातून होम गार्डचा उपयोग करता येईल काय? याचाही विचार व्हावयास पाहिजे.त्याचबरोबर ज्या वस्त्या असतात, एखाद्या ठिकाणी जाण्यासाठी ज्याप्रमाणे कमांडोना मोटर सायकल देण्यात येतात, त्याप्रमाणे संबंधितांना मोटर सायकल देता येतील. जेणेकरुन दरोडेखोरांच्या बाबतीत निरोप आला तर त्यांना तेथे ताबडतोब जाता येईल. मात्र बऱ्याच वेळेला दरोडेखोर आजूबाजूला जी घरे असतात, त्यांचे दरवाजे बाहेरुन बंद करतात जेणेकरुन या लोकांच्या मदतीला कोणी येऊ शकणार नाही. अशा परिस्थितीमुळे जर तेथील गरीब लोकांकडे मोबाईल दिला तर ते लोक कमांडोंना वॉर्निंग बेल देऊन संपर्क साधू शकतील. कारण त्याठिकाणी दरोड्यांचे सत्र वाढत आहे, ते थांबविणे अत्यंत गरजेचे आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, याठिकाणी राज्यातील वाढत्या गुन्हेगारीला कसे रोखता येईल याबाबत सदनामध्ये अनेक वेळा वेगवेगळया मुद्यांच्या अनुषंगाने चर्चा झालेली आहे. त्यादृष्टीने शासनाने निश्चितपणे उपाययोजना कराव्यात.मात्र खास करुन दरोड्याच्या बाबतीत अधिक प्रभावीपणे आणि लवकरात लवकर उपाययोजना करावी अशी या प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने माननीय गृह मंत्र्यांना विनंती करीत आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----

2 एफ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांनी एका अतिशय चांगल्या विषया-वरील प्रस्ताव सदनामध्ये चर्चेसाठी आणलेला आहे

सभापती महोदय, या ठरावामध्ये जे उल्लेख केले आहेत, त्याबाबत सांगावयाचे तर गेल्या काही दिवसामध्ये मुंबईमध्ये आणि महाराष्ट्रातील काही भागात जे प्रकार घडले, त्याचा संदर्भ देऊन एकूणच या चर्चेचा सूर असा झाला की, या राज्यातील संपूर्ण कायदा व सुव्यवस्था कोलमडून पडलेली आहे आणि आता या जनतेला कोणी वाली आहे की नाही ? असा त्या निमित्ताने एक फार मोठा गंभीर आशय व्यक्त करण्याचा हा प्रयत्न होता.

सभापती महोदय, एक गोष्ट खरी आहे की, आपल्याला वास्तवापासून फार लांब जाता येणार नाही. पण त्याबरोबर हे देखील नक्की आहे की, एखाद्या नदीच्या काठावर उभे राहून दुसऱ्यांनी कसे पोहले पाहिजे हे शिकविण्यापेक्षा, पाण्यामध्ये उतरलेल्या माणसांना पाण्याच्या प्रवाहाची, त्या जलाशयामध्ये असलेल्या प्राण्यांची आणि त्यापासून असलेल्या धोक्याची तसेच त्या जलाशयातील पाणी केव्हाही वेगळे रुप धारण करु शकेल या सर्व शक्यतांचा विचार करुन शिकवण दिली पाहिजे. मला एका गोष्टीचा खेद होतो. सन्माननीय सदस्य श्री.विनोदजी तावडे यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, महाराष्ट्राचे पोलीस खाते स्मार्ट होणार आहे की नाही? त्यामधून आपल्याला जे सुचवावयाचे होते आणि त्यामागे राज्याचे माननीय गृहमंत्री असतील, गृह राज्यमंत्री असतील, राज्य शासन असेल या सगळयांच्या बाबत अतिशय वेगळया पध्दतीचा उल्लेख या चर्चेच्या निमित्ताने झाला. सहाजिकच सत्तेच्या बाकावर बसलेल्या आमच्या सारख्या लोकांना अंतर्मुख होऊन विचार करण्याची वेळ येते की, खरोखरच अशी काही आपल्या माणसांची अवस्था आहे काय, मग पुढे असा विचार येतो.

सभापती महोदय, लोकशाहीमध्ये एक प्रसिध्द वाक्य आहे की, "People get the Government that they deserve." जसा समाज आहे, त्या समाजाची आता "लायकी किंवा नालायकी" असे प्रश्न निर्माण व्हावयाचे. पण पात्रतेप्रमाणे त्या समाजातूनच सत्ता तयार होत असते. एकीकडे हे वास्त असताना दुसरीकडे विदेशातील भरपूर दाखले दिले जातात.पण प्रगत समाजामध्ये त्यातील जे मूलभूत तत्व आहे, त्यानुसार पोलिसाची वर्दी घातली तरी त्याच्यामध्ये एक माणूसच असतो आणि जेव्हा आपण समाजामध्ये एकत्रपणे वावरतो,तेव्हा आपल्या अंगावर पोलिसाचा वेष नसला तरी सुध्दा आपण वृत्तीने पोलिसासारखे असले पाहिजे. जसे प्रत्येक वर्गात





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काही चुकीचे लोक आल्यामुळे प्रतिमा मलीन होण्याचा जो प्रकार असतो. त्याप्रमाणे काही चुकीच्या लोकांमुळे जर संपूर्ण त्या विभागाचीच बदनामी करण्याचे ठरविले तर आपल्याला त्यामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने मार्ग सापडत नाहीत. या सगळया गोष्टीमुळे, बदलत्या आर्थिक परिस्थितीमुळे, बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे गावातील लोकांचे शहरामध्ये येण्याचे प्रमाण वाढले आहे. गावोगावी दुष्काळाची परिस्थिती असल्याने, पाणी नसल्याने तेथील लोकांचे रोजगार बंद झाले. त्याच बरोबर समाजातील काही चुकीच्या प्रवृत्तींना प्रसार माध्यमातून आणि मनोरंजनाच्या माध्यमातून एक प्रकारचे वीरत्व प्राप्त करुन देण्याची जणूकाही स्पर्धा लागली. त्यामुळे सिनेमामध्ये दिसणारा पोलीस सहसा चांगला वागणारा नसतो. मग तो पोलिसाच्या गणवेषामध्ये असला तरी त्याचे किती बिभत्स चित्रण करावे याबाबत मर्यादा पाळल्या जात नाहीत. लोकशाही आणि स्वत:चे कलाविष्कार मनमोकळेपणे करावयास पाहिजेत असे मानणारा हा समाज आणि त्यातून निर्माण झालेले सेन्सॉर बोर्ड हे सुध्दा अशा प्रकारच्या सर्व गोष्टींना वारेमाप प्रसिध्दी कशी मिळेल याकडेच लक्ष दिले जाते.

सभापती महोदय, पूर्वीच्या काळामध्ये समाज कसा होता ? मला आठवते साने गुरुजींच्या अनेक प्रसिध्द गोष्टीपैकी ही एक गोष्ट आहे. एक गुन्हेगार पकडला जातो. तो माणूस लहान पणापासून गुन्हे करीत असतो. त्यामुळे त्याला मोठी शिक्षा होते. पण त्याला पोलीस कैदखान्यामध्ये घेऊन जाऊ लागतात, तेव्हा तो त्यांना सांगतो की, मला माझ्या आईला भेटावयाचे आहे. मग त्याला आईजवळ नेतात. त्या लोकांना असे वाटते की, आता तो मुलगा आईच्या कुशीत शिरुन रडेल आणि माझ्याकडून कशा चुका झालेल्या आहत हे सांगेल. पण तो आपल्या आईच्या हाताला कडकडून चावा घेतो. पण सगळयांना आश्चर्य वाटते की, हे काय झाले ? त्यावर तो मुलगा आईला असे सांगतो की, जेव्हा मी पहिल्यांदा चोरी केली, तेव्हा का थांबविले नाहीस. समाजामध्ये अशा प्रकारच्या प्रवृत्ती वाढण्यापूर्वी त्यांच्यावर संस्कार करण्याची ज्यांची जबाबदारी आहे ते जर आपल्या कर्तव्यामध्ये चुकत असतील तर अशा प्रकारच्या घटनांची एक साखळी निर्माण होईल आणि मग समाज गुन्हेगारी प्रवृत्तीकडे जाऊ लागला तर त्यातून जे काही निर्माण होईल ते निश्चितच समाजाच्या स्वास्थ्यासाठी, हितासाठी योग्य असणार नाही अशा प्रकारचे एक भीषण चित्र आपल्यासमोर उभे रहात आहे.

सभापती महोदय, पोलिसांना अधिक शस्त्रे,चांगली वाहने द्यावयास पाहिजेत. त्यांच्यासाठी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चांगल्या घरांची व्यवस्था करावयास पाहिजे. पण हा व्यवस्थेचा भाग आहे. अशा वेळी समाज आणि पोलीस यांनी एकरुप होऊन समाजातील विघातक कृतींना, व्यक्तींना आळा घालण्यासाठी जर व्यवस्था निर्माण करावयाची असेल तर त्यासाठी सगळयात जास्त उत्तरदायित्व हे सत्तेवर बसलेल्या लोकांचे आहे, त्याचप्रमाणे लोकांच्या मार्फत निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचे सुध्दा यातील स्थान तेवढेच महत्वाचे आहे.ही एखाद्या व्यवस्थेची जबाबदारी नसून,समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले.....

आणि त्या दृष्टीने मला असे वाटते की, काही तरी रचनात्मक बदल करुन, मानसिकतेमध्ये बदल करुन काही चांगल्या गोंष्टी मग ज्याच्या बाबतीत आज कदाचित काही लोक त्याला चेष्टा या स्वरुपात पहात असतील, परंतु जेव्हा आपण एखाद्या गोष्टी बद्दलचा आपला असंतोष प्रकट करतो तो असंतोष प्रकट करताना सुध्दा आपण काही मर्यादा बाळगायला हव्यात, त्या बाळगल्या जात नाहीत.

सभापती महोदय, पोलिसांनी जर सांगितले की, अमुक ठिकाणा पर्यंत जा, त्याच्या पुढे थांबा. तर आपण कडे मोडून रस्त्यावरील रहदारीला अडथळे करुन आणि पोलिसांनी अडविले म्हणून सामाजिक संस्थांची, शासनाची, समाजाच्या मालकीच्या वास्तू किंवा इतर गोष्टींचा विनाश करावयाला लागलो तर या विनाशाची हिंसक प्रवृत्ती माणसाला या एकूणच परिवर्तनातून अधिक उत्क्रांत करण्या ऐवजी आपण पुन: पुन: मागच्या युगाकडे जातो आहोत की काय अशा प्रकारची स्थिती निर्माण होईल. म्हणून मला वाटते या सर्व गोष्टींचा विचार करताना सामाजिक व्यवस्थेचा, त्या मधून निर्माण झालेल्या अस्वस्थतेचा, त्यामधून वाढणाऱ्या असुरक्षिततेचा अतिशय गांभीर्याने विचार करुन आपल्याला ज्या पध्दतीची रचना हवी आहे, ज्या पध्दतीचे उत्तरदाईत्व पोलीस विभागाकडून हवे आहे, ते जर आपल्याला मिळवावयाचे असेल तर आपण शासनाच्या प्रयत्नांना सहकार्य केले पाहिजे. व्यवस्थेतील दोष दूर करण्यासाठी मार्गदर्शन केले पाहिजे आणि ज्यांना शिक्षा देणे आवश्यक आहे त्यांना ती शिक्षा मिळण्यामध्ये कोणी आड येत असेल तर त्या बाबतही आपण योग्य तो बंदोबस्त केला पाहिजे. मला वाटते या राज्याचे हे शासन माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय गृह मंत्री आणि माननीय गृह राज्यमंत्री हे सर्व जण या दृष्टीने चांगला प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे फार काही अघटित होऊन आता सगळे संपायला आलेले आहे ही भावना सोडून देऊन आपण काही तरी चांगले घडण्यासाठी प्रयत्न करु या आणि या प्रयत्नात आपल्या सगळयांची साथ या खात्याला देऊ या. पोलिसांना अधिक सन्मान देऊ या, त्यांना सत्प्रवृत्त होण्यासाठी प्रेरित करु या आणि त्या निमित्ताने आपल्या देशातील, आपल्या राज्यातील नागरिकांची सुरक्षितता आणि त्यांची एकूणच कायद्या बद्दलची दृष्टी या बद्दल एक नवीन वातावरण तयार करु या आणि या सगळयासाठी आपण सगळयांनी एकजूट करु या, अशी विनंती करुन मी थांबतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

----

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, विरोधी पक्षाने दिलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. या प्रस्तावामधील लिखाण आणि हा प्रस्ताव कशा पध्दतीने दिला आहे हे वाचल्या नंतर असे लक्षात येते की, विरोधी पक्ष म्हणून केवळ नकारात्मक भूमिका घ्यावयाची आणि नकारात्मक चित्र सरकारच्या विरोधात रंगवायचे अशा भावनेतून हा प्रस्ताव समोर आलेला दिसतो. अशा पध्दतीचा प्रस्ताव ज्यावेळी देण्यात येतो त्यावेळी त्याचे परिणाम आंतरराष्ट्रीय जगामध्ये काय होतात याचा कुठे तरी आपण सर्वांनी विचार करण्याची आज वेळ आलेली आहे. महाराष्ट्र आणि विशेषत: मुंबई विषयी या राज्यातील राजकीय पक्ष काय म्हणतात, सरकार बद्दलची त्यांची प्रतिमा काय आहे, या राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था कशा पध्दतीने आहे, याच्या बद्दलची वक्तव्ये अत्यंत जवळून आणि कटाक्ष ठेवून पाहिली जातात. या राज्यामध्ये आणि या मुंबई शहरामध्ये असलेल्या अनेक आंतरराष्ट्रीय दुतावासामधून त्यावर देखरेख केली जाते आणि त्याचे रिपोर्ट् घेतले जातात. या रिपोर्टसच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या देशामध्ये जे वेगवेगळे उद्योगपती, ज्या वेगवेगळया व्यक्ती या देशामध्ये गुंतवणूक करु इच्छितात त्यांना त्याचे फिडबॅक देत असतात आणि त्या फिडबॅकच्या माध्यमातून या राज्यामध्ये गुंतवणूक करावयाची की नाही याचा निर्णय ते घेत असतात.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यामध्ये गुन्हेगारांचे प्रमाण वाढले आहे अशा पध्दतीची चर्चा या सभागृहामध्ये विरोधी पक्षाच्या वतीने केली गेली. माझा विरोधी पक्षाला असा प्रश्न आहे की, गुन्हेगार का वाढतात? गुन्हेगार वाढले जातात याचे कारण समाजात विषमता आहे. गरीब, गरीबच राहतो त्याला वर येण्यासाठी कमी संधी उपलब्ध आहे आणि जे पैसेवाले आहेत ते आपले पैसे आणखी कसे वाढविता येतील या दृष्टिकोनातून काम करीत आहेत. कमी वेळात जास्त पैसे कमविण्याची जी स्पर्धा आहे, या स्पर्धेमधून आज हे सगळे सुरु झालेले आहे. त्याचबरोबर बेकारीचा प्रश्न आहे. सभापती महोदय, यासाठीच मी यापूर्वी उल्लेख केला होता की, नवीन उद्योगधंदे या राज्यामध्ये आले तर त्या पध्दतीचे पोषक वातावरण देशामध्ये आणि विदेशामध्ये जाऊ शकेल आणि महाराष्ट्राची चांगली प्रतिमा जाऊ शकेल, याची जबाबदारी केवळ सत्ताधारी पक्षाची नाही तर याची जबाबदारी ही विरोधी पक्षाची देखील आहे. कारण आपण सर्व या महाराष्ट्राचे नागरिक आहोत आणि या राज्याच्या प्रगतीचा आलेख उंचावलेला आपल्या सर्वांना हवा आहे. आपल्या मुलाबाळांना,

...3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे.....

आपल्या नातेवाईकांना रोजगार उपलब्ध झालेला आपल्याला बघावयाचे आहे. हे करावयाचे असेल तर मला वाटते अशा पध्दतीने नकारात्मक भूमिकेतून अशा प्रकारचा प्रस्ताव आणणे ही अत्यंत अयोग्य गोष्ट आहे. लवकर श्रीमंत होण्याची आज जी रस्सीखेच चालली आहे, घोडदौड चालली आहे, त्यामध्ये गरीब फसले जात आहेत.

सभापती महोदय, या सभागृहात आपण आर्थिक गुन्हयांच्या बाबतीत चर्चा केली. या राज्यामध्ये वर्तमानपत्रातून खुलेआम जाहिराती देण्यात येतात, कारण त्यांना त्या जाहिरातीचे पैसे मिळतात. विचार कसलाच केला जात नाही. लोकांना सांगितले जाते की, आज एक लाख रुपये गुंतवा तुम्हाला दोन महिन्यात, एका वर्षात दोन लाख, तीन लाख रुपये देऊ, अशा प्रकारची आमिषे दाखविली जातात, हे का घडते? याचे कारण जो गरीब आहे त्यालाही असे वाटते की, आपण झटपट श्रीमंत झाले पाहिजे. या सर्व बाबीतून जे काही गुन्हे घडतात, त्यातून मला समाजातील विषमता दिसून येते. सभापती महोदय, आज या राज्याच्या सर्वोच्च अशा सभागृहात ज्यावेळी आपण गुन्हेगारीवर चर्चा करतो, त्यावेळी समाजातील विषमता कशी दूर करता येईल आणि त्यातून गुन्हेगारीचे प्रमाण कसे कमी होईल या बाबतीत सकारात्मक चर्चा या सभागृहात झाली तर मला असे वाटते की, त्यातून या महाराष्ट्र शासनाला आणि महाराष्ट्रातील जनतेला चांगले मार्गदर्शन घडू शकेल. आज जो नवीन तरुणवर्ग आपल्या जीवनाची सुरुवात करु इच्छितो आहे त्या तरुण वर्गालाही एक चांगल्या प्रकारचे मार्गदर्शन सहाय्यक ठरू शकेल.

सभापती महोदय. आज नक्षलवाद्यांची समस्या आहे. नक्षलवाद्यांची जी चळवळ होती ती चळवळ नक्षलवाद्यांच्या ध्येयानुसार राहिलेली आहे काय? ती चळवळ आर्थिक बाबतीत निगडित झालेली आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये गुन्हयांची नोंद जास्त झालेली आहे या बाबतीतही या सभागृहात चर्चा झालेली आहे. महाराष्ट्र असे पुरोगामी राज्य आहे की, ज्यामध्ये एखादा गुन्हा नोंदविला गेला नाही तर या राज्यातील राजकीय कार्यकर्ता असेल, सामाजिक कार्यकर्ता असेल त्याची समाजाशी असलेली जी बांधिलकी आहे त्यातून ज्यांचे गुन्हे नोंदविले जात नाहीत त्यांच्याकडे ते जातात आणि ते गुन्हे नोंदविण्यासाठी पोलिसांवर सातत्याने दबाव आणतात. त्यामुळे गुन्हे नोंदविले जातात. त्यामुळे इतर राज्यांच्या तुलनेत आपल्या राज्यामध्ये गुन्हयांचे स्वरुप जास्त आहे, अशा स्वरुपाचे चित्र दिसते.

..4...



श्री. प्रकाश बिनसाळे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, या सभागृहात बॉम्बस्फोटा विषयी चर्चा झालेली आहे. खरे म्हणजे बॉम्बस्फोटावरील चर्चेच्या वेळी कायदा व सुव्यवस्थेसंबंधीची चर्चा फार विस्ताराने झालेली आहे. त्यामुळे या प्रस्तावाची गरज नव्हती. तरी देखील विरोधी पक्षाने हा प्रस्ताव आणलेला आहे, मी या प्रस्तावाचे स्वागत करतो. अनेक उपाययोजना सरकारने केल्या आहेत, त्याचा उल्लेख मी या ठिकाणी करणार नाही तसेच त्या संबंधीच्या आकडेवारीचाही उल्लेख मी या ठिकाणी करणार नाही. परंतु आज सातत्याने पोलीस खात्यावर आघात केला जात आहे. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी उल्लेख केला की, आपण पोलिसांवर कशा पध्दतीचे बर्डन्स टाकीत आहोत. आपण रोज मोर्चे काढतो, रोज आंदोलने करतो, आता नवीन फेस बुकचे युग आलेले आहे त्या माध्यमातून आपण आंदोलन करु शकतो. प्रत्येक वेळेला रस्त्यावर येऊन आंदोलन करण्याची काही गरज आहे काय? पोलिसांचे कडे तोडावयाचे, पोलिसांनी दिलेले निर्देश पायदळी तुडवायचे आणि त्यातून जी कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होते, त्यातून पोलिसांवर सातत्याने ताण पडतो. मग या पोलिसांना गुन्हे शोधण्यासाठी जी काही शक्ती किंवा वेळ द्यावा लागतो तो आपण कसा काय देणार आहोत?

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे .....

सभापती महोदय, अनेक गोष्टी आहेत. मी पोलीस खात्याच्या बाबतीत सांगू इच्छितो की, 6 टक्के, 8 टक्के एवढेच गुन्हे आज कोर्टामध्ये शाबीत होत आहेत ही एक गोष्ट निश्चितपणे भूषणावह नाही. या बाबतीत आपले कोठे तरी, काही तरी चुकत असेल तर निश्चितपणे त्या बाबतीत कारणमीमांसा केली गेली पाहिजे. त्याचा शोध लावला पाहिजे आणि त्या बाबतीत योग्य पावले उचलून गुन्हे शाबीत करण्याचे जे प्रमाण आहे ते कशा पध्दतीने जास्त करता येईल याचाही गांभीर्याने विचार केला पाहिजे. माझे या चर्चेच्या निमित्ताने सर्व राजकीय पक्षांना आवाहन आहे. आपण ज्या पध्दतीने दोष दाखवितो आणि आपल्या महाराष्ट्र राज्याची प्रतिमा मलीन करतो तसे न करता हाच प्रस्ताव जर आपण पॉझिटिव्ह पध्दतीने आणला असता, ज्यामध्ये गुन्ह्याचे प्रमाण वाढत असताना यातून या राज्याने मार्ग काढला पाहिजे, यातून चांगली शिस्त कशी लावली पाहिजे, पोलीस खात्याची कार्यक्षमता कशी वाढली पाहिजे त्यादृष्टीने जर आपण योग्य प्रकारच्या सूचना केल्या असत्या तर ते जास्त योग्य झाले असते. टीका करणे सोपे असते. टीकेतून शिकणारी आम्ही माणसे आहोत पण टीकेतून तुम्ही काही तरी शिकले पाहिजे. आज रस्त्यावर मोर्चे काढून, आंदोलने करुन पोलिसांवर आपण जो ताण निर्माण करता तो ताण जर सर्व राजकीय पक्षांनी कमी केला तर पोलिसांना गुन्हे थांबविणे आणि इतर कामे करण्यासाठी जास्त वेळ मिळेल.

सभापती महोदय, मी आणखी एक शेवटचा मुद्दा मांडतो. त्याबाबतचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी केला. आज अनेक जुने कायदे आहेत. नागपूरचा एक कायदा सभागृहासमोर आला. तो अनेक वर्षापूर्वीचा कायदा आहे. असे अनेक जुने कायदे आहेत. त्यामुळे आज गुन्हेगारांवर जो धाक असावयास पाहिजे तो कोठे तरी कमी आहे असे वाटत असेल तर या कायद्यांचाही पुन्हा अभ्यास करुन गुन्हेगाराला कडक शासन होईल, गुन्हेगाराला कायद्याची भीती वाटेल अशा स्वरुपाची पावले शासनाने तातडीने उचलावीत असे आवाहन या निमित्ताने करतो आणि मी माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

श्री. जयवंतराव जाधव ( नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी दोनच मिनिटांमध्ये माझे विचार व्यक्त करणार आहे. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्या. मी माननीय गृह मंत्र्यांना विनंती करतो की, प्रोटेक्शन ऑफ विटनेस म्हणजे साक्षीदाराला संरक्षण हा एक अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. कारण आपल्याकडील गुन्हेगारीची जी प्रवृत्ती आहे त्या प्रवृत्तीच्या दृष्टीकोनातून पाहता जोपर्यंत आपण साक्षीदाराला संरक्षण देत नाही तोपर्यंत तो साक्षीदार निर्भयपणे कोर्टामध्ये किंवा पोलिसांना सहकार्य करु शकत नाही. त्याला आपण चांगल्या पध्दतीचे संरक्षण द्यावयास पाहिजे. माननीय गृह मंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि माननीय मुख्यमंत्री यांनी महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलच्या कॉन्फरन्समध्ये या बाबतीतील विचार व्यक्त केले होते. त्या पध्दतीने जर आपला विचार झाला तर चांगल्या पध्दतीचे काम होऊ शकते.

सभापती महोदय, दुसरी एक गोष्ट मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो. सरकारी वकिलांच्या नेमणुकांमध्ये राजकीय हस्तक्षेप निश्चितपणे थांबविला गेला पाहिजे. याकरिता आपण एक नियमावली तयार केली पाहिजे. आज माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भामध्ये जिल्हा न्यायाधीश आणि जिल्हाधिकारी यांचा त्यामध्ये समावेश करुन या बाबतीत पुढाकार घेतलेला आहे. त्याच बरोबर सरकारी वकिलांची नेमूणक करताना त्या वकिलाचा अनुभव, पूर्वचारित्र्य, त्याचा आजपर्यंतचा अनुभव आणि त्या परिसरात त्याची असलेली कारकीर्द, तो सरकारची बाजू किती सक्षमपणे मांडू शकतो अशा सर्व बाबींचा जर विचार केला तर तो सरकार पक्षातर्फे निश्चितच गुन्हेगारांना सजा देण्याकरिता अतिशय चांगल्या पध्दतीने काम करु शकतो. अशा दोन सूचना मी आपल्यामार्फत माननीय गृह मंत्र्यांना करु इच्छितो. त्या बाबतीत त्यांनी विचार करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/ AKN/ KTG/

श्री. आर.आर.पाटील ( गृह मंत्री ) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी चर्चा सभागृहामध्ये उपस्थित केलेली आहे त्यावर राज्यामध्ये अलीकडच्या काळामध्ये घडलेल्या काही घटनांचा उल्लेख करीत काही प्रमाणात टीका तर काही प्रमाणात सूचना करण्याचे काम सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांने केले आहे. विशेषत: मला आवर्जून उल्लेख करावयास पाहिजे की, सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, श्री. हेमंत टकले आणि प्रकाश बिनसाळे यांनी थोडीशी माझी भूमिका सभागृहासमोर आणण्याची जबाबदारीही पार पाडलेली आहे. काही सन्माननीय सदस्यांनी मित्रत्वाच्या नात्याने सल्ला दिला तर काही सन्माननीय सदस्यांच्या भावना अलीकडच्या काळामध्ये घडलेल्या घटनांबद्दल तीव्र बनणे हे मी स्वाभाविक मानतो. आतापर्यंतची सगळी अधिवेशने बघितली तर कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा झाली नाही असे कधी होत नाही. कारण सत्तारुढ पक्षाच्या दृष्टीने आणि विरोधी पक्षाच्या दृष्टीने सुध्दा जनतेच्या जीविताचे आणि मालमत्तेचे रक्षण करणे ही कोणत्याही सरकारची पहिली आणि आद्य जबाबदारी असते. जीविताचे संरक्षण केले तरच विकासाला अर्थ उरतो त्याचबरोबर सुरक्षिततेच्या वातावरणामध्ये विकास कामे होत असतात.

सभापती महोदय, आज राज्य सरकारच्या अनेक जबाबदाऱ्या असल्या तरी राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था राखणे, जनतेला जीविताची आणि मालमत्तेची हमी देणे हे निश्चितपणाने शासनाचे प्रमुख कर्तव्य आहे. राज्यातील एकंदरीत गुन्हेगारीचा आढावा घेत महाराष्ट्र पूर्वीसारखे सुरक्षित आहे का अशा पध्दतीचे प्रश्नचिन्ह माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उपस्थित केले. माझ्याकडे देशातील सुध्दा आकडेवारी आहे तसेच आपल्या राज्यातील पूर्वीची आकडेवारी आणि अलीकडची आकडेवारी सुध्दा आहे. राज्याची लोकसंख्या वाढत असताना आणि अनेक प्रश्न वाढत असताना सुध्दा गुन्हेगारी न वाढू देण्याचे काम आपल्या राज्यामध्ये घडले आहे. त्याचे सगळे श्रेय मी पोलिसांना देऊ इच्छित नाही. राज्यातील जनताच शांतताप्रिय आहे आणि शांत राहावे, चांगले जीवन जगावे, चांगले काम करावे अशी आपल्या महाराष्ट्राची मनोवृत्ती आहे. त्याला अपवाद जरुर असणार आहे. सर्वसाधारणत: लोक सहकार्य करीत आहेत. पोलीसही चांगले काम करीत आहेत म्हणून अन्य राज्यांबरोबर तुलना करताना महाराष्ट्र हे आजही देशामधील सर्वात सुरक्षित राज्य

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/ AKN/ KTG/

श्री. आर. आर. पाटील .....

आहे हे आकडेवारी सिध्द करते. काही घटनांमध्ये थोडीशी वाढ तर काही घटनांमध्ये घट ही नेहमीच होत असते. खुनासारखा जो महत्वाचा गुन्हा आपण म्हणतो त्यामध्ये गेल्या वर्षी म्हणजे 2010 च्या जून अखेर 1372 खुनांची नोंद झाली होती आणि या वर्षी पहिल्या सहा महिन्यांमध्ये 1430 खुनांची नोंद झालेली आहे.

सभापती महोदय, आतापर्यंत मी बघितले की, हे आकडे घेऊन गृह मंत्री बोलावयाचे आणि वर्तमानपत्रांच्या बातम्या घेऊन विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय सदस्य बोलावयाचे. कारण त्यांचा माहितीचा प्रमुख स्त्रोत तो असावयाचा. पण आता जो कागद माझ्या हातामध्ये आहे, जी माहिती, जी आकडेवारी माझ्या भाषणासाठी काढली होती तीच माहिती आपल्याकडे देखील उपलब्ध आहे. इतका पारदर्शीपणा अन्य कोणत्या विभागामध्ये असू शकत नाही. ही सगळी माहिती ज्यांनी आपल्यापर्यंत पोहोचविली त्या अधिकाऱ्यांना सुध्दा मी मनापासून धन्यवाद देतो. पण ही आकडेवारी बघितल्यानंतर एक गोष्ट आपल्याही लक्षात आली असेल की, सर्वसाधारण गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्रात वाढ नाही. खुनाच्या गुन्ह्यामध्ये वाढ आहे तर दरोड्यामध्ये गेल्या वर्षी पहिल्या सहा महिन्यांमध्ये 393 घटना घडल्या होत्या आणि या वर्षी 353 घटना घडलेल्या आहेत. म्हणजे यामध्ये घट आहे. रॉबरीच्या घटना गेल्या वर्षी 1820 घडलेल्या होत्या तर या वर्षी 1813 घटना घडलेल्या आहेत. त्यामध्येही घट आहे. घरफोडीमध्ये 283 घटनांची वाढ आहे तर चोऱ्यांमध्ये घट आहे. दंगलीच्या घटनांमध्ये घट आहे. लोकांना जखमी करण्याच्या घटनांमध्ये घट आहे. एकंदरीतच 1 ते 5 हे आय.पी.सी.मधील महत्वाचे गुन्हे मानतो त्यामध्ये एकंदरीत पाहिले तर 1372 घटनांची घट आहे.

सभापती महोदय, आपण आकडेवारी घेऊनच बोलत असाल आणि राज्यामध्ये घटना वाढल्या असे म्हणत असाल तर राज्यातील प्रत्यक्ष आकडेवारी घटना कमी झाल्याचे दर्शविते. एक तर आपण आकडेवारीवर विश्वास ठेऊ नका आणि विश्वास ठेवला तर फक्त टीका करण्यासाठी त्याचा वापर करु नका, एवढीच माझी विनम्र सूचना आहे. 1 ते 5 या महत्वाच्या घटनांमध्ये 1372 ने आपल्या राज्यामध्ये घट आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील......

एका बाजूला लोकसंख्या वाढत असताना, बेकारी वाढत असताना, सामाजिक ताणतणाव वाढत असताना गुन्हे घटविण्याचे काम आपल्या राज्यामध्ये झालेले आहे. मला नेहमी असे वाटते की, प्रत्येक चांगल्या गोष्टीमध्ये आपल्या महाराष्ट्राचे स्थान वरचे असावयास पाहिजे, खूप मोठी परंपरा असलेले आपले राज्य आहे, सगळया क्षेत्रात आघाडी घेतली पाहिजे. सुरक्षिततेबाबत सुध्दा आपले राज्य आघाडीवर असले पाहिजे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात पोलिसांची संख्या वाढविली पाहिजे. ती वाढविण्यासाठी विभागाचे प्रयत्न सुरु आहेत. मागील 4 वर्षांपासून प्रत्येक वर्षी प्रशिक्षणाची क्षमता विचारात घेत आहे. रिक्त जागा भरल्या जात आहे. 11 हजार वाढीव जागा मागील 4 वर्षात भरलेल्या आहेत. पोलीस कॉन्स्टेबलच्या संदर्भात मी माझ्या मागील भाषणात सांगितलेले आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाबरोबर या संदर्भात चर्चा झाली आहे. राज्यातील पीएसआयची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहे. आपल्या सर्वांना कल्पना आहे की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे मागील 3-4 वर्षापासून कामकाजच बंद पडले होते. त्यातील काही सदस्य तुरुंगात गेले होते. त्यानंतर कोर्ट केसेस झाल्यामुळे पीएसआय या पदाची भरती रखडली होती. परंतु पीएसआय या पदाची भरती प्रक्रिया सुरळीतपणे सुरु झालेली आहे. यावर्षी नव्याने 1,750 पीएसआयची पदे भरली जाणार आहेत. या संदर्भातील जाहिरात लवकरच दिली जाईल. हे पीएसआय सुध्दा आपल्याला लवकरच उपलब्ध होतील. मागील 2 महिन्यात 400 पीएसआय सेवेत दाखल झालेले आहेत. सप्टेंबर अखेर 700 पीएसआय आपले प्रशिक्षण संपवून सेवेत येणार आहेत. जी रिक्त पदे आहेत ती भरण्याचे आमचे प्रयत्न सुरु असून यावर्षी सुध्दा रिक्त पदे भरली जाणार आहेत. ही पदे भरली तरी सुध्दा अन्य राज्यांची तुलना केली तर 1 लाख लोकसंख्येमागे देशात काय स्थिती आहे ते लक्षात आणून देतो. जम्मू आणि काश्मीर या राज्यात विशिष्ट परिस्थिती असल्यामुळे दर लाख लोकसंख्येमागे 683 पोलीस आहेत. दिल्लीमध्ये 362, पंजाबमध्ये 249 पोलीस आहेत. महाराष्ट्रात एक लाख लोकसंख्येमागे 166 पोलीस आहेत. दिल्ली, पंजाब, जम्मू व

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काश्मीर ही राज्ये ज्या गोष्टीला तोंड देत आहेत तशा प्रकारची लढाई कधी नक्षलवाद्यांबरोबर, कधी आतंकवाद्यांबरोबर तर कधी गँगस्टर्सबरोबर आपल्याही पोलिसांना करावी लागते. राज्य सरकारने मंजूर केलेला 55 हजार पोलिसांचा कोटा यावर्षी पूर्ण होणार आहे. तरी सुध्दा 13 हजार पदे भरल्यानंतरही राज्यातील वाढत्या गरजा व सुरक्षिततेचे निर्माण झालेले प्रश्न लक्षात घेऊन तज्ज्ञांची समिती नेमून राज्यात आणखी जादा मनुष्य बळ निर्माण केले जाईल. लोकांना 100 टक्के सुरक्षितता प्राप्त होईल, त्यासाठी लागणारे पोलीस निश्चितपणे नेमले जातील.

असे असले तरी सुध्दा सन्माननीय विरोधी पक्षाच्या सदस्यांनी अशी वक्तव्ये केली की, एकेकाळी महाराष्ट्र सुरक्षित होता, आज हा महाराष्ट्र चोरांचा झाला आहे, गुंडांचा, दरोडेखोरांचा झ ाला आहे. देश स्तरावरील माहिती घेतल्यानंतर त्यांनी व्यक्त केलेल्या भावना ही वस्तुस्थिती नाही असे दिसून येते. दर लाख लोकसंख्येच्या पाठीमागे देश स्तरावर घडणाऱ्या मोठ्या शहरातील गुन्ह्यांची संख्या पाहिली तर आपल्या राज्यातील परिस्थिती लक्षात येईल. आयपीसीची 5 प्रमुख कलमे आहेत. देशामध्ये ज्या मेगा सिटीज आहेत त्यांची स्थिती पाहिली तर दर लाख लोकसंख्येमागे भोपाळला 836 गुन्ह्यांची नोंद होत आहे, लखनऊमध्ये 462, गुजरातमध्ये 458, दिल्लीत 353, हैद्राबादमध्ये 322 आणि महाराष्ट्रात 191 गुन्ह्यांची नोंद होत आहे. आपण इतर कोणत्याही राज्याची किंवा शहराची तुलना करु नये परंतु ज्या राज्याला देशातील सर्व राज्ये मानतात, भारतीय जनता पक्षाचे लोक मानतात त्या राज्याच्या राजधानीची व आपल्या राज्याची तुलना केली तर अहमदाबादमध्ये दर लाख लोकसंख्येमागे 458 गुन्ह्यांची व मुंबईत 191 गुन्ह्यांची नोंद केली जाते. हे सर्व आकडे पाहिल्यानंतर आपण देशातील मोठ्या शहरापैकी कोणत्या शहराला सुरक्षित मानणार आहात हे मी सांगण्याची आवश्यकता नाही. त्याचा विचार सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनीच करावा अशी मी त्यांना विनंती करीन.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कन्व्हिक्शनचा वेग दिवसेंदिवस कमी होत चालला आहे असाही मुद्दा मांडला आहे. हे खरे आहे, ही चिंतेची गोष्ट आहे. त्याचबरोबर ही देखील गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, एकदा दावा कोर्टात गेल्यानंतर अनेक कारणांनी दावा प्रलंबित राहतो कधी साक्षीदार न आल्यामुळे, कधी आरोपी न आल्यामुळे, न्यायालयाची संख्या कमी

श्री.आर.आर.पाटील......

असल्यामुळे दावा प्रलंबित राहतो. कोर्टात गेलेल्या दाव्यांच्या डिस्पोजलचा रेट पाहिला तर कर्नाटक राज्यात 26 टक्के, मध्य प्रदेश राज्यात 21 टक्के, उत्तर प्रदेश राज्यात 20 टक्के, दिल्लीत 9 टक्के आणि गुजरात राज्यात 7 टक्के आणि महाराष्ट्रात 6.58 टक्के डिस्पोजल होते. याबाबत विधी व न्याय खात्याबरोबर चर्चा करुन आवश्यकते प्रमाणे ज्या परिसरामध्ये गुन्ह्यांची संख्या जास्त आहे त्या परिसरामध्ये न्यायालयांची संख्या वाढविण्याची भूमिका घेऊन जर लवकर न्याय मिळाला तर साक्षीदार फितूर होत नाहीत, गुन्ह्याची तीव्रता कमी होत नाही, खूप विलंब लागणे हेच कन्व्हिक्शनचा रेट कमी होण्याचे एक महत्वाचे कारण आहे. या संदर्भात हायकोर्टाबरोबर विचारविनिमय करुन राज्यात न्यायालयाची संख्या वाढविण्याची भूमिका स्वीकारली जाईल व तशा प्रकारचा प्रस्ताव तयार केला जाईल.

सभापती महोदय, या राज्यात माता भगिनी सुरक्षित नाहीत असाही उल्लेख केला गेला. हे देखील वस्तुनिष्ठ चित्र नाही. इन्सिडन्स ऑफ क्राईम अगेन्स्ट वुमन हे पाहिले तर आंध्र प्रदेशमध्ये नोंदविलेल्या गुन्ह्यांची संख्या 25,569 इतकी आहे, पश्चिम बंगालमध्ये 23,307, उत्तर प्रदेशमध्ये 23,354, मध्य प्रदेश हे राज्य आपल्या राज्यापेक्षा लहान आहे तेथे 15,827 गुन्ह्यांची नोंद झालेली आहे व महाराष्ट्रात 15,048 घटनांची नोंद आहे. मध्य प्रदेशपेक्षा महाराष्ट्रात कमी गुन्हे घडलेले आहेत व कमी नोंदविले गेले आहेत. देश स्तरावर लोकसंख्येच्या प्रमाणात बघितले तर हे प्रमाण निश्चितच कमी आहे. यावरुन सन्माननीय सदस्यांना अंदाज येईल की, देशात महिलांच्या बाबतीत कोणते राज्य सुरक्षित आहे ? मोठ्या शहरात महिलांवरील अन्यायाची स्थिती पाहिली तर दिल्लीत 2009 साली 3701 गुन्ह्यांची नोंद झालेली आहे. हैद्राबादमध्ये 1896, अहमदाबादमध्ये 1474, बेंगळुरमध्ये 1471 व मुंबईत 1332 नोंद झालेली आहे. मोठ्या शहरातील महिलांच्या बाबतीत घडणाऱ्या गुन्ह्यांच्या या नोंदी आहेत. मी आणखी काही राज्यांबाबत सांगण्याची आवश्यकता नाही. परंतु मी इतकेच सांगेन की, महिला असतील, मागासवर्गीय असतील, आदिवासी असतील राज्यातील स्थिती निश्चितच चांगली आहे.

4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील......

सभापती महोदय, शेडयूल कास्टच्या लोकांसंबंधी देश स्तरावर जे गुन्हे नोंद होत आहेत त्यामध्ये उत्तर प्रदेशमध्ये 7522, राजस्थानमध्ये 4985, बिहारमध्ये 3800, मध्य प्रदेशमध्ये 3040, गुजरातमध्ये 1182 व महाराष्ट्रात 1096 गुन्ह्यांची नोंद झालेली आहे. आकाराने महाराष्ट्र मोठा असला तरी गुजरात व मध्य प्रदेश या राज्यांपेक्षा दलित माणसांच्या बाबतीत घडणाऱ्या गुन्ह्यांची संख्या महाराष्ट्रात कमी आहे. लहान मुले असतील, दलित असतील, आदिवासी असतील, महिला असतील, मोठ्या शहरातील महत्वपूर्ण गुन्हे असतील यामध्ये जर महाराष्ट्रातील गुन्ह्यांची संख्या कमी असेल तर सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी विचारु इच्छितो की, आपण कशाच्या आधारावर महाराष्ट्र असुरक्षित आहे असा निष्कर्ष काढला ? या सदनामध्ये चर्चा होते त्यावेळी आपले राज्य असुरक्षित आहे असा निष्कर्ष आपण काढतो त्यावेळी तसाच संदेश बाहेर जाण्याची शक्यता असते. पूर्वीच्या काळी एखाद्या खेड्यापाड्यात घडलेला गुन्हा समजत सुध्दा नव्हता. परंतु अलीकडच्या काळात माध्यमे एवढी टोकापर्यंत पोहोचलेली आहेत त्यामुळे राज्यात कोठेही व कोणतीही घडलेली घटना लपून रहात नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 17:20

श्री. आर.आर.पाटील....

काही काही वाहिन्या 24 तास चालविल्या जातात. त्यामुळे एकदा घडलेला गुन्हा पुन्हा पुन्हा दाखविला जातो. त्यामुळे विरोधी पक्षाने कदाचित ती एक घटना मोजण्या ऐवजी 10-10 वेळा घटना मोजल्यामुळे त्यांचा असा समज झालेला आहे की काय, असा प्रश्न मला पडतो. कदाचित गैरसमज होतो.

मी लोकशाही मानणारा आहे. विरोधी आणि सत्ताधारी पक्ष यांच्यामध्ये सहमती असली पाहिजे आणि चर्चेमधून निर्णय झाले पाहिजे अशा प्रकारची भूमिका मी नेहमीच घेत असतो. याबाबतीत मला खाजगीत विचारले असते की, काय परिस्थिती आहे ? तरी सुध्दा मी हेच सांगितले असते की, आपल्या राज्यामध्ये गुन्हे वाढलेले आहेत अशा प्रकारची परिस्थिती नाही. परंतु एखादी घटना घडली की मागच्या सगळया उखाळया पाखाळया निघत राहातात. स्फोटाची घटना घडल्यानंतर गृह खात्याचे सर्व बाजूने वाभाडे निघणे स्वाभाविक होते. या घटनेकडे कोण कोण कसे कसे बघतात हेही पहातोय. दोन-तीन वर्षे लपून असलेली माणसे बाहेर आली आणि त्यांनी सांगितले की आर.आर.पाटील यांची प्रायॉरिटी आतंकवाद नसून डान्सबार आहे. हा उठला की तिथेच मागे लपतोय. त्यामुळे स्फोट करणा-याचे फावते. सभापती महोदय, डान्सबार आणि स्फोटांचा काय संबंध आहे ? त्यासाठी वेगळी शाखा आहे, वेगळे लोक आहेत, वेगवेगळया विंग्ज काम करीत आहेत. परंतु असे काही घडले की प्रत्येक जण आपापल्या अँगलने बघायला सुरुवात करतोय. आज मुंबईमध्ये जो स्फोट झाला त्यामुळे लोकांना सुरक्षिततेच्या बाबतीत भीती वाटणे, साशंकता निर्माण होणे स्वाभाविक आहे. ज्या कमतरता आणि त्रुटी राहिलेल्या आहेत त्या भविष्यामध्ये कशा दूर करायच्या या दृष्टीने अनेक पावले आम्ही उचलेली आहेत. विरोधी पक्ष सुध्दा या पासून अनभिज्ञ असू नये म्हणून माझा हा जास्तीत जास्त प्रयत्न राहिलेला आहे की, ज्या ज्या काही व्यवस्था केलेल्या आहेत त्या बघण्यासाठी विरोधी पक्षाला देखील बरोबर नेले पाहिजे आणि सुरक्षिततेसाठी जे काही आपण करतोय ते दाखविले पाहिजे. पण त्यावरुन देखील कोणी तरी असे निष्कर्ष काढले की विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव खडसे आणि माझी मैत्री आहे. मैत्री असती तर त्यांनी माझ्यावर कशाला टीका केली असती ? मी विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांना देखील बरोबर घेऊन गेलो होतो. विधानसभेमध्ये, विधानपरिषदेमध्ये जी आश्वासने दिली होती त्याप्रमाणे ही कारवाई केली होती.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

कोस्टल गार्डची सुरक्षा व्यवस्था आम्ही स्वत: बघितली होती. खूप अधिकारी राबत आहेत. परंतु कधी कधी त्यांच्याही नजरेतून काही गोष्टी सुटत आहेत. आता पुन्हा एक बोट आली. पहिल्यांदा जी बोट आली होती तिचे ट्रॅकिंग कोस्टल गार्ड आणि नेव्ही यांनी मिळून केले होते. ती बोट यायला लागली आहे हे त्यांना माहीत होते. त्यामुळे त्या बोटीचे ट्रॅकिंग ते व्यवस्थित करीत होते. परंतु ही जी बोट आलेली आहे त्यामुळे कोणताही धोका निर्माण झाला नाही. परंतु धोका निर्माण होऊ शकतो. ही बोट जशी आली, तशी अतिरेक्यांची एखादी बोट येऊ शकते अशा शंका लोकांच्या मनामध्ये येऊ शकतात. आता असे विचारण्यास सुरुवात केली की, राज्य सरकारकडे बोटी आहेत त्याचे काय झाले ? मी त्या बोटीचा आकार बघितला. आपल्या 28 बोटी एका कप्प्यात बसतील इतकी मोठी बोट सगळयांची नजर चुकवून आली. याबाबतीत केन्द्र सरकारच्या शिपिंग विभागाला, नेव्ही विभागाला, कोस्ट गार्ड विभागाला राज्य सरकारच्या वतीने कडेकोट व्यवस्था करण्याच्या बाबतीत ज्या काही त्रुटी राहिल्या आहेत त्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने विनंती करणार आहोत. तसेच आमच्या यंत्रणा सुध्दा आणखी कशा सक्षम करता येतील यासाठी तज्ज्ञांचे मागदर्शन घेऊन जरुर त्या उपाययोजना याही बाबतीत निश्चितपणे केल्या जातील. पण काही झालेच नाही असा निष्कर्ष काढणे चुकीचे आहे. 26/11च्या हल्ल्यानंतर सागरी किनारा सुरक्षित करावा म्हणून 12 सागरी पोलीस ठाणी व 32 चेक पोस्ट कार्यरत झालेले आहेत. केन्द्र सरकारने 28 कोटी रु.दिलेले आहेत. आपले 11 कोटी रु.प्राप्त झालेले आहेत. बाकीचे जानेवारी पर्यन्त प्राप्त होणार आहेत. सगळयात महत्वाची बाब म्हणजे या कामात स्थानिक लोकांचे सहकार्य खूप मोठया प्रमाणात मिळत आहे.

सभापती महोदय, आणखी एका महत्वाच्या प्रश्नाकडे मी लक्ष वेधू इच्छितो. परदेशी लोक येऊन ते मुंबईमध्ये आणि आपल्या राज्यामध्ये वास्तव्य करीत आहेत. त्यांच्यावरसुध्दा पोलिसांनी कारवाया केलेल्या आहेत. 2001 पासून पाहिले तर 7706 घुसखोर बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आलेली आहे आणि 5230 लोकांना डिपोर्टसुध्दा करण्यात आलेले आहे. कोर्टामध्ये त्यांच्या विरुध्द केसेस चालवून त्यांना त्यांच्या मूळ देशामध्ये, बांगला देशामध्ये पाठविण्याची कामगिरी आपल्या पोलीस दलाने केलेली आहे. नायजेरियन लोकांच्या बाबतीत शंका उपस्थित करण्यात आल्या. ही गोष्ट खरी आहे की, काही नायजेरियन लोक ड्रग्ज विकताना सापडलेले

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत. ज्यांच्याकडे व्हिसा नाही. ज्यांच्या व्हिसाची मुदत संपलेली आहे. जे बेकायदेशीरपणे आपल्या देशामध्ये राहात आहेत त्यांच्यावर पोलिसांनी कारवाई केलेली आहे. 2008मध्ये 103 लोकांना अटक करण्यात आली आणि 75 लोकांना त्यांच्या मूळ देशामध्ये पाठविण्यात आले. 2009मध्ये 100, 2010मध्ये 88 आणि यावर्षी आता पर्यन्त 25 नायजेरियन लोकांना अटक करुन त्यांच्या मूळ देशामध्ये पाठविण्याची कारवाई केलेली आहे. सभापती महोदय, आपल्या देशामध्ये येणे सोपे आहे. परंतु सगळया न्यायाच्या प्रक्रिया पूर्ण करुन अशा लोकांना परत पाठविणे ही वेळखाऊ आणि कठीण गोष्ट आहे. त्यामुळे या गोष्टीचा फायदा ते लोक घेत आहेत. तरी सुध्दा हा सेल सक्षम करण्यासंबधी ज्या सूचना सन्माननीय सदस्यांनी केलेल्या आहेत त्यांचा नक्कीच स्वीकार केला जाईल. परदेशी नागरिकांचा व्हिसा संपल्यानंतर जे येथे रहात आहेत त्यांच्यावर मोठया प्रमाणावर कारवाई केलेली आहे. या वर्षी 205 लोकांना अटक केलेली आहे आणि 17 लोकांच्या बाबतीत कोर्टाकडून निकाल मिळवून त्यांना त्यांच्या मूळ देशात पाठविलेले आहे. ज्यांच्या विरुध्द कोर्ट केसेस असतात त्यांना तोपर्यन्त ताब्यात ठेवले जात असते. या कारवाया देखील आपल्या सूचने प्रमाणे अगोदरच राज्य सरकारने सुरु केलेल्या आहेत. या सर्व घटना घडत असताना जनतेच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले पाहिजे याबद्दल कुणाचेही दुमत असता कामा नये. बॉम्बस्फोटाच्या चर्चेच्या वेळी मी सांगितले की, पोलिसांची जी सलामी दिली जाते त्यामध्ये खूप मोठे पोलीसबल वाया जाते. दौरे वेळेवर होत नाहीत त्यामुळे ग्रामीण भागामध्ये जाऊन, तालुक्याच्या ठिकाणी जाऊन 20-20 पोलिसांना थांबावे लागते. फक्त जिल्हा मुख्यालय सोडून बाकीच्या सर्व ठिकाणची सलामी बंद करण्याची भूमिका आपण स्वीकारलेली आहे. मला या गोष्टीचा आनंद होत आहे की, मंत्रिमंडळातील माझ्या सहका-यांनी माझ्या या गोष्टीचे स्वागत केलेले आहे.

सभापती महोदय, आपण मोठ्या प्रमाणावर व्हीआयपीच्या संरक्षणासाठी पोलीस देतो. काही ठिकाणी ते देण्याची आवश्यकता देखील आहे. पण अलीकडच्या काळात बक्कळ पोलीस घेऊन फिरणे हे स्टेटस सिम्बॉल मानले जाते. एखादा जरी पोलीस कमी झाला तरी फोन यायला सुरुवात होते. याला कोणताही एक पक्ष अपवाद नाही. याबाबतीत जर कुणी आक्षेप घेतला तर मी त्या पक्षाच्या नेत्याचे नाव येथे देखील सांगायला तयार आहे. कुणीही अपवाद नाही. सर्वांची या बाबतीतील भूमिका सारखी आहे. परंतु तरी सुध्दा ज्या घटना घडत आहेत, जी परिस्थिती आहे

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि जे मनुष्यबळ उपलब्ध आहे ते पाहिल्यानंतर  याही बाबतीत निर्णय घेतलेला आहे. कुणाला किती संरक्षण द्यावे याबाबतीत स्टेट इण्टेलिजन्स डिपार्टमेण्ट, सीपी, डीजी आणि आयबीचा वरिष्ठ अधिकारी यांची एक कमिटी असते. ते आपला अहवाल तयार करुन मुख्य सचिवांकडे पाठवितात. तेथे एक मिटींग होते. कुणाला किती सुरक्षा द्यायची याचा प्रस्ताव तेथे तयार केला जातो आणि मान्यतेसाठी गृहमंत्री आणि अंतिम मान्यतेसाठी मुख्यमंत्र्यांकडे तो जात असतो. अलीकडचा जो अहवाल आलेला आहे त्यामध्ये अनेक व्हीआयपींची सेक्युरिटी कमी करण्याच्या सूचना आलेल्या आहेत. माझी खात्री आहे की, लवकरात लवकर या बाबतीतील निर्णय घेतला जाईल आणि वस्तुनिष्ठ पध्दतीने जितके संरक्षण लागते तितके संरक्षण ठेवून बाकीच्या सुरक्षेसाठी असलेले लोक कमी करुन ते सर्वसामान्य माणसाच्या सुरक्षेसाठी दिले जातील. याबाबतीत जरुर थोडासा वाईटपणा देखील येईल. परंतु लोकांच्या भावना किती गुंतलेल्या असतात हे मी रोजच अनुभवतोय. कुठे तरी मला हे सत्य स्वीकारावे लागेल आणि लवकरच याबाबतीतील कारवाई शासना मार्फत केली जाईल इतकेच मी या निमित्ताने सांगतो.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

....नंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील........

महोदय, एका बाजूने अशा प्रकारे राज्यातील पोलिसांची रिक्त पदे भरण्यात येतील व दुसऱ्या बाजूला व्हीआयपींची सुरक्षा कमी करुन त्यातून जे मनुष्यबळ उपलब्ध होईल तेही सुरक्षेसाठी वापरले जाईल. पण त्याचबरोबर पोलिसांना नवीन तंत्रज्ञा ान तसेच आधुनिक सुविधा उपलब्ध करुन दिल्या तर कमी मनुष्यबळामध्ये सुध्दा चांगल्या सुविधा दिल्या जाऊ शकतात. आज पोलिसांची अशी तक्रार आहे की, चोरांच्या गाड्या फास्ट धावतात व पोलीस मात्र उशिरा पोहचतात. तशीच मंत्र्यांची सुध्दा तक्रार आहे की, आमच्या गाड्या वेगाने धावतात आणि पोलिसांना दिलेल्या क्वॉलिस गाड्या पळत नाहीत. अशा प्रकारे पोलिसांना 4.90 लाखाच्या गाड्या दिल्या आणि त्यापुढील गाड्या अत्यंत वेगाने धावणाऱ्या असतील तर कदाचित त्यांच्या मागे जाण्यासाठी त्यांना वेळ लागणारच आहे. म्हणून पोलिसांना अत्याधुनिक सुविधा देण्यासाठी शासनाने यावर्षी चांगली पावले उचलली आहेत व तसाच निधी सुध्दा दिलेला आहे. त्याचबरोबर देश स्तरावर होणाऱ्या बैठकांमध्ये राज्य शासनाची जी भूमिका असते त्याचे अनुकरण दुसऱ्या राज्यांनी करावे अशा प्रकारच्या सूचना केंद्रीय स्तरावरुन दिल्या जातात. आपण मात्र अनेक वेळा खूप चुकीच्या गोष्टी करतो व आपल्याच पोलिसांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करतो, ही भूमिका योग्य नाही.

महोदय, मला कल्पना आहे की, पोलीस स्टेशन्स तसेच पोलिसांची निवासस्थाने याबाबतीत अत्यंत गैरसोय आहे. मराठवाड्यात गेलो तर निजामाच्या काळात बांधलेली पोलीस स्टेशन्स दिसतील, कोकणात गेलो तर इंग्रजांच्या काळातील पोलीस स्टेशन्स दिसतील. मध्यंतरीच्या काळात आपण या गोष्टींना प्राधान्य दिले नव्हते. आपले प्राधान्य शाळा, दवाखाने व रस्ते अशा बाबींना होते. पण अलिकडच्या काळात सुरक्षा सुध्दा अत्यंत महत्वाची मानून शासनाने 115 कोटी रुपये या कामासाठी उपलब्ध करुन दिले आहेत. त्यातून इतरही बरीच कामे पूर्ण झाल्यामुळे आज आपल्याला बदललेली पोलीस स्टेशन्स ठिकठिकाणी दिसून येतील. अशा प्रकारे जास्तीत जास्त चांगल्या सुविधा पोलिसांना देणे तसेच राज्याचा गुप्त वार्ता विभाग सक्षम करणे हे राज्यापुढे एक आव्हान होते. त्याप्रमाणे आपण राज्याचा गुप्त वार्ता विभाग सक्षम केला. त्यासाठी व्हीकल ट्रेकिंग सिस्टमचे मॉडर्नायझेशन हे प्रशिक्षण 1 तारखेपासून सुरु होत आहे. तरी सुध्दा अनेक वेळा टीका





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील........

केली जाते की, पोलीस दलाला खबरे कमी पडतात, खबरे मिळत नाहीत. पण काही गोष्टी अशा खबऱ्यांच्याही आवाक्या पलिकडच्या असतात. राज्यात अलिकडच्या काळात ज्या घटना घडल्या त्यात रेल्वेतील बॉम्बस्फोटामध्ये जो आरोपी सापडला तो पिलभाई हा आंतरराष्ट्रीय "याहू" कंपनीत चीफ इंजिनियर हुद्यावर कामाला आहे. ज्यावेळेस त्याला अटक केली तेव्हा एवढ्या मोठ्या हुद्यावरील व्यक्ती असे काम करील यावर कोणाचाच विश्वास बसणार नाही असे वाटत होते. तेव्हा अनेक लोकांनी माझ्याजवळ ऑब्जेक्शन्स घेतले की, पोलिसांनी चुकीच्या माणसाला पकडले. मी माझ्या पोलिसांना विचारले की, या लोकांच्या शंका आपल्याला दूर करता येतील काय. तेव्हा पोलिसांनी सांगितले की, तो सर्व लोकांच्या समोरच कबूल करेल, त्याप्रमाणे या आरोपीने या लोकांसमोर कबूल केले. मालेगावच्या बॉम्बस्फोटामध्ये कर्नल पुरोहित या मिलिटरीत काम करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात आली. मिलिटरीत काम करणारी व्यक्ती म्हटल्यानंतर कोणता खबऱ्या माहिती काढू शकेल, कोणालाही त्या व्यक्तिवर संशय येणार नाही. तसेच अशा लोकांची 100 टक्के माहिती मिळू शकत नाही. तरी सुध्दा आपला गुप्त वार्ता विभाग सक्षम असला पाहिजे म्हणून शासनाने काही उपाययोजना केल्या आहेत. मला एक गोष्ट माहिती आहे की, अलीकडच्या काळात कोर्टात चार्जशीट दाखल केल्यानंतर आपली जबाबदारी संपली अशी मनोवृत्ती वाढीस लागली. चांगला तपास करताना त्यात काही त्रुटी राहिल्या असतील तर त्या दूर न करता चार्जशीट दाखल केल्यानंतर पुन्हा त्या केसचे पुढे काय होईल, माझी बदली होईल आणि जो नवीन अधिकारी येईल तो पाहून घेईल, आपण बदलून जाऊ अशी भावना वाढीस लागली आहे. यानंतरच्या काळात इन्स्पेक्टरपासून तर वरिष्ठांपर्यंत सी.आर. लिहिताना त्यांनी तपास केलेल्या गुन्ह्यांमध्ये कन्व्हिक्शनचा रेट काय होता की नुसतेच डिटेक्शन झाले हा भाग तपासून बघितला जाईल व कन्व्हिक्शनचा रेट सुध्दा विचारात घेतला जाईल, अशा प्रकारे सीआरच्या सिस्टममध्ये बदल केले जातील.

माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्यांच्या भाषणात एक वाक्य उच्चारले, त्यांच्या त्या मताशी मी थोडासा सहमत आहे. ते म्हणाले की, पोलिसांचा गुन्हेगारांवर वचक राहिलेला नाही, दरारा राहिला नाही या त्यांच्या म्हणण्याशी मी थोडा सहमत आहे. पण हा वचक कशाने निर्माण

...3...



श्री. आर.आर.पाटील........

करावयाचा याचे उत्तर कधीतरी एकत्र बसून काढण्याची गरज आहे. त्यांनी अहमदनगर जिल्ह्यातील वीरगांवच्या घटनेचा उल्लेख केला, त्याच जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी एका दरोडा पडला होता. पोलिसांनी आरोपींना अटक केली व त्यातील एका महिला आरोपीने चालू गाडीतून उडी मारली होती. त्या केसमध्ये एक पीएसआय, एक पीआय व दोन पीएसआय तीन महिने जेलमध्ये होते. त्यांच्यावर 302 चे गुन्हे दाखल करण्यात आले होते. सर्व गावाने व पोलिसांनी एकत्र येऊन दरोडेखोरांना पकडत असताना दरोडेखोर कसा मरतो ही घटना वाशिम जिल्ह्यात घडली होती. त्या केसमध्ये सुध्दा एक पीआय, एक पीएसआय आणि एक कॉन्स्टेबल 302 च्या गुन्ह्याखाली अटक झाले होते. संपूर्ण गाव आणि पोलीस एकत्र होते. रात्रभर दरोडेखोरांचा पाठलाग करुन गावातील कोणत्या तरी व्यक्तिने दरोडेखोराला दगड मारला व तो दरोडेखोर जागेवरच मरण पावला. त्या केसमध्ये आज हे पोलीस अधिकारी तुरुंगात आहेत. अशा प्रकारे एका बाजूने आपणच असे नियम केले आहेत. दुसऱ्या बाजूने मात्र संपूर्ण देशात व जगात जेवढे मानवी हक्काचे लोक असतील त्यांची बेरीज केली तर आपल्या राज्याची बरोबरी जग करु शकणार नाही.

आज प्रत्येक गावा-गावात वेगवेगळ्या एनजीओज तयार झालेल्या आहेत. पोलिसांविरुध्द तक्रारी करण्यासाठी सगळेच पुढे येतात. आपण संरक्षणासाठी यंत्रणा तयार केल्या आहेत त्यांच्या भोवताली मात्र किती तरी निर्बंध उभे केले आहेत. हे बघून पोलिसांचा वचक कसा राहणार, दरारा का संपला याचे उत्तर याच सभागृहात चर्चा करुन शोधण्याची आवश्यकता आहे. केवळ टीका करुन चालणार नाही तरी सुध्दा मी सांगू इच्छितो की, चांगला हेतू ठेवून आपले कर्तव्य पार पाडीत असताना एखाद्या पोलीस अधिकाऱ्याकडून बोनाफाईड अशी मिस्टेक झाली असेल, चूक झाली तरी त्याची 100 टक्के पाठराखण करण्याची भूमिका शासनाच्या वतीने करण्यात येईल. मग त्यासंदर्भात कोणालाही टीका करु देत त्याला दाद न देता हेतू चांगला असेल त्या अधिकाऱ्याला पाठबळ देण्याची भूमिका ठामपणे स्वीकारण्यात येईल, मग त्यासाठी वाटेल ती किंमत द्यावी लागली तरी चालेल. एका बाजूला पोलिसांकडून चांगल्या कामाची अपेक्षा करावी आणि दुसरीकडून मात्र त्यांच्या हातून छोट्या चुका झाल्या तर त्यांच्यावर टीका करावी व त्यांचे नीतिधैर्य खच्ची करण्याचा

....4...



श्री. आर.आर.पाटील........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रयत्न करावा, हे कितपत योग्य आहे. म्हणून चांगला हेतू ठेवून काम करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांनी मोकळेपणाने काम करावे, त्यासाठी त्या अधिकाऱ्यांना योग्य संरक्षण देण्याची भूमिका स्वीकारुन शासन त्यांच्या पाठीशी उभे राहील.

महोदय, राज्यात नक्षलवादाचा प्रभाव वाढत असल्याच्या तक्रारी सुध्दा करण्यात आल्या. पण गेल्या सहा महिन्यातील घटना पाहिल्या तर गेल्या वर्षीच्या तुलनेत नक्षलाईट कारवायांमध्ये वाढ दिसेल. पण संपूर्ण देशात गडचिरोलीच्या घटना बघितल्या तर काय स्थिती असेल हे देखील विचारात घ्यावे लागेल. आज महाराष्ट्रातील नक्षलवादाचा विचार करीत असताना आपल्या शेजारच्याच छत्तीसगड मध्ये तर आपल्याच पक्षाचे कर्तृत्ववान मुख्यमंत्री आहेत. अहोरात्र काम करीत आहेत, तरी सुध्दा नक्षलवादाचे संकट अहोरात्र त्या राज्यासमोर आहे. मागील एका वर्षात नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात त्या राज्यात किती पोलीस कर्मचारी मृत्यू पावले, किती निरपराध्यांचे बळी गेले हे बघून आपल्या राज्याचे पोलीस दल नक्षलवादी कारवायांना कसे सामोरे जाते याची तुलना करुन टीका केली असती तर अधिक बरे झाले असते. त्याचबरोबर झारखंड व ओरिसा या राज्यांमध्ये काय परिस्थिती आहे हे सर्वांना माहीत आहे. आंध्र प्रदेशमध्ये या मोहीममध्ये यशस्वी झ ाल्याचा तसे बरे प्रमाण आहे. पण छत्तीसगडच्या तुलनेत विचार केला तर महाराष्ट्रात काही प्रमाणात हा नक्षलवाद आपण नष्ट करुन दाखविला. पण गडचिरोली जिल्ह्यातील काही तालुक्यांपुरताच हा प्रश्न सिमीत करण्यात आपले पोलीस दल व यंत्रणेने यश मिळविले आहे. अहोरात्र जी माणसे मरतात, अहोरात्र राबत आहेत ते करीत असलेल्या प्रयत्नांना मात्र "पोलीस काहीच करीत नाहीत" या एका फटकाऱ्याने डिमॉरलाईज्ड करण्याची भूमिका स्वीकारु नये, इतकीच माझी विनंती आहे. खूप चांगल्या पध्दतीने आपल्या राज्यातील पोलीस व जवान काम करीत आहेत, केंद्र शासनाने सुध्दा या कामी चांगले सहकार्य दिले आहे. हे सर्व केले तरी सुध्दा शेवटी सर्व लोकांना बरोबर घेऊन प्रशासकीय यंत्रणांनी काम केले तर यश मिळण्याची शक्यता असते. म्हणून येत्या काही दिवसात मोहल्ला समित्या आणि झोपडपट्टी पोलीस पंचायती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. कम्युनिटी पोलिसींग केल्याशिवाय पर्याय नाही. त्यासाठी पोलिसांनी जास्तीत जास्त लोकांमध्ये गेले पाहिजे, यादृष्टीने राज्य शासनाचे प्रयत्न राहतील. मोहल्ला समित्यांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक येणार नाहीत, याची दक्षता घेतली जाईल.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील .....

आणि तसे कोणी केलेच तर त्यासंदर्भात कठोर कारवाई करण्याच्या भूमिका स्वीकारल्या जातील. एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, या चर्चेचा फायदा घेऊन राज्यातील जनतेला मी काही विनंती आणि आवाहन करणार आहे. एका बाजूने आतंकवाद्यांचे अलर्ट रोज मोठया प्रमाणात येत आहेत. गेल्या वर्षी अधिकृत एजन्सीजने 447 इनपूट अलर्ट दिले होते. याचा अर्थ 447 ठिकाणी बॉम्बस्फोट होतील, आतंकवादी कारवाया होतील अशा प्रकारच्या इन्फॉर्मेशन अधिकृत रित्या मिळाल्या होत्या. एक इन्फॉर्मेशन मिळाल्यानंतर पोलिसांची झोप उडत असते. एका बाजूने अशा प्रकारच्या इन्फॉर्मेशन मिळाल्यानंतर आणि दुस-या बाजूने आपणही आपले कार्यक्रम, सण साजरे करण्यास कोठे तरी मेळ घालण्याची आवश्यकता आहे. सोमवारचा बंद आपण मागे घेतल्याबद्दल मी आपल्याला आणि शिवसेना कार्याध्यक्षांना धन्यवाद देतो. या विषयाच्या संदर्भात सरकारनेही सकारात्मक पाऊले टाकली आणि आपणही अशा प्रकारचे एकदा पाऊले उचलल्यानंतर मागे येत नाही याचा अनुभव आहे. यासंदर्भात काहीही असले तरी आपल्या पक्षाला व पक्षाच्या नेत्यांना मी जाहीरपणे धन्यवाद दिलेले आहेत. माननीय रावते साहेब यासंदर्भातील भावना आपण आपल्या नेत्यांना जरुर सांगाव्यात. राजकीय पक्षाने कार्यक्रम घेतांना काही वाजवी कार्यक्रम घेतले पाहिजेत. महाराष्ट्रामध्ये आपल्यचा पोलीस दलाला डिटेक्शन पेक्षा लॉ अँड ऑर्डरवर जास्तीची ताकद खर्ची करावी लागत आहे. जितके मोर्चे जास्त निघतात तितकी लॉ अँड ऑर्डरची परिस्थिती खराब होत जात असते. आपले सण बघितले तर आपल्या श्रावण महिना अनेक सण येतात. इलेक्शनला लागणार नाही त्यापेक्षा जास्त बंदोबस्त गणेशोत्सवाला लागतो. संख्येने मर्यादित असलेल्या पोलीस यंत्रणेवर किती ताण टाकावयाचा याबाबतीत सर्वांनी संयम ठेवला आणि पोलिसांना सहकार्य करण्याची भूमिका घेतली, स्वयंशिस्त राखली तर अनेक चांगल्या गोष्टी होऊ शकतात. सुप्रीम कोर्टाने दिलेले निर्णय पोलिसांना मानावे लागतात. रात्री दहा वाजेच्या पुढे स्पीकर्स लावू नये याबाबतीत सुप्रीम कोर्टाने आदेश दिलेले आहेत. सुप्रीम कोर्टाने आदेश काढल्याबरोबर ते आदेश प्रत्येक राज्याला राबवावे लागतात. त्यात आपल्याकडे एनजीओंची संख्या इतकी वाढलेली आहे की, प्रत्येकाच्या हातात

श्री. आर.आर.पाटील .....

मोबाईल आहेत. दहा वाजून एक मिनिट झाले की, जसे ढोल वाजवणारे नेटाला येतात त्याप्रमाणे फोटो काढणारे पुढे येतात आणि थेट फोटो वरिष्ठांना पाठविले जातात. त्यामुळे पोलिसांना कारवाई करणे भाग पडते. काहीही कारण नसतांना पोलिसांना लोकांचा रोष पत्करावा लागतो. अलीकडच्या काळात नवीनच प्रथा सुरु झालेली आहे. रात्री दहाच्या पुढे गणपतीची मिरवणूक जेथे असेल तेथेच गणपती ठेवून ते घरी निघून जातात. गणपतीची विटंबना झाली की, पुन्हा लॉ अँड ऑर्डरचे प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून गणपतीची मिरवणूक काढणारे घरी जरी गेले तरी पोलिसांनी घरी जावयाचे नाही तर त्यांना गणपती राखत बसावे लागते. हे लोक घरी जाऊन, खाऊन पिऊन सकाळी 10 वाजता पुन्हा येतात आणि वाजवावयास सुरुवात करतात. पोलीस तेथेच राहतो. कधी तरी या अँगलने आपण विचार करणार आहोत की, नाही? राज्यात चो-या, दरोडे, आतंकवादी हल्ले वाढत आहेत अशी टिका आपण करीत असू आणि त्यांच्यावर केसेस घातल्या की, विधानसभेत, विधानपरिषदेत गुन्हे परत घ्या म्हणून मागणी केली जाते. लोकशाही प्रक्रियेमध्ये विरोधकांचाही सन्मान करावा लागतो. त्यांच्या सूचना ऐकाव्या लागतात. गुन्हे परत घेतल्यानंतर पुढील वर्षी वाजवावयास हे मोकळे होतात परंतु त्याचा कोणी विचार करीत नाही. कोठे तरी पोलीस दलावर किती ताण टाकावयाचा, त्यांनी किती सहन करावयाचे याबाबतीत जर प्रत्येकाने विचार केला तर निश्चितपणे चांगल्या गोष्टी होऊ शकतील. सर्वसामान्य नागरिक पोलीस स्टेशनमध्ये जातांना खुषीने जात नाही परंतु गेलाच तर त्याला योग्य मार्गदर्शन मिळावे, तेथेही त्याचे स्वागत करावे, लोकशाहीमध्ये तो मालक आहे म्हणून सर्व पोलीस स्टेशनमध्ये स्वागत कक्ष तयार केले जातील. कुठलाही नागरिक पोलीस स्टेशनमध्ये गेल्यावर त्याचे स्वागत करुन, शांतपणे तक्रार ऐकून घेतली जाईल व योग्य अधिका-याकडे त्याची शिफारसही केली जाईल. नागपूर व चंद्रपूरमध्ये हा प्रयोग केला असून त्याचे चांगल्या प्रकारचे रिझल्ट्स मिळालेले आहेत. टप्प्या टप्प्याने राज्यात सगळीकडे चांगल्या प्रकारे कायद्याचे पालन करणारा नागरीक खुषीने पोलीस स्टेशनमध्ये जाईल अशा पध्दतीचे वातावरण आम्ही निर्माण करु. आपणही थोडेसे आम्हाला सहकार्य करा. माननीय फुंडकर साहेब, थोडया काही त्रुटी राहत असतील तर

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील .....

राज्यात सर्व काही बिघडले आहे, सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झालेला आहे असे काही नसते. राज्यात एकही गुन्हा घडला नाही तर सगळयात जास्त आनंद कोणाला होईल हे आपण सुध्दा जाणतातच. वीरगावसारखी घटना सर्वांच्याच मनाला क्लेश देणारी आहे. या सर्व घटना केवळ पोलिसांच्या अकार्यक्षमतेमुळे होत आहेत अशी स्थिती नाही.

नक्षलवादाची कारणे शोधतांना त्या भागात विकास झाला नाही, गरिबी राहिली, शिक्षण नाही, एका वर्गाने हातामध्ये बंदूका घेतल्या त्या ठिकाणी कोणतीही डेव्हलपमेंट झाली नाही. यामध्ये आमच्या सिस्टीमचा काहीच दोष नव्हता. महाराष्ट्रात काही जमाती आहेत परंतु त्या जमातींचा मी येथे उल्लेख करणार नाही. या जमातींना कोणतेही गाव आपल्या गावात सामावून घेत नाही, मतदार यादीमध्ये त्यांची नावे नाहीत, त्यांच्याकडे रेशनिंगचे कार्ड सुध्दा नाही, जनगणनेमध्ये नोंद नाही, उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. शिक्षण नसल्यामुळे नोकरी नाही. समाजामध्ये पत नाही. त्यांना मारायचा पोलिसांना अधिकार नाही अशा स्थितीमध्ये दोन पध्दतीने विचार करण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. टकले साहेबांनी मोजक्या शब्दात सांगितले आहे की, एका बाजूने आपण आपली कायदा व सुव्यवस्था मजबूत करीत असतांना पोलीस दल सक्षम करीत असतांना आपली जी दु.खे आहेत व आपले जे प्रश्न आहेत ते सोडवण्यासाठी आपण जर प्राधान्य देऊ शकलो आणि दोन्ही बाजूने प्रयत्न केला तर या गोष्टी चांगल्या पध्दतीने होऊ शकतील. माणसे कमी शिकली व गरीब असली म्हणजे वाईट वागतात असे काही नाही. कधी कधी माणसांवर चांगले संस्कार होत नाहीत. आज चांगले संस्कार करणारे शिल्लक राहिलेले नाहीत. पाठीमागच्या काळात जे थोडेफार चांगले संस्कार करीत होते ते राजकारणात आल्यामुळे तेथे संस्कार करण्याचे काम, नैतिक मूल्ये, नैतिक अधिष्ठान निर्माण करण्याचे काम जवळ जवळ ठप्प झाले आहे. आषाढी एकादशीच्या दिवशी माननीय मुख्यमंत्र्यांच्या पत्नीची पर्स चोरीला गेली होती. पर्स चोरणारा आरोपी पोलिसांनी पकडला आहे. परंतु मला दुसरा धक्का बसला की, हा आरोपी इंजिनिअर आहे, बडया घरातील आहे. त्याला चोरी करण्याची दुर्बुध्दी का सुचली हे मला कळत नाही. पण एवढा शिकलेला अशी चोरी करावयास लागला तर कसे होणार ?

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील .....

सभापती महोदय, परिस्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी, सिस्टीममध्ये दुरुस्ती करण्यासाठी विरोधकांनी जरुर टिका केली पाहिजे परंतु चांगला मार्ग सुध्दा त्यांनी दाखवला पाहिजे, उपायही सांगितले पाहिजेत. तावडे साहेब आपण केवळ एकतर्फीच तलवार चालविण्याचे काम करीत आहात. विरोधकांनी जबाबदार विरोधकांची भूमिका सुरक्षिततेच्या प्रश्नावर मांडली पाहिजे. गुजरातला स्फोट झाल्यानंतरची भाजपच्या नेत्यांची येथून तेथून वक्तव्ये बघितली तर गुजरातचे संकट हे राष्ट्रीय संकट आहे आणि मुंबईमध्ये स्फोट झाल्यानंतर मुख्यमंत्री हाय हाय. हा दुटप्पी पणा निश्चितपणे बरा नाही. राष्ट्रापुढील जी संकटे आहेत ती राष्ट्रापुढचीच राहिली पाहिजेत. आपल्या राज्यामध्ये आपण सत्तेवर नसून विरोधी बाकावर असल्यामुळे पोलीस यंत्रणेवर टीका करणार परंतु लोकशाहीमध्ये माणसे बोलण्याऐवजी खुर्च्या बोलतात. जेव्हा माननीय गोपीनाथ मुंडे उपमुख्यमंत्री होते त्यावेळेस आज पोलीस दलामध्ये जे लोक काम करीत आहेत तेच लोक तेव्हाही पोलीस दलामध्ये काम करीत होते. आम्ही विरोधी पक्षात होतो त्यावेळेस मी सुध्दा टीका करीत होतो. मी गृहमंत्री झालो आणि त्या बाजूला गोपीनाथ मुंडे गेल्याबरोबर ते पोलिसांवर टीका करावयास लागले. खुर्च्या बदलल्या की, भूमिका बदलतात. आज अनेक गोष्टी राज्यासमोर अवाहन म्हणून उभ्या राहिलेल्या असतांना तुम्ही, आम्ही ख-या अर्थाने एकत्र येऊन या परिस्थितीवर मात कशी करता येईल याबाबतीत विचार करण्याची आवश्यकता आहे.

सुरक्षिततेच्या प्रश्नाच्या बाबतीत आपण राजकीय भूमिका घेऊ नये, जबाबदार भूमिका घ्यावी. त्रुटी राहत नाहीत असा सरकारचा दावा नाही. परंतु जेथे त्रुटी, उणिवा आहेत त्या दूर करण्यास सरकार एका पायावर तयार आहे. आपण सर्व मिळून प्रयत्न करु या . पोलीस दलावरील ताण वाढणार नाही. त्यादृष्टीने आपण जेवढी मदत करु शकू तेवढी करु या. ताण न वाढता जेवढे राजकारण करता येईल तेवढे विरोधक म्हणून आपण जरुर करावे. विरोधी पक्ष नेत्यांनी वीरगावच्या घटनेचा उल्लेख केला आहे. यामध्ये सहा आरोपी निष्पन्न झालेले असून पोलिसांनी शिताफीने 4 आरोपी पकडले आहेत. मुंबई बॉम्बस्फोटामध्ये 26 लोकांचा मृत्यू झालेला आहे. या केसएवढी कुठलीच प्रायोरिटी पोलीस दलाच्या दृष्टीने असूच शकत नाही. आम्ही सुध्दा काही धोरणे ठरवलेली आहेत. राज्यामध्ये

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

अनेक कामे असली तरी आतंकवाद, नक्षलवाद, या दोन गोष्टी आमच्या टॉप प्रॉयोरिटीवर राहतील. गॅंग ॲक्टीव्हीटी नेस्तनाबूत करणे या गोष्टीला देखील आमचे प्राधान्य राहील. IPC खालील जेवढे गुन्हे आहेत याकडे देखील प्रत्येक पोलीस ठाणे बारकाईने लक्ष ठेवून आहे. चारही बाजूने आपले राज्य सुरक्षित करण्याच्या दृष्टीने आपण ज्या काही सूचना केल्या आहेत त्या दृष्टीने प्रयत्न केले जातील. आपल्या ज्या योग्य सूचना आहेत त्या आम्ही जरूर पाळू. येथे अवेळी राजकीय टीका करण्यात आलेली आहे अशा सूचनांकडे थोडेसे दुर्लक्ष करून कोठेही नाउमेद न होता महाराष्ट्र देशामध्ये सुरक्षितच राहील या दृष्टीने आम्ही प्रयत्न सुरू ठेवलेले आहेत. भविष्यात देखील ते सुरू राहतील. आपले राज्य असुरक्षित आहे, महिला असुरक्षित आहेत, आकडेवारी न बघता किंवा आकडेवारी माहीत असून सुद्धा राजकीय दृष्टीने टीका केल्याने आपल्या राज्याची बदनामी होईल असे कोणी वागू नये असे आवाहन मी या निमित्ताने करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांचे भाषण ऐकल्यानंतर मला माझे शाळेतील दिवस आठवले. परीक्षेचा निकाल लागल्यानंतर मी निकाल पाठीमागे धरायचो. मी माझ्या वडिलांना अण्णा म्हणतो. परीक्षेचा निकाल लागल्यानंतर मी अण्णांना म्हणायचो, काळ्यांचा शंकर तीन विषयात नापास झाला, अण्णा, अत्र्यांचा नितीन एका विषयात नापास झाला. मला 35 टक्केच गुण असायचे. पण माझे 35 टक्के गुण लपविण्यासाठी मी अशी उदाहरणे द्यायचो. त्याचप्रमाणे माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी छत्तीसगडला अमुक झाले, गुजरातला तमुक झाले असे सांगितले. त्यामुळे श्री.टकले साहेब, मला माझ्या शाळेतील दिवस आठवतात. मी माझा निकाल सर्वात शेवटी सांगायचो. मग माझे वडील म्हणायचे अरे वा, आपले पोरगं पास झाले ना. मी गेली आठ वर्षे या सभागृहात आहे. दरवेळी छत्तीसगडला हे झाले, गुजरातला हे झाले असे सांगितले जाते. त्यामुळे आता आपण गृह विभागाची चर्चा स्टॅटीस्टीकवर ठेवू या. ज्यावेळी तेथील गुन्हे कमी झाले असे निदर्शनास आणतो त्यावेळी आपण तेथील लोकसंख्येचा आधार घेता. येथील लोकसंख्येचा आधार घेऊन पोलीस संख्या कमी आहे असे दाखवायचे. स्टॅटीस्टीक आपण दाखवू तसे करतो.

मी माझा भाषणात स्पेसिफिक डान्स बारची नावे घेतली. मी पोलिसांच्या दोन घटना नजरेत आणल्या. जे आपण बंद केले होते ते पुन्हा सुरू झालेले आहे. मी गेल्या अधिवेशनात दोन स्पेसिफिक स्मगलर्सची नावे घेतली होती. मुंबई कमिशनर पर्यंत, सीआयडी पर्यंत प्रकरण चौकशीसाठी गेले होते आणि ते थांबले. मी स्पेसिफिक बोललो होतो. आम्ही येथे कुठल्याही अधिकाऱ्याच्या विरोधात टीका करीत नाही. आम्हाला असे वाटते की, गृह मंत्री या नात्याने आपण अधिक चांगले परफॉर्म करू शकता. त्यामुळे आम्ही थोडासा चिमटा घेतो. तो चिमटा कळवळा येई पर्यंत घेत नाही. केवळ दुरूस्त होण्या पुरताच घेतो. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.भाऊसाहेब फुंडकर यांनी भाषण सुरू केल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले बोलत आहेत व सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते बोलण्यास उभे राहिले की, सन्माननीय सदस्य श्री.बिनसाळे बोलत आहेत. असे आपण गृहीत कसे काय धरता ? जर आपली तशी अपेक्षा असेल तर

..3

श्री.विनोद तावडे...

मग आम्ही असे प्रस्ताव कशाला द्यायचे? माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्याकडे शब्द कौशल्य आहेच. डान्सबारचा उल्लेख केला की ते म्हणतात की त्यासाठी वेगळी ब्रांच आहे. आता त्यांनी येथे सणांसंबंधी उल्लेख केला. पण त्यासाठी देखील वेगळी ब्रांच आहेच ना. त्यामुळे उद्यापासून सगळेच सण बंद केले पाहिजे. कारण सण साजरे केल्यामुळे पोलिसांवर खूप तणाव येतो. पुण्याला एखाद्या ठिकाणी गणपती विसर्जनाची मिरवणूक थांबवली असेल. तो प्रकार नक्कीच चुकीचा आहे. लाखो गणपतींचे विसर्जन होत असते. आपल्या भाषणातून असे वाटते की, पोलिसांवर ताण पडतो म्हणून यापुढे गणपती उत्सव नकोच, मोहरम नकोच. आताच आपण 44 हजार पोलीस वाढविले आहेत. मागच्या वेळी सांगितले की, त्यांना प्रशिक्षण द्यायचे आहे. म्हणजे एका शिपायाला विचारायचे की, तू लढत का नाही ? तो म्हणतो की, काय करू हातामध्ये तलवार आणि ढाल आहे. त्यामुळे लढणार कसा. आपण पोलीस फोर्स वाढवला आहे ही चांगली गोष्ट आहे. त्यामुळे कृपा करून आमची टीका ही राजकीय नव्हती हे आपण प्रथम लक्षात घ्यावे. आपण बॉम्बस्फोटावर चर्चा का घेतली ? राजकीय दृष्टया आपण या एका विषयावर एक आहोत म्हणूनच घेतलेली आहे. आतकंवादा विरूद्ध आपल्या सर्वांना एकत्रितपणे लढायचे आहे म्हणूनच ही चर्चा घेतलेली आहे. आपण आजही आणि मागेही श्री.राज पुरोहित यांचा उल्लेख केला. जी.टी.हॉस्पिटलमध्ये बर्न वॉर्ड नाही त्यामुळे तेथील पेशंट जे.जे.हॉस्पिटलमध्ये शिफ्ट करावे अशी मागणी नातेवाईक करीत होते. पण प्रशासन ऐकत नसल्यामुळे त्यांनी तसा प्रयत्न केला. आपण येथे संसदेचा उल्लेख केला. ज्यावेळी श्रीमती सोनिया गांधी आणि अन्य नेत्यांनी मत व्यक्त केले तेव्हा श्री.माकन यांनी तेथे निदर्शने केली होती. त्याची सीडी माझ्याकडे आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते सर्वश्री एकनाथ खडसे व श्री.पांडुरंग फुंडकर यांनी वक्तव्य केले की, आज पोलिसांसमवेत राहिले पाहिजे. हे आपण विसरलात. त्याचा उल्लेख आपण केला नाही. आपण श्री.राज पुरोहित यांचा उल्लेख केला. संसेदवर हल्ला झाला होता त्यावेळी श्रीमती सोनिया गांधी व श्री.शरद पवार यांनी केलेल्या वक्तव्याचा उल्लेख येथे केला. त्यावेळी तेथील कॉंग्रेसच्या स्थानिक नेत्याने काय केले त्याचा उल्लेख आपल्या भाषणात केला नाही. आपण विचार करताना सर्वकष करू या. एकत्रितपणे विचार करू या. अकोल्याची घटना आणि उद्या भ्रूण हत्येवर चर्चा होणार

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

आहे ती खरोखरच क्लेशदायक आहे. सावित्रीबाई फुले आणि कर्वे यांच्या महाराष्ट्रात लाज वाटाव्यात अशा घटना वाढतात. म्हणून त्या प्रकारचा कन्सर्न मी व्यक्त करतो. विरोधी पक्षाचा कन्सर्न हा विधायक आहे. आपल्या बोलण्यातून आम्ही विरोधासाठी विरोध करतो असे आपण भासविले. आपण मागची सगळी भाषणे काढून पाहू या. आजची आपण सगळी भाषणे काढून पाहा. त्यात रिपीटीशन काही नव्हते. बॉम्बस्फोटासंबंधी आम्ही जास्त काही बोललो नाही. असे असताना अधिक सकारात्मक उत्तर आपण द्याल असे वाटले होते. ज्या काही चुका झालेल्या आहेत त्या आपल्या सारख्या उमद्या मंत्र्याने स्वीकारायला हव्यात. आपणच म्हणाला होता की, गुन्हेगार आता स्मार्ट झाले आहेत. तेच आम्ही येथे मांडले. माझ्याकडे आपले अधिवेशनातील शब्दशः कार्यवृत्त आहे. त्यात गुन्हेगार स्मार्ट असल्याचा उल्लेख आहे. त्यामुळेच आम्ही म्हटले की, गुन्हेगार स्मार्ट असतील तर आमचा गृह मंत्री ओव्हर स्मार्ट असला पाहिजे. पण ओव्हर स्मार्टपणा विरोधकांवर दाखवून काय फायदा. तो गुन्हेगारांवर असला पाहिजे. एवढेच आमचे म्हणणे आहे. महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था अधिक चांगली व्हावी अशी आमची इच्छा आहे. सामान्य माणसाला कायद्याचे राज्य आहे असे वाटले पाहिजे. त्यातून त्याला आनंद मिळाला पाहिजे एवढेच आम्हाला वाटते. श्री.आर.आर.पाटील यांच्यावर व्यक्तिगत टीका करणे हा आमचा अजिबात उद्देश नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, टीका करणे हा आपला उद्देश नसेल तर मी आपला आभारी आहे. आपण सणांच्या बाबतीत उल्लेख केलेला आहे, पण माझा तसे म्हणण्याचा उद्देश नव्हता. सण लोकांनी आनंदाने साजरे केले पाहिजेत. पण पोलीस प्रशासनाला आवश्यक तेवढे सहकार्य देखील केले पाहिजे. आवश्यक असलेला बंदोबस्त सणामध्ये ठेवला जाईल व सुरक्षिततेची हमी दिली जाईल. सण साजरे करायला राज्य शासनाकडून कुठलेही निर्बंध असणार नाहीत. गुन्हेगार स्मार्ट आहे हे आपण कोणत्या प्रोसिडींगमधून काढून आणले ते मला जरा दाखवाच. मी असे म्हटले होते की, काही वेळा गुन्हेगार हुशारीने पुरावे मागे ठेवत नाहीत. त्यामुळे तपास यंत्रणांना वेळ लागतो. टीव्हीवर स्ट्रीप आली की, पोलिसांपेक्षा गुन्हेगार हुशार आहेत. (अडथळा) दैनिक सामन्यामध्ये एवढी सुधारणा झाली आहे की, त्यांनी पहिल्या पानावर माझा फोटो छापला. या दुरूस्तीला दाद दिली पाहिजे.

..5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील माहिती गोळा करण्यामध्ये अत्यंत वीक आहेत. माननीय गृह मंत्र्यांनी पोलीस महासंचालक, पोलीस आयुक्त यांना विचारावे की, गणपती, मोहरम, वर्ल्डकप साठी चांगला बंदोबस्त ठेवल्यामुळे मी माझे लेखी पत्र व SMS यांना पाठविलेले आहेत. आम्ही त्यांचे कौतुक करतो.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, अभिनंदनाची पत्रे त्यांना आणि टीका करायला मी. त्यामुळे यापुढे निदान सन्माननीय सदस्यांनी त्या पत्राची एक प्रत तरी मला पाठवावी.

**उप सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

....

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>नियम 93 च्या सूचने वरील निवेदन चर्चेला घेण्याबाबत</u>**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती त्या संदर्भात पाचव्या क्रमांकाचे निवेदन होते. मला असे सांगण्यात आले होते की, म.वि.प.नियम 260 अन्वये स्त्री भ्रूण हत्येसंबंधीचा प्रस्ताव आजच्या कामकाजात दाखविलेला आहे. त्या प्रस्तावावर आज चर्चा होणार आहे. त्यामुळे माझे नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन पुढे गेले. आज या प्रस्तावावर चर्चा होणार नाही असे दिसते. त्यामुळे कमीत कमी नियम 93 च्या सूचनेवरील निवेदनावर चर्चा व्हायला पाहिजे होती.

**उप सभापती** : आपल्या सूचने वरील निवेदन पुन्हा विचारात घेऊ एवढेच मी आपणास सांगतो.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** ....

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 3. ऑगस्ट, 2011 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक संध्याकाळी 6.00 वाजता, बुधवार, दिनांक 3.8.2011 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही